ल्युसी माँड माँटगोमरी

# ॲन ऑफ ग्रीन गेबल्स



अनुवाद
गायत्री साळवणकर

ग्रीन गेबल्सची ॲनी: एक मनस्विनी

a

# ग्रीन गेबल्सची ॲनी

## एक मनस्विनी

## लेखिका- लुसी मॉड मॉँटगोमेरी

## अनुवाद - सौ.गायत्री साळवणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# Anne of Green Gable

# Novel by Lucy Maud Montgomery

# ग्रीन गेबल्सची ॲनी: एक मनस्विनी

मराठी अनुवाद **अनुवादीका: सौ.गायत्री साळवणकर**

172/ब, 'केदार,' जवाहरनगर,

कोल्हापूर, 416012,

महाराष्ट्र.

इमेल: gayatri.salvankar@gmail.com

मोबाईल क्रमांक: 8446800213

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

a

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १२ ऑक्टोबर २०२४

©esahity Pratishthan®2024

या पुस्तकाच्या छापिल प्रतींसाठी आपण **सौ.गायत्री साळवणकर यांच्याशी** 8446800213 या क्रमांकावर संपर्क करावा

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फा ॅरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अनुवादिका परिचय

## सौ. गायत्री गिरीश साळवणकर



पुर्वाश्रमीची मी, उज्वला दिगंबर गुहागरकर,

जन्म: 16 जानेवारी 1963

शिक्षण: BCom.

पत्ता: 172/ब, 'केदार,' जवाहरनगर, कोल्हापूर, 416012, महाराष्ट्र.

माझा हा अनुवाद करण्याचा हा दुसरा प्रयत्न आहे. जेन आयर हा पहिला. **कव्हरवर क्लिक केल्यास ते उघडेल**. काही बाल कविता आहेत. दै. लोकसत्तामध्ये नियमितपणे 'लोक मानस' सदराखाली पत्रलेखन केले आहे. 6 में 2023च्या, लोकसत्ता चतुरंग पुरवणी मध्ये 'सोने चांदी आम्हा मृत्तिके समान' हा आपल्या शिक्षकांप्रती आदरभाव प्रगट करणारा लेख, तसेच 'दृष्टी आणि कोन''या सदराखाली लेख प्रसिद्ध




दिनांक 12 जून 2023 रोजी आकाशवाणी कोल्हापूर वर "माझे जीवन गाणे" या सदरात मुलाखत प्रक्षेपित

'स्वांत सुखाय' या ब्लॉगवर काही स्फुट लेखन प्रसिद्ध केले आहे. https://swantsukhay2245533.wordpress.com/

मला सकस, वैचारिक वाङ्मयाची विशेष आवड आहे.

# थोडक्यात पुस्तक परिचय

ॲन ऑफ ग्रीन गेबल्स ही कॅनेडियन लेखिका लुसी मॉड माँटगोमेरी यांची 1908 सारी प्रकाशित झालेली कादंबरी, जगभरातील असंख्य वाचकांच्या पसंतीस उतरलेली एक उत्कृष्ट कादंबरी मानली जाते, तिचा मराठी भावानुवाद:

ग्रीन गेबल्सची ॲनी: एक मनस्विनी

कॅनडाच्या प्रिन्स एडवर्ड आयलंडवरील ग्रीन गेबल्स फार्ममधील मारिला आणि मॅथ्यू कथबर्ट हे वयस्कर अविवाहित बहिण भाऊ, शेतीच्या कामात मदतीला येईल म्हणून एक मुलगा दत्तक घेण्याचा निर्णय घेतात, तसा तोंडी निरोप देताना ऐकण्यात चूक होते आणि अनाथाश्रमातून लाल रंगाचे केस असलेली, अकरा वर्षांची ॲन शर्ली पाठवली जाते. झालेल्या चुकीच्या दुरुस्तीसाठी तिला परत पाठवण्याची तयारी सुरू होते, तोपर्यंत बहिण भावाच्या जोडगोळी पैकी भावाचे- मॅथ्यूंचे, हृदय त्या निरागस, स्वच्छंदी, स्वप्नाळू मुलीने अर्धेअधिक जिंकलेले असते. मारिलाचे कर्तव्यकठोर मन, त्या मुलीची करुण कहाणी ऐकल्यावर आणि तिच्या स्वतःच्या नकारामुळे, त्या मुलीचे संपूर्ण भवितव्य अंधकारमय होण्याची शक्यता दिसल्यावर विरघळून जाते.

त्या मुलीचा लोकविलक्षण धांदरट स्वभाव, सौंदर्यसक्त मन, अंगभूत हुशारी, जिज्ञासू वृत्ती, खंबीरपणा, प्रसंगावधान आणि तिच्या कल्पनाशक्तीच्या उत्तुंग भराऱ्या पाहून अचंबित व्हायला होते. तिचे जीवनावरील, निसर्गावरील आणि पुस्तकांवरील प्रेम, सर्वांच्या हृदयाला स्पर्श करते.

a

अल्लड किशोरी अशा ॲनीचे, एका समंजस, जबाबदार युवती मध्ये होणारे रूपांतर पाहताना उमलत्या कळीचे फुलात रुपांतर झाल्याचे पाहिल्याचा भास होतो. प्रामाणिकपणा, नैतिकता, श्रम प्रतिष्ठा आणि मैत्री या मुल्यांचे महत्वही त्याबरोबर स्पष्ट होते.

गेल्या 115 वर्षांत या कादंबरीच्या 5000 पेक्षा जास्त आवृत्त्या निघाल्या आहेत आणि जगभरात 50 दशलक्ष प्रती विकल्या गेल्या आहेत, 36 पेक्षा जास्त भाषांमध्ये ही कादंबरी अनुवादित झाली आहे. मराठी मध्ये बहुदा पहिल्यांदा अनुवादित होत असावी.

या कादंबरीवर आधारित चित्रपट, दूरदर्शन मालिका, ॲनिमेटेड आणि ॲक्शन मालिका, नाट्यप्रवेश असे वेगवेगळे प्रयोग कॅनडा, युरोप मध्ये होत आले आहेत आणि जपानमध्ये तर दरवर्षी संगीत नाटक निर्मिती केली जाते.

अलीकडे नेटफ्लिक्स मालिका 'ॲन विथ एन ई' ला प्रेरणा मिळाली आहे.

# **अर्पण पत्रिका**

चि. अर्णव, चि. रियान आणि चि. इरा
या माझ्या लाडक्या नातवंडांना आजीची सप्रेम भेट

# मनोगत

दोन एक महिन्यांपूर्वी 'जेन आयर' या कादंबरीचा अनुवाद पूर्ण केला आणि काहीशी रिकामीपणाची भावना जाणवू लागली. पुन्हा एकदा प्रयत्न करून पहावा म्हणून शोध घेऊ लागले तर अचानक 'ॲन ऑफ ग्रीन गेबल्स' सामोरी आली आणि पहिल्याच भेटीत हा अनुवाद करण्याचे मनाशी पक्के केले.

अनुवाद करताना 'वृध्दत्वी निज शैशवास जपणे हा कवीचा बाणा असे', या उक्तीप्रमाणे आपणही किंचित कवी असल्याचे समाधान वाटले. तिच्याबरोबर संवाद साधताना, माझ्या बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या. जीवाभावाच्या मैत्रीणी, शाळेतील लहान मोठी भांडणे, वेगवेगळया स्पर्धांमध्ये हिरीरीने घेतलेला सहभाग, वार्षिक परीक्षा तर सोडाच पण आठवड्याच्या चाचणी परीक्षेत पण अर्ध्या मार्कासाठी शिक्षकांशी घातलेली हुज्जत, ॲनीच्या दुखावलेल्या पायाप्रमाणे ऐन शाळेच्या गॅदरिंगच्या रंगीत तालीमीच्या वेळी मोडून घेतलेला हात आणि पुढील संपूर्ण दिड महिना माझी प्रिय मैत्रीण सकाळ संध्याकाळ माझे दप्तर स्वतः घेऊन मला घरापर्यंत सोडत असे. ॲनी आणि डायना प्रमाणे अर्ध्या रस्त्यापर्यंत सोडायला म्हणून जाऊन परत अर्धा तास बोलत थांबणे नेहमीच घडत असे. या सर्व गोष्टी एखाद्या चलचित्राप्रमाणे डोळ्यासमोर साकार झाल्या.

ॲनीला जसे तिच्या लाल रंगाच्या केसांचे वैषम्य वाटत असे, तसे वैषम्य मला इतर मुलींच्या लांब वेण्या पाहून वाटत असे. काहीजणी सांगायच्या की टायफाईड मध्ये केस गळाले आणि नंतर एकदम वाढले, हे ऐकून आपल्याला एकदाचा टायफाईड व्हावा आणि केस गळून जाऊन परत लांब केस व्हावेत अशी आशा कित्येक दिवस मी मनाशी बांधून ठेवलेली होती. डेंटिस्ट कडे गेल्यावर दात, दाढा काढल्यावर आईस्क्रीम मिळते आणि ती खुर्ची बरीच वेगळी असते हे ऐकून,

a

तो अनुभव घेण्याची आणि उगाच भाव मारण्यासाठी डोळ्याला चष्मा लागायला हवा, अशा दोन बालपणीच्या इच्छा वयाच्या चाळिशीत पूर्ण झाल्या.

या पुस्तकाच्या लेखिका ल्युसी मॉड मॉंटगोमरी यांनी 'ॲनी' या नायिकेला केंद्रस्थानी ठेवून या नंतर आठ कादंबऱ्या लिहिल्या असून तिच्या आयुष्याशी कथा त्यात पुढे चालू ठेवली आहे.

ग्रीन गेबल्स फार्महाऊस, प्रिन्स एडवर्ड आयलंडच्या कॅव्हेंडिश येथे आहे, त्याची उत्तमप्रकारे जपणूक करून त्याच्या आजूबाजूचा परिसर, जो या कादंबरीत वर्णन केला आहे तो देखील आजतागायत तसाच राखला असून तो परिसर ग्रीन गेबल्स म्युझियमचाच एक भाग म्हणून संरक्षित केला आहे. ॲनीच्या चाहत्यांचे पर्यटन, हा या बेटाच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग असून, या कादंबरीवर आधारित वस्तूंचा, स्मृतीचिन्ह म्हणून तिथे सर्वात मोठा व्यापार चालतो. जपानमध्ये 1952 पासून शालेय अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश केला असून तिथे कादंबरीत वर्णन केल्याप्रमाणे एक थीम पार्क बनवला आहे.

इ.स. 1908 सालची ही कादंबरी पब्लिक डोमेन मध्ये असल्याने भाषांतरासाठी लेखिकेच्या वारसांची परवानगीची आवश्यकता नाही. परंतु काही गोष्टी स्पष्ट व्हाव्यात म्हणून मी त्यांच्याशी संपर्क साधला तेव्हा त्यांनी त्वरित उत्तर देऊन सर्व खुलासा तर केलाच आणि या अनुवादाची एक प्रत त्यांच्या लायब्ररीत मराठी अनुवाद म्हणून पाठवण्याची सूचना केली.

असो, नमनाला घडाभर तेल लागायचे तेव्हा आता आटोपते घेते. आपल्याला ॲनी कशी वाटली हे सांगायला विसरू नका.

पुन्हा भेटू,

गायत्री साळवणकर

# ग्रीन गॅबल्सची ॲनी

## प्रकरण 1

मिसेस रेचेल लिंड यांचे घर, ॲव्हनली गावचा मुख्य रस्ता जिथे संपतो आणि ॲल्डरचे वृक्ष आणि फ्यूशियाची वाढलेली झुडपे यांनी भरून गेलेले माळरान सुरू होते, बरोबर त्याच ठिकाणी उभे होते.

ओल्ड कथबर्ट जंगलाचा तो शेवटचा भाग होता. जवळच कथबर्ट जंगलातून वाहत आलेला ओढा, आता तिथून शांतपणे वाहताना दिसत होता. त्याचा अवखळपणा, जोश आता खूपच थंड पडलेला दिसून येई. तसे त्याच्यावर मिसेस रेचेल नेहमीच खिडकीतून लक्ष ठेवून असत. त्यांच्या भीतीने म्हणा किंवा धास्तीने, बिचाऱ्याला निमुटपणे शहाण्यासारखे वागणे भाग होते. आजूबाजूच्या लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत आणि ओढ्यापासून ते झाडावरच्या फुलाफळांवर त्यांची बारीक नजर असे. जरा जरी थोडे वेगळे दिसले तरी त्याचा पाठपुरावा केल्याशिवाय त्या स्वस्थ बसत नसत.

ॲव्हनली गावात अशी बरीच माणसे होती की जी स्वतःची कामे बाजूला ठेवून शेजाऱ्यांच्या कामांत नाक खुपसत, पण मिसेस रेचेल यांची गोष्टच वेगळी होती. त्या स्वतःची सर्व कामे बैजवार उरकून दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्या एक

कर्तव्यदक्ष गृहिणी तर होत्याच पण शिवणकाम करणाऱ्या महिला मंडळाच्या त्या प्रमुख होत्या. गावातील शाळेच्या आणि चर्चच्या सुधार समितीमध्ये शिवाय परदेशातील मिशनरींच्या मदतकार्यात त्यांचा पुढाकार असे आणि हे सर्व करताना त्यांनी, घराच्या खिडकीत बसून एक नाही दोन नाही तर तब्बल सोळा कापसाच्या रजया बनवल्या होत्या असे लोक कुजबजत असत.

सेंट लॉरेन्सच्या आखातातील एका छोट्याशा त्रिकोणी द्वीपकल्पावर ॲव्हनली गाव वसलेले होते. गाव दोन्ही बाजूंनी पाण्याने वेढलेले असल्याने गावात येताना किंवा बाहेर जाताना लोकांना, रेचेल त्यांच्या घरासमोरील डोंगराळ रस्त्याने जावे लागत असे आणि त्यामुळे कोणतीही गोष्ट त्यांच्या नजरतून सुटत नसे.

जून महिन्याच्या एका सकाळी त्या नेहमीप्रमाणे खिडकीत बसलेल्या होत्या.

उबदार तेजस्वी सूर्यप्रकाश खिडकीतून आत येत होता. घराच्या मागच्या बाजूच्या उतारावरील त्यांची बाग, फुलांनी बहरलेली होती. मधमाशा मध गोळा करण्यात दंग झाल्या होत्या. थॉमस लिंड म्हणजे रेचेल लिंड यांचे पती, पलीकडच्या डोंगरावरील शेतात पेरणीचे काम करत होते. अशावेळी शेजारच्या ग्रीन गॅबल्सचे मालक, मॅथ्यू कथबर्ट पण त्यांच्या शेतात पेरणी करत असणार असा मिसेस रेचेलचा अंदाज होता. कारण तिने आदल्या दिवशी संध्याकाळी मॅथ्यू, पीटर मॉरिसनला तसे सांगताना ऐकले होते. अर्थात पीटरने त्याला विचारल्यानंतरच मॅथ्यू बोलले होते कारण मॅथ्यू कथबर्टनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात कधीही कोणत्याही गोष्टीबद्दल कोणी मुद्दाम विचारल्याखेरिज काही माहिती दिली नव्हती.

मॅथ्यू, दुपारी टेकडीवरील रस्त्याने घोडागाडीत बसून ठेवणीतले चांगले कपडे घालून बाहेर निघाले होते. नक्कीच ते बाहेर गावी चालले असणार, नेमके काय काम असावे? मिसेस रेचेल विचारात पडल्या कारण मॅथ्यू क्वचितच गाव

a

सोडून परगावी जात असत. शेवटी चहा झाल्यावर ग्रीन गेबल्सकडे जाऊन मारिलाला प्रत्यक्ष विचारून घ्यावे या निष्कर्षाप्रत त्या आल्या व लगेच चहा पिऊन ग्रीन गेबल्सकडे रवाना झाल्या. त्यांच्या घरापासून साधारण मैलभर अंतरावर कथबर्ट रहात असत. गावातील इतर घरांच्या तुलनेत ग्रीन गॅबल्स अगदीच एकोंडे घर होते. मॅथ्यूंचे वडील देखील फारसे कोणाशी मिसळत नसत. मिसेस रेचेलच्या मते अशा ठिकाणी रहाणे महाकर्मकठीण गोष्ट होती. मात्र या बहिणभावांना असे एकलकोंडे रहाणे अंगवळणी पडले असल्याचे मिसेस रेचेलचे ठाम मत होते. अंगणात एका बाजूला विलो आणि लोम्बार्डीजची खूप जूनी झाडे होती. त्यांची उत्तम निगा राखलेली दिसत होती. अंगणात काडीकचरा अथवा अगांतुक दगडगोटा सुध्दा दिसत नव्हता. मारिला कथबर्ट, घराइतकेच स्वच्छ अंगण झाडत असावी असे रेचेल मनातल्या मनात म्हणाल्या, अगदी जेवणाचे ताट घेऊन अंगणात जेवण केले तरी वावगे ठरणार नाही अशी स्वच्छता राखलेली होती.

मिसेस रेचेलनी दरवाजा ठोठावला, मारिलाने दार उघडल्यावर त्यांनी किचन मध्ये प्रवेश केला. किचन अतिशय सुंदर आणि व्यवस्थीत होते. खिडक्यांमधून स्वच्छ सूर्यप्रकाश आत आला होता. मारिला विणकाम करत असावी. तिच्या मागे डिनर टेबल होते. पटकन मिसेस रेचेलने टेबलावरची मांडणी मनात टिपून घेतली. डिनर साठी तीन प्लेट्स मांडलेल्या होत्या. केक आणि क्रॅब ॲपलचा साॅस बनवलेला दिसत होता. जेवणाची तयारी पाहिल्यावर, मिसेस रेचेलचा गोंधळ उडालेला दिसला.

"गुड इव्हनिंग, रेचेल," मारिला मोठ्याने म्हणाली. त्या दोघी एकमेकींच्या मैत्रिणी म्हणायला हरकत नव्हती पण त्यांच्यामध्ये काहीही साम्य नव्हते.

मारिला एक उंच सडपातळ स्त्री होती. तिच्या काळयाभोर केसात आता अधूनमधून करडी छटा जाणवू लागली होती. मारिला स्वभावाची फारशी मोकळी

a

दिसत नव्हती पण वागणूकीला चोख होती. काही वावगे खपवून घेणाऱ्यातील तर ती मुळीच नव्हती.

"आम्ही सर्व ठिक आहोत पण आताच मॅथ्यूची गाडी जाताना बाहेर पाहिली कुठे डाॅक्टरांकडे तर गेला नाही ना?"

मारिलाच्या लक्षात आले की मॅथ्यूला बाहेर गेलेले पाहिल्यावर सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला असणार. मिसेस रेचेलची चौकशी तिला अपेक्षित होती. रेचेलला फारसे कोड्यात न पाडता, मारिलाने सांगितले, "मॅथ्यू ब्राइट रिव्हरवर गेला आहे. आम्ही नोव्हा स्कॉशियामधील अनाथाश्रमातील एका लहान मुलाला दत्तक घेणार आहोत."

आता मात्र आश्र्चर्याने मिसेस रेचेल अवाक् झाली. मारिला अशी चुकूनही चेष्टा करणाऱ्यातली नाही याची खात्री असल्यामुळे तिला ही बातमी सत्य म्हणून स्विकारण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

"हे खरे आहे, मारिला?" तिने विचारले.

“होय, नक्कीच,” मारिला म्हणाली,

रेचेलला खराखुरा धक्का बसला. एखादा मुलगा दत्तक घेणाऱ्यापैकी हे बहिण भाऊ नक्कीच नव्हते याची तिला खात्री होती. "तुमच्या डोक्यात अशी कल्पना कशाने आली?" तिने विचारणा केली.

"आम्ही बरेच दिवस याबाबत विचार करत होतो. मिसेस स्पेन्सरच्या बोलण्यात ती एक मुलगी दत्तक घेत आहे असा विषय आला त्यावरून मॅथ्यूच्या मनात पण एखादा मुलगा दत्तक घेतल्यास पुढेमागे हाताशी येईल असा विचार आला. मात्र मुलगा इथलाच नागरिक असावा अशी आमची इच्छा होती. त्याप्रमाणे आम्हाला मुलगा मिळेल असे वाटले म्हणून प्रयत्न केले. नाहीतरी आता मॅथ्यू,

साठीच्या घरात आला आहे आणि शिवाय त्याला हृदयाचे दुखणे पण आहे त्यामुळे त्याला पहिल्यासारखे काम होत नाही,"

मारिलाने सविस्तर माहिती दिली.

मिसेस रेचेलला आपल्या बोलण्याचा भारी अभिमान होता. पूर्ण विषय ध्यानात आल्यावर तिने आपले मतप्रदर्शन सुरू केले.

"ठीक आहे, मारिला, मी तुम्हाला स्पष्टपणे सांगेन की मला वाटते की तुम्ही एक मूर्खपणा करत आहात. ही एक धोकादायक गोष्ट आहे. तुम्हाला तो मुलगा कोण हे माहित नाही. एका अनोळखी मुलाला तुम्ही घरात आणत आहात. तुम्हाला त्याचा स्वभाव कसा आहे किंवा त्याचे पालक कोणत्या प्रकारचे आहेत याची कल्पना नाही. नुकतेच असाच एक दत्तक मुलगा पैशासाठी पालकांच्या जीवावर उठल्याची बातमी पेपर मध्ये आली होती. मला तुम्ही अगोदर विचारले असते तर मी या गोष्टीचा विचार करू नका असे म्हटले असते."

मारिला शांतपणे म्हणाली, "रेचेल तू म्हणतेस ते मी नाकारत नाही. पण मी मॅथ्यूच्या इच्छेच्या आड आले नाही. क्वचितच मॅथ्यू कोणत्याही गोष्टीचा विचार करतो आणि जेव्हा तो करतो तेव्हा मला नेहमीच असे वाटते की त्याचा मान राखणे हे माझे कर्तव्य आहे आणि जोखमीचा विचार केला तर, जोखीम कशात नाही?"

"ठीक आहे, मला आशा आहे की ते सर्व ठीक होईल," रेचेलने शंका स्पष्टपणे सूचित केलेल्या स्वरात म्हणाली. "फक्त उद्या जर काही बरेवाईट झाले तर असे म्हणू नका की मी तुम्हाला चेतावणी दिली नाही —"

मिसेस रेचेलला तिथे थांबून नवीन पाहुणा येण्याचे स्वागत करण्याची इच्छा होती पण ही इतकी सनसनाटी बातमी आजुबाजुच्या लोकांना देऊन खळबळ उडवून देणे तिला अधिक आवडले असते. त्यासाठी ती तिकडून निघाली, त्यामुळे

a

मारिलाला थोडा दिलासा मिळाला, रेचेलच्या बोलण्याने बिचारी घाबरून गेली होती.

वाटेत जाताना मिसेस रेचेल दत्तक म्हणून येणाऱ्या मुलाचाच विचार करत होती, "मॅथ्यू आणि मारिला यांना मुलांबद्दल काहीही माहिती नाही. बिचाऱ्याचा कसा काय निभाव लागणार देव जाणे. मला तर त्याची दया येत आहे.'' तिच्या मनात दया दाटून आली.

पण त्याच क्षणी ब्राईट रिव्हर स्टेशनवर धीराने वाट पाहत असलेल्या मुलाला जर तिने पाहिले असते तर तिची दया अजून अधिक खोलवर नक्कीच गेली असती.

# प्रकरण 2

मॅथ्यू कथबर्ट आपल्या सॉरेल घोडी जोडलेल्या घोडागाडीतून, रमत गमत आरामात ब्राइट रिव्हर स्टेशन पर्यंत निघाले होते. वाटेत सफरचंदाच्या बागांमधील मंद सुवास वातावरण प्रसन्न करत होता. वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक स्त्री पुरुषाला त्यांना मान लवून अभिवादन करावे लागत होते कारण प्रिन्स एडवर्ड आयलंड येथे जरी तुम्ही रस्त्यातील माणसे ओळखत असोत किंवा नसोत तरीही तुम्हाला हसून मान लववणे हा शिष्टाचार आहे.

मॅथ्यू, मारिला आणि मिसेस रेचेल वगळता सर्व स्त्रियांना घाबरत असत. त्यांना असे वाटे की सर्वजण आपल्या माघारी आपल्यावर हसत असावेत. कदाचित असा विचार अगदी बरोबर असू शकला असता, कारण त्यांचे व्यक्तिमत्व विचित्र होते. करड्या रंगाचे केस पार मानेवर लोळत असत, ऐन विशीत असल्यापासून वाढवलेली लांब दाढी आता फक्त काळ्याची पांढरी झाली होती एव्हढाच काय तो फरक पडला होता.

ब्राईट रिव्हर स्टेशनवर पोहोचेपर्यंत त्यांना, ट्रेन आल्याचे चिन्ह दिसले नाही. त्यांना वाटले की ते वेळेच्या खूप अगोदर आले असावेत.

त्यांनीघोडागाडी, स्टेशनजवळच्या हॉटेलजवळ थांबवली आणि मग ते रेल्वे स्टेशनच्या आत गेले. संपूर्ण प्लॅटफॉर्म निर्मनुष्य होता. एका कोपऱ्यात खापऱ्यांच्या ढिगाऱ्यावर एक लहान मुलगी बसली होती. मॅथ्यूनी तिकडे लक्ष दिले नाही. तिथे बसून ती मुलगी कुणाची तरी वाट पाहत असावी असे त्यांना वाटले. स्टेशन-मास्तर

a

ऑफिसला कुलूप लावून घरी जाण्याच्या तयारीत होते. पाच-तीस ट्रेन कधी येईल असे मॅथ्यूंनी त्यांना विचारले

“पाच तीसची ट्रेन अर्ध्या तासांपूर्वी येऊन गेली. तुमच्याकडे एक पाहुणी आली आहे. मी तिला वेटिंग रूममध्ये बसायला सांगितले होते पण तिने बाहेर बसून वाट पहायचे ठरवले आणि कोपऱ्यात खापऱ्यांच्या राशीवर ती तुमची वाट पहात बसली आहे,” स्टेशन मास्तर गडबडीत बोलले.

“छे! छे! माझ्याकडे एक मुलगा येणार आहे. मिसेस स्पेन्सर त्याला नोव्हा स्कॉशियाहून माझ्यासाठी आणणार होत्या,” मॅथ्यूने स्टेशन मास्तरांना सांगितले.

"काहीतरी गडबड झाली असावी मला मिसेस स्पेन्सरनी तुम्ही आणि तुमची बहिण एक मुलगी दत्तक घेणार असल्याचे म्हणाल्या आणि त्या मुलीला तुमच्या ताब्यात द्यायला सांगून गेल्या."

आता मारिलाच्या विरोधाला नेमके कसे तोंड द्यायचे ही चिंता मॅथ्यूना सतावू लागली. शिवाय सर्वात अगोदर त्या गरिब अनाथ मुलीशी बोलणे भाग होते. ती त्यांच्याकडेच पाहत होती. साधारण अकरा वर्षांच्या मुलीने जाड्याभरड्या खाकी रंगाचे कपडे घातले होते. बहुदा तिच्या मापापेक्षा दोन एक वर्षे लहान मापाचे असावेत त्यामुळे ते तोकडे आणि अंगात घट्ट बसले होते. खलाशाच्या टोपी मधून जाडजुड वेण्या बाहेर पडल्या होत्या. केसांचा रंग अजब असा लालसर होता. लहानसर चेहरा, रंग गोरा पण तोंडावर बारीक ठिपके होते. डोळे मोठे असून उजेडात हिरवट घारे दिसत होते. डोळ्यात चैतन्य आणि औत्सुक्य नाचतांना जाणवत होते, नाजुक जिवणी, रुंद कपाळ एकंदरीत थोड्याफार बावरलेल्या पण उत्साही मुलीशी भेटायला बोलायला, मॅथ्यूना मोठे अवघड वाटत होते. पण इलाज नव्हता. तिने त्यांचे बोलण्याची सुरवात करायचे काम हलके केले, ते तिच्याकडेच येत आहेत हे पाहून

ती उठून उभी राहिली. तिच्या हातात जाड कापडाची अतिशय जूनी प्रवासी बॅग होती, तिचे हॅंडल तिने हातात धरून ठेवले होते.

"मला वाटतं तुम्ही ग्रीन गेबल्सचे मिस्टर मॅथ्यू कथबर्ट आहात?" ती विलक्षण स्पष्ट आणि गोड आवाजात म्हणाली. "मी तुमचीच वाट पाहत होते, मला भीती वाटली की आता तुम्ही कदाचित येणार नाही. आज रात्री झोपण्यासाठी मी पलीकडील चेरीच्या झाडावरची एक फांदी हेरून ठेवली होती."

मि. मॅथ्यू स्वतःच इतके गोंधळलेले दिसत होते की त्यांना काय बोलायचे ते सुचेना. त्यांनी तिचा छोटासा हात हातात घेतला आणि पुढे काय करायचे याचा निर्णय झटकन मनाशी घेऊन टाकला. ते एका मुलाला घरी घेऊन जाण्यासाठी आले होते, हे सत्य त्या छोट्याशा मुलीला सांगू शकले नाहीत. ते काम घरी गेल्यावर मारिला करू शकेल याची त्यांना खात्री होती. पण कोणत्याही परिस्थितीत तिला ब्राईट रिव्हर स्टेशनमध्ये एकटीला सोडून देणे शक्य नव्हते. ग्रीन गेबल्समध्ये गेल्यावर मग काय ते स्पष्टीकरण देता येईल हा विचार त्यांनी पक्का केला.

"माफ कर मला उशीर झाला," ते अवघडून म्हणाले. "माझ्या बरोबर चल. बाहेर घोडागाडी आहे. मला तुझी बॅग दे."

"नको मी माझी बॅग धरते. त्याचे काय आहे ना, तिचे हॅंडल थोडे सैल आहे पटकन बाहेर येते शिवाय ती फारशी जड सुध्दा नाही, माझ्या रोजच्या वस्तू आहेत. ही खूप जुनी बॅग आहे फक्त मीच तिला नीट पकडू शकेन. एक सांगू का खरंतर मला त्या चेरीच्या झाडावर झोपायला गंमत वाटली असती. मिसेस स्पेन्सर म्हणत होत्या की ग्रीन गेबल्स इथून आठ मैल दूर आहे. आपण घोडागाडीतून जाणार आहोत ना? मला घोडागाडीत बसायला खूपच आवडेल. आता मी तुमच्याबरोबर राहणार आहे याचा मला आनंद झाला आहे. आता मी तुमची झाली आहे. खरं तर मी कुणाचीच नव्हते. अनाथाश्रमात मला किती वाईट वाटत होते याची तुम्हाला कल्पना येणार

a

नाही. मी खूप अशक्त आहे ना? तसा अनाथाश्रम ठिक होता पण मला फारसा आवडला नाही.”

गाडीत बसल्यावर वाटेत लागलेली टेकडी ओलांडून पुढे जाईपर्यंत ती गप्प होती. वाटेत रस्त्याच्या कडेला जंगली चेरीची झाडे शुभ्र फुलांनी बहरलेली होती. तिकडे बोट दाखवत तिने मॅथ्यूना विचारले ही झाडे पाहून त्यांच्या मनात नेमका कशाचा विचार येतो. उत्तरादाखल मॅथ्यूनी तोच प्रश्न तिला विचारला.

"अर्थातच एका पांढऱ्या बुरखा घेतलेल्या नवरीचा. अशी बुरखा घातलेली, फुलांनी नटलेली नवरी मी काही पाहिली नाही पण मी कल्पनेने पाहू शकते. मी स्वतः कधी नवरी होईन असे मला वाटत नाही कारण कोणी माझ्याशी लग्नाला तयार होणार नाही. कदाचित एखादा परदेशी मिशनरी तयार होईल. मला पांढरा रेशमी पोशाख घालायला खूप आवडेल. आज सकाळी हा ड्रेस घालायला मला खूप लाज वाटली. आमचे सर्वांचे कपडे एकाच प्रकारच्या कापडापासून बनवतात. मागच्या थंडीत एका व्यापाऱ्याने तीनशे यार्ड कापडाचा तागा दान केला होता. त्यातून हा ड्रेस बनवला. लोक म्हणतात की त्याचे कापड विकले जात नव्हते म्हणून दान दिले पण मला त्याचा हा दयाळूपणा वाटतो. आज रेल्वेमध्ये सर्व लोक माझ्या ड्रेसला हसत आहेत असे मला वाटत होते. मग मी कल्पना केली, की मी सुंदर फिकट निळ्या रंगाचा रेशमी पोशाख घातला आहे, डोक्यावर फुलांनी सजवलेली हॅट, मोजे, बूट, हातात घड्याळ घातले आहे आणि मग मला खूप छान वाटले. बोटीमध्ये सुद्धा मी खूप आनंद लुटला. हे बेट मला आधीपासून आवडते आणि मला खूप आनंद आहे की मी येथे राहायला जात आहे. मी नेहमीच ऐकले आहे की प्रिन्स एडवर्ड आयलंड हे जगातील सर्वात सुंदर ठिकाण आहे आणि मी येथे राहत असल्याची कल्पना करत असे, परंतु मी ते सत्यात उतरेल अशी अशी अपेक्षा केली नव्हती. तुमची कल्पना

सत्यात उतरल्यावर खूप आनंद होतो, नाही का? आणि एक विचारू? हे रस्ते लाल का आहेत?"

“मला काही कल्पना नाही,” मॅथ्यूनी उत्तर दिले.

"पण ते शोधून काढायला हवे. मला या जगातील माहिती नसलेल्या गोष्टी शोधायला आवडतात. अरेच्चा! मी खूप जास्त बोलत आहे काय? लोक मला मी जास्तच बडबडी आहे असे म्हणतात. आता मी थोडी गप्प बसते,” असे म्हणून ती शांत बसली.

मॅथ्यू स्वतःच आश्चर्याने थक्क झाले होते. एव्हढ्याशा चिमुरडीची जगाविषयी जाणून घेण्याची आस त्यांना सुखावह वाटली. तू बोल माझी काही हरकत नाही असे त्यांनी तिला सांगितले.

“तुमच्या घराचे नाव 'ग्रीन गेबल्स' आहे असे मिसेस स्पेन्सर म्हणत होत्या. आजुबाजुला मोठमोठाली झाडे आहेत असे पण सांगितले. मला मोठे वृक्ष खूप आवडतात. आमच्या आश्रमाजवळ पण झाडे होती पण ती खूप लहान होती. त्यांना पाणी सुद्धा जास्त मिळत नसे मग ती कशी बरं मोठी होणार? मला त्यांचे वाईट वाटे. मी त्यांची समजूत काढत असे. त्यांच्या जवळ एखाद्या ओढा असता तर त्यांना भरपूर पाणी मिळाले असते; पक्षी त्यांच्या फांद्यावर रहायला आले असते. आज सकाळी मला त्यांना सोडून येताना वाईट वाटले. आपल्या मळयाजवळ एखादा ओढा आहे काय? मी मिसेस स्पेन्सरना विचारायचे विसरून गेले."

"होय, घराच्या मागच्या बाजूला एक ओढा आहे."

"अय्या किती छान! वाहत्या ओढ्यात खेळण्याचे माझे स्वप्न आता पूर्ण होईल."

तिने आपल्या वेण्या मॅथ्यूना दाखवल्या आणि त्याचा रंग कोणता असा प्रश्न विचारला. लालसर रंग असे त्यांनी म्हणताच तिच्या तोंडून एक उसासा बाहेर

पडला. तिला तिच्या केसांचा रंग अजिबात आवडत नसे. ते काळया रंगाचे व्हावेत असे स्वप्न ती पाहत असे पण ते अशक्य असल्याचे ती जाणत होती म्हणून ती अधिकच दु:खी होत असे. अचानक ती बोलायची थांबली आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या सफरचंदाच्या झाडांकडे कुतुहलाने पाहू लागली. एका वृद्ध शेतकऱ्याने अनेक वर्षांपूर्वी ही झाडे लावली होती. डोक्यावर पाना फुलांचे छत असल्याचे भासत होते. एक प्रकारचा मादक सुगंध वातावरणात दरवळत होता. संधीप्रकाशात आजुबाजुचे दृश्य स्वप्नवत भासत होते. फांद्यांच्या पसाऱ्यातून सुर्यास्ताच्या वेळेचे रंगलेले आकाश आणि क्षितीजाकडे निघालेले सूर्यबिंब दृष्टीस पडत होते.

“ओह! मिस्टर कथबर्ट,” ती कुजबुजली, “आपण ज्या रस्त्याने आलो तो रस्ता कोणता?”

"त्याला 'अव्हेन्यू' असे न्यूब्रिजचे लोक म्हणतात. ही एक सुंदर जागा आहे.” मॅथ्यूनी उत्तर दिले.

“सुंदर? हा शब्द इथे चपखल बसत नाही. ही एक अद्भुत गोष्ट आहे. अशा सुंदर जागेला ‘अव्हेन्यू' म्हणण्याऐवजी मला 'द व्हाइट वे ऑफ डिलाईट'- ‘आनंदाचा शुभ्र मार्ग’ म्हणणायला जास्त आवडेल."

पुढे गेल्यावर 'बॅरीचा तलाव' लागला. त्याचे नाव तिने 'चमचमणाऱ्या पाण्याचा तलाव' असे केले. तिने त्या तलावाच्या मालकांची मि. बॅरींची आणि त्यांच्या कुटुंबीयांची पण चौकशी केली. त्यांच्या मुलीचे 'डायना' हे नाव तिला आवडले जे मि. मॅथ्यूना फारसे आवडत नव्हते. पुलावरून गाडी जाताना तिने डोळे गच्च मिटून घेतले होते. मिसेस रेचेल लिंड यांचे घर मागे पडले. अंधारामुळे मिसेस रेचेल आपले कुतुहल शमवू शकल्या नाहीत.

आता घर जवळ येत चालले. अत्यानंदाचा उसासा घेऊन ती पुन्हा शांत झाली. आता मात्र मि. मॅथ्यूंचे अंत:करण अंतर्बाह्य ढवळून गेले. त्यांच्या किंवा

a

मारिलाच्या निराशेचा प्रश्न नव्हता पण तिला जे घर हवे होते ते तिचे होणार नाही हे सांगणे अत्यंत अवघड गोष्ट होती. तिच्या तेजस्वी डोळ्यातील स्वप्ने विझवून, निराशेचा अंधकार निर्माण करण्याचे पाप, एखाद्या निष्पाप प्राण्याच्या हत्येसारखे होते असे त्यांना वाटू लागले होते. "झाडं पण झोपेत बोलतात ते ऐका," ती कुजबुजली. घराच्या समोर गाडी थांबली, मॅथ्यूनी तिला उचलून जमिनीवर ठेवले.

"झाडे किती छान स्वप्ने पाहत असतील!"

मग, "तिच्या सर्व सांसारिक वस्तू" असलेल्या कार्पेट बॅगला घट्ट धरून ती त्याच्या मागे घरात गेली.

a

# प्रकरण 3

मॅथ्यूने दार उघडताच मारिला वेगाने पुढे आली पण जेव्हा तिची नजर त्या ताठ मानेच्या, विचित्र पोशाखातल्या, लाल केसांच्या लांब वेण्या घातलेल्या, उत्सुक तेजस्वी डोळे असलेल्या छोट्या आकृतीवर पडली तेव्हा ती थक्क होऊन तिथेच थांबली.

"मॅथ्यू कथबर्ट, ही कोण?" तिने मोठ्या आवाजात विचारले, "आणि तो मुलगा कुठे आहे?"

"तिथे कोणी मुलगा नव्हता," मॅथ्यू चाचरत म्हणाले.

"तिथे फक्त ही मुलगी होती."

त्यांनी अद्याप तिचे नावही विचारले नव्हते.

"नाही पण तिथे एक मुलगाच असायला हवा होता," मारिला आग्रहाने म्हणाली.

"आपण मिसेस स्पेन्सरला मुलगा आणायला सांगितला."

"पण, तिने तसे न करता, हिला आणले. मी स्टेशन मास्तरांना विचारले तेव्हा त्यांनी मला मिसेस स्पेन्सरने तसाच निरोप त्यांना दिल्याचे सांगितले आणि मला हिला घरी आणावे लागले. कोणाचीही चूक झाली असली तरी हिला तिथे एकटीला सोडता आले नसते."

"पण ही गोष्ट व्यवहाराला धरून नाही. एक गोष्ट कबूल करून नेमके त्या विरुद्ध हे वागणे झाले."

बहिण भावाचे बोलणे सुरू असताना ती बिचारी निमुटपणे त्यांच्या तोंडाकडे पाहत होती. जेव्हा तिला सर्व गोष्टींचा उलगडा झाला तेव्हा तिच्या

चेहऱ्यावरचा रंग उडाला. तिच्या हातातील तिची मौल्यवान कार्पेट बॅग गळून खाली पडली रडत रडत ती म्हणाली, "म्हणजे मी मुलगी आहे तुम्हाला नको आहे तर. मला हे अपेक्षितच होते. माझ्या बाबतीत एव्हढी चांगली गोष्ट घडणे हे आश्चर्य झाले असते. मी कुणालाही नको आहे. पण मी काय करू? मला खूप रडायला येत आहे," असे म्हणून ती दोन्ही हातांमध्ये तोंड खुपसून ओक्साबोक्शी रडू लागली.

मॅथ्यू आणि मारिला, कानकोंडे होऊन एकमेकांकडे पाहू लागले. त्यांना नेमके काय करावे हेच कळेनासे झाले. शेवटी मारिला पुढे होऊन म्हणाली, "बरं! बरं!, याबद्दल रडण्याची गरज नाही."

"गरज आहे," त्या मुलीने डोके वर करून थरथरत्या आवाजात मारिलाला म्हटले, "जर तुम्ही अनाथ असतात आणि तुम्हाला तुम्ही मुलगा नाही म्हणून कुणी बाहेर काढले असते तर तुम्ही सुध्दा रडला असतात. आतापर्यंत माझ्या बाबतीत झालेली ही सर्वात दु:खदायक गोष्ट आहे."

कसेतरी हसायचा प्रयत्न करीत मारिला म्हणाली, "आता लगेच काही तुला आम्ही बाहेर काढत नाही आहोत. नेमका काय घोटाळा झाला हे कळेपर्यंत तुला इथे राहता येईल. तुझे नाव काय आहे?"

छोटी मुलगी क्षणभर संकोचली आणि म्हणाली, "कृपया तुम्ही मला कॉर्डेलिया म्हणाल काय?"

"कार्डेलिया म्हणा? ते तूझे नाव आहे काय?"

"नाही हे माझे नाव नाही पण मला कार्डेलिया म्हणवून घ्यायला फार आवडेल."

"तुला काय म्हणवून घ्यायला आवडेल हे मला नको आहे. तुझे खरे नाव काय ते सांग."

“ॲन शर्ली,” ती पुढे म्हणाली, " मी इथे जास्त दिवस राहणार नाही तर मग मला कार्डेलिया म्हणण्याने तुम्हाला काही फरक पडणार नाही. मला 'ॲन' नाव आवडत नाही अगदीच रूक्ष नाव आहे."

"ॲन हे नाव रूक्ष समजणे हा मूर्खपणा आहे उलट ॲन हेच चांगले साधे समजूतदार नाव आहे. तुला याची लाज वाटण्याची गरज नाही.”

“मला लाज नाही वाटत पण मला कार्डेलिया नांव फार आवडते. मी माझे नाव कार्डेलिया आहे अशी नेहमी कल्पना करत असते. पण तुम्हाला 'ॲन' म्हणायचे असेल तर निदान 'ॲनी' तरी म्हणा."

"त्याने काय फरक पडतो?” चहाचे भांडे उचलत मारिला म्हणाली.

“मला फरक पडतो. ‘ॲन’ ही हाक ऐकू आल्यावर माझ्या मनाला कसे तरीच वाटते त्यापेक्षा शेवटच्या 'इ' चा उच्चार केला तर मला थोडे चांगले वाटेल मग तुम्ही कार्डेलिया नाही म्हटलेत तरी चालेल."

“म्हणजे चुकीच्या पध्दतीने उच्चार करायचा? आता आम्हाला एक गोष्ट सांग आम्ही मुलगा पाठवायला सांगितला होता मग त्यांनी मुलगी का पाठवली? आश्रमात कोणी मुलगा नव्हता काय?"

“होते बरेच मुलगे होते पण मिसेस स्पेन्सर स्पष्टपणे म्हणाल्या की तुम्हाला अकरा वर्षांची मुलगी हवी आहे म्हणून मला पाठवायचे ठरले. मला किती आनंद झाला हे तुम्हाला समजणार नाही. काल रात्रभर मी आनंदाने झोपू शकलो नाही.” असे म्हणत ती मॅथ्यू यांच्याकडे वळून म्हणाली, "तुम्ही मला स्टेशनवर तसे सांगितले असते तर मी इकडे आलेच नसते. जर मी ‘व्हाईट वे ऑफ डिलाईट’ आणि ‘लेक ऑफ शायनिंग वॉटर’ पाहिले नसते तर मला इतके वाईट वाटले नसते.”

"ती नेमके काय बोलत आहे?” मारिलाने मॅथ्यूला विचारले.

a

"काही नाही, आम्ही येताना वाटेत बोलत होतो त्या संदर्भात बोलत आहे. मी घोडीला बांधून येतो. तू चहाचे बघ." असे म्हणत मॅथ्यू बाहेर गेले.

"मिसेस स्पेन्सरनी तुझ्या शिवाय आणखी कुणाला अनाथाश्रमातून आणले आहे काय?" मारिलाने विचारले.

"होय, स्वतःसाठी पाच वर्षांची 'मिली जोन्स' आणली आहे. ती खूप सुंदर आहे. तिचे केस तपकिरी आहेत. मी जर तपकिरी केसांची सुंदर मुलगी असते तर तुम्ही मला घरी ठेऊन घेतले असते काय?"

"नाही, मॅथ्यूला शेतात मदत करण्यासाठी मुलगा हवा आहे. मुलगी आमच्यासाठी काही उपयोगाची नाही. तुझी टोपी काढ. मी टोपी आणि तुझी बॅग हॉलच्या टेबलावर ठेवते."

ॲनीने टोपी काढली. मॅथ्यू आल्यावर सर्व जेवायला बसले पण ॲनीला जेवण गेले नाही. कसाबसा ब्रेड आणि बटर खाण्याचा ती प्रयत्न करत होती.

"तू काहीच खात नाहीस," मारिला थोड्या तीव्रपणे म्हणाली.

"मी निराशेच्या गर्तेत पडले आहे अशा वेळी मी जेवू शकत नाही. जेव्हा तुम्ही निराशेच्या गर्तेत असता तेव्हा तुम्ही जेवू शकता का?"

"नाही मी कधीच निराशेच्या गर्तेत नव्हते म्हणून मी सांगू शकत नाही."

"पण तुम्ही कधी निराशेच्या गर्तेत असल्याची कल्पना करण्याचा प्रयत्न केला आहे का?"

"नाही मी कल्पना सुध्दा केलेली नाही."

"मग तुम्हाला निराशा म्हणजे काय हे समजणे अवघड आहे. ही खरंच खूप अस्वस्थ भावना आहे. जेव्हा तुम्ही काही खाण्याचा प्रयत्न करता पण खाऊ शकत नाही, गिळायचे म्हटले तर गिळू शकत नाही, अगदी आवडते चाॅकलेट कॅरमल

सुध्दा नजरेसमोर नकोसे होते. तुम्ही जेवण खूप छान बनवले आहे पण मला खायला जाणार नाही. तुम्ही नाराज होऊ नका."

"मला वाटते ती थकली असेल, तिची झोपायची व्यवस्था कर."

ॲनीला कुठे झोपवायचे असा प्रश्न मारिलाला पडला होता. तिने इच्छित आणि अपेक्षित मुलासाठी किचन चेंबरमध्ये एक पलंग तयार केला होता. पण मुलीला कुठे झोपायला द्यायचे हा प्रश्न होता. पूर्वेकडील छोट्या खोलीत तिची झोपण्याची व्यवस्था करावी म्हणून मारिला तिला तिकडे घेऊन गेली. कपडे बदलून रात्रीचा पोशाख करायला लावून 'गुड नाईट' म्हणून तिकडून निघत असता ॲनी म्हणाली, "ही माझ्या जीवनातील आजवरची सर्वात वाईट रात्र असली पाहिजे, हे तुम्हाला माहीत असताना तुम्ही मला ‘शुभ रात्री’ कसे म्हणू शकता?"

मारिला हळू हळू स्वयंपाकघरात जाऊन आणि जेवणाची भांडी आवरायला लागली. मॅथ्यू धूम्रपान करत होते— त्यांच्या अस्वस्थ मनाचे ते लक्षण होते. ते क्वचितच धुम्रपान करत असत, कारण मारिलाला ती घाणेरडी सवय म्हणून आवडत नसे.

"आपण स्वतः अनाथाश्रमात जाण्याऐवजी दुसऱ्यांवर अवलंबून राहिल्याचा हा परिणाम आहे. उद्या स्पेन्सरकडे जाऊन या मुलीला परत पाठवावे हेच योग्य आहे.” मारिला करवदली.

"तू म्हणत असशील तर ठिक आहे तसेच करूया."

"म्हणजे तुला असे वाटत नाही?"

"ती खूप चांगली मुलगी आहे असे मला वाटते. तिची इथे राहण्याची इच्छा असताना तिला परत अनाथाश्रमात पाठवून देणे माझ्या मनाला पटत नाही."

"मॅथ्यू म्हणजे आपण तिला इथे ठेऊन घ्यावे अशी तुझी इच्छा आहे?"

a

"अगदी असेच काही नाही पण आपण तिला ठेऊन घेऊ शकतच नाही असे तुला वाटत असेल तर मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे तिला परत पाठवायला तयार आहे."

"माझे म्हणणे ‘नाही’ असेच आहे. तसाही तिचा आपल्याला उपयोग काय आहे?

"पण आपण तिच्यासाठी काही चांगले करु शकतो,” अचानक मॅथ्यू बोलून गेले.

"मॅथ्यू तिने तुझ्यावर जादू केली आहे. तुला तिला परत पाठवायची इच्छा दिसत नाही."

"खरे आहे. स्टेशन वरून येताना तिचे बोलणे तू ऐकले असतेस तर तुला पण माझ्यासारखेच वाटले असते."

"मी तिचे बोलणे ऐकले आहे आणि मला काही ते फारसे आवडले नाही. जादा बोलणारी मुले मला आवडत नाहीत आणि ही अनाथ मुलगी तर नाहीच नाही. जरी मी मुलगी दत्तक घेण्यासाठी तयार झालेच तर ती ह्या मुलीपेक्षा ती नक्कीच वेगळी असली असती. उद्या मला तिला ती जिथून आली होती तिथे लगेच परत पाठवायचे आहे.”

"मी माझ्या मदतीला एक नोकर ठेवतो तुला या मुलीची सोबत होईल,” मॅथ्यू म्हणाले.

“मला तिची सोबत नको आहे."

“ठिक आहे तू म्हणतेस तसेच होईल. मी झोपायला जातो,” असे म्हणून मॅथ्यू झोपायला निघून गेले.

आवराआवर करून मारिला झोपायला जाण्यापूर्वी आपला निश्चय अधिक दृढतेने तडीला नेण्याचे ठरवून झोपी गेली. छोट्या खोलीत झोपलेली पोरकी पोर झोपेत दचकून उठली.

# प्रकरण 4

ॲनी उठली आणि अंथरुणावर बसून गोंधळलेल्या नजरेने खिडकीतून बाहेर पाहू लागली. स्वच्छ सूर्यप्रकाशाचा आत आला होता, बाहेरच्या निळया आकाशाचे दर्शन होत होते. ते पाहून ती आनंदीत झाली. क्षणभर तिला ती कुठे आहे हे समजेना मग हळूहळू तिच्या आनंदाची जागा दु:खाने घेतली. ती 'ग्रीन गॅबल्स' मध्ये होती. कुणाच्या तरी चुकीने तिची रवानगी इथे झाली होती आणि येथील मंडळींना ती नकोशी होती कारण ती मुलगा नव्हती. तिचे कोवळे मन दुखावले गेले होते.

पण आता सकाळ झाली होती. खिडकीतून बाहेर फुललेले चेरीचे झाड पाहून ती पटकन उठून बाहेर जाण्यासाठी तयार झाली. चेरीचे झाड इतके बहरले होते की झाडावर पाने दिसत नव्हती. बाहेरचे दृश्य पाहताना तिचे डोळे आनंदाने चमकत होते. खरच ती जागा खूपच सुंदर होती. भले तिला तिथे न का राहयला मिळेना पण ती असण्याची कल्पना तर ती नक्कीच करू शकत होती. त्याला तर कोणी अडवू शकत शकत नव्हते. बागेच्या पुढे हिरवेगार शेत होते, शेजारी ओढा वाहत होता, त्या पलीकडे डोंगर आणि दरीच्याजवळ काल पाहिलेला चमचमणाऱ्या पाण्याचा तलाव दिसत होता. डावीकडे मोठमोठी धान्याची कोठारे होती आणि त्यांच्या पलीकडे हिरवीगार, कमी उतार असलेली शेतं आणि सर्वात सुंदर गोष्ट म्हणजे निळयाशार समुद्राची झलक दिसत होती.

ॲनीची सौंदर्यासक्त नजर प्रेमळपणे या सर्वांवर रेंगाळत होती. लोभसपणे ती सर्व तिच्या आत सामावून घेत होती. आजपर्यंत तिने अनेक अप्रिय ठिकाणे पाहिली होती

a

पण त्या गरीब मुलीने पाहिलेले हे दृश्य तिच्या स्वप्नातल्या जगासारखे सुंदर होते. गुडघे टेकून खाली वाकून ती त्या जगात हरवून गेली होती तोच कुणीतरी एक हात तिच्या खांद्यावर ठेवला. मारिलाच्या हाका तिच्या कानावर न आल्याने शेवटी मारिलाने खांद्यावर हात ठेवून काहीश्या तुटकपणे सांगितले, “तुझी कपडे बदलायची वेळ झाली आहे.”

मारिलाला खरोखरच मुलांशी कसे बोलावे हे माहित नव्हते. तिचा नेहमीचा स्वर काहीसा तुटक असे. ॲनीने उठून एक दीर्घ श्वास घेतला. सभोवार दृष्टी फिरवत ती म्हणाली, “हे सर्व किती छान आहे."

"हे एवढं मोठं झाड मोहरले आहे पण त्याला फळे अगदी थोडीशी येतात ती सुध्दा आकाराने लहान आणि किडकी असतात,” मारिला म्हणाली.

"मला फक्त या झाडाबद्दल बोलायचे नव्हते. येथील फुलबाग, फळबाग, शेत, ओढा, जंगल, भोवतालचे सर्व जग खूप सुंदर आहे. हे झाड तर सुंदर आहेच पण त्याचा सुगंधित मोहर अप्रतिम आहे. मी या सगळ्यांवर प्रेम करते. इथला हा ओढा मी पुन्हा कधीही पाहणार नाही तरी तो इथे वाहतो याचा मला आयुष्यभर आनंद होणार आहे. आज सकाळी मला अजिबात निराश वाटत नाही. तुम्ही मला इथे ठेवून घेणार नाही हे मला माहीत आहे पण मला काही फरक पडत नाही. मी इथे कायम वास्तव्य करत आहे अशी कल्पना तर करूच शकते. तुम्हाला मी हवी आहे असे माझ्यापुरते समजून आनंदी होऊ शकते."

"आता स्वतःचे आवरून शक्य तेव्हढ्या लौकर नाष्ट्यासाठी खाली ये."

ॲनी दहा मिनिटात सर्व आवरून खाली आली. मारिलाच्या एकूण एक सूचना पाळल्याचे तिला समाधान वाटत होते. फक्त गडबडीत पलंगावरची बेडशीट बदलायचे राहून गेले.

a

“मला आज सकाळी खूप भूक लागली आहे,” तिने आल्या आल्या जाहीर केले. आज मी खूप आनंदात आहे. आज छान सूर्यप्रकाश पडला आहे. कल्पनेने दु:खाचा सामना केल्याचा, दु:खावर विजय मिळवल्याचा आनंद मानणे सोपे असते पण जेव्हा खरोखरची वेळ येते तेव्हा ते इतके सोपे नसते. हे खरे आहे ना?"

"कृपा करून तू जरा तुझी बडबड आवरती घेतेस काय? वयाच्या मानाने तू जास्तच बोलत असतेस.” मारिला तिच्यावर उगाचच डाफरली.

मात्र त्यानंतर ॲनी इतकी गप्प बसली की मारिलाला पण अस्वस्थ वाटू लागले. मॅथ्यूने पण अबोलपणे बेक्रफास्ट केला. अर्थात ते त्यांचे नेहमीचे वागणे होते. ॲनी न बोलता खिडकीतून बाहेर बघत होती. तिच्या मनात रम्य कल्पनांच्या स्वैर भराऱ्या सुरू होत्या हे तिच्या प्रसन्न चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. मारिला अस्वस्थ होऊन तिच्याकडे पाहत होती. खोलीत ती शरिराने उपस्थित होती पण मनाने आकाशात कल्पनेच्या पंखांवर बसून उंच भरारी घेत उडत होती. मॅथ्यूचे काल रात्री जे मत होते ते आज अजून पक्के झाल्याचे वाटत होते. एकदा एक गोष्ट ठरवली की न बोलता त्याचा पाठपुरावा करायचा ही त्यांची जूनी खोड मारिला जाणून होती.

खाणे आटोपल्यावर ॲनीने भांडी घासायला सुरूवात केली. मारिलाला ती नीट काम करेल याची खात्री वाटत नव्हती. ॲनीने आपण काय काय कामे करू शकतो याची माहिती दिली. जेव्हा मारिला मॅथ्यूवर उगाचच चिडली तेव्हा ॲनीने मॅथ्यूची बाजू घेतली. शेवटी मारिलाने ॲनीला दुपारी व्हाईट सँड्सकडे जावे लागेल आणि मिसेस स्पेन्सरला भेटून तिच्या बाबतीत काय करायचे ते ठरवणार असल्याचे सांगितले. तसेच तिला पण बरोबर येण्यासाठी तयार राहण्याची सूचना दिली.

भांडी घासून झाल्यावर मारिलाने बिछाना नीट करायची सूचना देऊन ठेवली होती. त्याप्रमाणे ॲनी कामाला लागली, मात्र या कामात ती फारशी तरबेज नव्हती त्यामुळे बिछान्यावरच्या एकुण एक सुरकुत्या काढण्यात फारशी यशस्वी

झाली नाही. त्यानंतर थोडावेळ बाहेर जाण्यासाठी मारिलाला सांगून अंगणात धावली आणि त्याच पावली परतून दिवाणखान्यात येऊन बसली. तिचा दुर्मुखलेला चेहरा पाहून मारिलाला पण कारण विचारल्याशिवाय राहवेना.

"आता माझ्यात बाहेर जाण्याचे धाडस नाही. जर मी इथे राहणारच नसेन तर मला आवडलेल्या इथल्या माझ्या मित्रांच्या प्रेमाला प्रतिसाद देणे मला अत्यंत कठीण आहे. इथला निसर्ग माझा मित्र बनला आहे. माझ्याप्रमाणेच प्रत्येकजण माझ्याशी मैत्री करायला आतूर आहे. त्यांना नाराज करणे योग्य नाही. इथे राहणार या कल्पनेने आणि इतके छान छान मित्र मिळणार म्हणून मी आनंदाने हरखून गेले होते. आता मी माझ्या मनाची तयारी केली आहे की लौकरच इथून बाहेर पडायचे आहे मग जर मी पुन्हा बाहेरच्या माझ्या मित्रांकडे गेले तर माझा निश्चय मोडून पडेल पण वास्तव मात्र बदलणार नाही. माझे सवंगडी नाराज झालेले पाहून मी तर दु:खी होईनच पण म्हणून मला त्यांना दु:ख देण्याचा अधिकार नाही. मी आपली घराच्या आताच बरी आहे."

"अगं ती तर साधी झाडे झुडपे आहे. ते कसे काय मित्र असू शकतील?" मारिलाचा प्रश्न सडेतोड होता.

"त्यांना असे झाडे झुडपे म्हणणे बरोबर नाही. मी त्यांची नांवे तुम्हाला सांगू का? हे जे लाल पांढरी फुले असलेले रोपटे आहे ना, त्यांचे नाव मी 'बोनी' असे ठेवले आहे. माझ्या झोपायच्या खोलीतल्या खिडकीमधून दिसणाऱ्या चेरीच्या झाडाचे नांव आहे, 'स्नो क्वीन' : आता कसे बर्फासारखे शुभ्र दिसत आहे. पण जेव्हा मोहोर गळून फळे येतील तेव्हा ते पांढरे रहाणार नाही पण ते तसे आहे याची आपण कल्पना करू शकतो."

"माझ्या संपूर्ण आयुष्यात अशी अजब मुलगी मी कधी पाहिली नव्हती," असे म्हणत मारिला तळघरातून बटाटे आणायला निघून गेली.

मारिला परत आली तेव्हा ॲनी खिडकीतून पाहत उसासे सोडत होती. तिकडे दुर्लक्ष करून मारिला विचार करू लागली, "मॅथ्यूने म्हटल्याप्रमाणे ही मुलगी खरोखरच मजेशीर आहे. पुढच्या क्षणी काय बोलेल याची कल्पनाही करता येत नाही. तिने मॅथ्यूवर तर जादू केली आहेच तशीच माझ्यावर पण करू शकेल. मॅथ्यूने कधी नव्हे ते आपले म्हणणे न बोलता माझ्यापर्यंत बरोबर पोहोचविले आहे. जर माणूस स्पष्ट बोलला तर वाद घालून जिंकता तरी येते पण तो असे न बोलून माझ्यावर मानसिक दबाव टाकून माझा निर्णय बदलण्याचा प्रयत्न करत आहे. मलाच आता एकदाचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे."

दुपारच्या जेवणाच्या वेळी मारिलाने मॅथ्यूला सांगितले, ’’मला दुपारी बग्गी लागेल. घोडी जुंपून तयार ठेव. मी हिला घेऊन व्हाईट सँड्सवर स्पेन्सर यांच्या घरी जाईन. मिसेस स्पेन्सर कदाचित तिला नोव्हा स्कॉशियाला परत पाठवण्याची व्यवस्था करतील. मी तुझा चहा करून ठेवेन आणि गायींचे दूध काढण्यासाठी वेळी घरी येईन."

मॅथ्यू काही बोलेल असे मारिलाला वाटत होते पण मॅथ्यूने नुसती मान डोलावली. थोड्या वेळाने मारिलाच्या सांगण्यानुसार मॅथ्यूनी बग्गी तयार केली आणि मारिला आणि ॲनी व्हाइट सॅण्डवर जाण्यासाठी निघाल्या. मॅथ्यूने त्यांच्यासाठी अंगणाचे गेट उघडले आणि गग्गी हळू हळू पुढे जात असताना ते म्हणाले: "आज सकाळी खाडीवर राहणारा, छोटा जेरी बुओटे येथे होता, मी त्याला उन्हाळ्यासाठी कामावर घेईन असे सांगितले आहे."

मारिलाने काहीच उत्तर दिले नाही, पण सा◌ॅरेलवर जोराचा चाबूक उगारला तशी घोडी जोरात उधळली. तिला बिचारीला अशा फटकारण्याची सवय नव्हती. मारिलाने बाहेर पडताना एकदा मागे वळून पाहिले आणि तेव्हा त्रासलेल्या चेहऱ्याने मॅथ्यू त्यांच्याकडे पाहत होता.

# प्रकरण 5

"मी तुम्हाला एक गोष्ट सांगू काय?" ॲनीने मारिलाला विचारले. मारिलाने होकार दिला आणि ॲनी पुढे म्हणाली, "मी आताच्या या बग्गीतल्या प्रवासचा आनंद घ्यायचे ठरवले आहे. माझा असा अनुभव आहे जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही प्रत्येक गोष्टींचा आनंद घेऊ शकता. आता सुध्दा अनाथाश्रमात परत जाण्याचा विचार करत या आनंदाला मुकायचे नाही असे मी ठरवले आहे. तो जंगली गुलाब पाहिलात काय? किती छान आहे! त्याला बोलता आले असते तर किती मज्जा आली असती, त्यामुळे आपल्याला त्याच्या जगातील सुंदर सुंदर गोष्टी समजल्या असत्या. त्यांचा गुलाबी रंग किती सुंदर आहे. मला खूप आवडतो. तुम्हाला पण आवडतो काय? पण माझे केस लाल रंगाचे असल्याने मला गुलाबी रंग चांगला दिसत नाही. केसांचा लाल रंग बदलून काळा होतो काय?"

"मला माहित नाही आणि असे झाल्याचे मी कधी पाहिले नाही तेव्हा तुझ्या बाबतीत असे घडेल याची शक्यता नाही," मारिलाने उत्तर दिले.

ॲनी एक खोल उसासा टाकत म्हणाली," म्हणजे एक आशा संपली. माझे आयुष्य म्हणजे आशा पुरून टाकण्याचे एक कब्रस्तान बनले आहे. हे एका पुस्तकातील वाक्य आहे, मी जेव्हा निराश होते तेव्हा मला ते नेहमी आठवते. आपण त्या चमचमणाऱ्या पाण्याच्या तलावाजवळील रस्त्याने जाणार आहोत काय?"

"तू जर बॅरीच्या तलावाजवळील रस्त्याने विचारत असशील तर नाही, आपण किनाऱ्याजवळून जाणाऱ्या रस्त्याने व्हाईट सॅण्डला जाणार आहोत."

a

"हा रस्ता पण खूपच छान आहे. 'व्हाईट सॅण्डस्' हे नांव मला फारसे आवडले नाही. 'ॲव्हनली' हे नांव सुंदर आहे एखाद्या गोड गाण्यासारखे. व्हाईट सॅन्ड्स एकूण किती लांब आहे?''

''ते पाच मैल आहे; तुला स्वतःबद्दल मला काही सांगायचे असेल तर तिकडे जाता जाता सांगू शकतेस."

"मला जे माझ्याबद्दल माहीत आहे ते फारसे काही सांगण्यासारखे नाही तो त्यापेक्षा मला माझ्याविषयीच्या काय कल्पना आहेत त्याबद्दल बोलू काय? ते तुम्हाला जास्त आवडेल,'' ॲनीने विचारले.

"नको मला तुझ्या कल्पनेतील जग जाणून घ्यायचे नाही. जी काय खरीखुरी हकीकत आहे तिच सांग. सर्वात अगोदर सांग तुझे वय किती? तुझा जन्म कोठे झाला?"

"मी अकरा वर्षांची आहे. माझा जन्म बोलिंगब्रोक, नोव्हा स्कॉशिया येथे झाला. माझ्या वडिलांचे नाव वॉल्टर शर्ली होते आणि ते बोलिंगब्रोक हायस्कूलमध्ये शिक्षक होते. माझ्या आईचे नाव बर्था शर्ली होते. वॉल्टर आणि बर्था ही सुंदर नावे आहेत ना? मला खूप आनंद आहे की माझ्या पालकांची नावे छान आहेत."

''माझ्यामते माणसाचे नाव सुंदर आकर्षक असण्यापेक्षा त्याची वर्तणूक महत्वाची असते,'' मारिला म्हणाली.

"माझे आईवडील बोलिंगब्रोक येथे एका छोट्या घरात राहत होते. त्यांच्या शेजारी थाॅमस कुटुंब राहत होते. माझी आई पण शिक्षिका होती पण तिने लग्नानंतर नोकरी सोडली. त्या दोघांचे कोणी जवळचे नातेवाईक नव्हते. दुर्दैवाने मी तीन महिन्यांचे बाळ असताना तापाच्या साथीमध्ये दोघेपण चार पाच दिवसांच्या अंतराने देवाघरी गेले असे मला मिसेस थाॅमसनी सांगितले. मला सांभाळायला कोणी नातेवाईक नसल्याने मिसेस थाॅमसनी मी आठ वर्षांची होईपर्यंत माझे पालनपोषण

a

केले. नंतर थॉमस कुटुंब बोलिंगब्रोकहून मेरीजविलेला राहायला गेल्यावर मी पण मेरीजविलेला गेले. त्यांची आर्थिक परिस्थिती अगदीच बेताची होती. त्यांना माझ्यापेक्षा लहान चार मुले होती त्यामुळे मला त्यांना सांभाळायचे काम करावे लागत होते शिवाय मि. थाॅमस व्यसनी असल्याने पैशाची खूप चणचण होती. मिस्टर थाॅमसचा अपघाती मृत्यू झाल्याने मिसेस थाॅमस पूर्णपणे निराधार झाल्या. त्यांची सासू त्यांना आणि त्यांच्या मुलांना सांभाळायला तयार झाली पण माझे काय करायचे हा प्रश्न होता. शेवटी मला मिसेस हॅमंड त्यांच्या घरी घेऊन जाण्यासाठी तयार झाल्या. मि. हॅमंड यांची छोटीशी लाकडाची वखार होती. गावाबाहेर नदीच्या काठावर त्यांचे घर आणि वखार होती. आजुबाजुला कोणी राहत नव्हते. त्यांना एकूण आठ मुले होती. तीन वेळा जुळी मुले झाल्याने मुलांना सांभाळायला माझा उपयोग होईल म्हणून त्या घरी घेऊन जाण्यास तयार झाल्या होत्या. इतक्या मुलांना सांभाळताना मी कंटाळून जात होते. दोन वर्षे मी त्यांच्या बरोबर होते. या कुटुंबावर पण थाॅमस कुटुंबाप्रमाणेच दुर्दैवाचा घाला पडला आणि मि. हॅमंड मरण पावले. एव्हढे मोठे कुटुंब, त्यांच्या नातेवाईकांमध्ये विभागले गेले. काही दिवस मी हॉपेटन येथील अनाथाश्रमात होते पण तिथे खूप गर्दी होती म्हणून मला मिसेस स्पेन्सर, तेथून काढून मला नोव्हा स्कॉशियाला घेऊन गेल्या."

यावेळी ॲनीने आणखी एक सुस्कारा सोडला. स्पष्टपणे तिला नको असलेल्या जगातल्या अनुभवांबद्दल बोलणे तिला आवडत नव्हते.

“तू कधी शाळेत गेली होतीस काय?” किनाऱ्याच्या रस्त्यावर बग्गी वळवतांना मारिलाने विचारले.

"फारशी नाही. थाॅमस कुटुंबात असताना एखादे वर्ष गेले असेन. हॅमंड यांच्या घरापासून शाळा लांब होती म्हणून जाता आले नाही. पण अनाथाश्रमात मात्र

a

शाळेत जात होते. मी चांगले वाचू शकते. मला अनेक कविता तोंडपाठ आहेत. माझा चौथीचा अभ्यास झाला आहे."

“मिसेस था ॅमस आणि मिसेस हॅमंड तुझ्याबरोबर कशा वागत होत्या?” मारिलाने विचारले.

ॲनी एकदम गडबडून गेली,” त्या माझ्याबरोबर शक्य तितके चांगले आणि दयाळूपणे वागत होत्या. जेव्हा लोक तुमच्याबरोबर चांगले वागतात तेव्हा त्याचे फारसे महत्त्व वाटत नाही पण सर्वांना नेहमीच चांगले वागणे शक्य नसते. ज्याची त्याची काळजी करण्याची कारणे वेगवेगळी असू शकतात. आता व्यसनी नवरा, तीन वेळा जुळी मुले जन्माला घालणे, आठ आठ मुलांचे पालनपोषण, कधीतरी माणसाचा तोल ढळणारच, तेव्हा त्या गोष्टींकडे नेमके कसे बघायचे यावर चांगले किंवा वाईट ठरत असते. नाही का? पण मला खात्री आहे की त्यांना माझ्याबरोबर चांगलेच वागायचे होते.”

मारिलाने आणखी प्रश्न विचारले नाहीत. मारिलाच्या मनात अचानकपणे ॲनीबद्दल कणव दाटून आली. अरेरे! बिचारीचे बालपण किती कष्टात आणि हालखीत गेले आहे. एव्हढ्याशा लहान वयात मातापित्याच्या मायेला पारखी झालेली पोर, साऱ्या निसर्गावर प्रेम करायला शिकते आणि इतरांना शिकवते, आपल्या स्वतःपुरते एक आनंदी जीवनाचे काल्पनिक जग निर्माण करून त्यात रममाण होते हे वरवर पाहणाऱ्याला समजणार नाही पण त्यातील सत्य मारिलाच्या ध्यानात आले. खऱ्या घराच्या आशेने तिला खूप आनंद झाला असेल यात काही आश्चर्य नाही. तिला परत पाठवावे लागत आहे ही वाईट गोष्ट होती. मॅथ्यूच्या इच्छेप्रमाणे तिला घरी ठेवून घ्यावे काय? तशी मुलगी शिकवण्या योग्य आहे, असा विचार मारिलाच्या मनात आला.

“तिला खूप काही सांगायचे आहे, बोलायचे आहे. कदाचित तिला योग्य शिक्षण दिले तर ती चांगली प्रगती करेल आणि ती जे बोलते त्यात असभ्य किंवा अपमानास्पद असे काहीही नाही. ती एका सभ्य स्त्री सारखी आहे. बहुधा तिचे आईवडील चांगल्या कुळात जन्मलेले असतील.”

ॲनी किनाऱ्याजवळून जाणाऱ्या रस्त्यावरची मजा पाहण्यात दंग होती. एका बाजूला लाल सँडस्टोनचे खडक होते. पलिकडे हिरवट निळा समुद्र सूर्यप्रकाशात चमचमत होता, त्यावर समुद्रपक्षी संथपणे तरंगत होते. त्यांचे पंख सूर्यप्रकाशात चांदीसारखे चमकत होते.

"समुद्र छान आहे ना?” ॲनी म्हणाली, "मी एकदा मेरीजविलेला समुद्र पाहायला गेले होते त्यादिवशी खूपच मजा आली. पण हा समुद्र किनारा त्यापेक्षा जास्त छान आहे. तुम्हाला समुद्रपक्षी व्हायला आवडेल? मला समुद्रपक्षी होऊन समुद्रावर घिरट्या घालायला आवडेल. रात्री घरट्यात परताना कसलीही काळजी नाही, असे जगायला खूप छान वाटेल. ते पुढे कोणाचे एव्हढे मोठे घर आहे?”

“ते व्हाईट सँड्स हॉटेल आहे. मिस्टर किर्के ते चालवतात, पण अजून हंगाम सुरू झालेला नाही. उन्हाळ्यासाठी तेथे अमेरिकन लोकांची गर्दी असते, त्यांना हा किनारा फार आवडतो.”

"मला भीती वाटत होती की कदाचित ते मिसेस स्पेन्सरचे घर असेल,” ॲन दु:खी स्वरात म्हणाली. “मला तिथे जायचे नाही. का कुणास ठाऊक मला तिथे गेल्यावर सर्व काही संपल्यासारखे वाटेल.”

# प्रकरण 6

शेवटी मारिला आणि ॲनी, मिसेस स्पेन्सर यांच्या व्हाईट सँड्स वरील कोव्ह येथील घरी पोहोचल्या. दार उघडून आनंदाने तिने स्वागत केले. त्यांना पाहून ती आश्चर्यचकीत झाली. मारिलाला घोडा बांधून ठेवायला सांगून ती ॲनीकडे वळून म्हणाली, "ॲनी तू कशी आहेस?"

"मी ठिक आहे," ॲनी हसत म्हणाली. पण नीट पाहिले असता, तिला एक प्रकारचा धक्का बसल्याचे जाणवत होते.

“मला वाटतं आम्ही फक्त घोडीला आराम करण्यापुरते थोडा वेळ थांबू,” मारिला म्हणाली, “मी मॅथ्यूला लवकर घरी येईन असे सांगून आले आहे. खरं म्हणजे, मिसेस स्पेन्सर, कुठेतरी एक विचित्र चूक झाली आहे आणि ती नेमकी कशी झाली हे पाहण्यासाठी मी आले आहे. मी आणि मॅथ्यूने आमच्यासाठी आश्रमातून एक मुलगा आणायचे ठरवले होते आणि तसा निरोप आम्ही तुझ्या भावाला, रॉबर्टला दिला होता की आम्हाला दहा किंवा अकरा वर्षांचा मुलगा हवा आहे.”

“पण रा◌ॅबर्टच्या मुलीने, नॅन्सीने तुम्हाला मुलगी हवी असा मला निरोप सांगितला. नाही का, फ्लोरा जेन?” तिने तिच्या मुलीला प्रश्न केला.

“हो, मिस कथबर्ट तिने असाच निरोप दिला,” फ्लोरा जेनने कळकळीने पुष्टी केली.

a

"मला माफ करा," मिसेस स्पेन्सर म्हणाल्या. "ते खूप चुकीचे झाले आहे; पण त्यात माझी खरच काही चूक नाही, मला मिळालेल्या निरोपाप्रमाणे मी मुलीची निवड करून घेऊन आले. नॅन्सीच्या बेजबाबदारपणामुळे हा सगळा घोटाळा झाला."

"खरेतर ही आमची स्वतःची चूक होती," मारिला म्हणाली. "आम्ही स्वतः तुमच्याकडे यायला हवे होते. असा महत्वाचा निरोप तोंडातोंडी द्यायला नको होता. पण आता चूक तर झालीच आहे पुढे काय? आम्ही या मुलीला आश्रमात परत पाठवू शकतो का? मला वाटते की ते तिला परत पाठवता येईल, नाही का?"

"होय," मिसेस स्पेन्सर थोडा विचार करून म्हणाल्या, "पण तिला परत पाठवण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. मिसेस पीटर ब्लूविट काल येथे आल्या होत्या, तिला एका लहान मुलीची गरज आहे असे सांगत होत्या. त्याच्या मोठ्या कुटुंबासाठी ॲनी अगदी योग्य मुलगी आहे. याला म्हणतात योगायोग."

मारिलाला मात्र या योगायोगाचे महत्व वाटले नाही. तसे पाहिले तर या नको असलेल्या अनाथ मुलीपासून सुटका करून घ्यायची तिला एक अनपेक्षितरित्या चांगली संधी चालून आली होती पण त्याबद्दल तिला कृतज्ञताही वाटली नाही.

ती मिसेस ब्लूविटबद्दल फक्त ऐकून होती. एक अतिशय बारीक सडपातळ स्त्री, पण कामगारांना अगदी धारेवर धरणारी, अत्यंत कजाग आणि कंजूस मालकीण अशी तिची ख्याती होती. तिची नोकरी सोडून गेलेल्या नोकरांकडून तिच्या स्वभावाचे आणि एकूण सर्व कुटूंबाचे विशेषतः तिच्या भांडणखोर मुलांचे भयंकर किस्से मारिला ऐकून होती. अशा स्त्रीच्या दयाबुध्दीवर ॲनीला सोपवण्याच्या विचाराने मारिलाची सद्सद्विवेकबुद्धी अस्वस्थ झाली.

"ठिक आहे, आपण बसून याबाबत बोलू," असे तिने मिसेस स्पेन्सरला सांगितले.

a

"अरेच्चा! हे काय बहुधा मिसेस ब्लूविट इकडे येत आहेत. हे चांगले झाले आपण लगेचच या प्रकरणाचा निकाल लावू शकतो." असे म्हणत मिसेस स्पेन्सर सर्वांना आता हॉलमध्ये घेऊन गेल्या आणि मिसेस ब्लूविट आणि मारिला यांची ओळख करून देऊन नेमका काय समजूतीचा घोटाळा झाला याची त्यांनी मिसेस ब्लूविटना कल्पना दिली. कालचे त्यांचे लहान मुली हवी असल्याचे मत आताही कायम असेल तर ॲनी त्यांना चालले काय याची पण विचारणा केली.

गरिब बिचारी ॲनी, चिमणी एव्हढे तोंड करून एका स्टुलावर बसून मिसेस ब्लूविट यांच्या तोंडाकडे बघत होती. या धारदार चेहऱ्याच्या, तीक्ष्ण डोळ्यांच्या स्त्रीच्या हाताखाली रहावे लागेल की काय असा प्रश्न तिला पडला होता, पोटात भीतीने ढवळत होते, डोळे पाझरायच्या बेतात होते. उसने अवसान आणून ती शांत रहाण्याचा प्रयत्न करत होती.

मिसेस स्पेन्सरनी सर्व खुलासा केल्यावर मिसेस ब्लूविटनी ॲनीला नखशिखांत निरखून पाहिले आणि तिचे नाव काय आणि वय किती असा प्रश्न विचारला.

"शर्ली, मी अकरा वर्षांची आहे," असे तिने मोजके उत्तर दिले. ॲन ऐवजी ॲनी म्हणावे असे बोलण्याचे तिला धाडस झाले नसावे.

"हं! तुझ्याकडे पाहून तुझ्यात फार काही विशेष आहे असे वाटत नाही. बरीच बारीक आहेस पण काटक असलीस तर चांगले. मी जर तुला घरी ठेवून घेतले तर तुला चांगली, हुषार आणि आदबशीर मुलगी बनायला हवे. तुझी जेवणाखाण्याची आणि रहाण्याची सोय केली जाईल त्यात काही चूक होणार नाही. मिस कथबर्ट मी तिला माझ्या घरी घेऊन जायला तयार आहे. मला जरा घाई आहे. आमचे बाळ भयंकर चिडखोर आहे आणि मी त्याच्याकडे लक्ष देऊन थकले आहे. तुम्हाला चालत असेल तर मी तिला आत्ताच घरी जाईन."

मारिलाची नजर ॲनीकडे वळली, तिच्या फिकटलेल्या चेहऱ्यावर दु:ख दाटून आले होते--एक असहाय्य लहानसा जीव, परत एकदा त्याच सापळ्यात अडकला जात होता ज्यातून नुकतीच सुटका झाली अशी तिची समजूत होती. तिच्या डोळ्यात मदतीची याचना होती. आज जर ती याचना अव्हेरली गेली तर त्याची बोच संपूर्ण मरेपर्यंत आपल्याला त्रास देईल असे मारिलाला वाटले. शिवाय तिचे मिसेस ब्लूविट विषयी फारसे चांगले मत नव्हते. अशी स्त्री, एक अत्यंत संवेदनशील मुल सांभाळण्यास योग्य नाही, तिला ती जबाबदारी पेलणार नाही याची तिला खात्री होती.

"मी आत्ताच नक्की सांगू शकत नाही. मी आणि मॅथ्यूने पक्के असे ठरवलेले नाही. खरं तर मॅथ्यू तिला ठेऊन घेण्यासाठी तयार आहे पण मी चूक कशी झाली हे जाणून घेण्यासाठी इथे आले आहे. मला वाटते की तिला पुन्हा घरी घेऊन जाऊन मॅथ्यूशी परत एकदा बोलावे लागेल. त्याच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय मी कोणताही निर्णय घेणे योग्य होणार नाही. जर आम्ही तिला न ठेवण्याचा निर्णय घेतला तर आम्ही उद्या रात्री तिला तुमच्याकडे आणू किंवा पाठवू पण आम्ही नाही केले तर ती आमच्यासोबत राहणार आहे असे समजून चला. ते तुम्हाला चालेल काय, मिसेस ब्लीवेट?"

“मला वाटतं तसेच करावं लागेल,” मिसेस ब्लीवेट तुटकपणे म्हणाल्या.

मारिलाच्या संभाषणाच्या दरम्यान ॲनीच्या चेहऱ्यावर सूर्योदय होत होता. प्रथम निराशेचे रूप मिटले; मग आशेची एक लाली आली; तिचे डोळे शुक्राच्या चांदणीसारखे मंदपणे तेवत होते.

तेव्हढ्यात मिसेस स्पेन्सर आणि मिसेस ब्लूविट काही कामानिमित्त किचनमध्ये गेल्या तेव्हा ॲनी टुणकन उडी मारून मारिलाकडे धावली आणि तिला विचारले, "ओहो! मिस कथबर्ट, तुम्ही खरंच असे म्हणालात की कदाचित तुम्ही

मला ग्रीन गेबल्समध्ये राहू द्याल?" इतक्या हळू कुजबुजत तिने विचारले की जणू मोठ्या आवाजात बोलल्यास ही शक्यता नष्ट होईल की काय असे वाटले असावे.

"तुम्ही खरंच बोललात का? की मी तुम्ही असे बोललात अशी कल्पना केली?" परत एकदा खात्री करण्यासाठी तिने प्रश्न विचारला.

"मला वाटतं की तू तुझ्या त्या कल्पनेवर थोडे नियंत्रण ठेवायला शिकशील तर बरे होइल. ॲनी, तुला खरं काय आहे आणि काय नाही यात फरक करता येत नाही," मारिला तिरसटपणे म्हणाली.

"होय, तू मला 'आमच्या सोबत राहणार आहे', एवढंच म्हणताना ऐकलंस पण त्यापुढील, 'यावर अजून निर्णय झालेला नाही' हे ऐकलेले नाहीस. कदाचित आम्ही मिसेस ब्लीवेटला तुम्हाला घेऊन जाऊ देण्याचा निष्कर्ष काढू, माझ्यापेक्षा तिला नक्कीच तुझी खूप गरज आहे."

"तिच्यासोबत राहायला जाण्यापेक्षा मी आश्रमात परत जाणे पसंत करेन," ॲनी उत्कटतेने म्हणाली. "ती हुबेहुब एखाद्या चेटकीणीसारखी दिसते."

ॲनीच्या अशा बोलण्याला फटकारलेच पाहिजे म्हणून मारिला येणारे हसू दाबत रागावून म्हणाली, "तुझ्यासारख्या लहान मुलीला एखाद्या अनोळखी व्यक्तीबद्दल असे बोलण्याची लाज वाटली पाहिजे. तू तुझ्या जागेवर परत जा आणि शांतपणे बस आणि जरा आपल्या जीभेला आवर घाल आणि एखाद्या चांगल्या मुलीसारखे वागायला शिक."

"तुम्ही मला ठेवून घेणार असलात तर मी तुम्हाला जे काही हवे आहे तसे करण्याचा आणि बनण्याचा प्रयत्न करेन," ॲनी तिच्या जागेकडे जाताना नम्रपणे म्हणाली.

संध्याकाळी जेव्हा त्या ग्रीन गेबल्स येथे परत आल्या तेव्हा त्यांना गल्लीत प्रवेश करतानाच मॅथ्यू भेटले. दुरूनच त्यांना पाहिल्यावर मारिलाला त्यांच्या हेतूची

a

खात्री पटली. तिने ॲनीला तिच्यासोबत परत आणल्याचे पाहून त्यांच्या चेहऱ्यावरचा दिलासा स्पष्टपणे वाचता येत होता. पण गाईंचे दूध काढण्यासाठी बाहेर येईपर्यंत तिने या प्रकरणाबाबत त्यांना काहीच सांगितले नाही. मग तिने त्यांना ॲनीची करुण कहाणी आणि मिसेस स्पेन्सरच्या मुलाखतीचा परिणाम थोडक्यात सांगितला.

"माझे आवडते कोकरू, मी त्या ब्लीविटबाईंना कधीच देणार नाही," मॅथ्यू विलक्षण आत्मियतेने बोलून गेले.

"मला मिसेस ब्लूविटचे वागणे अजिबात आवडत नाही," मारिलाने कबूल केले, "आणि त्यामुळे म्हणून असेल किंवा तुला स्वतःला ती हवी आहे म्हणून असेल, मी तिला इथे ठेवून घेण्याची तयारी दाखवणे गरजेचे होऊन बसले आहे. मला एखाद्या लहान मुलाला आणि विशेषतः अशा मनस्वी मुलीला सांभाळणं किती अवघड असेल याची कल्पना आहे. माझा भयंकर गोंधळ उडून जाईल यात काडीचीही शंका नाही. पण मी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे ठरवले आहे. मॅथ्यू, तुझ्या इच्छेप्रमाणे ती राहू शकते."

मॅथ्यूच्या संकोची चेहऱ्यावर आनंदाची चमक होती.

"म्हणूनच मी तुमची वाट बघत बाहेर उभा होतो. ती एक विलक्षण गोड मुलगी आहे." मॅथ्यू समाधानाने बोलले.

"त्यापेक्षा ती एक आपल्याला उपयोगी पडू शकणारी मुलगी आहे असे तू म्हणू शकला असतास तर ते जास्त अधिक महत्त्वाचे ठरले असते," मारिला म्हणाली.

"त्याप्रमाणे तिला मी शिकवण्याचा प्रयत्न करेन पण मॅथ्यू, तू माझ्या पद्धतींमध्ये ढवळाढवळ करू नकोस. कदाचित मुलांच्या संगोपनाची मला कमी

a

माहिती असेन पण मला वाटते की या बाबत मला तुझ्यापेक्षा जास्त माहिती आहे हे नक्की."

“त्या बाबतीत मारिला, तू स्वतःचा मार्ग शोधू शकतेस. फक्त तिच्याबरोबर शक्य तितके चांगले आणि दयाळूपणे वागायला हवे. त्याबरोबरच ती बिघडून जाणार नाही हे पण पाहिले पाहिजे. ती अशी मुलगी आहे की ती जर का तुमच्यावर प्रेम करायला लागली तर तुम्ही तिच्याकडून काहीही काम करुन घेऊ शकाल,” मॅथ्यूने सल्ला दिला.

त्यांच्या सल्ल्याला नाक मुरडत मारिला चरवी घेऊन दूध काढण्यासाठी गोठ्यात गेली.

दूध काढतांना मारिलाचे विचारचक्र सुरू झाले, "आज रात्री तिला ती इथे राहू शकते हे सांगून चालणार नाही. ती इतकी उत्तेजित होईल की तिने डोळे मिटून घेतले तरी झोप येणार नाही. मी एक अनाथ मुलगी दत्तक घेईन असा दिवस कधीतरी येईल अशी कल्पना पण कधी केली नव्हती. खरोखरच हे एक आश्र्चर्यच आहे. पण त्यापेक्षा मोठे आश्चर्य हे आहे की या सर्वांच्या मागे मॅथ्यू असावा ज्याला नेहमी लहान मुलांची विशेषतः लहान मुलींची भयंकर भीती वाटत होती. असो, आम्ही प्रयोग करण्याचा निर्णय तर घेतला आहे आणि त्यातून काय होईल हे फक्त देवच जाणे.”

# प्रकरण 7

त्या रात्री जेव्हा मारिला ॲनला झोपायला घेऊन गेली तेव्हा ती कडकपणे म्हणाली:

“ॲनी, काल रात्री माझ्या लक्षात आले की तू तुझे कपडे उतरवताना जमिनीवर फेकून दिले होतेस. ही एक अतिशय घाणेरडी सवय आहे आणि मी तसे वागायची अजिबात परवानगी देऊ शकत नाही. कोणतेही कपडे काढताच ते व्यवस्थित घडी करून खुर्चीवर ठेवायला हवेत. नीटनेटके नसलेल्या लहान मुलीचा मला अजिबात उपयोग नाही.”

"काल रात्री मी माझ्या दु:खात इतकी बुडून गेले होते की मी माझे कपडे घडी घालून ठेवायचे विसरून गेले,” ॲनी म्हणाली. “मी आज रात्री छान घडी घालून ठेवेन. अनाथाश्रमात आम्हाला ते नेहमी करायला लावत असत. पण मी बऱ्याच वेळा विसरत असे, मला छान छान गोष्टींची कल्पना करत झोपायला आवडते."

“इथे राहाताना तुला थोड्या चांगल्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील,”मारिलाला सल्ला दिला.

“इथे अव्यवस्थितपणा चालणार नाही. आता तुझी प्रार्थना कर आणि झोप.”

“मी कधीच प्रार्थना करत नाही,” फॲनीने घोषणा केली.

a

मारिला चेहऱ्यावर भयंकर आश्चर्य उमटले. "ॲनी, तुला असे म्हणायचे की तू झोपताना प्रार्थना कधीच म्हणत नाहीस? देव नेहमी लहान मुलांची प्रार्थना ऐकतो असतो. तुला देव म्हणजे कोण ते तरी माहित आहे काय?"

"'देव एक आत्मा आहे, अनंत, शाश्वत आणि अपरिवर्तनीय. त्याच्या अस्तित्वात, शहाणपण, सामर्थ्य, पवित्रता, न्याय, चांगुलपणा आणि सत्य वास करत असते,' " ॲनने त्वरित आणि योग्य उत्तर दिले.

मारिला थोडी निश्चिंत झाल्यासारखी दिसली. "नशीब तुला काहीतरी माहित आहे, या बद्दल देवाचे आभार! तू फारशी असंस्कृत दिसत नाहीस. तू हे कुठे शिकलीस?"

"आमच्या अनाथाश्रमाच्या रविवारच्या शाळेत.. त्यांनी आम्हाला संपूर्ण तोंडपाठ करून घेतले होते. काही शब्द मला तर खूपच आवडले. 'अनंत, शाश्वत आणि अपरिवर्तनीय.' पण आपण याला कविता म्हणू शकत नाही, मला कविता खूप छान वाटते, तुम्हाला पण आवडते का?"

"आपण कवितेबद्दल बोलत नाही आहोत, ॲनी- तुझ्या प्रार्थना करण्याबद्दल बोलत आहोत. दररोज रात्री प्रार्थना न करणे ही चांगली गोष्ट नाही हे तुला माहीत नाही का? मला भीती वाटते की तू खूप वाईट मुलगी आहेस."

"तुमचे केस लाल असतील तर चांगले होण्यापेक्षा वाईट असणं चांगले असे तुम्हाला सुध्दा वाटेल," ॲन निंदाव्यजक स्वरात म्हणाली. "ज्या लोकांचे लाल केस नाहीत त्यांना त्यांचा त्रास काय आहे हे माहित नाही. मिसेस थॉमस यांनी मला सांगितले की देवाने माझे केस, हेतूपुरस्सर लाल केले आहेत आणि तेव्हापासून मी कधीही देवाला प्रसन्न करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत आणि असेही असू शकेल की मी नेहमी रात्री खूप थकून जात असे, प्रार्थना करण्या एव्हढी शक्ती माझ्याकडे उरत नसे. ज्या लहान मुलांना, जुळ्या मुलांची काळजी घ्यायला लागते,

त्यांच्याकडून प्रार्थना म्हणण्याची अपेक्षा केली जाऊ नये. आता मला सांगा, अशी मुले प्रार्थना करू शकतील असे तुम्हाला प्रामाणिकपणे वाटते का?"

या प्रश्नाचे उत्तर मारिलाने दिले नाही पण लगेचच मनाशी पक्के ठरवले की ॲनीचे धार्मिक शिक्षण लगेचच सुरू केले पाहिजे. आता वेळ गमावून चालले नसते.

"तू माझ्या घरी असताना प्रार्थना म्हणायलाच पाहिजेस, ॲनी."

"ठिक आहे, जर तुम्हाला मी घरी हवी असेन तर नक्कीच मी प्रार्थना म्हणेन," ॲनीने आनंदाने होकार दिला. "मी तुम्हाला खुश करण्यासाठी काहीही करेन. पण यासाठी तुम्हाला, मला नेमके काय म्हणायचे ते सांगावे लागेल. मी अंथरुणावर पडल्यानंतर मी नेहमी म्हणण्यासाठी खरोखर छान प्रार्थना करेन. मला विश्वास आहे की ते खूप मनोरंजक असेल, आता मी याचा विचार करते."

"त्यापुर्वी तुला गुडघे टेकले पाहिजेत," तिचे अज्ञान पाहून मारिला अचंबित झाली होती.

ॲनीने मारिलाच्या सांगण्यानुसार गुडघे टेकले आणि गंभीरपणे वर पाहिले.

"प्रार्थना करण्यासाठी गुडघे का टेकले पाहिजेत? जर मला खरोखर प्रार्थना करायची असेल तर मी काय करेन ते मी तुम्हाला सांगते. मी एकटीच मोठ्या शेतात किंवा दूर जंगलात जाईन आणि सुंदर निळ्या आकाशाकडे पाहत प्रार्थना म्हणेन. बरं, मी तयार आहे. मी काय बोलू?"

मारिला मनात विचार करू लागली नेहमीची साधी पवित्र प्रार्थना शिकताना ॲनी नक्कीच त्याकडे एक विनोद म्हणून बघेल तेव्हढी तिची बुध्दी तल्लख आणि मार्मिक आहे. ज्या मुलीला माणसांच्या माध्यमातून प्रेमाचा शब्द मिळाला नाही, मायेचा स्पर्श लाभला नाही, तिने देवाकडे नेमके कशासाठी आभार मानायला कृतज्ञतेने प्रार्थना करायची, असा प्रश्न नक्कीच विचारेल. पुढचा प्रश्न टाळण्यासाठी मारिलाने तिला उलट प्रश्न केला, "स्वतःसाठी प्रार्थना करण्याइतपत तू मोठी आहेस,

असे तुला वाटत नाही काय? तुला हव्या असलेल्या गोष्टी नम्रपणे माग आणि लाभलेल्या कृपेसाठी देवाचे आभार मान."

“ठीक आहे, मी माझे सर्वतोपरी प्रयत्न करेन,” ॲनीने वचन दिले. "हे कृपामय स्वर्गीय पित्या-चर्चमध्ये फादर असेच म्हणतात, म्हणून मला वाटते की घरातील प्रार्थनेत चालू शकेल, नाही का?” तिने विचारले. “हे दयाळू स्वर्गीय पित्या, मला आनंदाचा शुभ्र मार्ग, चमकदार पाण्याचा तलाव, लाल पांढरी फुले देणारा बोनी आणि स्नो क्वीन चेरीची ओळख करून दिल्याबद्दल, मी तुझे आभार मानते. मी या सर्वांची खरोखरच अत्यंत ऋणी आहे आणि हे सर्व मला मिळालेल्या आशीर्वादच आहेत ज्याबद्दल मी आत्ताच तुझे आभार मानते. मला हव्या असलेल्या असंख्य गोष्टींची, नावे देण्यास बराच वेळ लागेल, म्हणून मी फक्त दोन सर्वात महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करेन. कृपया मला ग्रीन गेबल्स येथे राहू द्या; आणि कृपया मी मोठी झाल्यावर मला सुंदर बनव.”

“तुमची आदरपूर्वक,

“ॲन शर्ली."

"मी ठीक प्रार्थना केले काय?” तिने उत्सुकतेने उठून विचारले. "मला यावर विचार करण्यासाठी थोडा वेळ मिळाला असता तर मी अधिक चांगल्या प्रकारे प्रार्थना केली असती."

बिचाऱ्या मारिलाला एका मोठ्या धर्मसंकटातून सुटका झाल्यासारखे वाटले. ॲनीच्या मनात परमेश्वराच्या प्रती अनादर नव्हता फक्त आध्यात्मिक अज्ञान होते ज्यामुळे तिने अशी लोक विलक्षण प्रार्थना केली होती. तिने ॲनीला झोपायला

सांगितले आणि दुसऱ्या दिवशी तिला प्रार्थना शिकवण्याचे ठरवून खोलीतून बाहेर निघाली. तेव्हढ्यात ॲनीने परत हाक मारली आणि तिला विचारले, “मी 'तुमचा आदरपूर्वक' असे म्हणण्याऐवजी 'आमेन' असे म्हणायला हवे होते काय? चर्चमध्ये फादर 'आमेन' असे म्हणतात. मी ते विसरले त्यामुळे काही फरक पडेल काय?"

“मी—मला असे वाटत नाही,” मारिला म्हणाली. “आता चांगल्या मुलाप्रमाणे झोप. गुड नाईट."

आज ॲनी आनंदाने गुड नाईट म्हणाली.

मारिला किचनमध्ये गेली आणि मेणबत्ती टेबलावर ठेवून मॅथ्यूला म्हणाली, “या मुलीला ज्या कोणी सांभाळले आहे त्यांनी धर्मातील कोणत्याही गोष्टींची माहिती करून दिली नाही. अगदीच असंस्कृतपणे मोठी झाली आहे. आज रात्रीपर्यंत तिने तिच्या आयुष्यात कधीही प्रार्थना केली नाही यावर तुझा विश्वास बसेल काय?

“मी तिला चर्चमध्ये मास साठी पाठवेन आणि ' पिप ऑफ दे डे' ची सर्व पुस्तके अभ्यासासाठी घेऊन येईन. तिच्यासाठी योग्य कपडे आणल्यावर तिला संडे-स्कूलला पाठवता येईल. मला तिच्यावरती बरीच मेहनत घ्यावी लागणार हे उघड आहे. या जगात भरपूर समस्या आहेत. मी आतापर्यंत खूप सोपे जीवन जगले आहे, परंतु आता माझी अवघड गोष्टींचा सामना करायची वेळ आली आहे आणि मला माझे सर्वोत्तम द्यावे लागेल.”

# प्रकरण 8

मारिलाने ॲनीला घरी ठेवून घेण्याचे नक्की केले होते पण ॲनीला मुद्दाम त्याची कल्पना दिली नव्हती. तिने सकाळपासून ॲनीला वेगवेगळ्या कामात गुंतवून ठेवले होते. तिच्या काम करण्यावर मारिलाचे बारीक लक्ष होते. दुपारपर्यंत मारिलाची खात्री पटली की ॲनी हुशार आणि आज्ञाधारक मुलगी असून काम करण्यास इच्छुक आणि शिकण्यास तत्पर आहे. मात्र तिच्या वागण्यात एक मोठी समस्या होती ती म्हणजे एखादी गोष्ट करता करता ती दिवास्वप्नात हरवून जात असे आणि मग हाती घेतलेले काम तिथल्या तिथे राहून जाई. तिला रागे भरल्याखेरीज ती भानावर येत नसे. त्यामुळे हाती घेतलेले काम पूर्ण होण्यास जास्त वेळ लागे.

ॲनीने रात्रीची भांडी घासली आणि मग मात्र तिचा धीर सुटला. अचानक ती वेगाने मारिलाकडे वळली; जीवनातील एका वाईट गोष्टीला सामोरे जाण्याचा तिचा निर्धार झाला होता पण आता त्यासाठी तिची थांबण्याची तयारी नव्हती; एकदाच काय तो सोक्षमोक्ष लावण्याचे तिने ठरवले. तिचा चेहरा लाल झाला होता, तिचे अशक्त शरीर थरथरत होते, डोळे कधीही पाझरायच्या बेतात होते, तिने मारिलाचा हात घट्ट पकडला आणि थरथरत्या आवाजात तिला विनवणी केली, "मिस कथबर्ट, तुम्ही मला इथे राहायला ठेवून घेणार आहात की नाही? सकाळपासून मी धीर धरण्याचा प्रयत्न केला आहे पण आता मात्र मी अजून वाट बघू शकत नाही. भीतीने मला काहीच सुचेनासे झाले आहे. कृपया मला तुमचा निर्णय सांगा."

"ॲनी, मी तुला भांडी पुसून ठेवण्याचे कापड गरम पाण्याने धुवून वाळत टाकायला सांगितले होते ते काम मला कोणताही प्रश्न विचारण्या अगोदर पूर्ण कर."

ॲनी निमुटपणे गेली आणि सांगितलेले काम पूर्ण करून आल्यावर मारिला समोर काही न बोलता उभी राहिली, तिच्या मोठ्या डोळ्यात विनंती दिसत होती, एका कटू सत्याला सामोरे जाण्यासाठी तिने डोळे मिटून घेतले.

“ठीक आहे,” मारिला म्हणाली, आता तिच्याकडे स्पष्टीकरण लांबणीवर टाकण्याचे कोणतेही निमित्त नव्हते,” आता तुला सांगायला हरकत नाही की मॅथ्यू आणि मी तुला घरी ठेवून घेण्याचा निर्णय घेतला आहे--जर तू एक चांगली मुलगी बनण्याचा प्रयत्न करणार असशील तर त्या साठी तू परमेश्वराचे आभार मानायला हवेत, आता तुझे समाधान झाले काय?"

“आता मला रडू येत आहे पण त्याचे कारण मला माहित नाही. मला खूप आनंद झाला आहे खरं तर त्यासाठी आनंद हा शब्द पण योग्य नाही. तसा तर मला शुभ्र रस्ता आणि चेरी ब्लॉसम साठी आनंद झाला होता पण हे आनंदापेक्षाही काही वेगळे आहे. मी खूप आनंदी आहे. मी खूप चांगली होण्याचा प्रयत्न करेन. मी खूप मेहनत करण्याचा दृढनिश्चय केला आहे. मी माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करेन. पण मी का रडत आहे ते सांगू शकाल का?"

“कारण तू उत्साहीत आहेत आणि काळजीने थकलेली आहेस,” मारिला नापसंतीच्या स्वरात म्हणाली. "खुर्चीत बस आणि स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न कर. तू रडत रडत, हसत आहेस. होय, तू येथे राहू शकतेस आणि आम्ही तुझ्याकडून योग्य ते करून घेण्याचा प्रयत्न करू. तुला शाळेत जावे लागेल; पण सुट्टीसाठी फक्त पंधरवडा उरला आहे त्यामुळे सप्टेंबरमध्ये शाळा सुरू होईल."

“मी तुम्हाला काय म्हणून हाक मारू?” ॲनीने विचारले. “मी नेहमी मिस कथबर्ट म्हणू की मी तुम्हाला मारिला आंटी म्हणू?"

“नाही; तू मला फक्त मारिला म्हण. मला मिस कथबर्ट हाक ऐकायची सवय नाही.”

"फक्त मारिला म्हणणे अत्यंत अनादराचे वाटते,” ॲनीने निषेध केला.

“तू आदरपूर्वक बोलण्याची काळजी घेतली तर त्यात अनादर करण्यासारखे काहीही होणार नाही असे मला वाटते. ॲव्हनली मधील प्रत्येकजण मला मारिला म्हणतात.”

“पण मला, तुला मारिला आंटी म्हणायला आवडेल,” ॲनी उत्सुकतेने म्हणाली. “मला कोणी नातेवाईक नाहीत. आंटी म्हणाल्यावर मला असे वाटेल की मी खरोखरच तुझी आहे. खरंच मी तुला आंटी मारिला म्हणू शकत नाही का?"

“नाही. मी तुझी आंटी नाही म्हणून मला आंटी अशी हाक मारलेली आवडणार नाही.”

"मी कल्पना करू शकते की तू माझी मावशी आहेस."

"पण मी तसे करू शकत नाही,” मारिला गंभीरपणे म्हणाली.

"तुम्ही कधीच खरोखरच ज्या गोष्टी अस्तित्वात आहेत त्यांच्या विषयी एखादी वेगळी कल्पना करत नाही?” ॲनीने डोळे मोठे करून विचारले.

"नाही."

"अरेरे!”ॲनीने दीर्घ श्वास घेतला.

“मिस-मारिला, तुम्ही खूप मोठ्या आनंदाला मुकत आहात!"

“माझा खरोखरच ज्या गोष्टीं अस्तित्वात आहेत त्यांच्या विषयी वेगळ्या गोष्टींची कल्पना करण्यावर विश्वास नाही,” मारिलाने उत्तर दिले.

“देवाने जे निर्माण केले आहे त्याविषयी आपण वेगळी कल्पना करणे देवाला अपेक्षित नाही. आता मला तुला आठवण करून द्यायची आहे हात पाय

स्वच्छ करून, टेबलावर एक चित्रांचे कार्ड ठेवले आहे त्यावरची प्रार्थना आज दुपारी मनापासून पाठ कर. काल रात्री प्रमाणे केलेली प्रार्थना यापुढे होणार नाही."

"खरोखरच मी प्रथमच प्रयत्न केला होता मग मला एकदम चांगली प्रार्थना कशी करायला जमेल? पण मी झोपताना एक सुंदर प्रार्थना तयार केली अगदी चर्चमधील पाद्री म्हणतात तशी मोठी आणि काव्यमय होती. पण सकाळी मी विसरून गेले."

"ॲनी तुझ्या लक्षात येत आहे काय, जेव्हा मी एखादे काम सांगते, तेव्हा ती आज्ञा लगेच पाळायला हवी, इथे थांबून चर्चा करण्यात वेळ घालवू नये."

ॲनी लगेच तेथून हॉलमध्ये गेली. दहा पंधरा मिनिटे तिची काहीच हालचाल न समजल्याने मारिला तिला पाहायला गेली. भिंतीवर टांगलेल्या एका चित्रासमोर ॲनी स्तब्ध उभी असलेली दिसली."

"ॲनी, तू काय विचार करत आहेस?" मारिलाने मोठ्याने विचारले.

ॲनी एकदम भानावर आली आणि म्हणाली, "या येशू ख्रिस्ताच्या चित्रात कोपऱ्यात एक छोटी मुलगी उभी आहे, तिचा मी विचार करत होते. ती पण माझ्यासारखी एकटी आणि उदास दिसते. मला वाटते ती पण अनाथ असावी, येशूच्या आशीर्वाद मागण्यासाठी आली असावी पण गर्दी बघून बाजूला झाली असणार. तिच्याकडे येशूचे लक्ष जावे म्हणून म्हणून तिचे हृदय धडधडत असावे आणि तिचे हात थंड झाले असावेत, मघाशी मी तुम्हाला विचारत होते तेव्हा माझी सुध्दा तशीच अवस्था झाली होती. कदाचित त्याचे लक्ष तिच्याकडे जाणार नाही, पण तो असे करेल काय? शेवटी त्याने तिच्या डोक्यावर हात ठेवल्यावर तिला कसे वाटेल? तिच्या चेहऱ्यावर आनंद केव्हढा पसरेल! पण मला वाटते चित्रकाराने येशूच्या चेहऱ्यावर एव्हढे दु:खी भाव दाखवायला नको होते. तुम्ही लक्षात घेतले असेल तर सर्व चित्रात त्यांचा असाच उदास चेहरा असतो. पण ते तो खरोखर इतका

उदास दिसत असेल यावर माझा विश्वास नाही नाहीतर लहान मुलांना त्यांची भीती वाटली असती.”

"ॲनी, असे बोलू नये. असे बोलणे अपमानास्पद आहे."

ॲनीचे डोळे आश्चर्यचकित झाले. “का, मला ते तितकेच आदरणीय वाटले. मला खात्री आहे की मला अनादर करायचा नव्हता.”

“ठिक आहे तू असे केले नसशील पण लहान मुलांनी असे बोलू नये. तुला मी प्रार्थना पाठ करायला सांगितली होती. हे चित्रांचे कार्ड घे आणि त्यातील चित्रांचा विचार न करता कोपऱ्यात बसून मनापासून प्रार्थना पाठ कर पण तुझ्या जीभेला लगाम घाल,” मारिला म्हणाली.

ॲनीने सफरचंदाच्या फुलांच्या कळीला एक चुंबन दिले आणि नंतर थोडावेळ परत अभ्यास केला. ॲनीने ते कार्ड सजावटीसाठी आणलेल्या सफरचंदाच्या फुलांमध्ये ठेवले आणि प्रार्थना पाठ करू लागली.

"मला ही प्रार्थना आवडते, ती सुंदर आहे. मी संडे-स्कूलच्या अधीक्षकांना म्हणताना ऐकली आहे. पण तेव्हा मला ती आवडली नव्हती. त्यांचा आवाज कर्कश होता आणि खूप दु:खी आवाजात त्यांनी प्रार्थना म्हटली होती. पण मला अगदी संगीतासारखी मधूर सुंदर कविता वाटली. मला खूप आनंद झाला आहे की तुम्ही मला हे शिकायला लावलेत."

"मिस-मारिला, ॲव्हनलीमध्ये मला एखादी मैत्रीण मिळेल?"

“मैत्रीण? कशी मैत्रीण?"

"मला जीवाभावाची मैत्रीण हवी आहे, जिच्यावर माझा पूर्ण विश्वास असेल, अशी मैत्रीण मिळावी असे माझे खूप जूने स्वप्न आहे पण ते कधी पूर्ण होईल असे आजवर वाटत नव्हते पण आता माझी इतकी सुंदर स्वप्ने एकाच वेळी पूर्ण

झाली आहेत की कदाचित हे देखील होईल असे वाटते. हे शक्य आहे असे तुम्हाला वाटते का?"

"डायना बॅरी, ऑर्चर्ड स्लोप येथे राहते आणि ती तुझ्याच वयाची आहे. ती खूप छान मुलगी आहे, आणि कदाचित ती घरी आल्यावर तुझी आणि तिची जोडी जमेल. ती आत्ताच कार्मोडी येथे तिच्या मावशीला भेटायला आली आहे. पण तुला वागताना काळजी घ्यावी लागेल कारण तिची आई, मिसेस बॅरी एक शिष्टाचार पाळणारी स्त्री आहे. ती डायनाला असंस्कृत, गावंढळ मुलीशी मैत्री करू देणार नाही."

ॲनीने सफरचंदाच्या फुलांमधून मारिलाकडे पाहिले, तिचे डोळे आनंदाने चमकत होते.

"डायना दिसायला कशी आहे? तिचे केस लाल तर नाहीत ना? स्वतःला लाल केस अजिबात आवडत नाहीत त्यामुळे मैत्रिणीचे लाल केस असतील तर अजून वाईट वाटेल."

"डायना खूप सुंदर मुलगी आहे. तिचे डोळे आणि केस काळेभोर आहेत. रंग गोरापान, गाल गुलाबी आहेत. मुख्य म्हणजे वागायला चांगली आणि शाळेत हुशार आहे, जे सुंदर असण्यापेक्षा जास्त महत्वाचे आहे."

हे ऐकून ॲन खूपच आनंदली.

"कित्ती छान! निदान माझी मैत्रीण तरी सुंदर आहे, हे चांगले आहे. तुम्हाला सांगू काय, मी जेव्हा मिसेस था ॅमस यांच्या घरी राहत होते, तिथे एक पुस्तकांचे कपाट होते. त्याच्या दोन्ही दारांना आरसे होते. मिसेस था ॅमस त्यात त्यांचे चीनी मातीची क्रोकरी आणि लोणची, सा ॅस, जाम वगैरे गोष्टी ठेवत असत. त्या कपाटाच्या एका दरवाज्याची कांच, मिस्टर था ॅमस यांचेकडून दारुच्या नशेत दंगा करताना फुटली होती. दुसऱ्या आरश्यात मला माझे प्रतिबिंब दिसे, मी त्या

a

प्रतिबिंबातील मुलीला माझी मैत्रीण समजत असे. तिला मी 'केटी मॉरिस' म्हणून हाक मारत असे. रिकाम्या वेळी आमच्या गप्पा गोष्टी चालत. मला वाटे जर मिसेस था‌ॅमसनी कपाटातील सामान काढून कपाट रिकामे केले तर किती मज्जा येईल. मला केटी, 'ॲलीस इन वंडर लॅड' सारखी तिच्या जगात घेऊन जाईल आणि आम्हा दोघीना कायम एकत्र राहता येईल. तिथून मिसेस हॅमंड यांच्या घरी जाताना मला केटीचा निरोप घेताना खूप वाईट वाटले. ती पण माझ्यासाठी रडत होती. हॅमंड यांच्या घरी पुस्तकाचे कपाट नव्हते. पण त्यांचे घर नदीच्या जवळ होते. जवळ एक डोंगर होता. त्या डोंगराजवळ जाऊन बोलले की आपल्या आवाजाचा प्रतिध्वनी ऐकू येत असे. मी त्याला माझ्या नवीन मैत्रीणीचा आवाज असे ठरवून टाकले. तिचे नाव मी

'व्हायोलेटा' असे ठरवले होते. मी जे बोलेन ते ती बोलायची. मी तिच्यावर पण केटी इतकेच प्रेम केले. शेवटी तिथून अनाथाश्रमात जाण्यापुर्वी तिला 'गुड बाय'

म्हणाले तेव्हा तिचा आवाज रडवेला झाला होता. अनाथाश्रमात मला कुणाशी मैत्री करण्याची इच्छा झाली नाही."

"आता तरी अशा कल्पना विश्र्वातून बाहेर पड आणि खऱ्याखुऱ्या मुलीशी मैत्री कर. तुझ्या जुन्या काल्पनिक मैत्रीणींची गोष्ट तिला सांगू नकोस नाहीतर ते ऐकल्यानंतर तिची आई, मिसेस बॅरी तिला तुझ्याबरोबर खेळायला पाठवणार नाही." मारिलाने योग्य सल्ला दिला.

"नाही, मी तसे आता करणार नाही. मी त्यांच्याबद्दल प्रत्येकाशी बोलू शकत नाही - त्यांच्या आठवणी माझ्यासाठी खूप पवित्र आहेत. पण मला वाटले की तुम्हाला त्यांच्याबद्दल माहिती करून घ्यायला आवडेल. अरेच्या! ही बघा, सफरचंदाच्या फुलातून नुकतीच एक मोठी मधमाशी बाहेर पडली आहे. जरा विचार करा की राहण्यासाठी किती सुंदर जागा आहे —त्या सफरचंदाच्या फुलात! वारा तो

डोलत असताना त्यात झोपायला कित्ती मज्जा येत असेल. जर मी मुलगी नसते तर मला वाटते की मला मधमाशी बनून फुलांमध्ये राहायला आवडले असते.”

"काल तुला 'समुद्र पक्षी' व्हायचे होते,”मारिलाने आठवण करून दिली. “मला वाटतं तू मनाने खूप चंचल आहेस. मी तुला ती प्रार्थना पाठ करायला सांगितले आहे त्याकडे पूर्ण लक्ष दे. कोणी ऐकत असेल तर तू बोलणे थांबावायचे नावच घेत नाहीस. आता बोलू नकोस, तुझ्या खोलीत जा आणि प्रार्थना पाठ कर."

“मला आता जवळजवळ सर्व पाठ आहे - फक्त शेवटची ओळ राहिली आहे."

“बरं, हरकत नाही, तरी मी तुला सांगते तसं कर. तू तुझ्या खोलीत जा आणि नीट पाठ कर, जोपर्यंत मी तुला चहा पिण्यास मदत करायला बोलावत नाही, तोपर्यंत तिथेच थांब.”

"मी माझ्यासोबत सफरचंदाची फुले घेऊन जाऊ शकते का?” ॲनीने विनंती केली.

“नाही; तुझी खोली मला फुलांनी भरायला नको. ती झाडावरच असलेली बरी.”

"मलाही थोडं तसं वाटलं,” ॲनी म्हणाली. “पण मला त्यांना तोडल्याशिवाय राहवले नाही. तुम्हाला असे प्रलोभन पडते तेव्हा तुम्ही काय करता?”

"ॲनी, मी तुला तुझ्या खोलीत जायला सांगितल्याचे तू ऐकलेस ना?"

ॲनीने उसासा टाकला, पूर्वेकडील छपराच्या उतरत्या भागातील खिडकीजवळ जाऊन खुर्चीत बसून विचार करु लागली, “मला प्रार्थना पाठ झाली आहे. आता मी माझी खोली कशी असेल याची कल्पना करणार आहे. खोलीत गुलाबी गुलाबाचे चित्र विणलेला पांढराशुभ्र वेल्वेटचा गालीचा पसरला आहे.

a

खिडक्यांचे पडदे पण गुलाबी रंगाचे आहेत. भिंतीवर सोनेरी चंदेरी धाग्यांच्या वेलबुट्टीने सजवलेले जाडजूड टेपेस्ट्री टांगलेल्या आहेत. खोलीत महागनीचे फर्निचर आहे, ते कसे असते ते मला माहित नाही पण नक्कीच भारी दिसत असणार. किरमिजी, सोनेरी रंगाच्या गाद्या गिरद्या, त्यावर निळया, गुलाबी रेशमी रंगाचे बेड कव्हर घातलेले आहेत. पलंगावर बसून मी समोरच्या मोठ्या आरश्यात स्वतःला पाहते आहे. पांढरा लेसचा गाऊन घातलेला आहे, गळयात मोत्यांचा क्रा ॅस घातला आहे. माझा रंग गोरापान असून केस काळेभोर आहेत. माझे नाव लेडी कॉर्डेलिया फिट्झगेराल्ड आहे. नाही, असे नाही—हे चित्र खरे वाटू शकत नाही.”

समोरच्या आरशात तिला स्वतःचा चेहरा दिसला: लालसर पिंगट डाग पडलेला, करड्या रंगाचे गंभीर डोळे आणि नावडते लालसर केस ते पाहून ॲनी कळवळून म्हणाली, ”मी फक्त ग्रीन गेबल्सची ॲनी आहे, मी लेडी कॉर्डेलिया कधीच बनू शकणार नाही. पण अनाथाश्रमातील पोरकी ॲनी असण्यापेक्षा ग्रीन गेबल्सची ॲनी असणे, लाखो पटीने चांगले आहे, नाही का?”

पुढे वाकून तिने आपल्या प्रतिबिंबाचे चुंबन घेतले आणि खिडकीतून बाहेर पाहत, समोरचे स्नो क्वीन: चेरीचे झाड, त्यामागचा बर्चचा मोठा वृक्ष, दूरच्या टेकडीवरचे राखाडी घर या साऱ्यांना 'गुड आफ्टर नून' म्हटले.”डायना खरचं माझी जिवलग मैत्रीण होईल? मी तिच्यावर खूप प्रेम करेन. पण मी केटी मॉरिस आणि व्हायोलेटाला कधीही विसरू शकणार नाही. दुर्दैवाने तसे झाले तर त्या दुखावल्या जातील. मला त्यांना लक्षात ठेवायला हवे."

ॲनीने चेरीच्या झाडाला 'फ्लाईंग किस' दिला आणि हनुवटीवर दोन्ही हात टेकवून तिच्या स्वप्नांच्या दुनियेत हरवून गेली.

# प्रकरण 9

ॲनी ग्रीन गेबल्स मध्ये राहायला आल्यापासून पंधरवडा उलटून गेला. मिसेस रेचेल यांच्या मनात तिला पाहण्याची उत्सुकता लागून राहिली होती पण त्या काही ग्रीन गेबल्सला भेट देऊ शकल्या नाहीत. त्यांच्या या अगोदरच्या भेटीनंतर लगेच त्या फ्ल्यूने आजारी पडल्या. त्या सहसा आजारी पडत नसत त्या आजारी लोकांचा जवळजवळ तिरस्कार करत पण फ्ल्यू पुढे त्यांचा नाईलाज झाला. डॉक्टरांनी त्यांना बाहेर जाण्याची परवानगी देताच त्या घाईघाईने ग्रीन गेबल्सकडे गेल्या. मॅथ्यू आणि मारिला त्या अनाथाश्रमातून आणलेल्या मुलीची देखभाल कशी करतात हे पाहण्याची कोण उत्सुकता त्यांना लागून राहिली होती. सध्या सर्व ॲव्हनली गावात हीच चर्चा सुरू सुरू होती, त्याचा माग काढणे मिसेस रेचेलना गरजेचे वाटत होते.

ॲनीने त्या पंधरवड्यातील रिकाम्या वेळेचा पुरेपूर उपयोग करून घेतला होता. आजुबाजुच्या प्रत्येक झाडा झुडपांशी तिची ओळख झाली होती. सफरचंदाच्या बागेच्या मागून जंगलात जाणारी पायवाट तिला शोधून सापडली

होती. नदी, पूल, देवदार, फर, जंगली चेरी, मॅपल यांना भेटून झाले होते. वसंत ऋतूतील आल्हाददायक हवा, कधी नव्हे ते मिळालेले स्वातंत्र्य यामुळे ॲनी हरखून गेली होती. जंगलातील ओढ्यात अजून थोडे बर्फ होते पण त्याच्या स्वच्छ थंडगार पाण्यात खेळायला गंमत येत होती. त्याच्यावरचा पूल ओलांडून ॲनी वृक्षाच्छादित टेकडीवर पण जाऊन आली. तिथे असंख्य नाजूक "जून बेल्स"ची फुले फुलली होती. वुडलँड ब्लूम्स, फिकट गुलाबी एरियल स्टारफ्लॉवर अशा रानफुलांनी माळरान सजले होते. झाडांमध्ये कोळयाच्या जाळयाचे धागे चांदीच्या धाग्यांसारखे चमकत होते. ही सर्व भटकंती तिने रोज खेळण्यासाठी मिळणाऱ्या अर्ध्या तासात केली होती आणि तिने गोळा केलेली माहिती मॅथ्यू आणि मारिलाला अत्यंत आत्मीयतेने सांगितली. मारिलाने त्याकडे दुर्लक्ष केले निदान मॅथ्यूने काही न बोलता आनंदाने ऐकून घेतले. शेवटी तिची बडबड मारिलाला रागावून बंद करणे भाग पडले.

मिसेस रेचेल आली तेव्हा ॲनी बागेत स्वच्छंदपणे भटकत होती. आल्या आल्या मिसेस रेचेलने स्वतःच्या आजाराचे आख्यान सुरू केले आणि शेवटी येण्याचे खरे कारण सांगितले, "मारिला, मी तुझ्याबद्दल आणि मॅथ्यूबद्दल काही आश्चर्यकारक गोष्टी ऐकत आहे."

"खरे पाहता तुझ्यापेक्षा मीच जास्त आश्र्चर्यचकीत झाले आहे" मारिला म्हणाली.

"अशी चूक झाली हे खूप वाईट आहे," मिसेस रेचेल सहानुभूतीने म्हणाल्या. "तुम्ही तिला परत का पाठवले नाही?"

"तसे आम्ही परत पाठवू शकलो असतो पण मॅथ्यूच्या मनाला परत पाठविण्याचा निर्णय पटला नाही. मी कबूल करते की ती थोडीशी धांदरट आहे अजून वागण्या बोलण्याचा पोच नाही तरी पण हुषार आहे."

a

मारिलाचे बोलणे ऐकताना रेचेलच्या चेहऱ्यावर नापसंती दिसत होती. गंभीरपणे ती म्हणाली, “तुम्ही एक मोठी जबाबदारी अंगावर घेतली आहे. तुम्हाला मुलांच्या संगोपनाचा अनुभव नाही शिवाय या मुलीचा स्वभाव कसा असेल याची कल्पना नाही. मोठी होऊन चांगली निघाली तर ठिक नाहीतर निराश व्हायला लागेल.”

"मला नाही वाटत की आम्हाला निराश व्हायला लागेल आणि जेव्हा मी एखादी गोष्ट करण्याचा निर्णय घेतो तेव्हा मी परिणामांसाठी तयारच राहते. मला वाटते तुम्हाला ॲनीला भेटायचे आहे. मी तिला आत बोलवते.”

ॲनी धावत धावत आत आली, तिचा चेहरा तिच्या बागेतील आनंदाने चमकत होता; पण अनोळखी व्यक्तीला पाहून ती गोंधळून दरवाजातच थांबली. तिने अनाथाश्रमातून येताना आणलेला ड्रेस घातला होता. तो अगदीच लहान होता आणि अंगात घट्ट बसला होता. हाडकुळी लहान अंगकाठी, बारीक पण लांब पाय एकंदर विचित्र ध्यान दिसत होते. चेहऱ्यावरचे लालसर डाग उठून दिसत होते. केस टोपी मधून बाहेर आले होते आणि त्यांचा लाल रंग जास्तच लाल वाटत होता.

“ठीक आहे, त्यांनी तुला तुझ्या दिसण्यावरून निवडले नाही हे उघड आहे.” मिसेस रेचेल लिंड बोलण्यात खवचट आणि फटकळ होत्या. त्यांना असे बोलणे म्हणजे स्पष्टवक्तेपणा वाटे. "बरीच हाडकुळी आहे आणि अजागळ पण आहे. अरे देवा! कुणाच्याही तोंडावर एव्हढे डाग असतील असे वाटत नाही शिवाय केस तर गाजरासारखे लाल आहेत. एक मुली! इकडे ये बघू."

ॲनी तीरासारखी धावत आली आणि मिसेस रेचेल समोर उभी राहिली. तिचा चेहरा रागाने लालेलाल झाला होता, ओठ थरथर कापत होते आणि तिचे संपूर्ण अंग संतापाने थरथरत होते.

"मी तुमचा तिरस्कार करते," तिचा गळा दाटून आला होता. जमिनीवर जोराने पाय आपटत आणखी दोन वेळा तिने या वाक्याचा पुनरूच्चार केला. मला हाडकुळी, अजागळ असे म्हणण्याची तुमची हिंमत कशी झाली? आणि काय म्हणालात, चेहऱ्यावर डाग असलेली, लाल केस असणारी मुलगी? तुम्ही स्वतःच एक उद्धट, असभ्य आणि भावनाशून्य स्त्री आहात."

"ॲनी!" मारिला घाबरून उद्गारली.

पण ॲनी धीटपणे हाताची घडी घालून, मिसेस रेचेलच्या डोळ्याला डोळा भिडवून ताठ उभी होती. संतापाने फणफणत होती.

"माझ्याबद्दल असे तुमची बोलण्याची हिम्मत कशी झाली?" तिने जोरदारपणे पुन्हा एकदा प्रश्न केला. "तुम्हाला स्वतःबद्दल इतरांनी असे बोललेले चालेल? तुम्ही लठ्ठ, गबाळया आणि अविवेकी आहात असे बोलले तर चालेल? असे बोलून तुमच्या भावना दुखावल्या तर मला काही फरक पडत नाही! मला वाटते आहे की तुमच्या भावना चांगल्याच दुखावल्या आहेत. मिसेस थॉमसच्या पतीने त्यांना, दारुच्या नशेत सुध्दा इतके वाईट बोलले कधी बोलले नसावे. तुम्ही अतिशय वाईट पद्धतीने मला दुखावले आहे. त्यासाठी मी तुम्हाला कधीच माफ करणार नाही हे त्रिवार सत्य आहे." दणादण पाय आपटत म्हणाली.

"काय हा उग्र संतापी स्वभाव?" मिसेस रेचेलने घाबरून म्हणाल्या.

"ॲनी, अगोदर तुझ्या खोलीत जा आणि मी येईपर्यंत तिथून उठून नको," मारिला रागाने ओरडून म्हणाली.

ॲनी रडून रडत हॉलच्या दाराकडे धावली, वावटळीप्रमाणे हॉलमधून जिन्यावरून पूर्वेकडील छोट्या खोलीत गेली आणि दरवाजा खाड्कन बंद झाला.

"मारिला, मला तुमच्या निर्णयाच्या परिणामांची भीती वाटू लागली आहे," अत्यंत गांभीर्याने रेचेल बोलत होती.

ॲनीला नापसंती आणि खेद कसा व्यक्त करायचा याची जरा सुध्दा माहिती नाही, असे काहीसे बोलण्याचा मारिलाचा विचार होता. त्यासाठी तिने तोंड उघडले पण नंतर ती जे काही बोलली यांचे तिचे तिलाच आश्र्चर्य वाटले.

"रेचेल, तू तिला तिच्या दिसण्याबद्दल एव्हढे वाईट बोलायला नको होतेस."

"मारिला, तू तिच्या आताच्या भयंकर वागण्याचे समर्थन करत आहेस काय?"

मिसेस रेचेल रागावून बोलली.

“नाही,”मारिला हळूच म्हणाली, “मी तिला माफ करण्याचा प्रयत्न करत नाही. ती खूप खोडकर आहे आणि मला तिच्याशी याबद्दल बोलणे आवश्यक आहे. पण आपण तिची बाजू पण समजून घ्यायला हवी. तिला योग्य काय, अयोग्य काय हे कधीच कुणी शिकवले नाही; तू पण तिच्याबद्दल खूप कठोरपणे बोलत होतीस, रेचेल."

शेवटचे वाक्य मारिलाच्या तोंडून अभावितपणे निघून गेले. मिसेस रेचेल दुखावलेल्या गेल्या होत्या, त्यांच्या सन्मानाला ठेच पोहोचली गेली होती.

“ठीक आहे, यापुढे बोलताना मी काळजी घेईन. अनाथ मुलांसाठी माझ्या मनात चांगल्याच भावना आहेत म्हणून तर मी भेटायला आले होते. नाही मी काही तुझ्यावर चिडले अथवा रागावले नाही उलट माझ्यामुळे हा प्रसंग घडला म्हणून मला मनापासून खेद वाटत आहे. तसेही तुला तुझ्या काळज्या आहेत. मी तुला एक सल्ला देते, तसा तो तुला आवडणार नाही पण मला दहा मुलांना सांभाळायचा अनुभव आहे म्हणून सांगते, तुला गोडीगुलाबीने हिच्या बरोबर वागून चालणार नाही. त्यासाठी 'छडी लागे छमछम' उपयोगात आणावी लागेल त्याशिवाय ती वठणीवर येणे अशक्य आहे. अशा मुलांना तीच भाषा समजते. जसे तिचे केस आगीसारखे

लाल आहेत तसा स्वभाव पण धगधगत्या आगीसारखा आहे. मला वाटते तू नेहमी प्रमाणे आमच्याकडे भेटायला येशील. परंतु इतका प्रकार घडल्यानंतर मी इथे पुन्हा लौकर येईन असे वाटत नाही. असा अनुभव मला उभ्या आयुष्यात प्रथमच आला."

असे बोलून मिसेस रेचेल निघून गेल्या आणि मारिला पुर्वेकडील छोट्या खोलीकडे जायला निघाली.

जिना चढत असताना नेमके काय करावे या विचाराने ती अस्वस्थ झाली होती. नुकत्याच झालेल्या प्रसंगामुळे तिला निराश वाटत नव्हते पण सगळी माणसे सोडून, मिसेस रेचेलला ॲनीने आपल्या स्वभावाची चुणूक दाखवली याची तिला खंत वाटली. ॲनीच्या वागण्याचे तिला दुःख होण्यापेक्षा स्वतःला अपमानीत झाल्यासारखे वाटत होते. छमछम छडीचा सल्ला तिला मानवला नाही. तिला विश्वासच बसत नव्हता की ती एखाद्या मुलाला छडीने मारू शकते. ॲनीला तिच्या चुकीची योग्य जाणीव करून देण्यासाठी शिक्षेची दुसरी पद्धत शोधली पाहिजे असा तिने विचार केला.

खोलीत गेल्यावर पाहिले तर ॲनी पलंगावर पडून रडत होती, चिखलाने माखलेले बूट तसेच पायात घातलेले होते.

“ॲनी” मारिलाने हाक मारली. त्यावर काहीच उत्तर मिळाले नाही.

“ॲनी,”अधिक तीव्रतेने हाक मारली, “या क्षणी त्या बिछान्यातून उतर आणि मी तुला काय सांगते ते ऐक.”

ॲनी पलंगावरून उठली आणि बाजूच्या खुर्चीवर जाऊन बसली, तिचा चेहरा रडून सुजला होता, अश्रूंनी भिजला होता, डोळे जमिनीवर खिळवून ती हटवादीपणे बसली होती.

“ॲनी, आता तू जे काही वागलीस त्याबद्दल तुला लाज वाटत नाही का?"

a

“त्यांना मला लाल केसांची कुरूप, अजागळ मुलगी म्हणण्याचा कोणताही अधिकार नव्हता,” ॲनीने आपल्या वागण्याच्या समर्थनार्थ बाजू मांडली.

"तरी सुद्धा तुला एव्हढ्या रागाने त्यांच्या बरोबर बोलण्याचा काही ही अधिकार नव्हता. ॲनी, मला तुझी लाज वाटली - तुझी पूर्ण लाज वाटली. तू मिसेस लिंड यांच्याबरोबर चांगले वागावे अशी माझी इच्छा होती आणि त्याऐवजी तू मला मान खाली घालायची वेळ आणलीस. मी मान्य करते की मिसेस लिंड तुला अजागळ आणि केस लाल असल्याचे म्हणाल्या, म्हणून तू तुझा तोल गमावून बसायची गरज नव्हती कारण तू स्वतः गोष्ट कित्येकदा मान्य केली आहेस."

“पण एखाद्याने स्वतः काही गोष्टी मान्य करणे आणि इतरांनी कुचेष्टा करणे यात फरक आहे,” ॲनी रडत म्हणाली. "तुम्हाला पण याची जाणीव आहे. इतर लोक कसे वागतील या बद्दल तुम्ही पण काही करू शकत नाही. तुम्हाला नक्कीच वाटले असणार की माझा स्वभाव भयंकर तापट आहे पण त्यांचे बोलणे मला सहन झाले नाही, संतापाची तीव्र सणक माझ्या मस्तकात उमटली आणि रागाच्या भरात मी त्यांच्यावर धावून गेले."

“तू स्वतःच छान शोभा करून घेतली आहेस असेच मला म्हणायला लागेल. मिसेस लिंड आता सगळीकडे तुझ्याबद्दल सर्वत्र ही गोष्ट सांगतील. ॲनी, तू असा मनाचा तोल गमावणे ही तुमच्यासाठी वाईट गोष्ट होती.”

“तुम्ही हाडकुळया आणि कुरूप आहात असे तुमच्या तोंडावर जर कोणी तुम्हाला सांगितले तर तुम्हाला कसे वाटेल याची कल्पना करा,” ॲनीला अश्रू आवरत नव्हते.

मारिलाला अचानक एक जुनी आठवण आली. ती खूप लहान होती जेव्हा तिने एका काकूला तिच्याबद्दल दुसऱ्याला असे म्हणताना ऐकले होते, "बिचारी

इतकी काळी आणि खुरटी मुलगी आहे की तिला पाहिल्यावर दया येते.” जवळजवळ दोन महिने ते शब्द डंख मारत होते.

“ॲनी, मी असे म्हणत नाही की मिसेस लिंड जे काय बोलली ते मला योग्य वाटत होते,” तिने हळूवार स्वरात कबूल केले. “रेचेल खूप स्पष्टवक्ती आहे. पण तुझ्याकडून अशा वर्तनाची अपेक्षा नाही. ती एक अनोळखी, वयाने मोठी स्त्री माझी पाहुणी होती - त्यामुळे तू त्यांच्याबद्दल आदर बाळगायला पाहिजे होतास. तू असभ्य आणि भांडकुदळ मुलीसारखी वागलीस आणि—” मारिलाला शिक्षा काय द्यावी असा प्रश्न पडला होता. “तुला त्यांच्याकडे जावून त्यांना सांगितले पाहिजे की तुला तुझ्या वाईट स्वभावाबद्दल खूप वाईट वाटत आहे आणि त्यांची क्षमा मागायला हवी.”

"मी ते कधीच करू शकत नाही,” ॲनी निर्धाराने आणि कडवटपणे म्हणाली. “तुम्हाला आवडेल त्या पद्धतीने तुम्ही मला शिक्षा करू शकता. अगदी मला साप, बेडूक, पाली, उंदीर असलेल्या ओलसर अंधारकोठडीत ठेवण्याची शिक्षा दिली तरी चालेल."

“आम्हाला अशा पद्धतीने कोंडून ठेवण्याची सवय नाही,” मारिला कोरडेपणाने म्हणाली, “विशेषत: ॲव्हनलीमध्ये साप वगैरे दुर्मिळ आहेत. पण तुला मिसेस लिंड यांची माफी मागायलाच लागेल आणि तू हे करायला तयार आहेस हे सांगेपर्यंत तुला इथे तुझ्या खोलीतच राहावे लागेल.”

“तर मग मला इथे कायमचं राहावं लागेल,” ॲनी शोकाकूलपणे म्हणाली, “कारण मी मिसेस लिंडला सांगू शकत नाही. मला माफ करा मी तुम्हाला त्रास दिला आहे. पण मी मिसेस लिंडना जे बोलले आहे याचा मला आनंदच झाला. खूप समाधान वाटलं. मनात नसताना मी 'मला माफ करा' म्हणू शकत नाही, फार काय अशी कल्पनाही करू शकत नाही.”

"कदाचित सकाळपर्यंत तुमची कल्पनाशक्ती चांगली होईल," मारिला खोलीतून निघताना म्हणाली. "तुला, तुझ्या आचरणाबद्दल विचार करण्यासाठी आणि मन:स्थिती चांगली होण्यासाठी एक रात्र मिळेल. जर आम्ही तुला ग्रीन गेबल्स येथे ठेवले तर तू खूप चांगली मुलगी होण्याचा प्रयत्न करशील असे तू म्हणाली होतीस, पण मला असे सांगायचे आहे की आज संध्याकाळचे तुझे वागणे पाहून असे फारसे वाटले नाही."

शेवटचा घाव मात्र ॲनीच्या मनावर वर्मी बसला. अत्यंत अस्वस्थ मनाने मारिला किचनमध्ये गेली. तिला ॲनी प्रमाणेच स्वतःवर राग आला होता, कारण जेव्हा जेव्हा तिला मिसेस रेचेलचा उदास झालेला चेहरा आठवायचा तेव्हा तेव्हा तिची फजिती झाल्याचा आनंद वाटून हसण्याची उबळ येत होती आणि त्याबद्दल स्वतःची निर्भर्त्सना करावीशी वाटत होती.

# प्रकरण 10

मारिलाने त्या संध्याकाळी मॅथ्यूला या प्रकरणाबद्दल काहीही सांगितले नाही; पण दुसऱ्या दिवशी सकाळी ॲनीने अजूनही आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे सिद्ध केल्यावर नाश्ताच्या-टेबलवरील तिच्या गैरहजेरीचे स्पष्टीकरण द्यावे लागले. ॲनीच्या वागणुकीच्या गंभीर परिणामांची योग्य जाणीव करून देण्यासाठी मारिलाने मॅथ्यूला घडलेली हकीकत सांगितली.

“ही एक चांगली गोष्ट आहे की रेचेल लिंडला चांगली अद्दल घडली नाही तरी तिला कुचाळक्या करण्याची घाणेरडी सवय आहे,” मॅथ्यूचे उत्तर ॲनीच्या वागण्याचे जवळजवळ समर्थन केल्याचे दर्शवित होते.

“मॅथ्यू कथबर्ट, मला तुझ्या बोलण्याचे आश्चर्य वाटत आहे. तुला माहित आहे की ॲनी अत्यंत चुकीचे लागली आहे आणि तरी तू तिच्या बाजूने बोलत आहेस. मला वाटतं तू आता असेही म्हणशील की तिला अजिबात शिक्षा होऊ नये.”

"तू योग्य तेच करशील, मी त्यात भाग घेणार नाही,” मॅथ्यू ओशाळून म्हणाले.

“माझ्या मते तिला थोडी शिक्षा झालीच पाहिजे. पण तिच्यावर जास्त कठोर होऊ नकोस, मारिला. आठवते तिला चांगले वाईट वागणे म्हणजे काय हे

शिकवायला कोणीच नव्हते. आता तू आहेस - पण तू तिला काहीतरी खायला देणार आहेस, नाही का?"

"तू कधी मी लोकांना उपाशी ठेवून त्यांनी चांगले वागावे असा प्रयत्न केल्याचे पाहिले आहेस काय? मारिलाने रागाने विचारले. "तिला जेवणखाण व्यवस्थित मिळेल, मी स्वतः तिला नेऊन देईन."

सकाळीची न्याहरी आणि दोन्ही वेळच्या जेवणाच्या वेळी दोन्ही बहिण भाऊ शांत होते. प्रत्येक वेळी मारिला खाण्याचे ताट घेऊन वर जाई पण त्यातील फारच कमी गोष्टी खाल्या गेल्या होत्या. मॅथ्यूनी त्या परत आलेल्या ताटांकडे पाहिले आणि त्यांना ॲनीने काही खाल्ले नसल्याचे पाहून काळजी वाटू लागली.

मारिला मागच्या कुरणातून गायी आणण्यासाठी बाहेर पडली, तेव्हा घरात तिच्या बाहेर पडण्याची वाटच बघत बसलेले मॅथ्यू पटकन घाईघाईत ॲनीच्या खोलीकडे गेले आणि दारावर थाप मारून हळूच दार उघडून आत प्रवेश केला.

ॲनी खिडकीजवळच्या पिवळया खुर्चीवर बसून बागेत पाहत होती. तिची दु:खी मुद्रा पाहून मॅथ्यूना धक्काच बसला आणि हळूच ते पुढे जाऊन तिच्या कानात

कुजबजले, “ॲनी तू कशी आहेस?"

ॲनी खिन्नपणे हसली आणि म्हणाली, “मी मजेत आहे. एका सुंदर गोष्टीवर विचार करत वेळ घालवत आहे. अर्थात, मी एकाकी आहे. पण मग, मलाही याची सवय होऊ शकते.” ॲनी परत हसली जणू काही एकांतवासाच्या शिक्षाला दीर्घकाळ धैर्याचे तोंड देत असावी. मॅथ्यूना ते जे बोलण्यासाठी आले होते ते बोलण्याची खूप घाई होती. मारिला घरी परतण्यापूर्वी त्यांना तिथून निसटून जायचे होते. त्यांनी घाईघाईत बोलायला सुरुवात केली, "ॲनी तुला असे वाटत नाही काय की मारिलाने सांगितल्याप्रमाणे मिसेस लिंडची माफी मागून विषय लौकरात लौकर संपवून टाकावा. कारण आज नाही तर उद्या हे तुला करावे लागणारच. मारिला एक

a

दृढनिश्चयी स्त्री आहे- अतिशय दृढनिश्चयी, ॲनी, मी म्हणतो की लौकर माफी मागून विषय संपवून टाक.”

"तुम्हाला पण मिसेस लिंडची माफी मागायला हवी असे म्हणायचे आहे काय?"

“होय—माफी मागणे हेच अपेक्षित आहे,” मॅथ्यू उत्सुकतेने म्हणाले.” तू गोड बोलून अतिशय नम्रपणे माफी मागावीस असा माझा तुला सल्ला आहे."

"मला वाटतं की मी तुम्हाला खुश करण्यासाठी हे करू शकेन,” \\ॲनी विचारपूर्वक म्हणाली. “मला माफ करा असे म्हणणे पूरेसे खरे ठरेल, कारण मला आता खरोखरच वाईट वाटत आहे. मात्र काल रात्री मला जराही वाईट वाटले नाही. मी रागाने पूर्णपणे वेडी झाले होते, अजिबात झोपले नाही. रात्रभर मी रागाने धुमसत होते. पण आज सकाळी सगळं संपलं होतं. प्रचंड थकावट जाणवत होती. मला माझीच लाज वाटत होती पण, पण मी मिसेस लिंड यांच्यापाशी जाऊन चूक कबूल करण्याचा विचार करू शकत नव्हते. ते खूप अपमानास्पद वाटले असते तसे करण्यापेक्षा मी इथे कायमचे बंद राहायचे पसंत केले असते. पण तरीही - मी तुमच्यासाठी काहीही करेन - जर तुम्हाला खरोखरच मी तसे करायला हवे असेल तर -"

"आता कसे शहाण्या मुलीसारखे बोललीस. तू नसल्याने रिकामे घर अगदी खायला उठल्या सारखे वाटत आहे. तेव्हा गोड बोलून आणि अतिशय नम्रपणे आणि मनापासून माफी माग,."

"होय मी नक्कीच असे करू शकेन. मारिला येताच सांगेन की मला पश्चात्ताप झाला आहे."

“खूपच छान! पण मारिलाकडे मी तुला हे करायला सांगितले याची वाच्यता करू नको. मी याबाबतीत काही ढवळाढवळ करणार नाही असे कबूल केले आहे."

a

"माझ्यापासून कोणीही माझे रहस्य काढून घेऊ शकणार नाही. तिचे डोळे आनंदाने चमकले."

मॅथ्यूना स्वतःची शिष्टाई सफल झाली, यावर अचंबित झाले आणि झटकन दूर घोडे चरत असलेल्या कुरणाकडे घाईघाईने निघून गेले. मारिलाला संशय येऊ नये म्हणून एव्हढी काळजी घेणे आवश्यक होते.

मारिला घरी परतल्यावर, माडीवरून "मारिला" हाक ऐकून आश्चर्यचकित झाली.

"काय?" असे विचारत ती हॉल मध्ये गेली.

"मला माफ करा, मी माझ्या आंधळ्या रागापायी माझा तोल गमावला आणि अतिशय वाईटपणे मिसेस लिंड यांचा अपमान केला, याचा मला पश्चात्ताप होत आहे. मी मिसेस लिंड यांचेकडे जाऊन माफी मागण्यास तयार आहे." ॲनी म्हणाली.

"खूप छान." मारिला कोरडेपणाने म्हणाली पण लगेच तिला माफ केल्याचा दिलासा दिला नाही.

शेवटी ॲनी माफी मागायला तयार झाली नसती तर काय करायचे असा तिला प्रश्न पडला होता."

"तुझे दूध पिऊन झाल्यावर मग मी तुला खाली यायला परवानगी देईन," मारिला म्हणाली.

त्यानुसार, दूध पिऊन झाल्यावर, मारिला आणि ॲन मिसेस रेचेलकडे निघाल्या. मारिला विजयी मुद्रेने ताठ चालत होती तर ॲनी खांदे पाडून निराश चेहऱ्याने तिच्याबरोबर चालली होती. पण अचानक ॲनीची उदासीनता गायब झाली तिने मान वर उचलून आकाशाकडे पाहिले. सूर्य अस्ताला जात होता, तिचा

दबला गेलेला उत्साह सळसळून वर आला. मारिलाला हा बदल मानवला नाही, ती नाराज झाली.

अपमानीत झालेल्या मिसेस लिंड यांच्या समोर माफी मागायला जाताना तिला पश्चाताप झाल्याचे दर्शवत नव्हते.

“ॲनी, तू काय विचार करत आहेस?” तिने स्पष्टपणे विचारले.

“मी मिसेस लिंड यांची कशाप्रकारे माफी मागावी यांचा विचार करत आहे,” ॲनीने उत्तर दिले.

हे समाधानकारक होते तरी काहीतरी गडबड आहे अशी मारिलाला शंका सतावू लागली. ॲनीला इतके उत्साही आणि आनंदी दिसण्याचे कोणतेही कारण नव्हते.

किचनच्या खिडकीजवळ विणकाम करत बसलेल्या श्रीमती लिंड यांच्या समोर जाताच ॲनीचा आनंद, उत्साह लोप पावला. चेहऱ्यावरचे तेज नाहीसे होऊन त्या ठिकाणी शोकपूर्ण पश्चात्ताप दिसू लागला. काही बोलण्याआधीच ॲनी, मिसेस रेचेलसमोर गेली आणि अचानक गुडघे टेकले. मिसेस लिंड आश्चर्यचकित झाल्या. ॲनीने विनवणी करत हात पुढे केला.

"ओह! मिसेस लिंड, मला माफ करा,” थरथरत्या आवाजात ॲनी म्हणाली. “मला माझ्या वागण्याचा इतका खेद होतो आहे की तो व्यक्त करायला माझ्यापाशी शब्द नाहीत. मी तुमच्याबरोबर अतिशय वाईट लागले. माझे पालक मॅथ्यू आणि मारिला, ज्यांनी मला ग्रीन गेबल्समध्ये आसरा दिला, त्यांचे नाव माझ्यामुळे बदनाम झाले. मी एक भयंकर दुष्ट आणि कृतघ्न मुलगी आहे आणि मी शिक्षा भोगण्यास पात्र आहे आणि आदरणीय लोकांच्या यादीमधून कायमचे काढून टाकण्याच्या लायकीची आहे. तुम्ही जे बोललात ते सत्य होते. त्याबद्दल मी संतापाने बेभान व्हायला नको होते. त्यातील प्रत्येक शब्द खरा होता. माझे लाल रंगाचे केस,

a

हाडकुळा बांधा, कुरुप, अजागळ यात काहीही खोटे नव्हते. मी तुम्हाला जे बोलले ते सुद्धा खरे होते पण मी तसे बोलायला नको होते. हो मिसेस लिंड कृपया मला क्षमा करा. तुम्ही जर मला माफ केले नाहीत तर माझ्यासाठी ते आयुष्यभराचे दु:ख असेल. एका गरीब लहान अनाथ मुलीवर आयुष्यभर दु:ख द्यायला तुम्हाला आवडणार नाही, जरी तिचा स्वभाव भयंकर असला तरी, तुम्ही असे कराल काय? माझी खात्री आहे तुम्ही असे करणार नाही. मिसेस लिंड कृपया तुम्ही मला माफ केले आहे असे सांगावे."

ॲनी हात जोडून, डोके खाली वाकवून त्यांच्या निर्णयाची वाट पाहत उभी होती.

तिच्या प्रामाणिकपणा बद्दल शंका घेण्यास काहीच जागा नव्हती, तो तर तिच्या शब्दा शब्दात, स्वरात भरून राहिला होता. मारिला आणि मिसेस लिंड यांनी त्यातील ध्वनीत होणारा अर्थ जाणून घेण्यात कोणतीही चूक केली नाही. ॲनी प्रत्यक्षात तिच्या झालेल्या पाणउताऱ्याचा अप्रत्यक्षपणे आनंद लुटत आहे, झालेल्या अपमानाची पुरेपूर मजा गुप्तपणे उपभोगत आहे हे लक्षात आल्यावर मारिला बेचैन झाली. यामध्ये नैतिकदृष्ट्या हितकारक शिक्षा कुठे होती की दिल्याबद्दल मारिला स्वतःची पाठ थोपटून घेतली होती? असा तिला प्रश्न पडला. ॲनीने ती त्या शिक्षेचे स्वरूप एकप्रकारच्या निर्मळ आनंदात बदलून टाकले होते.

मिसेस लिंड यांच्या ध्यानात या गोष्टी आल्या नसाव्यात कारण त्यांनी माफीनाम्या मागिल अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांना फक्त एवढंच समजलं की ॲनीने खूप सखोल माफी मागितली होती त्यामुळे सर्व राग त्यांच्या दयाळू पण काहीशा आत्मकेंद्री मनातून नाहीसा झाला.

"ठिक आहे, उठ, बाळा,'' त्या मनापासून म्हणाल्या. "अर्थात मी तुला माफ करते. मला वाटतं, तरीही मी तुझ्याबरोबर जरा जास्तच कठोरपणे वागले. पण मी

a

स्पष्टवक्ती स्त्री आहे. तू माझे बोलणे जास्त मनावर घेऊ नकोस. प्रश्न एव्हढाच आहे की तुझ्या केसांचा रंग लाल आहे; माझ्या माहितीत एक मुलगी होती जी आमच्या शाळेत होती तिचे केस अगदी गुंजेसारखे लाल होते पण मोठेपणी ते सुंदर तपकिरी झाले फक्त थोडीशी लालसर छटा राहिली होती. तुझे पण केस तसे झाले तर मला आश्चर्य वाटणार नाही - ते काही अगदी गुंजेसारखे लाल नाहीत."

"ओह! मिसेस लिंड!" ॲनीने एक दीर्घ श्वास घेतला आणि ती तिच्या पायावर उभी राहिली. "तुम्ही मला एक आशा दिली आहे. तुमचे उपकार मी आयुष्यभर विसरणार नाही. अहो, मी मोठी झाल्यावर माझे केस छान तपकिरी लालसर होतील तर मला वाटते मी काहीही सहन करू शकेन. तुम्ही आणि मारिला बोलत असताना मी तुमच्या बागेत जाऊन त्या बाकावर सफरचंदाच्या झाडाखाली बसू काय? त्या तिथे कल्पनाशक्तीला खूप वाव आहे."

"हो बाळ, जा पळ आणि तुला आवडत असल्यास तू कोपऱ्यात असलेल्या पांढऱ्या जून लिलीची, डेफोडीलची फुले तू घेऊ शकतेस."

ॲनीच्या बागेत गेल्यावर, मिसेस लिंड दिवा लावण्यासाठी उठल्या आणि म्हणाल्या,

"ती खरोखरच विचित्र आहे. या खुर्चीवर बस, मारिला; माझ्या मते मदतीसाठी कामाला एखादा मुलगा नेमला असता तर सोपे झाले असते. तिच्यामध्ये काहीतरी वेगळेपण खास आहे. तू आणि मॅथ्यूने तिला सांभाळायचे ठरवले यांचे मला आता आश्र्चर्य वाटत नाही, मी देखील तसेच केले असते. आता मला तुझ्याबद्दल तितकं वाईटही वाटत नाही. ती चांगली मुलगी होऊ शकेल. अर्थात, तिचा स्वतःला व्यक्त करण्याचा एक विलक्षण मार्ग आहे—थोडा आक्रमक आहे तुमच्या लक्षात आले असेलच. पण आता ती सुसंस्कृत लोकांमध्ये राहायला आली आहे तेव्हा नक्कीच चांगला फरक पडेल असे मला वाटते. ती जितक्या पटकन

चिडते, तितक्या लौकर शांत होते पण धूर्त किंवा कपटी असण्याची शक्यता नाही. एकूणच, मारिला, मला ती आवडली."

घरी जाताना ॲन बागेतील पांढऱ्या डेफोडीलच्या फुलांचा गुच्छ घेऊन चालली होती.

"मी खूप छान माफी मागितली, नाही का? ”वाटेत चालताना तिने अभिमानाने मारिलाला विचारले. "मी विचार केला की माफी मागायची असेल तर मग मी अगदी व्यवस्थितपणे माफी मागू शकेन."

“तू माफी व्यवस्थित मागितलीस,” हे कबूल करतांना मारिलाला मनातून हसू येत होते. मिसेस लिंडच्या लक्षात त्यातील विसंगती न आलेल्या गोष्टीवर हसणे तिला योग्य वाटत नव्हते, त्यासाठी ॲनीला दटावणे पण मूर्खपणा ठरला असता. शेवटी तिने, तिच्या विवेकाशी तडजोड केली: “ॲन, मला आशा आहे की तुझ्यावर अशी अनेक वेळा माफी मागण्याची वेळ येऊ नये आणि तू आता तुझ्या रागावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करशील.”

“जर लोकांनी मला माझ्या दिसण्याबद्दल जास्त टिप्पणी केली नाही तर असे प्रसंग कमी येतील. मला इतर कोणत्याही गोष्टीचा इतका त्रास होत नाही, जितका मला माझ्या केसांचा होतो. मी त्यांना खूप कंटाळले आहे त्यामुळे कोणी त्यांचा साधा उल्लेखही केला तरी माझ्या रागाला उकळी फुटते. मी मोठी झाल्यावर माझे केस खरोखरच सुंदर तपकिरी लालसर होतील असे तुम्हाला वाटते का?”

“तू तुझ्या दिसण्याबद्दल इतका विचार करू नयेस ॲनी. मला भीती वाटते की तू खूप व्यर्थ मुलगी आहेस.”

"मी एक साधी सरळमार्गी सालस आहे हे मला माहीत आहे मी व्यर्थ कशी होऊ शकते?” ॲनीने विरोध दर्शविला. “मला सुंदर गोष्टी आवडतात; आणि मला स्वतःला आरशात पाहताना, सुंदर नसलेले काहीतरी पाहणे आवडत नाही. यामुळे

a

मला खूप वाईट वाटते - जसे मी कोणत्याही कुरूप गोष्टीकडे पाहते तेव्हा वाटते. मला त्याची दया येते कारण ती सुंदर नाही.”

“माणसाचा देखणेपणा म्हणजे चांगले सुंदर दिसणे नाही तर चांगली वर्तणूक हा आहे.” मारिलाने पुस्ती जोडली.

"मी मला हे आधी ऐकलेले आहे, परंतु मला त्याबद्दल शंका आहे,” ॲनी तिच्या फुलांच्या गुच्छाकडे पाहत म्हणाली, “अरे, ही फुले गोड आहेत ना! मिसेस लिंड यांनी मला ती दिल्याबद्दल मला खूप आनंद झाला. आता माझ्या मनात मिसेस लिंड यांच्या बद्दल कोणतीही कटू भावना उरली नाही. माफी मागणे आणि माफ करणे दोन्ही दिलासा देतात. आज चांदणे खूप छान पडले आहे. तुम्हाला वाऱ्यावर तरंगत रहायला आवडेल काय? मला त्या मोठ्या टेकडीवर वाऱ्यावर तरंगत रहायला आवडले असते."

"ॲनी, तुझ्या तोंडाला जरा कुलूप घालतेस काय?” ॲनीच्या अखंड बडबड ऐकून मारिला थकून गेली होती.

ॲनी अचानक मारिलाच्या जवळ आली आणि आपला हात तिच्या तळहातावर ठेवला, घरकामाने, गाई गुरांच्या देखभालीने तसेच शेतीतील कामाने मारिलाचा तळहात खरखरीत झाला होता. लहान मुलीच्या कोवळया हाताच्या स्पर्शाने तिला सुखद अनुभूती जाणवली हृदयात काहीतरी उबदार आणि आनंददायी भावना उमटली.

"आपले असे घर असणे किती छान आहे नाही? मला याआधी कोणत्याही राहण्याच्या जागेचे विषयी प्रेम वाटले नव्हते. कुठलीही जागा ग्रीन गेबल्स सारखी वाटली नव्हती. अरे, मारिला, मी खूप आनंदी आहे. मी आत्ताच प्रार्थना करू शकते आणि आता मला ते कठीण वाटत नाही.”

a

“तू चांगली मुलगी बनशील तर तू नेहमी आनंदी राहशील, ॲनी. आणि तुला तुमची प्रार्थना म्हणणे कधीही कठीण वाटू नये.”

“एखादी प्रार्थना म्हणणे म्हणजे देवाबरोबर बोलणे होय ते सगळ्यांचे एक असू शकत नाही,” मी अशी कल्पना करणार आहे झाडांच्या माथ्यावरून वाहणारा वारा मीच आहे. तिथे कंटाळा आला की या हिरव्यागार गवताच्या पात्यांना, गवत फुलांना थरथररून सोडेन. तसाच मग मिसेस लिंडच्या बागेत जाऊन तिथल्या झाडांना पाना फुलांना नाचायला लावेन. नंतर चमचमणाऱ्या पाण्याच्या तलावाच्या पाण्याला स्पर्श करून लहान मोठे तरंग निर्माण करेन. अरेच्चा! वारा बनण्याच्या कल्पनेत किती आनंद आणि गमतीजमती आहेत. त्यामुळे मी आताच काही बोलणार नाही, मारिला.”

“त्यासाठी देवाचे आभार,” मारिलाने सुटकेचा निःश्वास सोडला.

# प्रकरण 11

“बरं , तुला मी शिवलेले नवीन कपडे आवडले काय?” मारिलाने विचारले. पलंगावर तीन नवीन ड्रेस पडले होते, त्यापैकी एक चाॅकलेटी रंगाचा चौकड्याच्या कापडाचा साधा ड्रेस होता, जो उन्हाळ्यात वापरण्यास योग्य होईल म्हणून मारिलाने आणला होता. उरलेल्या दोन पैकी एक काळ्या पांढऱ्या सॅटीनचा आणि दुसरा छापिल प्रिंट असलेला गडद निळ्या रंगाचा होता.

सगळे कपडे मारियाने स्वतः शिवले होते. तिन्ही एक सारखे अगदी साधे स्कर्ट ब्लाऊज शिवलेले होते. त्यांना फारसा घेर नव्हता. हाताच्या बाह्या पण अगदी साध्या होत्या.

“मला ते आवडले आहेत अशी मी कल्पना करेन,” ॲनी शांतपणे म्हणाली.

“तुला आवडले आहेत अशी नुसती कल्पना मला नको आहे,” मारिला नाराज होऊन म्हणाली. “मला दिसत आहे की तुला कपडे आवडत नाहीत! त्यांना काय हरकत आहे? ते नीटनेटके, स्वच्छ आणि नवीन नाहीत का?”

a

"हो."

"मग तुला ते का आवडत नाहीत?"

"ते सुंदर नाहीत-सुंदर," ॲनी अनिच्छेने म्हणाली.

"सुंदर!" मारिला नाक उडवत म्हणाली, "मला तुझ्यासाठी सुंदर कपडे शिवण्यासाठी जास्त त्रास करून घ्यायचा नाही. मी तुला आताच सांगते मला कपड्यांच्या बाबतीत जास्त लाड करायला आवडत नाहीत. फॅशनेबल कपडे तर अजिबातच नाहीत. साधे सुधे, टिकावू, मळखाऊ रंगाचे कपडे मी निवडेन. त्याला झालर वगैरे असणार नाही. तपकिरी आणि गडद निळा शाळेसाठी आणि सॅटीनचा ड्रेस चर्चला आणि संडे स्कूलला जाताना घालता येईल. तू ते कपडे स्वच्छ धुवून नीटनेटकेपणे वापरशील. खेळताना फाडणार बिडणार नाहीस. मला असे वाटले की इथे येताना तू घातलेल्या केलेल्या त्या तोकड्या आणि लहान मापाच्या ड्रेसपेक्षा चांगले नवीन ड्रेस मी स्वतः तुझ्यासाठी शिवल्याने तुला आनंद होईल."

"तशी मी त्यासाठी कृतज्ञ आहे," ॲनने निषेध केला. "परंतु जर तुम्ही त्यांच्यापैकी फक्त एक फुगलेल्या बाहीचा बनवलात तर मी खूप आभारी राहीन. फुग्याच्या हाताची आता खूप फॅशन आहे. मारिला, फक्त फुगलेल्या बाही असलेला ड्रेस घालायला मला खूप आनंद होईल."

"तर मग तुला तो आनंद मिळणे कठीण आहे. मला फुगलेल्या बाहीसाठी कापड वाया घालवायला आवडणार नाही. मला असे कपडे हास्यास्पद वाटतात. मला साधे कपडेच चांगले वाटतात.

"या गोष्टी लक्षात ठेव! बरं, ते कपडे तुझ्या कपाटात काळजीपूर्वक टांगून ठेव आणि रविवारच्या-शाळेतल्या धड्याचा अभ्यास करत बस. मिस्टर बेल तुला शिकवणार आहेत असे मला सांगितले आहे आणि उद्या तुला संडे-स्कूलला जायचे आहे." असे म्हणत मारिला रागा रागाने तिकडून निघून गेली.

a

ॲनी कपड्यांकडे पाहात स्वतःशीच बोलू

लागली, "मला आशा होती की एक तरी फुग्याच्या हाताचा पांढरा शुभ्र ड्रेस असेल, तशी प्रार्थना केली पण पूर्ण होण्याबद्दल फारशी आशावादी नव्हते. देवाकडे एका गरीब लहान मुलीच्या कपड्यांसाठी एव्हढा त्रास घ्यायला वेळ मिळेल अशी आशा नव्हती त्यासाठी मला फक्त मारिलावर अवलंबून रहावे लागणार हेच खरे आहे. ठिक आहे पण मी कल्पना तर करूच शकते की त्यापैकी एक स्नो-व्हाइट मलमलचा आहे ज्याला सुंदर लेस आणि फ्रिल्स लावल्या आहेत आणि सर्वांच्या बाह्या फुगलेल्या आहेत."

दुसऱ्या दिवशी सकाळी मारिला डोकेदुखीमुळे त्रस्त होती त्यामुळे ॲनीसोबत रविवारच्या शाळेत जाऊ शकली नाही.

"तुला मिसेस लिंड, यांच्या घरी जाऊन त्यांच्याबरोबर संडे स्कूलला जावे लागेल," मारिला म्हणाली. "त्यांना तुझा वर्ग दाखवायला सांग. वर्गात नीट वाग. लोकांकडे टक लावून बघू नको आणि वेडेवाकडे चाळे पण करू नको. चर्चच्या पेटीत टाकायला हे पैसे घे आणि शाळेतून आल्यावर तिकडे काय झाले ते मला सांग."

ॲनी एकटीच चर्चमधील शाळेला निघाली. काळा पांढरा सॅटीनचा ड्रेस उंचीला लांब असला तरी एकंदरीत अगदीच साधा होता. त्याचप्रमाणे टोपी पण छोटी होती. जुन्या पद्धतीची सपाट चकचकीत टोपी ॲनीच्या मनाला भावली नाही. वाटेत रस्त्याच्या कडेला गुलाब आणि सोन पिवळया बटरकपची फुले फुलली होती त्या फुलांनी ॲनीने आपली टोपी सजवली. इतर लोक काय म्हणतील याचा विचारही तिच्या मनाला शिवला नाही. आनंदाने गुलाबी, पिवळया फुलांनी सजवलेली टोपी डोक्यावर घालून ती अभिमानाने ताठपणे चालत मिसेस लिंड यांच्या घरी गेली परंतु त्या अगोदरच बाहेर पडल्या होत्या. अजिबात न घाबरता ॲनी

a

एकटीच चर्चकडे निघाली. तिकडे गेल्यावर बऱ्याच लहान मुली जमलेल्या दिसल्या. बहुतेक मुलींचे ड्रेस गुलाबी, पांढरा, निळसर अशा रंगाचे होते. सर्वजणी ॲनीकडे कुतुहलाने पाहू लागल्या. तिच्या सजवलेल्या टोपीने सगळयांचे लक्ष वेधून घेतले होते शिवाय अगोदरच मिसेस लिंड यांच्याकडून तिच्या स्वभावाची जाहिरात सगळीकडे पसरली होती. ग्रीन गेबल्समध्ये तिला अनाथाश्रमातून आणले आहे, ती सतत स्वतःशी किंवा झाडांशी आणि फुलांशी वेड्या मुलीसारखी बोलत असते अशी कुजबूज त्या मुलींमध्ये सुरू झाली. कोणी तिच्याबरोबर ओळख करून घ्यायला पुढे आल्या नाहीत. प्रार्थना आणि पाठांतर झाल्यावर ॲनीला मिस रॉजरसनच्या वर्गात प्रवेश मिळाला.

मिस राॅजरसन वीस वर्षे रविवारच्या शाळेत शिकवत असत. त्या पुस्तकातील छापलेल्या प्रश्नांची उत्तरे तोंडी विचारत असत. त्यांनी वर्गात ॲनीकडे पाहून बरेच प्रश्न विचारले सुदैवाने मारिलाने तिच्याकडून चांगली तयारी करून घेतल्याने ॲनीने पटापट उत्तरे दिली. पण तिला प्रश्न अथवा उत्तरे कितपत समजली होती हा एक प्रश्नच होता. ॲनीचे लक्ष इतर मुलींच्या फुग्याच्या बाह्यांकडे होते आणि मनातून खंतावत होती. त्याशिवाय तिला आयुष्य व्यर्थ आहे असे वाटू लागले होते.

"बरं, तुला रविवारची शाळा आवडली?" ॲनी घरी आल्यावर मारिला आल्यावर पहिला प्रश्न केला. टोपीची सजावट तोपर्यंत सुकली होती म्हणून तिने वाटेत फेकून दिली होती त्यामुळे त्याविषयी मारिला अनभिज्ञ राहिली.

"मला शाळा थोडी देखील आवडली नाही. खूप भयंकर होती."

"ॲनी शर्ली! हे बरोबर नाही" मारिलाने दटावले.

ॲनी एक दीर्घ उसासा घेऊन

स्टुलवर बसली, बोनीच्या एका पानाचे चुंबन घेतले, तसेच फुललेल्या फुशियाकडे पाहून हात हालवला.

“मी घरात नसल्याने बागेतील झाडांना एकटे पडल्यासारखे वाटले असावे,” असे तिने स्पष्टीकरण केले.

"आता रविवारच्या शाळेबद्दल. तुम्ही मला सांगितले तसे मी चांगले वागले. मिसेस लिंड अगोदरच गेल्या होत्या, म्हणून मी एकटी गेले. तिकडे बऱ्याच लहान मुलीं होत्या. सुरवातीला प्रार्थना आणि पाठांतर यांच्या वेळी मी एका कोपऱ्यात खिडकीजवळ बसून राहिले. मिस्टर बेल यांनी खूप वेळ प्रार्थना आणि प्रवचन केले. जर मी त्या खिडकीजवळ बसले नसते तर भयंकर कंटाळले असते. खिडकीतून चमकणाऱ्या पाण्याचे सरोवरावर दिसत होते त्याकडे पाहत मी कल्पनाविश्र्वात रमून गेले.”

“तू असे काहीही करायला नको होते. तू मिस्टर बेल सांगताना पूर्ण लक्ष द्यायला हवे होते."

“पण ते कुठे माझ्याशी बोलत होते? त्यांचा देवाशी संवाद चालू होता. देव आपल्यापासून अनंत अंतरावर आहे अशी त्यांची समजूत असावी त्यामुळे त्यांना फारसे स्वारस्य आहे असे वाटत नव्हते. माझी मी स्वतः छोटीशी प्रार्थना केली. मी आपली तलावावर झुकलेल्या पांढऱ्या बर्चच्या झाडाच्या फांदीमधून सूर्य प्रकाश, ओघळून चमचमत्या पाण्यावर नृत्य करताना पाहत होते. मारिला, ते एका सुंदर स्वप्नासारखे होते! त्याबद्दल मी फक्त दोन-तीन वेळा देवाला धन्यवाद, दिले."

“मला आशा आहे तू मोठ्याने प्रार्थना केली नसावी,” मारिला म्हणाली.

“नाही अगदी मनातल्या मनात, प्रत्येक श्वासाबरोबर, मि. बेल यांची प्रार्थना संपल्यावर मग मिस राॅजरसन यांचा क्लास झाला. वर्गात नऊ मुली होत्या. प्रत्येकीच्या ड्रेसच्या बाह्या फुग्याच्या होत्या. मी कल्पना केली की माझ्या ड्रेसचे हात फुल्यांचे आहेत. घरी एकटीने असा विचार करणे ठिक होते पण खरोखरच इतर मुलींचे फॅशनेबल कपडे पाहून मला खोटे खोटे तसे वाटून घेणे जमले नाही."

"तुला शाळेत ड्रेस बद्दल विचार करण्याऐवजी शिकवत असलेल्या धड्यांचा विचार करायला पाहिजे एव्हढे तरी समजत असेल अशी मी आशा करते."

"हो! मी मला विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली पण मला सुध्दा तिला बरेच काही विचारायचे होते पण परंतु मला ते शक्य झाले नाही. मग मुलींनी बायबल मधील स्तोत्रे म्हणून दाखवली. मला पण म्हणायला सांगितले पण मी मला पाठ नसल्याने मी पुढच्या रविवार पर्यंत पाठ करायचे कबूल केले. मी, मला पाठ असलेली कविता म्हणून दाखवायची तयारी दाखवली पण ती देवाच्या संदर्भात नसल्याने मला परवानगी मिळाली नाही.

शाळा संपल्यावर मिसेस लिंडनी आपल्या कुटुंबाच्या नांवे असलेला बेंच दाखवला त्यावर बसून मी देवाच्या वाणी मधील दोन अध्यायातील श्लोक शांतपणे ऐकले. त्यासाठी खूप वेळ लागला. मला सर्व अगदीच एकसुरी आणि कंटाळवाणे वाटले. फारशी काय तर थोडी सुध्दा स्वतःची कल्पना शक्ती वापरली नव्हती. मी त्याकडे विशेष लक्ष न देता माझ्या विचारात बुडून गेले होते. खूप चांगल्या चांगल्या कल्पना माझ्या मनात घोळत होत्या.

मारिलाला हे ऐकून या सर्व गोष्टींसाठी तिला रागे भरण्याची इच्छा झाली पण थोडा अधिक विचार करता ॲनीचे फारसे चुकीचे आहे असे वाटेना. विशेषतः लांबलचक कंटाळवाण्या प्रवचनाबद्दल, वर्षानुवर्ष तिच्या मनात पण असेच विचार येत पण ते उघडपणे बोलण्याचे धाडस तिने कधी केले नव्हते. मारिला स्वतः स्पष्टवक्ती असूनही मनातील गुप्तपणे वास करणारे गंभीर विचार, आज अचानक आज या अनाथ मुलीच्या रुपात प्रकट होऊन जणू त्याला वाचा फोडत असल्याचा भास झाला.

a

# प्रकरण 12

पुढच्या शुक्रवारी मारिलाला मिसेस लिंडकडून रविवारी चर्चमध्ये जाताना फुलांनी सजवलेलेल्या ॲनीच्या टोपीची गोष्ट समजली. घरी आल्यावर लगेच तिने ॲनीला हाक मारली आणि विचारले, “अग हे मी काय ऐकत आहे, टोपीला कुणी फुलांनी सजवतात काय? सगळ्या लोकांनी त्याची किती टर उडविली याची तुला कल्पना तरी आहे काय?”

“मला गुलाबी आणि पिवळा रंग शोभत नाही” ॲन तोंड पाडून म्हणाली.

“मुळात टोपी फुलांनी सजवणे हाच मूर्खपणा आहे, यात फुलांच्या रंगाचा कुठे प्रश्न येतो? खरोखरच तू अशक्य कोटीतील मुलगी आहेस."

“कित्येक मुलींनी तर ड्रेस वर पण नकली फुले लावलेली होती. मग टोपीवर खरी फुले लावली तर तो मूर्खपणा कसा?"

“मला उलट उत्तर नको आहे. पुन्हा असा वेडेपणा घडणार नाही याची काळजी घे. तुझा अवतार पाहून मिसेस लिंड म्हणत होती की ती अगदी ओशाळून गेली. त्या तुला टोपीवरची फुले काढून टाकायला सांगण्यापुर्वीच लोकांनी पाहिले

होते. सर्वजण आपापसात कुजबुजत होते. त्यांनी या साऱ्या गोष्टींचा दोष मला दिला असणार आणि सगळीकडे माझी टिंगल झाली असणार."

"अरे, मला माफ करा," ॲनी म्हणाली, तिच्या डोळयात अश्रू आले. "मला कधीच वाटलं नाही की तुम्हाला हे आवडणार नाही. गुलाब आणि बटरकप इतके गोड आणि सुंदर होते की ते माझ्या टोपीवर सुंदर दिसतील असे मला वाटले. अनेक मुलींच्या टोपीवर पण फुले होती पण ती कृत्रिम फुले होती. मला भीती वाटते की मी तुमच्यासाठी एक त्रासदायक गोष्ट ठरणार आहे. कदाचित तुम्ही मला आश्रमातला परत पाठवाल. तसे झाले तर ती गोष्ट माझ्यासाठी दुर्दैवी असेल; मला वाटत नाही की मी ते सहन करू शकेन; बहुधा मी दु:खाने मरून जाईन. तशीही मी फार सशक्त मुलगी नाही. पण तुमच्या त्रासाला मी कारण होण्यापेक्षा मरण आले तर चांगले होईल."

"परत एकदा मूर्खपणा," मारिला, ॲनी रडायला लागल्याने ती स्वतःवरच चिडली होती. "मला तुला आश्रमात परत पाठवायचे नाही हे नक्की. माझी फक्त एवढीच इच्छा आहे की तू इतर लहान मुलींसारखे वागले पाहिजे आणि उगाच स्वतःला हास्यास्पद बनवू नये. अगोदर रडणे थांबव. माझ्याकडे तुला सांगायला एक बातमी आहे. डायना बॅरी आज दुपारी परत घरी आली आहे. मी मिसेस बॅरी कडून स्कर्टचा पॅटर्न आणायला जाणार आहे जर तुला आवडत असेल तर तू माझ्यासोबत चल आणि डायना बरोबर ओळख करून घे."

हे ऐकताच ॲनी हात जोडून उभी राहिली, तिच्या अश्रु गालावर अजूनही ओघळत होते. "अरे, मारिला, मला भीती वाटत आहे तर तिला सुध्दा मी आवडले नाही तर मग मात्र माझी घोर निराशा होईल. मी जीवाभावाची मैत्री मिळण्यापूर्वी तिला गमावून बसले तर मला पुन्हा स्वतःला सावरणे कठीण आहे."

a

“आता, एव्हढे घाबरून जाण्याचे कारण नाही आणि एव्हढे मोठे मोठे शब्द वापरायची आवश्यकता नाही. लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखे वाटते. तुझी आणि डायनाची मैत्री नक्की होईल पण तिच्या आईला तुझे वागणे विचित्र वाटायला नको याची काळजी घे. जर तिने मिसेस लिंड कडून तुझ्याविषयी साद्यंत अहवाल ऐकला असेल तर मग पंचाईत आहे. टोपी भवती रानफुले वगैरे प्रकार तिला रुचणार नाहीत. तिच्यासमोर तुला नम्र आणि चांगले वागावे लागेल. कोणतेही धक्कादायक भाषण नको. पण असे भीतीने थरथर कापायची गरज नाही. एव्हढी काही ही गोष्ट अवघड नाही."

ॲनी खरोखरच थरथर कापत होती. तिचा चेहरा पडला होता. देहबोली चिंताग्रस्त दिसत होती. त्या दोघीजणी ओढा ओलांडून टेकडीवरच्या झाडांच्या मधून जाण्यासाठी जवळच्या रस्त्याने बॅरींच्या घराकडे गेल्या. मिसेस बॅरीनी दार उघडले.

मिसेस बॅरी, अगदी भारदस्त व्यक्तिमत्व होते. उंची भरपूर, डोळे आणि केस काळेभोर, दृढनिश्चयी चेहरा, अतिशय कडक शिस्तीच्या म्हणून त्यांची सगळीकडे ख्याती होती.

"मारिला या, आत या. ही तुमची दत्तक घेतलेली मुलगी आहे काय? तुम्ही कशा आहात?"

"हो आम्ही छान आहोत, ही आमची मुलगी ॲनी शर्ली,” मारिलाने उत्तर दिले.

'ॲन' ऐवजी 'ॲनी' असा उल्लेख ऐकून ॲनीचा जीव भांड्यात पडला. इतकी महत्त्वाची गोष्ट सुरवातीलाच स्पष्ट झाल्याने तिला आनंद झाला. मिसेस बॅरींनी मान डोलावली आणि प्रेमाने तिला विचारले, “बाळ तू कशी आहेस?"

a

"मी शरिराने उत्तम आहे मात्र मनाने थोडी गोंधळून गेले आहे." ॲनी गंभीरपणे म्हणाली आणि मारिलाच्या कानाजवळ कुजबुजत विचारले, “मी चुकीचे तर वागत नाही आहे ना?"

डायना सोफ्यावर बसून पुस्तक वाचत होती. तिच्या आईसारखी गोरी गुलाबी होती. डोळे आणि केस काळेभोर होते. तिला तिच्या वडिलांकडून आनंदी स्वभाव मिळालेला होता. ती दिसायला खूपच सुंदर  होती.

"ही माझी मुलगी डायना" मिसेस बॅरीनी ओळख करून दिली.

“डायना, तू ॲनीला घेऊन बागेत जा आणि आपली बाग दाखव, सतत पुस्तकात डोळे घालून बसण्यापेक्षा बाहेर बागेत फेरफटका मारल्यास चांगले होईल." मिसेस बॅरी म्हणाल्या.

त्या दोघी बागेत गेल्यावर मिसेस बॅरी मारिलाला म्हणाल्या," सतत पुस्तकात गढून गेलेली असते, या बाबतीत तिच्या वडिलांवर गेली आहे. तिला एखादी मैत्रीण मिळाली तर कुठे घराबाहेर पडेल."

बागेत सगळीकडे संध्याकाळचा सोनेरी मंद प्रकाश झाडांच्या फांद्यामधून झिरपत होता. ॲनी आणि डायना जवळच फुललेल्या केशरी रंगाच्या टायगर लिलीच्या फुलांकडे बघत उभ्या होत्या.

बॅरीच्या बागेतील तरतऱ्हेची फुले पाहून नेहमीच दु:खाने खंतावत असलेले ॲनीचे मन आनंदाने हरखून गेले. सभोवताली जुनी पुराणे विलो आणि देवदारचे मोठमोठ्याले वृक्ष होते. त्यांच्या सावलीत असंख्य फुले फुलली होती. बाग अगदी आखीवरेखीव होती. रक्तवर्णी गुलाब, किरमिजी रंगाच्या पिओनी, पांढऱ्या शुभ्र सुवासिक डेफोल्डील, काटेरी स्कॉच गुलाब, पांढऱ्या, निळया जांभळया कोलंबिन्स् आणि लायलॅक्स्,  वेगवेगळया छटांची सफनोरियाची फुले फुलली होती. सदर्नवुड, रिबन गवत आणि पुदीना ताटव्यांमध्ये गच्च पसरलेले होते. पांढऱ्या आणि

a

गुलाबी रंगाचे क्लोव्हर, या साऱ्यांचा मंद सुगंध वातावरणात दरवळत होता. बागेत अजून सूर्यप्रकाश रेंगाळला होता, मधमाशा फुलांतून मध गोळा करण्यात व्यस्त होत्या आणि वारा उत्साहात सळसळत होता.

"डायना, मी तुझी जिवलग मैत्रिण होऊ शकेन असे तुला वाटते काय?"

डायना हसली, ती नेहमीच बोलण्यापुर्वी हसत असे.

“तू ग्रीन गेबल्समध्ये राहायला आल्याचे समजल्यावर इतक्या जवळ राहणारी मला मैत्रीण मिळणार म्हणून मला खूपच आनंद झाला. माझी बहिण अगदी लहान असल्याने, मला माझ्या वयाची एक बहिणी सारखी मैत्रीण मिळेल असे वाटले."

"तू माझी जीवाभावाची मैत्रीण होण्याची शपथ घेशील का?” ॲनीला उत्सुकतेने मागणी केली.

"मी कधी अशी शपथ वगैरे घेतलेली नाही,” डायना थोडी संभ्रमात पडल्यासारखी दिसली.

“शपथ घेणे म्हणजे आण घेऊन कायमची मैत्री टिकवण्यासाठी वचन द्यायचे,” ॲनीने माहिती पुरवली.

“ठीक आहे, माझी तसे वचन द्यायला काही हरकत नाही,” डायनाने दिलासा दिला. "पण म्हणजे नक्की काय करायचे."

“खरे तर वाहत्या पाण्यासमोर हात जोडून वचन द्यायचे असते पण तिकडे लांब वाहणाऱ्या ओढ्याच्या काठी आपण आहोत अशी कल्पना करूया. आता मी म्हणते:-जोपर्यंत सूर्य आणि चंद्र टिकून राहतील तोपर्यंत मी माझ्या जवळच्या मैत्रिणीशी-- डायना बॅरीशी, विश्वासू राहण्याची शपथ घेत आहे. आता तू म्हणताना माझे नाव घे.”

a

डायनाने हसून शपथ घेतली आणि म्हणाली, "तू एक अजब मुलगी आहेस, असे मी आधी ऐकले होते. पण मला तू खूप आवडशील यात शंका नाही."

मारिला आणि ॲनीला सोडायला डायना ओढ्यावरील पूलापर्यंत पोहोचवायला गेली. घरी पोहोचल्यावर मारिलाने ॲनीला नवीन मैत्रीण कशी वाटली असे विचारले. तेव्हा ॲनी म्हणाली, "

"मी प्रिन्स एडवर्ड बेटावरची सर्वात आनंदी व्यक्ती आहे. आज प्रार्थना करताना मी देवाचे आभार नक्कीच मानेन. उद्या आम्ही दोघी त्यांच्या बागेत भातुकली खेळणार आहोत. मला डायना वाचायला एक पुस्तक देणार आहे आणि जंगलातील वेगवेगळी रानफुले पण दाखवणार आहे. ती मला एक छान गाणे शिकवणार आहे शिवाय एका सुंदर स्त्रीचे चित्र पण देणार आहे. मला पण तिला काही तरी द्यायला आवडेल. ती म्हणाली की तिला माझ्यासारखे बारीक व्हायला आवडेल. बहुदा मला बरे वाटण्यासाठी म्हणाली असावी आणि आम्ही की नाही ओढ्यावरच्या धबधब्याचे 'वनराणीचा साज' हे नाव पक्के केले आहे."

"ठिक आहे, आता मी काय सांगते ते ऐक. तिन्ही त्रिकाळ तुला खेळ, गोष्टी आणि अखंड बडबड करता येणार नाही. तुला तुझे काम सर्वात अगोदर पूर्ण करावे लागेल," मारियाने आठवण करून दिली.

आज ॲनचा आनंदाने भरलेला कप मॅथ्यूमुळे ओसंडून वाहू लागला. त्यांनी कार्मोडी येथील दुकानातून आणलेला चा ॅकलेटचा पुडा घरी आल्या आल्या ॲनीच्या हाती सुपूर्द केला.

"दात खराब होतील, पण ॲनी अगदी रडवेली होऊ नको. तुला चा ॅकलेट मिळतील पण सगळी एकदम खाऊ नको. तुझ्यासाठीच मॅथ्यूनी आणली आहेत त्यापेक्षा पेपरमिंटच्या गोळया आणायला हव्या होत्या त्या चा ॅकलेट पेक्षा चांगल्या असतात," मारियाने समजावले.

"अरे, नाही, खरंच, मी सर्व एकट्याने खाणार नाही," ॲनी उत्सुकतेने म्हणाली. "मी आज रात्री एक चा ॅकलेट खाईन. मारिला, मी डायनाला त्यापैकी निम्मी देऊ शकते का? तिला दिल्यास उरलेलेली निम्मी चा ॅकलेट मला दुप्पट गोड लागतील. माझ्याकडे तिला देण्यासारखे काहीतरी आहे या विचाराने मला आनंद वाटत आहे."

जेव्हा ॲनी झोपायला गेली तेव्हा मारिला मॅथ्यूला म्हणाली, "ती अप्पलपोटी आणि कंजूस नाही हे चांगले आहे. मला कंजूस मुले अजिबात आवडत नाहीत. तिला इथे येऊन जेमतेम तीन आठवडे झाले पण मला ती कायमची इथलीच असल्यासारखी वाटते. तिच्या शिवाय मी ग्रीन गेबल्सची कल्पना पण करू शकत नाही. असे आश्र्चर्यने माझ्याकडे बघू नको. मी तिला घरी ठेवून घेण्याची परवानगी दिली याचा मला आनंद वाटत आहे. मला ती आवडायला लागली आहे. पण मॅथ्यू तुला निक्षून सांगते तू आमच्या दोघींच्या मध्ये येऊ नकोस."

# प्रकरण 13

“ॲनी अजून शिवणकाम शिकायला कशी काय आली नाही?” मारिला घड्याळाकडे बघत म्हणाली. ऑगस्ट महिन्यातील दुपारच्या उन्हाने तिला पेंगुळायला होत होते.” खरं तर ती डायना बरोबर खेळायची वेळ संपल्यावर पण अर्धा तास जास्त खेळत होती आणि आता तिकडे लाकडाच्या ढिगाजवळ मॅथ्यूशी बोलत बसली आहे. तो आपला शांत उभा आहे आणि हिची टकळी मात्र सतत सुरू आहे. तिला पक्के माहीत आहे की आता शिवणकाम करण्याची वेळ आहे. मॅथ्यू पण मूर्खासारखा तिचे बोलणे ऐकत उभा आहे. तिच्यावर नको इतकी माया करत आहे. ती जितकी जास्त आणि विचित्र गोष्टी बोलते त्याबद्दल रागवायचे सोडून कौतुक करत बसतो. ॲन शर्ली, तू या क्षणी इथे ये, तुला माझी हाक ऐकू येते का!”

पश्चिमेकडील खिडकीतून मारिला मोठ्याने हाका मारत होती. शेवटी ॲनी अंगणातून घराकडे यायला निघाली. तिचे डोळे आनंदाने लकाकत होते. चेहरा उत्साहाने फुलला होता.

आत आल्यावर एका दमात बोलून गेली, “मारिला संडे स्कूलची सहल मिस्टर हार्मन अँड्र्यूजच्या शेतात जाणार आहे. मिसेस लिंड आणि मिसेस बेल आईस्क्रीम बनवणार आहेत. कित्ती मज्जा! मग मी पण पिकनिकला जाऊ ना?”

“अगोदर जरा घड्याळात किती वाजले ते बघ. मी तुला किती वाजता आत यायला सांगितले होते?”

“दोन वाजता, पण मी पिकनिकला जाऊ ना? मी कधीच पिकनिकला गेले नाही. फक्त पिकनिकचे स्वप्न पाहिले आहे.”

“ॲनी,मी तुला दोन वाजता घरात यायला सांगितले होते. आता तीन वाजत आहेत. तू माझी आज्ञा का पाळली नाहीस हे मला जाणून घ्यायचे आहे.”

“मला आज्ञा मोडायची नव्हती. पण माझा नाईलाज झाला. डायनाबरोबर भातुकली खेळताना किती वेळ झाला हे लक्षात राहिले नाही. आम्ही की नाही, एक छोटेसे घर बनवले आहे. त्यांचे नांव 'आयड्लवाइल्ड' असे ठरवले आहे, ते खूप सुंदर आहे, तिथून निघून यायची इच्छाच होत नव्हती. घराकडे आल्यावर मॅथ्यूना पिकनिकचे सांगवे लागले, त्यांनी सर्व दयाळूपणे सर्व ऐकून घेतले. मारिला मी पिकनिकला जाऊ शकते काय?”

“तुमच्या भातुकलीच्या घराबद्दल 'आयडलवाइल्ड' का काय ते सोडून यायची इच्छा होत नव्हती त्याविषयी मला सांगायचे आहे की मोहावर मात करायला तुला शिकायला हवे. माझी आज्ञापालन तुझे कर्तव्य होते. जेव्हा मी ठराविक वेळी घरी यायला सांगते तेव्हा त्यापेक्षा उशीर झालेला मला चालणार नाही हे तुझ्या ध्यानात रहायलाच हवे. त्यानंतर सुद्धा वाटेत मॅथ्यू बरोबर चर्चा करत थांबण्याची गरज तर मुळीच नव्हती. आणि पिकनिकची गोष्ट म्हणशील तर तू पिकनिकला जावू शकतेस.”

“पण—पण,” ॲनी गडबडली, “डायना म्हणते की प्रत्येकाने खाण्यासाठी एक टोपली घेतली पाहिजे. मला स्वयंपाक करता येत नाही, एकवेळ फुगलेल्या बाहीच्या ड्रेस नसला तरी चालेल पण खाण्याची बास्केट न घेता पिकनिकला कसे जायचे, याचीच काळजी मला लागून राहिली आहे.”

“त्याची काळजी करण्याची गरज नाही. मी तुला टोपलीभर खाऊ बनवून देईन.”

“खरचं? मारिला तुम्ही किती दयाळू आहात. मी तुमचे उपकार कधीच विसरणार नाही.”

असे म्हणत ॲनीने मारिलाला घट्ट मिठी मारली आणि गालाचा पापा घेतला. मारिला क्षणभर भांबावली आणि नंतर आयुष्यातील प्रथमच बालिश ओठांचा गालाला झालेल्या स्पर्शाने मोहरुन गेली. मारिला मनातून खूप खूश झाली होती पण ते प्रगट होऊ न देता ॲनीला रागे भरु लागली.

“हा काय वेडेपणा? तुला सांगितलेले ऐकायला आणि त्याप्रमाणे वागायला शिक. तुला मी स्वयंपाक शिकवणार आहे. तशी तू हुशार आहेस पण जरा शांत आणि स्थिर राहायला कधी शिकशील का हे पाहण्यासाठी मी वाट पाहत आहे. स्वतःला आणि स्वतःच्या विचारांना इतस्ततः भटकू देऊ नकोस. आता शिवणकामाचा पॅचवर्कचा चौकोन चहाच्या वेळेपूर्वी तयार व्हायला हवा.”

“मला पॅचवर्क आवडत नाही,” ॲन धीरगंभीरपणे म्हणाली. शिवणकामाच्या पेटीतील लाल, पांढऱ्या चमकणाऱ्या मण्यांशी खेळत एक उसासा टाकत आणि म्हणाली, “शिलाई करण्यात थोडीफार कल्पनाशक्ती वापरता येते पण पॅचवर्क मध्ये एकामागून एक टाकेच तर घालायचे असतात. त्यात आपले कौशल्य कुठेच दिसत नाही. मला त्याचा कंटाळा येतो. डायना बरोबर खेळताना वेळ कसा संपला ते समजले नाही तसाच वेळ पॅचवर्क करताना संपायला हवा. ओढ्याच्या पलीकडे पांढऱ्या बर्चच्या झाडाची रांग आहे. तिथे भातुकलीच्या खेळातील घर बनवले आहे. त्याचे नांव 'आयडूलवाईल्ड' असे ठेवले आहे. किती छान आहे नाही? शेतातील तळयाला 'विललोमेर' असे नांव दिले आहे. आम्ही दगड बसण्यासाठी आणि लाकडाच्या छोट्या पट्टयांची कपाटे बनवली आहेत. एक सुंदर चिनी मातीची

a

प्लेट आणि काचेचा ग्लास पण आहे. त्यात इंद्रधनुष्याचे रंग दिसतात. आम्ही त्याला परीराणीचा ग्लास म्हणतो. मॅथ्यू आम्हाला टेबल बनवून देणार आहेत. डायना कोपऱ्यापर्यंत बाह्या असलेला नवीन ड्रेस पिकनिकला घालणार आहे. बुधवार पर्यंत कोणतीही अडचण आली नाही म्हणजे मिळवली कारण जर मला पिकनिकला जायला मिळाले नाही तर ते माझ्यासाठी आयुष्यभराचे दु:ख होईल. काही झाले तरी मी चुकवणारे नाही. त्या दिवशी लेक ऑफ शायनिंग वाॅटर वर बोटी असणार आहेत आणि आईस्क्रीम पण. मी यापूर्वी कधीच आईस्क्रीम खाल्लं नाही.” ॲनीची बडबड अखंड सुरू होती.

"ॲनी, तू घड्याळात मोजून सलग दहा मिनिटे बोलत आहेस, आता थोडा वेळ शांत बसायला काय घेशील?” मारिला म्हणाली.

तेव्हढा वेळ ती शांत बसली पण पुढचा पूर्ण आठवडा ती पिकनिकविषयी बोलत होती, सतत पिकनिकचा विचार करत होती आणि पिकनिकचेच स्वप्नात पाहत होती. त्यात आणखी भर म्हणजे शनिवारी पाऊस पडला तो बुधवार पर्यंत राहिल की काय या भीतीने पार वेडावून गेली होती. शेवटी तिला मारिलाने बळजबरीने पॅचवर्क करायला लावले तेव्हा कुठे थोडी भानावर आली.

रविवारी चर्चमध्ये पिकनिकची परत एकदा घोषणा झाली. ॲनीचा जीव एकदाचा भांड्यात पडला तसे तिने मारिला कडे कबूल केले. गेले आठवडाभर मारिला तिच्या जीवाची घालमेल बघत होती शेवटी न राहवून ती ॲनला म्हणाली, “ॲनी, एखाद्या गोष्टींवर इतके जास्त लक्ष केंद्रित करणे योग्य नाही. जास्त अपेक्षा केल्या असतील आणि त्यानुसार इच्छीत गोष्ट प्राप्त झाली नाही तर पदरी घोर निराशा पडते."

“मारिला माझ्या मते एखाद्या गोष्टीची अभिलाषा धरण्यात पण आनंद मिळतो मग भले तर इप्सित साध्य झाले नाही तरी कामनापुर्तीची प्रतिक्षा करण्यातील

a

आनंद कोणी हिरावून घेऊ शकत नाही. मिसेस लिंड म्हणतात की अपेक्षांचे ओझे बाळगले नाही तर कधीही निराशा येणार नाही. मला ते पटले नाही मला वाटते एखाद्या गोष्टीची अपेक्षा न करणे हे न निराश होण्यापेक्षा वाईट आहे."

मारिला नेहमीप्रमाणे त्या दिवशी चर्चला जाताना तिचा नीलम ब्रोच घातला. तिच्यासाठी तो ब्रोच अतिशय महत्त्वाचा होता. ती मौल्यवान वस्तू तिला तिच्या आईकडून मिळाली होती शिवाय आईची आठवण म्हणून देखील बहुमूल्य होती. तिच्या तपकिरी रंगाच्या ड्रेसवर त्यांची शोभा अधिकच खुलून दिसत असे. ॲनीने तो ब्रोच पहिल्यांदा पाहिला तेव्हा तिला आनंद झाला होता.

“ओहो! मारिला, किती सुंदर ब्रोच आहे. तुम्ही प्रवचन किंवा प्रार्थना चालू असताना त्याकडे कसे लक्ष देऊ शकता हे मला माहीत नाही. मी करू शकणार नाही, मला माहित आहे. मला वाटते की नीलम खूप सुंदर असतात. पूर्वी मला नीलम आणि हिरे एकच असतात असे वाटत होते . जेव्हा मी एका बाईंच्या अंगठी मधील हिरा पाहिला तेव्हा समजले की हिरा मला वाटतं होता तसा जांभळा नसतो. आता खराखुरा जांभळा नीलम बघायला मला जरा हातात तुमचा ब्रोच द्याल काय? तुम्हाला असे वाटते काय की त्यामध्ये पण खरोखरचा जांभळा रंगाचा आत्मा राहत असेल?

# प्रकरण 14

ॲनी पिकनिकला बुधवारी जाणार हे पक्के ठरवले. सोमवारी संध्याकाळी मारिला तिच्या् खोलीतून अस्वस्थपणे बाहेर आली आणि ॲनीला हाका मारू लागली. ॲनी मटारच्या शेंगा सोलता सोलता डायनाने शिकविलेले गाणे गात होती.

"ॲनी, तू माझा नीलम ब्रोच कुठे पाहिलास काय? काल संध्याकाळी आपण चर्चमधून घरी आलो तेव्हा मी दागिन्यांच्या थैलीमध्ये ठेवल्याचे आठवते आहे पण आता कुठे सापडत नाही."

आज दुपारी तू बाहेर गेली होतीस तेव्हा मला दारातून दागिन्यांच्या पेटीवर ब्रोच दिसला म्हणून मी पाहायला आत गेले होते.

"तू त्याला हात लावलास का?" मारिला कठोरपणे म्हणाली.

"होय," ॲनीने कबूल केले, "मी तो उचलला आणि ते कसा दिसेल हे पाहण्यासाठी मी माझ्या छातीवर लावून बघितले."

"तुला माझ्या खोलीत जाऊन असा कारभार करण्याची गरज नव्हती. मुळात दुसऱ्यांच्या वस्तूला हात लावणे अत्यंत चुकीचे आहे. मला सांग तू ब्रोच कुठे ठेवला आहेस?"

"अरे, मी तो परत जिथे होता तिथेच लगेच ठेवला. एक मिनिटभर पण मी हातात धरला नव्हता. मी तुम्ही नसताना खोलीत जायला नको होते पण माझ्या लक्षात ही गोष्ट आली नाही. ब्रोचला हात लावून घालून बघणे चुकीचे होते पण ते मला आता समजत आहे. पुन्हा मी अशी चुक करणार नाही. मी एक चुक परत करत नाही."

a

“तू तो परत जागच्या जागी ठेवलेला नाहीस. नक्कीच तिथून बाहेर काढला असणार. त्यांचे नेमके काय केलेस ॲनी?

“मी ते परत ठेवले आहे,” ॲनीने झटकन उत्तर दिले.

मारिलाने विचारात पडली मी दागिन्यांच्या पेटीवर ठेवला होता की चायना ट्रेमध्ये परत एकदा शोधायला हवे."

“ठिक आहे मी परत एकदा शोधून पाहते. जर तिथे नसेल तर मग तू परत घेतल्या जागी ठेवलेला नसणार."

मारिला परत खोलीत गेली आणि सगळीकडे शोधून परत किचन मध्ये आली.

“ॲनी, ब्रोच हरवला. तू स्वतः

सांगितल्याप्रमाणे त्याला शेवटची हाताळणारी तूच होतीस. आता मला खरं सांग तू त्याचे काय केले? तू तेथून उचललास आणि हरवलास काय?”

“नाही, मी नाही केले,” मारिलाच्या चिडलेल्या नजरेला नजर देत ॲनी गंभीरपणे म्हणाली. “मारिला, मी तुमच्या खोलीतून ब्रोच कधीच बाहेर नेला नाही आणि हे सत्य आहे, जर मला त्यासाठी फाशी दिले जाईल - जरी मला फाशी म्हणजे नेमके काय ते माहित नाही. मग काय होईल ते होवो.”

ॲनीच्या ‘मग काय होईल ते होवो’ असे म्हणण्याचा हेतू फक्त ती जे काही सांगत आहे ते खरे असून त्यासाठी कोणतेही 'दिव्य' करण्याची तयारी दाखवणे हा होता परंतु दुर्दैवाने मारिलाची अशी समजूत झाली की, ती तिच्यावरील आरोपाला आव्हान देत आहे.

"ॲनी, माझी आता खात्री पटली की तू माझ्याशी खोटे बोलत आहेस. मारिला कठोरपणे म्हणाली. “मी तुला चांगली ओळखते. आता फक्त खरे काय ते

a

सांग, त्याव्यतिरिक्त एक शब्दही बोलू नको. आताच्या आता तुझ्या खोलीत जा आणि खरे काय त्यांचा कबुल करेपर्यंत तिथून बाहेर पडू नको.''

''मी वाटाणे सोलायला घेऊन जाईन,''

ॲन नम्रपणे म्हणाली.

''नको, मी स्वतः ते काम करेन, आताच्या घडीला मी तुला सांगते तसे कर.''

ॲनी गेल्यावर मारिला अस्वस्थपणे तिच्या मौल्यवान ब्रोचची काळजी करत बसली,'' जर ॲनीने खरोखरच ब्रोच हरवला असेल तर पुढे काय? आणि अगदी निष्पाप असल्यासारखे नाकारत आहे पण तिच्या शिवाय इतर कोणी घेण्याची शक्यता नाही. काय होणार आहे कुणास ठाऊक?'' वाटाणे सोलताना मारिला स्वतःशी उलटसुलट विचार करत राहिली. ''तिने चोरले आहे असे वाटत नाही पण खेळायला म्हणून, निरखून पाहण्यासाठी किंवा दिवास्वप्न पाहताना गंमत म्हणून घेतले असावे, म्हणून नक्की हरवला असे समजणे पण ठिक नाही. बहुतेक तिच्याकडून गहाळ झाले असणार पण कबूल करायला शिक्षा होईल या भीतीने घाबरत असावी. पण ती खोटारडी आहे असे समजणे तिच्या संतापाच्या उद्रेकापेक्षा अधिक वाईट आहे. ज्या मुलावर विश्र्वास ठेवता येत नाही त्याला घरी आसरा देणे ही भयंकर जबाबदारीची गोष्ट आहे. धूर्तपणा आणि खोटे बोलणे या दोन्ही गोष्टींमुळे तिने हे दाखवून दिले आहे की तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे अवघड गोष्ट आहे याचे दुःख ब्रोच हरवल्यापेक्षा जास्त आहे त्यापेक्षा तिने खरे काय ते सांगितले असते तर माझी फारशी हरकत नव्हती."

मारिलाने परत एकदा आपल्या खोलीचा कानाकोपरा धुंडाळून पाहिला पण काही उपयोग झाला नाही. तसेच ॲनीने पण आपला नकार कायम राखल्याने मारिलाच्या काळजीत भर पडली.

a

दुसऱ्या दिवशी सकाळी मारिलाने घडला प्रकार मॅथ्यूच्या कानावर घातला. मॅथ्यू पार गोंधळून गेले. त्यांचा ॲनीवरील विश्वास कायम होता पण परिस्थिती तिच्या विरुद्ध होती हे त्याला मान्य करावे लागले.

"तू टेबलाच्या मागे नीट पाहिलेस काय?" त्यांनी विचारले.

"मी टेबल बाजूला करून मागे पाहिले, सर्व ड्रावर्स तपासले. खोलीचा कानाकोपरा झाडून काढला. सत्य हे आहे ॲनीने ब्रोच घेतला आणि तो ती कबुल करायला तयार नाही."

मारिला खिन्नपणे म्हणाली.

"तर मग तू पुढे काय करायचे ठरवले आहेस?" हताशपणे मॅथ्यूनी विचारले.

खरे तर या प्रकरणामध्ये मारिला काय तो निर्णय घेईल या भावनेने स्वतःची सुटका झाल्यासारखे वाटले. मागच्या वेळेसारखे ॲनीला सावरून घ्यावे हा विचार मात्र त्यांनी सोडून दिला.

"ती कबूल करेपर्यंत ती तिच्या खोलीतच राहील," पूर्वीच्या प्रकरणात या पद्धतीचे यश लक्षात ठेवून मारिला गंभीरपणे म्हणाली. "मग आपण पाहू. तिने नेमके त्यांचे काय केले हे तिने सांगितल्यास कदाचित ब्रोच मिळेल. पण काही झाले तरी आपल्याला तिला कठोर शिक्षा दिलीच पाहिजे."

"शिक्षेचे काय ते तुझे तू बघ. मी तिच्या कुठल्याच बाबतीत लक्ष घालू नये असे तूच सांगितले आहेस."

मारिलाला एकटे पडल्यासारखे वाटले. मिसेस लिंडचा सल्ला घेणे योग्य वाटले नाही. परत एकदा ती ॲनीच्या खोलीकडे गेली आणि ॲनीचा नकार ऐकून अधिक दु:खी अंत:करणाने परतली. ॲनी आपल्या नकारावर ठाम होती. रडून रडून पार थकून गेली होती. मारिलाला दया आली पण तिने मन कठोर केले मात्र रात्री झोपताना पराभूत झाल्याची भावना मनाला कुडतडत राहिली. मंगळवारी मारिलाने

a

ब्रोच हरवल्यासंदर्भात कबूल करेपर्यंत खोलीच्या बाहेर पडायला मिळणार नाही हे ॲनीला निक्षून सांगितले. दुसरे दिवशी दुपारी पिकनिक असल्याने ॲनीने अगदी गयावया करत विनवणी केली की निदान पिकनिक पुरती सुट मिळावी त्यानंतर परत ती शिक्षा सहन करायला तयार आहे पण त्याचा काही उपयोग झाला नाही. मारिलाने खोलीचे दार लावून घेतले.

बुधवारची सकाळ प्रसन्न होती. मारिला ब्रेकफास्टचा ट्रे घेऊन गेल्यावर ॲनी बोलली, "मारिला, मी कबूल करण्यास तयार आहे."

मारिलाने पटकन ट्रे खाली ठेवला. पुन्हा एकदा तिला आपली योजना सफल झाल्याचे जाणवले पण त्याचा आनंद मात्र जाणवला नाही. अतिशय जड मनाने तिने ॲनीकडे स्पष्टीकरण मागितले.

"मी ब्रोच घेतला," मागच्या प्रमाणे कबुलीजबाबाची पुनरावृत्ती केली. "मी ब्रोच बघायला खोलीत गेले. खरं तर मला तो घ्यायचा नव्हता पण तो इतका सुंदर दिसत होता मी तो निरखून पाहिला आणि माझ्या ड्रेसवर पीन अप करून आरशात डोकावून पाहिल्यावर मला आमच्या भातुकलीच्या खेळघरा जाऊन लेडी कॉर्डेलिया फिट्झगेराल्ड बनून खोटे खोटे नाटक करायचा मोह मला आवरता आला नाही. खऱ्या ब्रोच मुळे मी खरी लेडी कॉर्डेलिया आहे असे मनोराज्य करणे सोपे झाले. तू घरी परतण्यापुर्वी मी ब्रोच जागेवर ठेवून देणार होते. शायनिंग वा◌ॅटर तलावाच्या काठावर मी ब्रोच हातात धरून चमचमत्या पाण्यांत त्यांचे प्रतिबिंब पाहताना माझ्या हातून निसटून तलावात पडला. या शिवाय माझ्याकडे दुसरे काही सांगण्यासारखे नाही. मला क्षमा करा."

मारिलाने संतापाने थरथरायला लागली. या मुलीने तिचा मौल्यवान ब्रोच न विचारता उचलला, हरवला आणि जरा देखील पश्र्चातापाची भावना न बाळगता खुशाल त्या गोष्टींचे तपशीलवार वर्णन करत आहे यांने तिच्या संतापात भर पडली.

“ॲनी, हे भयंकर आहे, इतकी वाईट मुलगी आयुष्यात पाहिली नाही.”

“हो मी वाईट वागले आणि त्यासाठी मी मिळेल ती शिक्षा भोगायला तयार आहे. मला पिकनिकला जाण्यापूर्वी शिक्षेला सामोरे जायचे आहे.” ॲनी शांतपणे म्हणाली.

“पिकनिक, खरचं! तू आज पिकनिकला जाणार नाही आहेस, ॲन शर्ली. हीच तुझी शिक्षा असेल. आणि तू जे काही केले आहे त्यासाठी ही शिक्षा देखील पुरेशी नाही!”

“पिकनिकला जाऊ नकोस!” ॲनीने मारिलाच्या पाय पकडले आणि रडत रडत म्हणाली, “पण तू मला वचन दिलेस मी कदाचित! प्लीज, मारिला, मला पिकनिकला जायलाच हवं. म्हणूनच मी कबूल केले. मला तुम्हांला हवी ती शिक्षा द्या पण मारिला, कृपा करून, मला पिकनिकला जाऊ द्या. आइस्क्रीमचा विचार करा! तुम्हाला माहीत असेल मला कदाचित पुन्हा आईस्क्रीम चाखण्याची संधी मिळणार नाही.”

मारिलाने ॲनीचे हात दगडाच्या काळजाने सोडवले.

“तुला विनवणी करण्याची गरज नाही, ॲनी. तू पिकनिकला जाणार नाहीस आणि ते फायनल आहे. नाही, एक शब्दही नाही. ”

ॲनीच्या लक्षात आले की मारिला जे बोलत आहे त्यात काही बदल होणे शक्य नाही. ॲनी, हाताच्या मुठी घट्ट आवळून जोराने किंचाळली आणि स्वतःला पलंगावर झोकून दिले आणि उशी मध्ये तोंड खुपसून निराशेने हताशपणे हमसाहमशी रडू लागली.

“अरे माझ्या कर्मा!” मारिला खोलीतून बाहेर पडताना म्हणाली, “माझी खात्री आहे ती नक्कीच जगावेगळी मुलगी आहे. तिच्या वयाचे कोणतेही लहान मुलं असे वागणे शक्य नाही. जर ती पूर्णतः वाईट नसेल तरी सुद्धा रेचेल बरोबर म्हणत

होती मी स्वतःहून आपली मान जोखडाखाली अडकवून घेतली आहे. आता माघार घेणे पण अवघड आहे."

मारिलाची संपूर्ण सकाळ मनाच्या अतिशय वाईट अवस्थेत गेली. शोधून शोधून काम काढून ते करण्यात तिने मन गुंतवायचा प्रयत्न केला. जमीन झाडून पुसून काढली. गोठा अंगण स्वच्छ केले. दुपारचे जेवण बनवून ॲनीला जेवायला हाक मारायला गेली. अश्रूंनी भिजलेला दु:खी चेहरा पाहून मारिलाला मनातून वाईट वाटत होते.

"मला जेवायला नको आहे. माझे हृदय पूर्णपणे तुटून गेले आहे. कधीतरी तुम्हाला त्याचा पश्चाताप होईल पण मी तुम्हाला माफ करेन. लक्षात ठेवा जेव्हा वेळ येईल तेव्हा मी माफी देईन पण आता मला जेवायला सांगू नका विशेषतः जेव्हा स्वादिष्ट भोजन बनवले गेले आहे. मन दुखावले असता स्वादिष्ट पक्वान्नावर ताव मारायचा म्हणजे फारच विसंगत वाटते."

संतापाने फणफणत मारिला किचनमध्ये परतली आणि झालेली गोष्ट मॅथ्यूना सांगू लागली. ॲनीबद्दल वाटणारी सहानुभूती अस्थायी आहे हे जाणवून त्यांना काय बोलायचे ते सुचेना तरी गुळगुळीत आवाजात ते म्हणाले, "आता खरे तर तिने ब्रोच घ्यायला नको होता किंवा त्याबद्दल सफाई देणे चुकीचे होते."

त्यांचे पण ॲनी प्रमाणे जेवणात मन नव्हते. मनाचा हिय्या करून ते मारिलाला म्हणाले, "खरोखरच ती अजाण छोटी मुलगी आहे, तिने सहलीला जायचे अगदी डोक्यात घेतले आहे तेव्हा तिला न जाऊ देणे अवघड आहे असे तुला वाटत नाही काय?"

"मॅथ्यू कथबर्ट, मला तुझे आश्चर्य वाटते, मला वाटते मी तिच्याबरोबर काहीही वावगे वागले नाही. तिने किती दुष्टपणा केला आहे याची तिला जाणीवही नाही याचेच मला फार दु:ख होत आहे. तिला थोडाफार जरी पश्चाताप वाटलेला

a

दिसला असता तर मला एव्हढे वाईट वाटले नसते. पण तुझ्या ते लक्षात आलेले नाही. किंवा तू तसा बहाणा करत आहेस हे मी बरोबर ओळखले आहे.”

“ठिक आहे पण ती लहान आहे हे पण विचारात घेतले पाहिजे, तुला माहीत आहे तिचे योग्य संगोपन झालेले नाही.” मॅथ्यूनी पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहिला.

“पण आता संगोपन व्यवस्थितपणे होत आहे,” मारिलाने झटकन उत्तर दिले.

मॅथ्यूना पटले नाही, त्यांनी मुकाट्याने पानात वाढलेले संपवायला सुरवात केली.

जेवण झाले, मागची आवराआवर करून मारिलाने ब्रेड भाजायला ठेवला, कोंबड्यांना खाणे देऊन मारिला थोडी निवांत झाली. अचानकपणे तिला आणखी एक काम आठवले, सोमवारी दुपारी मिटींग मधून परतल्यावर तिच्या किंमती काळ्या लेसच्या शालीला एक लहान छिद्र पडलेले दिसले होते. ते टाके घालून शिवणे गरजेचे होते त्याकडे लक्ष देण्यास सवडच मिळाली नव्हती. आता ते काम करावे म्हणून मारिलाने पेटी मधून शाल काढली आणि खिडकीजवळ उजेडाला शिवणकामाचे सामान घेऊन बसली. तो काय आश्चर्य उजेडात शालीमध्ये काही तरी चमकले. मारिलाने श्वास रोखून धरला आणि पाहाते तर काय, जांभळ्या रंगाची उधळण करत तिचा प्राणप्रिय ब्रोच शालीच्या तलम धाग्यांमध्ये अडकून बसला होता. मारिला आश्र्चर्यचकीत झाली होती तिने हळूच धाग्यांत अडकलेला ब्रोच हळूच सोडवून घेतला.

“याचा अर्थ काय?” मारिला विचारात पडली. “माझा ब्रोच तर घरात सुरक्षित आहे, मग बॅरीच्या तलावात हातून निसटून पडल्याचा ॲनीच्या कबुलीजबाबाचा अर्थ काय? ग्रीन गेबल्समध्ये जादू तर झाली नाही? बरोबर मी मिटींगहून आल्यावर शाल टेबलावर मिनिटभर ठेवली होती. कदाचित तिथे ॲनीने पाहून ठेवलेला ब्रोच तिच्या तलम धाग्यांमध्ये अडकला असणार. पेटी ठेवतांना

a

माझ्या लक्षात आले नाही आणि मग सर्व गोंधळ सुरु झाला.” मारिला लगबगीने ॲनीच्या खोलीकडे निघाली. ॲनी रडून रडून, थकून खिडकीतून बाहेर पाहत उदासपणे बसली होती.

“ॲनी शर्ली,” मारिला गंभीरपणे म्हणाली, “मला नुकताच माझा ब्रोच माझ्या काळया लेसच्या शालीत अडकलेला आढळला आहे. आता मला हे जाणून घ्यायचे आहे की आज सकाळी तू मला सांगितलेल्या त्या बाष्फळ बडबडीचा अर्थ काय ते मला सांगा.”

“कारण तुम्ही मला सांगितले होते की कबुल करेपर्यंत या खोलीच्या बाहेर पडायचे नाही,” थकलेल्या आवाजात ॲनने उत्तर दिले. “आणि मला तर पिकनिकला जायचे होते म्हणून मी रात्री जागून एक चांगला कबुलीनामा तयार केला. त्याला मला शक्य तितके मनोरंजक बनवले आणि मी ते विसरु नये म्हणून मी ते घोकून ठेवले. पण तुम्ही मला पिकनिकला जाऊ देणार नाही असे सांगितल्याने माझा सर्व कष्ट वाया गेले.”

ॲनीचे बोलणे ऐकून मारिलाला हसावे की रडावे असा प्रश्न पडला.

“ॲनी, तू मला हरवलेस बाई! माझी चूक झाली. मला तुझ्या बोलण्यावर शंका आली नाही. अर्थात न केलेल्या चुकीची कबुली देणे ही पण एक चूकच आहे. पण मी तुला तसे करण्यास भाग पाडले असे दिसते त्याबद्दल तू मला माफ कर. आणि मी पण तुला माफ करेन आपण पुन्हा नव्याने सुरूवात करू आणि आता पिकनिकसाठी तयारी कर.”

हे शब्द ऐकताच ॲनी टुण्णकन उठली आणि म्हणाली, “आता खूप उशीर झाला असेल नाही?"

“नाही, आता दोनच वाजले आहेत. अजून सर्व जमायचे असतील. चहा पाण्यासाठी अजून तासभर अवकाश आहे. तू पटकन तोंड धुवून, केस विंचरून

a

आणि कपडे घालून तयार हो. मी खाण्याचे बास्केट भरते. आज बऱ्याच खाण्यासाठी गोष्टी आहेत. मी जेरीला तुला पिकनिक ग्राउंडवर घेऊन जायला सांगते.''

''ओहो! मारिला, ''ॲन तयारी करायला जाता जाता म्हणाली, ''पाच मिनिटांपुर्वी मी इतकी उदास होते की मला जन्माला आल्याचे दु:ख वाटत होते. पण आता मात्र कुणी मला देवदूत जरी बनवतो म्हटले तरी मी ग्रीन गेबल्स मधून जाण्याला तयार होणार नाही.''

त्या रात्री पूर्णपणे आनंदी, पूर्णपणे थकलेली ॲन ग्रीन गेबल्समध्ये परतली, तिला जणू नवसंजीवनी मिळाली होती.

''ओ हो! मारिला आम्ही पिकनिक मध्ये खूपच मजा केली. सर्व काही सुंदर होते. मस्त चहापाणी झाल्यावर मिस्टर हार्मन अँड्र्यूज आम्हा सर्वांना एका रांगेत लेक ऑफ शायनिंग वॉटर्सवर घेऊन गेले. एका वेळी सहाजणांना बोटींग साठी नेले जात होते. जेन अँड्र्यूज तर वा ॅटर लिलीज् काढण्यासाठी वाकली तेव्हा पाण्यात पडता पडता मिस्टर अँड्र्यूजनी तिला वाचवले. खरं तर ती मी असायला हवी होते, पाण्यात पडल्यावर गटांगळ्या खाताना कसे वाटत असेल याचा पण अनुभव घ्यायला मिळाला असता आणि सर्वांना सांगायला एक छान गोष्ट मिळाली असती. मग त्यानंतर आईस्क्रीम पार्टी झाली. आईस्क्रीम अफलातून होते. खरं तर मी त्यांचे वर्णन करू शकत नाही."

संध्याकाळी मारिलाने सहलीचा वृतांत मॅथ्यूना सांगितला आणि ब्रोचच्या संदर्भात ॲनीनेच हरवले असल्याचा संशय घेणे आणि तिच्या कबुलीनाम्यावर विश्र्वास ठेवणे दोन्ही चुकीचे होते हे मान्य केले. एक गोष्टी बद्दल मात्र दोघा बहिणभावाचे एकमत झाले ते म्हणजे: ज्या घरात ती असेल त्या घरात कधीच निरूत्साह कधीही फिरकणार नाही.

# प्रकरण 15

“किती सुंदर दिवस!” आनंदाने हरखून, एक दीर्घ श्वास घेत ॲनी म्हणाली.

“आणि आपले नशीब थोर म्हणून शाळेत जाण्यासाठी एवढी सुंदर वाट मिळाली आहे, नाही का?”

डायना बरोबर शाळेला जाताना ॲनी म्हणाली. मुख्य रस्ता बराच लांबचा तर होताच पण रहदारीचा आणि कंटाळवाणा होता, त्याच्या तुलनेत त्यांनी शोधलेली ही वाट जवळची होती, दुतर्फा मेपलच्या झाडांचा मंद सुवास दरवळत होता. बर्च, सेडार , अल्डार अशा वृक्षांची सावली उन्हापासून संरक्षण करत होती. वाटेत लागणाऱ्या विलोमेर यांच्या शेता पलिकडील व्हॅलीत मि. ॲंड्र्यू बेल यांचे व्हायोलेट फार्म होते. वसंत ऋतूत ती संपूर्ण व्हॅली लाखो फुलांनी फुलून येतं असे, त्यामुळे तिचे 'व्हायोलेट व्हॅली असे नामकरण ॲनीने करून टाकले. या वाटेवर झाडावरून गळून पडलेल्या फुलांच्या रंगीबेरंगी पाकळ्याची जणू रांगोळी काढल्याचे वाटत असे. पक्ष्यांची किलबिल, मधमाशांची गुणगुण, उडणारी फुलपाखरे तर कधी कधी वाटेत एखादा वाट चुकलेल्या ससा सहज दृष्टीस पडत

असे. सारे वातावरण कसे अगदी स्वप्न पाहात असल्यासारखे भासे. या रस्त्याचे नामकरण ॲनीने, 'स्वप्न वाट' असे केले हे वेगळे सांगायला नकोच. डायना मात्र व्यवहारी अंक गणितात गुंतली होती. आईने आज डब्यात तीन रास्पबेरी टार्ट दिले होते ते जेवणाच्या सुट्टीत दहा मुलींमध्ये कसे वाटायचे याच हिशोब ती मनातल्या मनात करत होती. आपल्या स्वतःच्या वाट्याला येणाऱ्या टार्टचा हिशोब समजल्यावर ती भलतीच हिरमुसली.

ॲव्हनलीच्या शाळेची इमारत पांढऱ्या रंगाने रंगवलेली होती. जमिनी लगत मोठ्या रूंद खिडक्या व त्यावर पावसाची झझड लागू नये म्हणून रुंद सज्जे चढवले होते. आतमध्ये जुन्या पद्धतीचे डेस्क होते. जवळच एक लहानसा झरा वाहत होता, या झऱ्यात शाळेतील मुले आपल्या दुधाच्या बाटल्या ठेवत, दुपारच्या जेवणाच्या सुट्टीपर्यंत त्या थंडगार राहत असत, झऱ्याच्या आजुबाजुला पुष्कळ झाडी होती.

एक सप्टेंबरला ॲनीला शाळेत पाठवताना मारिला चिंताग्रस्त झाली होती. तिच्या मते ॲनी ही एक विचित्र मुलगी होती. ती इतर मुलांबरोबर कशी वागेल? आणि शाळेच्या वेळेत ती तिची चुरूचुरू चालणारी जीभ कशी काय गप्प राहू शकेल याची तिला काळजी लागून राहिली होती.

तथापि मारिलाच्या भीतीपेक्षा प्रत्यक्षात चांगला गोष्टी घडल्या, त्या संध्याकाळी ॲनी मोठ्या उत्साहात घरी आली.

“मला इथली शाळा आवडली,” मोठ्या उत्साहाने जाहीर केले. “पण मला शिकवणारे शिक्षक फारसे आवडले नाहीत. सारखे मिशी कुरवाळत प्रिसी अँड्र्यूजकडे पाहत असतात. ती सोळा वर्षांची आहे. पुढच्या वर्षी शार्लोटटाऊन येथील क्वीन्स अकॅडमीमध्ये प्रवेश परीक्षेचा अभ्यास करत आहे. टिली बोल्टरच्या मते सर तिच्यावर लट्टू आहेत. प्रिसी अँड्र्यूज खूपच सुंदर आहे. गुलाबी रंग, तपकिरी केस सर्वांत उंच आहे म्हणून शेवटच्या बाकावर बसते. सर पण नेहमी तिच्या

शेजारच्च्या डेस्क बसून तिला अभ्यासातील शंका सोडवण्यासाठी मदत करतात. रुबी गिलीस सांगत होती की सरांनी एका चिठ्ठीवर काही तरी लिहून प्रिसीला दिलेले तिने पाहिले, जेव्हा प्रिसीने ते वाचले तेव्हा ती बीटरुट सारखी लाल झाली आणि हसली; पुढे रुबी गिलिस म्हणाली त्याचा खरोखरीच अभ्यासाशी काही संबंध नव्हता.”

“ॲनी शर्ली, मला पुन्हा तुझ्या तोंडून शिक्षिकांबद्दल असे बोलताना ऐकू आलेले अजिबात चालणार नाही,” मारिला तीव्रपणे म्हणाली. “तुम्ही मास्तरांवर टीका करायला शाळेत जात नाही आहात. माझ्यामते त्यांना तुम्हाला शिकवण्यासाठी शिक्षक म्हणून नेमले आहे आणि तुम्हाला शाळेत शिकण्यासाठी पाठवले जाते. पुन्हा अशा गोष्टी माझ्या कानावर येतात कामा नयेत. हे मी जरासुद्धा खपवून घेणार नाही. मला आशा आहे की तू एखाद्या चांगली मुलीसारखी शाळेत वागली असशील.”

“खरेच मी चांगल्या मुलीसारखी वागले,” ॲनी सहजपणे म्हणाली. “आणि तुम्हाला वाटते तसे तेव्हढे काही ते अवघड नव्हते. मी आणि डायना एकत्र बसलो. आमची जागा खिडकीजवळ आहे. तिथून चमचमत्या पाण्याचा तलाव दिसतो. शाळेतील मुली चांगल्या आहेत. दुपारच्या सुट्टीत डबा खाताना मजा आली. बऱ्याच मुली पाचव्या इयत्तेत आहेत. मला चौथीचा अभ्यासक्रम सांगितला आहे. मला हे आवडले नाही. त्यांच्यापैकी एकाकडेही माझ्यासारखी कल्पनाशक्ती नाही असे माझ्या लक्षात आले. आज इतिहास, भूगोलाच्या पुस्तकांचे वाचन आणि शुध्द लेखन करून घेतले. माझ्या स्पेलिंग मध्ये चुका होत्या मि. फिलीप्स सर सगळ्या वर्गाला माझी पाटी दाखवून म्हणाले स्पेलिंग चुकणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. मला खूप वाईट वाटले. मला वाटते माझ्यासारख्या नवख्या मुलींबरोबर त्यांनी सौम्यपणे वागायला हवे होते. सर्व मुली माझ्याशी मैत्री करायला उत्सुक होत्या. आम्ही सर्वांनी मिळून आपापले डबे वाटून खाल्ले. एक मुलगी माझ्याबद्दल दुसऱ्या एका मुलीशी

a

बोलताना मी ऐकले की माझे नाक खूप सुंदर आहे. मारिला, खरंच माझे नाक सुंदर नाक आहे का? मला माहीत आहे तू मला खरं काय ते सांगशील.''

''तुझे नाक बरे आहे,'' असे मारिलाने सांगितले. तिला मनापासून जाणवले की ॲनीचे नाक खरच खूप सुंदर आहे पण तिने तसे सांगायचे मात्र टाळले.

त्यानंतर तीन आठवडे सर्व सुरळीत चालले होते. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात शाळेला जाताना डायना म्हणाली, ''मला वाटते की गिल्बर्ट ब्लिथ आज शाळेत येणार आहे. तो खूप देखणा आहे पण आम्हा मुलींना सारखे सतावत असतो आणि चिडवत असतो.''

परंतु डायनाच्या तक्रारींचा स्वर त्यांच्याविषयी नावड नक्कीच दर्शवत नव्हता.

''गिल्बर्ट ब्लिथ?''ॲनी म्हणाली. ''त्याचे नाव पोर्चच्या भिंतीवर ज्युलिया बेलच्या बरोबर लिहिलेले आहे नाही का? सगळेजण त्याकडे पाहत होते.''

''पण त्याला ज्युलिया बेल फारशी आवडत नाही. तिच्या चेहऱ्यावर असलेल्या डागांवरुन तो तिला चिडवत असतो.'' डायना पटकन बोलून गेली.

तिच्या चेहऱ्यावरच्या डागांबद्दल मला वेगळं काही सांगायला नको. माझ्याकडे ते भरपूर आहेत. पण अशी भिंतीवर मुलामुलींची नावे लिहणे हा वेडेपणा आहे. मला माझे नाव असे लिहलेले अजिबात आवडणार नाही आणि तसे कोणी करणारही नाही.''

ॲनीने उसासा टाकला. तिला तिचं नाव लिहलेले आवडणार नव्हते. पण तसे कोणी लिहिणार नसेल तर ते थोडे अपमानास्पद वाटले असते.

''मूर्खपणा,'' डायना म्हणाली, तिच्यामध्ये शाळेतील मुले विशेष दिलचस्पी दाखवत. अनेक मुलांच्या नावासोबत तिचे नाव लिहून झाले होते.

a

“तुझे नाव लिहले जाणारच नाही असं समजू नकोस. चार्ली स्लोएन तुझ्यावर लक्ष ठेवून असतो बरं. त्यांने घरी आईला तुझ्याविषयी सांगितले की तू वर्गातील सर्वात हुशार मुलगी आहेस म्हणून. सुंदर असण्यापेक्षा हुशार असणे कधीही चांगले आहे.”

“नाही मला हुशार असण्यापेक्षा सुंदर असते जास्त आवडेल. चार्ली स्लोन मला अजिबात आवडत नाही. त्याचे डोळे बटबटीत आहेत. त्यांच्या बरोबर माझे नाव लिहले गेले तर मी ते सहन करू शकणार नाही. पण डायना वर्ग प्रमुख बनणे ही मात्र एक चांगली गोष्ट आहे.”

डायना म्हणाली, “आता तुमच्या वर्गात गिल्बर्ट आल्यावर तोच वर्ग प्रमुख असणार. जरी तो चौदा वर्षांचा असला तरी चौथीत आहे. चार वर्षांपूर्वी त्यांचे वडील आजारी असल्याने त्यांची फॅमिली अल्बर्टाला जाऊन तीन वर्षे राहिली होती. तेव्हा त्याची शाळा बुडली. पण यापुढे तुझे वर्ग प्रमुख राहणे कठीण दिसते.”

“मला आनंद झाला,” ॲनी पटकन म्हणाली. “मला लहान मुलांचा वर्ग प्रमुख म्हणवून घेणे फारसे अभिमानाचे वाटत नाही. काल तर स्पेलिंग टेस्टमध्ये, जोसी पुस्तकात बघून स्पेलिंग लिहीत होती. फिलिप्स सरांचे लक्ष प्रिसी अँड्र्यूजकडे होते. मी जोसीकडे पाहिले तेव्हा चपापली.”

“तिची बहिण, गेर्टी पण तशीच आहे. काल तिने झऱ्यात माझ्या जागेवर आपली दुधाची बाटली ठेवली होती. मी आता तिच्याशी बोलत नाही,” डायना म्हणाली.

“तो गिल्बर्ट ब्लिथ, तुझ्या अगदी जवळ बसला आहे, ॲनी. फक्त तू त्याच्याकडे बघ आणि मला सांग तो तुला देखणा वाटतो की नाही,” डायना ॲनीशी कुजबुजली.

a

ॲनीने त्यादिशेने पाहिले. गिल्बर्ट ब्लिथ त्याच्या समोर बसलेल्या रुबी गिलिसची लांब वेणी तिच्या सीटच्या मागील बाजूस हेअर पीनने अडकवण्यात गुंतला होता. ॲनी त्याच्याकडे पाहत होती पण त्याचे लक्ष तिच्याकडे गेले नाही. तो एक उंचापुरा मुलगा होता. पिंगट रंगाचे खोडकर डोळे, कुरळे तपकिरी रंगाचे केस आणि खोडसाळपणा करणारा हसरा चेहरा. रुबी, सरांना गणित दाखवण्यासाठी उठली तशी तिची वेणी ओढली गेली आणि केस मुळापासून दुखावल्याने मोठ्याने ओरडली. सर्वजण तिच्याकडे पाहत राहिले, फिलिप्स सर तर रागारागाने तिच्याकडे बघायला लागले, ती बिचारी रडू लागली. या गोंधळात गिल्बर्टने हेअर पिन नजरेआड केली आणि साळसूदपणे इतिहासाच्या पुस्तकात डोके खुपसले. जेव्हा गोंधळ कमी झाला तेव्हा त्यांचे लक्ष ॲनीकडे गेले आणि त्याने गंमतीने डोळे मिचकावले.

“मला वाटते तुझा गिल्बर्ट ब्लिथ देखणा आहे पण नको इतका धाडसी आहे, अनोळखी मुलीकडे पाहून डोळे मिचकावणे हा चांगला शिष्टाचार नाही,"

ॲनीने डायनाला उत्तर दिले.

दुपार पर्यंत फारसे काही विशेष घडले नाही.

फिलिप्स सर, प्रिसी अँड्र्यूजच्या बीजगणितातील शंका समाधान करत होते, बाकीच्या मुलांच्या टिवल्याबावल्या सुरू होत्या. कोणी ग्रीन ॲपल खात होते तर कोणी कुजबुज करत होते. काही मुलांनी नाकतोडा पकडून त्याच्या पायाला दोरा बांधून दोन डेस्क मधल्या मोकळया जागेत सोडून दिला होता. गिल्बर्ट ब्लिथचे, ॲनी शर्लीचे लक्ष त्याच्याकडे वेधून घेण्यासाठी प्रयत्न सुरू होते परंतु तो पूर्णपणे अयशस्वी झाला, कारण ॲनी त्या क्षणी पूर्णपणे स्वतःच्या स्वप्नातील दुनियेत बुडून गेली होती. तिचे डोळे पश्चिमेकडील खिडकीतून दिसणाऱ्या चमचमत्या तलावातील पाण्यावर खिळले होते. त्याशिवाय तिचे इतरत्र कुठेही लक्ष नव्हते.

a

गिल्बर्ट ब्लिथला त्याच्याकडे दुर्लक्ष करणारी मुलगी अजून भेटली नव्हती आणि या अपयशाला सामोरे जाताना स्वतःला कसे सावरायचे हे त्याला माहीत नव्हते.

कोण ही आज आलेली लाल केसांची, मोठ्या डोळ्यांची आणि नाजुक हनुवटीची नवखी मुलगी, माझ्याकडे ढुंकूनही पाहत नाही या रागाने तो ताडकन उठला आणि पलिकडच्या डेस्क जवळ गेला. ॲनीच्या लांब वेणीचा शेपटा पकडून त्याने तो वर उचलला कुत्सितपणे कुजबुजत म्हणाला,

“गाजर! गाजर!”

ॲनीने त्याच्याकडे सूडाच्या नजरेने पाहिले त्यानंतरची तिची कृती मात्र सर्वांना अवाक् करणारी ठरली. रागाच्या भरात ती उठून उभी राहिली, तिची रम्य स्वप्ने पूर्णतः उध्वस्त झाली होती. तिने संतापाने गिल्बर्ट वर नजर फेकली, तिच्या डोळ्यात पेटलेली आग, तितक्याच संतप्त अश्रूंनी त्वरेने विझली आणि जोरात ओरडली, “दुष्ट मुलगा! असे बोलायची तुझी हिम्मत कशी झाली!” आणि मग ‘खळळ-खट्याक’ असा आवाज झाला. ॲनीचा हात अभावितपणे उचलला गेला आणि तिच्या हातातील पाटी गिल्बर्टच्या डोक्यावर फुटली. फुटलेल्या पाटीतून त्यांचे डोके बाहेर आले होते.

ॲव्हनलीच्या शाळेतील अपूर्व असे दृश्य पाहून, मुलांना तर धक्काच बसला. डायनाचा श्र्वास रोखला गेला तर रुबी नुकताच तिच्या बाबत घडलेला प्रकार आठवून पुन्हा वेड्यासारखी रडू लागली. टॉमी स्लोएनने त्यांचे नाकतोडे घाईघाईने खिशात लपवून ठेवले आणि आश्र्चर्यने आ वासून पाहत राहीला.

मि. फिलिप्सनी येऊन ॲनीच्या खांद्यावर हात ठेवला आणि रागारागाने विचारले, “ॲन शर्ली, याचा अर्थ काय?”

a

ॲनीने उत्तर दिले नाही. तिला गिल्बर्टने तिला "गाजर" म्हटल हे तिने संपूर्ण शाळेसमोर सांगताना शरमेने अजून मेल्याहून मेल्यासारखे झाले असते.

"ही माझी चूक होती, मिस्टर फिलिप्स. मी तिला चिडवले." गिल्बर्टने कबुली दिली. पण मिस्टर फिलिप्सने गिल्बर्टकडे लक्ष दिले नाही.

"माझा विद्यार्थी असा उग्र संतापी आणि सूडबुद्धीने वागताना पाहून मला खूप वाईट वाटत आहे. ॲनी, जा आणि फळ्यासमोर उभी राहा." मि. फिलिप्सनी फर्मावले.

ॲनीने या शिक्षेऐवजी चाबूकाचे फटके सहन केले असते. खरोखरच ती चाबकाचे फटकारे खात आल्यासारखी थरथरत, भेलकांडत कशीबशी फळ्याकडे जाऊन उभी राहिली. मिस्टर फिलिप्सने खडूने फळ्यावर लिहिले, "ॲन शर्लीचा स्वभाव खूप वाईट आहे. ॲन शर्लीने तिच्या रागावर नियंत्रण ठेवायला शिकले पाहिजे," आणि सर्वांना ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात फळ्यावरचे वाचून दाखवले.

ॲनी पुन्हा फळ्याकडे पाहणार नव्हती. पण रडली नाही किंवा तिने मान खाली नाही. घोर अपमानाच्या वेदनांमध्येही तिच्या रागाला अजून उकळ्या फुटत होत्या. डायनाची सहानुभूती पूर्वक नजर, जोसीचे कुत्सित हास्य, चार्ली स्लोएनचा अपेक्षाभंग झालेला चेहरा या साऱ्याला एका शूर योद्धा असल्याप्रमाणे आवेशात ती तोंड देत उभी होती पण गिल्बर्ट ब्लिथकडे ती नुसते बघणार सुध्दा नव्हती. पुन्हा कधीही बघणार नव्हती! ती त्याच्याशी कधीच बोलणार नव्हती!!

जेव्हा शाळा सुटली तेव्हा ती ताठ मानेने बाहेर पडली. गिल्बर्ट ब्लिथने तिला दारात अडवण्याचा प्रयत्न केला.

"ॲनी, मी तुला तुझी तुझ्या केसांवरून चेष्टा केली, माझी चूक झाली मी कबुल करतो मला माफ कर. विषय जास्त वाढवू नकोस, मी खरंच चुकलो."

a

ॲनीने तिरस्काराने तोंड फिरवले आणि ऐकून न ऐकल्या सारखे करून पुढे निघाली. "ॲनी तू असे कसे करू शकतेस?" थोडे पुढे गेल्यावर डायनाने ॲनीला विचारले. एकाच वेळी तिला ॲनीचा थोडा राग आला होता आणि थोडे कौतुकही वाटते होते. डायनाला वाटले आपल्याला गिल्बर्टने कळकळीची विनंती केली असती तर अमान्य करणे अवघड झाले असते.

"मी गिल्बर्ट ब्लिथला कधीही माफ करणार नाही," ॲनी ठामपणे म्हणाली. "आणि मि. फिलिप्सने माझ्या नावाचे स्पेलिंग e शिवाय लिहिले. डायना, माझ्या सहनशक्तीचा अंत झाला आहे."

डायना तरीही समजूतीच्या स्वरात म्हणाली, "अग तो प्रत्येक मुलीची चेष्टा करतो. मला तर कितीतरी वेळा माझ्या काळ्या केसांवरून काळा कावळा म्हणून चिडवत असतो."

"कावळा म्हणणे आणि गाजर म्हणणे यात खूप फरक आहे," ॲनी गंभीरपणे म्हणाली. "गिल्बर्ट ब्लीथने माझ्या भावना दुखावल्या आहेत, डायना."

हे प्रकरण या गोष्टीवर थांबले असते तर फारसा बिघडले नसते पण काही वेळा एकदा गोष्टी बिघडत चालल्या की त्या जास्तच बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ॲनीच्या शाळेच्या बाबतीत पण असेच काहीसे घडायचे होते.

मधल्या सुट्टीत शाळेतील मुले डबा खाऊन झाल्यावर जवळच्या मिस्टर बेलच्या टेकडीवर स्प्रुसच्या बनात झाडावरचा डिंक गोळा करत आणि च्युइंगम सारखा चघळत असत. अनेकदा मधली सुट्टी संपत आली तरी मुले तिथेच रेंगाळत असत. तिथून फिलीप्स सर घरातून शाळेकडे परताना दिसले की पळत पळत शाळा गाठताना सर्वांची थोडी तारांबळ उडत असे. बऱ्याचदा दोन तीन मिनिटांचा उशीर पण होत असे.

a

गिल्बर्टने ॲनीची खोडी काढल्यानंतर दुसरे दिवशी फिलीप्स सरांना मुलांना कडक शिस्त लावावी अशी हुक्की आली. मधल्या सुट्टी पूर्वी त्यांनी संपूर्ण वर्गाला तंबी दिली की मधली सुट्टी संपण्यापूर्वी वर्गात हजर राहणे अनिवार्य असेल आणि जे वेळेवर उपस्थित नसतील त्यांनी शिक्षेसाठी तयार राहावे.

यावेळी मुलांनी सावध पवित्रा घ्यायचे ठरवून फार दूर न जाण्याचे धोरण आखले पण अधिकाधिक डिंक गोळा करण्याच्या नादात ते धोरण फसले आणि मुले लांबवर पांगली. घरातून फिलीप्स सर बाहेर पडताना दिसल्या दिसल्या जास्त लांब न गेलेल्या मुली प्रथम शाळेकडे धावल्या. मुले मात्र दूर झाडावर चढून डिंक गोळा करत होती त्यांची थोडी धांदल उडाली. या डिंक गोळा करणाऱ्या मुलामुलीमध्ये ॲनी सामिल नव्हती, ती आपली आपल्याच नादात निसर्ग शोभा निरखत आनंदाने फिरत होती, पाने फुले तोडून तिने माळा गुंफून वनदेवीसारख्या केसात माळल्या होत्या. आज तिला एक मोठे झाड नव्याने सापडले होते, त्यांच्या सावलीत ती गाणे गुणगुणत एकटीच खेळात रमली होती. जेव्हा तिला मधली सुट्टी संपत आल्याची जाणीव झाली तेव्हा हत्तीच्या वेगाने तीने शाळा गाठण्यासाठी बऱ्याच मुलांना मागे टाकत वर्गात प्रवेश केला. फिलिप्स सर नुकतेच आत येऊन टोपी काढत होते. तिच्या नंतर उरलेली दहा बारा मुले वर्गात येती झाली.

फिलिप्स सरांची सर्व मुलांना शिस्त लावायची योजना बारगळली. जवळजवळ निम्म्या वर्गाला शिक्षा

करण्याचा त्रास घेण्यापेक्षा काहीतरी केले असे दाखवण्यासाठी त्यांनी उशीर झालेल्या मुलांकडे एकवार नजर टाकली आणि बळीचा बकरा आपसूक हेरला. जोरात पळत आल्यामुळे ॲन धापा टाकत होती, लिलीच्या फुलांची माळलेली माळ विस्कटलेली होती.

“ॲन शर्ली, तुला मुलांबरोबर खेळायला मधल्या सुट्टी कमी पडली असेल म्हणून आज तुला जास्त वेळ देता येईल. तुझ्या केसातील फुले काढ आणि तू आणि गिल्बर्ट ब्लिथ एका डेस्कवर बसा.” अत्यंत उपहासाने त्यांनी ॲनीला फर्मावले.

सर्व मुले कुचेष्टने हासू लागली. डायनाने ॲनीच्या केसातून फुलांची माळ हलकेच काढली आणि दिलासा देण्यासाठी हात हळूच दाबला. ॲनी दगडासारखी स्तब्ध होऊन सरांच्या तोंडाकडे पाहत राहिली.

“मी काय बोललो ते तू ऐकलेस, ॲन?” मिस्टर फिलिप्सला कठोरपणे विचारले.

“हो, सर,”ॲनी हळूच म्हणाली, “पण मला असे वाटले नाही की तुम्हाला ते खरोखरच म्हणायचे आहे.”

“मी खात्रीने सांगतो की मला तेच म्हणायचे आहे,” उपरोधिक स्वरात सर म्हणाले. “तुला जे सांगितले आहे त्याचे पालन त्वरित कर.”

क्षणभर ॲनी थांबली, सर्वांना असे वाटले की ती सरांची आज्ञा पाळणार नसावी. तिच्या पाठीशी कोणी नाही याची जाणीव झाल्यावर मुकाट्याने उठली आणि ताठ मानेने गिल्बर्ट ब्लिथच्या शेजारी बसली.

दोन्ही हातानी चेहरा झाकून घेतला होता.

जोसी पाय, जिला कालच्या स्पेलिंग पुस्तकात पाहून लिहिताना ॲनीने पाहिले होते ती मैत्रिणींना ॲनी बद्दल सांगताना ॲनीच्या कानावर पडले, “एकदम पांढराफटक रंग आहे आणि त्यावर असंख्य लालसर डाग आहेत.”

हा म्हणजे ॲनीसाठी अगदी कहर झाला.

डझनभर उशीरा आलेल्या मुलांमधून फक्त तिला एकटीला शिक्षा देणे; शिक्षेचे स्वरूप म्हणजे काल ज्या गिल्बर्ट ब्लिथने तिची कळ काढून तिला अत्यंत वाईट रित्या प्रतिक्रिया देण्यासाठी भाग पाडले, त्याच्याच शेजारी जाऊन बसण्याची

शिक्षा करणे; जोसी पाय सारख्या मुलीचे खवचट बोलणे आणि सर्व वर्गातील मुलांना तिचा अपमान होताना गंमत पाहणे, ॲनीला सर्व असहाय्य झाले. आता प्रयत्न करून काही उपयोग होणार नाही, अशी तिची भावना झाली. तिचे संपूर्ण अस्तित्व लाजेने, रागाने आणि अपमानाने खचून गेले.

सर्वजण हे पाहत होते. थोडी कुजबुज, थोडी टिंगल, एकमेकांना कोपरखळी मारून फिदीफिदी हसणे सुरू होती पण ॲनीने कधीही डोके वर काढले नाही. गिल्बर्ट खाली मान घालून अपूर्णांकाची उदाहरणे खाली मान घालून सोडवत बसला होता. फिलिप्स सर प्रिसिला उद्देशून करत असलेल्या कवितेचे यमक जुळल्याची खटपट करत होते. गिल्बर्टने हळूच एक कॅन्डी, ॲनीकडे सरकवली. कॅंडी गुंडाळलेल्या कागदावर, "तू गोड आहेस,'' असे सोनेरी रंगाने लिहलेले होते.

ॲनीने ती कॅन्डी अलगद उचलून हळूवारपणे खाली पायात टाकली आणि बुटांच्या टाचेखाली चुरडून त्याची पूड केली आणि गिल्बर्टकडे पुर्ण दुर्लक्ष करून परत हाताने चेहरा झाकून घेतला.

जेव्हा शाळा सुटली तेव्हा ॲनी तिच्या डेस्ककडे गेली, तिथले सर्व काही, पुस्तके आणि लेखन वह्या, पेन आणि शाई, प्रार्थनेचे पुस्तक सर्व गोष्टी बाहेर काढल्या आणि तिच्या फुटलेल्या पाटीवर व्यवस्थित ठेवल्या.

“ॲनी, तू त्या सर्व गोष्टी घरी कशासाठी घेऊन जात आहेस?'' शाळेतून बाहेर आल्यावर डायनाने विचारले. त्या आधी तिची ॲनी बरोबर बोलण्याची हिंमत झाली नव्हती.

“मी यापुढे शाळेत परत येणार नाही,'' ॲनी म्हणाली.

डायनाने ॲनीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत विचारले, “मारिला तुला घरी राहू देईल का?"

“तिला ते करावे लागेल,” ॲनी म्हणाली. “मी पुन्हा त्या माणसाच्या शाळेत जाणार नाही.”

“ओ,ॲनी!” डियना रडकुंडीला आली, “असं ग काय करतेस? मला सर त्या घाणेरड्या गर्टी पायसोबत बसायला लावतील. ती एकटीच बसते. तू असे करू नको. शाळा सोडून जाऊ नकोस.”

“डायना, मी तुझ्यासाठी जगात काहीही करेन,” ॲनी खिन्नपणे म्हणाली. “मी तुझ्यासाठी स्वत:चा जीव देखील पणाला लावेन पण मी हे करू शकत नाही, म्हणून कृपया मला गळ घालू नको त्यामुळे माझे अंत:करण दुखावत आहे.”

डायना दु:खी स्वरात ॲनीला समजावत राहिली, “अग तुला शाळेतील गमतीजमती गमवाव्या लागतील. आपण ओढ्याजवळ घर बांधायचे ठरवले आहे; बाॅलने खेळायचे आहे; नवीन गाण्याची तालीम जेन अँड्र्यूज घेत आहे ते अजून पुर्ण व्हायचे आहे; ॲलिस अँड्र्यूज पुढच्या आठवड्यात एक नवीन पुस्तक आणणार आहे त्यांचे समुह वाचन, नदीकाठी करायचे ठरवले आहे, तुला तर या सर्व गोष्टी मनापासून आवडतात. तेव्हा हा वेडेपणा सोड आणि विषय जास्त वाढवू नकोस.”

ॲनीवर कशाचाही परिणाम झाला नाही. घरी गेल्या गेल्या तिने मारिला समोर आपला फिलीप्स सरांच्या शाळेत न जाण्याचा तिचा निर्धार व्यक्त केला.

“हा काय मूर्खपणा आहे?” मारिला चिडून म्हणाली.

“हा मूर्खपणा नाही, मारिला माझा अपमान झाला आहे, हे तुमच्या लक्षात कसे येत नाही?” ॲनीने गंभीर स्वरात मारिलाला विचारले.

“तुझा अपमान झाला असे तुला वाटत असले तरीसुद्धा तुला उद्या सकाळी शाळेत जावेच लागेल.”

ॲनीने नकारार्थी मान हलवली आणि म्हणाली, "मी परत शाळेत जाणार नाही. मी घरीच अभ्यास करेन. मी माझी बडबड बंद करेन, तुम्ही मला तसे सांगाल त्याप्रमाणे वागेन पण मी शाळेत जाणार नाही."

ॲनीचा पक्का निश्चय तिच्या देहबोलीतून व्यक्त होत होता. तिला आता विरोध केल्यास प्रकरण अजून अवघड होईल याची मारिलाला कल्पना आली. तुर्तास काही न बोलणे शहाणपणाचे ठरेल म्हणून तिने गप्प बसायचे ठरवले. संध्याकाळी जाऊन मिसेस रेचेल लिंडशी याबाबत सल्ला घेण्याचे मनाशी पक्के केले. एव्हाना रेचेल पर्यंत ही बातमी पोहोचली असल्याची तिला खात्री होती. त्याप्रमाणे संध्याकाळी मारिला, रेचेलकडे पोहोचली. मारिला, ॲनीच्या शाळेतील घटनेबाबतीत आपल्याकडे सल्ला मागायला आल्यामुळे मिसेस रेचेल मनातल्या मनात सुखावल्या आणि प्रेमळपणे मारिलाला म्हणाल्या, "मला तुझ्या ॲनीची गंमत वाटते पण माझी खात्री आहे की यामध्ये चूक मिस्टर फिलिप्स यांचीच आहे. अर्थात काल तिच्या वागण्यासाठी शिक्षा केली हे ठिक होते पण आजची गोष्ट वेगळी होती. उशिरा आलेल्या इतरांनाही तशीच शिक्षा व्हायला हवी होती आणि शिक्षा म्हणून मुलींना मुलांसोबत बसवणे योग्य नाही. जोसीने तिची नालस्ती करून आगीत तेल ओतण्याचे काम केले आणि इतर मुले स्वतः चूक करून वर ॲनीची टिंगल टवाळी करत होती. ॲनीला इतक्या लौकर शाळेत लोकप्रिय होईल असे मला कधीच वाटले नव्हते."

"म्हणजे मी तिला घरी राहू द्यावे असे तर तुम्ही सुचवत नाही ना?" मारिलाने विचारले.

"होय, मी तर असे म्हणेन की ती स्वतःहून जोपर्यंत शाळेत जाण्याचे नाव काढत नाही, तोपर्यंत तू शांत बस. आठवडाभरात आपल्या आपण शांत होईल आणि स्वतःहून शाळेला जायला तयार होईल. मात्र तिला आता लगेच शाळेला

जायला भाग पाडले तर ती आक्रमकपणे जास्त विरोध करेल आणि मग निस्तरणे अवघड होईल. मिस्टर फिलिप्स हे शिक्षक म्हणून अजिबात चांगले नाहीत. ते लहान वर्गातील मुलांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करून, क्वीन्स अकॅडमीच्या पात्रता प्रवेशाची तयारी करणाऱ्या मोठ्या वर्गातील मुलांना मार्गदर्शन करण्यावर सर्व लक्ष देतात अशी एक वदंता आहे. त्यांचे काका जर शाळेचे विश्र्वस्त नसते तर त्यांना आणखी एखादं वर्ष शिक्षक म्हणून कामावर ठेवणे अशक्य झाले असते. अशाने लहान मुलांच्या शिक्षणाचे काय होणार हे देवच जाणे!"

मिसेस लिंडनी खंत व्यक्त केली.

मारिलाने मिसेस रेचेल यांचा सल्ला मानला आणि ॲनीला शाळेत जाण्यासाठी एक चकार शब्दही तोंडातून काढला नाही.

ॲनी घरी व्यवस्थित अभ्यास करत होती. नेमून दिलेली कामे करत होती आणि डायना बरोबर खेळतही होती. जेव्हा केव्हा गिल्बर्टची रस्त्यात अथवा रविवारच्या शाळेत भेट होई तेव्हा, त्यांचे समेट साधण्याचे प्रयत्न, तिरस्काराने उडवून लावत असे. डायनाच्या मध्यस्थीचा काही उपयोग झाला नाही. ॲनीने जीवनाच्या शेवटपर्यंत गिल्बर्ट ब्लिथचा तिरस्कार करण्याचे ठरवले होते. जितक्या तीव्रपणे ती गिल्बर्टचा तिरस्कार करत होती तितक्याचे तीव्रतेने ती डायना वर उत्कट प्रेम वर करत होती.

एक दिवस संध्याकाळी, मारिला बागेतील सफरचंदांची टोपली घरात आली तेव्हा तिला ॲनी पूर्वेकडील खिडकीजवळ एकटीच रडत बसलेली दिसली.

“आता आणखी काय झाले ॲनी?” मारिलाने विचारले.

“डायना साठी मला रडू येत आहे,” मुसमुसत ॲनी म्हणाली. “मला डायना खूपच आवडते, तिच्याशिवाय मला जगण्याची कल्पनाही करता येत नाही. मला माहित आहे मोठी झाल्यावर डायना लग्न करून आपल्या नवऱ्याच्या घरी जाईल,

तेव्हा मी तिच्याशिवाय कशी काय राहू शकेन? मला तिच्या होणाऱ्या नवऱ्याचा प्रचंड राग येत आहे. मी तिला नववधूच्या वेषात पाहत आहे--शुभ्र पांढऱ्या ड्रेस मध्ये नटलेली, सजलेली डायना मला दिसत आहे, मीही फुग्याच्या बाह्या असलेला पोशाख करवली म्हणून घातला आहे, पांढऱ्या घोड्यांच्या राजेशाही बग्गीतून नवऱ्याबरोबर डायना दूरच्या गावी जात आहे. मी तोंडावर उसने हासू आणले आहे पण माझे काळीज तीळ तीळ तुटत आहे. आणि डायनाला गुड बाय म्हणाताना----" इथे ॲनीचा संयम सुटला आणि हमसाहमशी रडू लागली.

मारिलाची हसून हसून मुरकुंडी वळली ते ऐकून शेजारच्या खोलीतून मॅथ्यू काय झाले हे पाहण्यासाठी आत आले. या पूर्वी मारिलाला असे हासताना आपण कधी पाहिले होते? असा प्रश्न त्यांना पडला होता.

हसण्याची उबळ थोडी कमी झाल्यावर मारिला ॲनीला म्हणाली, "ठिक आहे ॲन शर्ली, तुला कारण नसताना त्रास ओढवून घ्यायचाच असेल तर यापुढे लहानसहान समस्या, की ज्यांचे निराकरण झाल्यास घराच्या दृष्टीने फायदेशीर ठरेल त्यासाठी प्रयत्न कर. माझ्यामते तेव्हढी कल्पनाशक्तीच्या तुझ्याकडे नक्कीच आहे."

# प्रकरण 16

ऑक्टोबर महिना सुरू झाला होता. बर्चची झाडे सोनसळी रंगाने माखून गेली होती. मेपलची पानांवर किरमिजी रंग चढला होता. चेरी, गडद लाल आणि काळपट हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटा मिरवत होती. ॲनी निसर्गाच्या विलोभनीय दर्शनाने हरखून गेली होती. शनिवारच्या सुंदर सकाळी ॲनी बागेतील झाडांच्या छोट्या डहाळ्या घरात शोभेसाठी ठेवायला घेऊन आली. अर्थातच मारिलाने तिला त्याबद्दल हाटकले. तिच्या पाना फुलांच्या हौसेखातर सर्व खोलीतील शिस्त विस्कटली जाते असे तिचे म्हणणे होते, शिवाय वाटेवर पायऱ्यांवर पडणारा कचरा ॲनीच्या ध्यानामनात पण येत नसे. त्यादिवशी दुपारी मारिलाला महिला मंडळाच्या मिटिंगला जायचे होते म्हणून ॲनीला बजावून सांगितले की तिला यायला उशीर होईल तेव्हा तिने, मॅथ्यू आणि जेरीचे रात्रीचे जेवण उरकून घ्यावे आणि संध्याकाळचा चहा वेळेवर बनवायला घ्यावा मागल्या वेळेसारखे चहासाठी टेबलावर बसेपर्यंत चहा करण्याचे विसरून जाऊ नये.

ॲनीने ओशाळून कबुली दिली की त्यावेळी वेगळ्याच विचारात गढून गेली होती. त्यावेळी व्हायलेट व्हॅलीचे नाव नक्की ठरवायचे होते शिवाय मॅथ्यूना जी

a

परिकथा ऐकायची होती तिचा शेवट विसरला होता तो स्वतःच्या कल्पनेने पूर्ण करायचा होता त्यामुळे चहा करायला ठेवायचे विसरून गेले. पण आज असे होणार नाही असे आश्वासन तिने मारिलाला देऊन टाकले. त्यावर मारिला म्हणाली की मॅथ्यूची काय, मध्यरात्री सुध्दा जेवणाची तयारी असेल पण तू थोडे वेळेचे भान ठेव आणि हवेतर डायनाला चहासाठी बोलवू शकतेस; तुला सोबत पण होईल आणि खेळायला पण मिळेल.

ॲनीने भलतीच खुश झाली. तिने गुलाबी कळ्यांचे डिझाईन असलेला उंची टी-सेट काढण्यासाठी परवानगी मागितली. अगदी खास पाहुण्यांसाठी राखून ठेवण्यात आलेला टी-सेट काढण्यासाठी अर्थात मारिलाने नकार दिला आणि जुनाच टी-सेट वापरायला सांगितला. पिवळ्या बरणीतील चेरीचा मुरांबा, फ्रुट केक, कुकीज चहाबरोबर खाण्याची आणि घरातल्या घरात पत्ते पण खेळण्याची सूचना केली.

ॲनीने डायना बरोबर दिवाणखान्यात बसायचे की बैठकीच्या खोलीत याविषयी मारिलाला विचारले. तेव्हा मारिलाने सांगितले, “तुम्ही बैठकीच्या खोलीत बसा तिथे रास्पबेरीच्या सरबताची अर्धी बाटली शिल्लक आहे त्यातील सरबत घेतले तरी चालेल. मॅथ्यू बटाटे आणायला जाणार असल्याने त्याला चहाला यायला उशीर होईल.”

ॲनी लगेच तयार होऊन डायनाला चहा पार्टी साठी आमंत्रण करायला गेली. मारिला मिटिंगसाठी बाहेर पडल्यावर थोड्याच वेळात डायना ग्रीन गेबल्समध्ये आली. नेहमीच्या सवयीप्रमाणे ती दार न वाजवता किचनमध्ये पळाली नाही. आज ती ग्रीन गेबल्सची सन्माननीय पाहुणी होती. ॲनीने गंभीरपणे दार उघडले. जणु काही प्रथमच भेटत असल्याप्रमाणे दोघींनी हस्तांदोलन केले. ॲनीच्या खोलीत टोपी वगैरे काढून ठेऊन डायना बैठकीच्या खोलीत थोडीशी अवघडून बसली.

a

पाच एक मिनिटांनी ॲनीने डायना कडे तिच्या आईची खुशाली विचारली. सकाळी त्यांना सफरचंदाच्या बागेत तिने फळे काढतांना पाहिले होते पण शिष्टाचाराला धरून असे विचारणे अपेक्षित होते. डायनाने आई खुशाल असून चौकशी बद्दल धन्यवाद व्यक्त केले आणि मि मॅथ्यू, बटाटे आणायला गेल्याच्या संदर्भात चौकशी केली.

दोघींनी एकमेकांना त्यांच्या मळयातील भाजीपाला, शेतातील पिके आणि बागेतील फळांची चौकशी करून माहिती दिली. सफरचंदाचे नाव निघताच ॲनी प्रौढपणाचे सोंग विसरून पटकन उडी मारून उठली आणि डायनाला घेऊन फळबागेतील फळे काढावयास निघाली. ॲनी, मारिलाच्या औदार्याला वाखाणत तिने चहा सोबत द्यायच्या पदार्थांची माहिती देत होती तसेच तिने रास्पबेरीचे सरबत ओळखण्यासाठी स्पेलिंगचे कोडे पण डायनाला घातले. फळबागेतील झाडांची फळे अगदी हाताला येण्या एव्हढी जवळ होती दुपारपर्यंत दोघी बागेत खेळत, फुले तोडत, फळे खात खात गप्पा गोष्टी करत होत्या. डायना, ॲनीला शाळेतील गंमती जमती, रुसवे फुगवे, भांडणे या साऱ्यांची साद्यंत वृत्तांत कथन करत होती. सर्व मुले मुलीना ॲनीची गैरहजेरी विशेष करून जाणवत आहे हे सांगायला ती मुळीच विसरली नाही. शेवटी गिल्बर्ट ब्लिथचे नाव निघताच ॲनी पटकन उठली आणि डायनाला रास्पबेरीचे सरबत घेण्यासाठी घरात आग्रहाने बैठकीच्या खोलीत येण्याचे सूचवून आपण घाईघाईने पुढे निघाली.

ॲनीने पॅन्ट्रीच्या दुसऱ्या शेल्फवर पाहिले पण तेथे रास्पबेरी सरबताची बाटली नव्हती मग वरच्या शेल्फवर तिला मिळालेली बाटली तिने ट्रेवर ठेवली आणि ट्रे आणि ग्लास टेबलावर ठेवला आणि डायनाला नम्रपणे म्हणाली, “मला सफरचंद खाल्यावर सरबत पिण्याची अजिबात इच्छा नाही, तू तुला हवे असेल तेव्हढे ओतून घेशील काय?”

डायनाने ग्लासात सरबत ओतून घेतले आणि चवीचवीने प्यायला सुरुवात केली. ती ॲनीला म्हणाली, “खूप छान रास्पबेरी सरबत आहे. रास्पबेरी सरबत इतके छान असते याची मला कल्पना नव्हती.”

“तुला इतके आवडले यांचा मला आनंद झाला मी पटकन जाऊन शेकोटी मधील विस्तव जरा हलवून येते, तू तुला हवे तेव्हढे ओतून घे,” असे म्हणून ॲनी किचनमध्ये गेली.

ॲनी परत आली तेव्हा तिचा दुसरा ग्लास संपला होता, तिसऱ्या साठी ॲनीने विशेष आक्षेप घेतला नाही. डायना म्हणाली, “मी आतापर्यंत प्यालेले सर्वात छान सरबत आहे, मिसेस लिंड खूप बढाई मारतात पण हे सरबत तिच्या सरबता पेक्षा खूप छान आहे आणि चव वेगळी आहे.”

ॲनीने परत एकदा मारिलाच्या सुगरणपणाची वाखाणणी केली शिवाय मारिलाने आपल्याला स्वयंपाक शिकवण्याचा खटाटोप केला पण फारसे काही साध्य न झाल्याची कबुली दिली. पाकशास्त्रात कल्पनाशक्तीला फारसा वाव नसतो तिथे फक्त नियमानुसार काम करावे लागते याची तिला खंत वाटत होती. तिच्या विसरभोळेपणाने आणि धांदल गडबडीने मारिलाचा ओरडा खावा लागल्याची घटना पण तिने डायनाला सांगितली.

तेव्हढ्यात डायना अडखळत उभी राहिली आणि डोक्याला हात धरून मटकन खाली बसली.

“डायना! डायना काय झाले?” ॲनीने काळजीने विचारले.

“मी—मी भयंकर आजारी आहे,” ती जरा जड आवाजात म्हणाली. “मी-मला- लगेच घरी जावे लागेल.”

“अगं पण तू चहा घेतल्याशिवाय कशी जाऊ शकतेस? मी पटकन चहाचे बघते,” ॲनी काकुळतीला येऊन म्हणाली.

“तुला नेमके काय होत आहे? थोडा वेळ पडून विश्रांती घे. मी फ्रुट केक आणि चेरीचा मुरांबा आणते, चहाला बोलवल्यावर चहा न घेता जाणे योग्य नाही” ॲनीचे समजावणे चालूच होते.

“मला चक्कर येत आहे.” डायना म्हणाली आणि कशीबशी भेलकांडत घराकडे जाण्यासाठी निघाली. ॲनीच्या डोळयात निराशेने अश्रू उभे राहिले. बॅरींच्या घरापर्यंत डायनाला सोबत करून ॲनी ग्रीन गेबल्समध्ये परत येऊन रडू लागली. सरबताची बाटली परत पॅन्ट्रीमध्ये ठेवून मॅथ्यू आणि जेरीसाठी चहा तयार केला, तिचा सर्व उत्साह निघून गेला होता.

दुसरा दिवस रविवारचा होता. सर्व दिवसभर पाऊस पडत होता. सोमवारी दुपारी मारिलाने तिला मिसेस लिंड यांच्याकडे एका कामासाठी पाठवले. थोड्याच वेळात ॲनी पळत पळत परत आली, तिच्या गालावरून अश्रू ओघळत होते. सोफ्यावर बसली आणि आपला चेहरा खाली टेकवला.

“आता आणि काय झाले ॲनी? परत काही मिसेस लिंड यांच्याबरोबर काही आगळीक तर केली नाहीस ना?” मारिलाने शंका व्यक्त केली. ॲनी काहीच बोलली नाही.

“ॲन शर्ली, जेव्हा मी तुला प्रश्न विचारते तेव्हा मला उत्तर हवे असते. या क्षणी लगेच उठून बस आणि मला सांग की तू कशासाठी रडत आहेस.”

“ॲनी उठून बसली आणि सांगू लागली, "आज मिसेस लिंड, मिसेस बॅरी यांना भेटायला गेल्या होत्या. मिसेस बॅरीची अवस्था अत्यंत वाईट होती. त्यांनी मिसेस लिंडना असे सांगितले की मी डायनाला बेहोश होईपर्यंत मद्य पाजले आणि अत्यंत लाजिरवाण्या अवस्थेत घरी पाठवले. त्या म्हणाल्या मी अत्यंत वाईट मुलगी आहे आणि त्या परत कधीही डायनाला माझ्या बरोबर खेळायला पाठवणार नाहीत.

मारिला, मी नुकतीच एका दु:खातून बाहेर पडत असताना माझ्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.”

मारिला आश्चर्यचकित नजरेने पाहत होती.

“डायनाला मद्य पाजले! ॲनी, एक तर तू वेडी असशील किंवा मिसेस बॅरींना वेड लागले असेल. तू तिला नेमके काय प्यायला दिलेस?”

“दुसरे तिसरे काही नाही, रास्पबेरीचे सरबत दिले. मला नाही वाटत त्याने नशा चढत असेल अगदी तीन मोठे ग्लास प्यायले तरी नाही जसे डायनाने प्यायलं होते. हे म्हणजे मिसेस थॉमसच्या नवऱ्यासारख झाले; पण मी तिला मुद्दाम नशा करायला भाग पाडले नव्हते.”

“नशा करायला भाग पाडले! सगळा मुर्खपणा आहे,” असे म्हणत मारिला बैठकीच्या खोलीतील पॅन्ट्रीकडे गेली. शेल्फवर जी बाटली होती, ती तीन वर्षे जुनी घरगुती मनुकाची वाइन, कडक म्हणून ॲव्हनली मध्ये प्रसिद्ध होती.

त्याच वेळी मारिलाला आठवले की तिने रास्पबेरी सरबताची बाटली पॅन्ट्रीमध्ये ठेवली असल्याचे ॲनीला सांगितले होते पण प्रत्यक्षात ती तिथे न ठेवता तळघरात ठेवली होती.

मारिला ती बाटली घेऊन ॲनी जवळ गेली तिचे तोंड उतरलेले होते. “हे रास्पबेरीचे सरबत नसून ही मनुकाची वाईन आहे. माझी सांगण्यात चूक झाली. तुला पण फरक समजला नाही काय?” मारिलाने विचारले.

“मी कधी चव पाहिली नाही. मला ते सरबत वाटले, तिला हवे होते तेव्हढे तिने स्वतः ओतून घेतले आणि मी तिला घेऊ दिले. तिला एकदम आजारी झाल्यासारखे वाटू लागले आणि मग मी तिला घरापर्यंत सोडून आले. मिसेस बॅरीने मिसेस लिंडला सांगितले की ती मद्यधुंद अवस्थेत होती. तिला काय होतं आहे असे विचारल्यावर ती वेड्यासारखी हसत सुटली आणि मग जी झोपली ते उठवायला

a

दुसऱ्या दिवशीची संध्याकाळ होत आली. तिच्या आईला दारूचा वास आला. कालचा दिवसभर तिचे डोके दुखत होते. मिसेस बॅरी खूप रागावल्या. त्या आता माझ्यावर कधीच विश्वास ठेवणार नाहीत, मी हे जाणूनबुजून केले असे त्यांना वाटते."

"त्याऐवजी त्यांनी डायनाला तीन तीन ग्लास सरबत प्यायल्या बद्दल चांगली शिक्षा करायला हवी. जरी ते साधे रास्पबेरीचे सरबत असते तरी एव्हढे प्यायल्यावर त्रास झाला असता. लोकाना आता बोलायला एक चांगला विषय मिळेल. मला मनुकांपासून वाईन बनवल्या बद्दल बऱ्याच जणांनी नांवे ठेवली होती त्यात मिसेस बेरी पण होत्या. तेव्हा पाद्री महाशयांना पसंत पडली नव्हती म्हणून मी गेल्या तीन वर्षांत परत बनवायला गेले नव्हते."

"मला आता रडायला येत आहे. माझे नशीब माझ्यावर उलटले आहे. आता डायना आणि माझी मैत्री कायमची तुटली. आम्ही मैत्रीची आण घेतली तेव्हा क्षणभर अशी माझ्या मनात शंका डोकावली होती." असे म्हणून ॲनी परत रडू लागली.

"असे वेड्यासारखे काही करू नको. जेव्हा मिसेस बॅरीला खरी गोष्ट समजेल तेव्हा तिला तुझा यात काही दोष नाही याची खात्री पटेल. तिला आता तू जाणूनबुजून केले असे वाटतं आहे. संध्याकाळी तू स्वतः जाऊन त्यांचा गैरसमज दूर कर."

"डायनाच्या आई भयंकर दुखावली गेली आहे, मला त्यांना भेटायचे धाडस होत नाही त्यापेक्षा तुम्ही जाऊन त्यांच्या कानावर सर्व गोष्टी घातल्या तर त्यांचा विश्वास बसेल," ॲनीने मारिलाला विनंती केली.

"ठिक आहे मी जाऊन सांगते, सर्व काही ठिक होईल तू जास्त रडत बसू नको."

त्याप्रमाणे मारिला मिसेस बॅरीला भेटायला गेली. ॲनी तिच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. मारिलाला पाहिल्यावर ॲनी समजून गेली की मारिलाच्या

शिष्टाईचा काही उपयोग झाला नाही. "मला मिसेस बॅरी माफ करणार नाहीत काय?" ॲनीने विचारले.

"मिसेस बॅरी, खरचं! आजवर मी पाहिलेल्या असंमजस लोकांपैकी सर्वात आडमुठी आणि हेकेखोर स्त्री आहे. मी त्यांना सांगितले की ही गोष्ट नजरचुकीने घडली त्या तुझा काही दोष नाही, पण त्यांनी माझ्या बोलण्यावर विश्र्वास ठेवला नाही. त्यांनी मी बनवलेल्या वाईनच्या परिणामांबद्दल बोल लावला आणि तीन वर्षांपूर्वी मी 'मनुकाच्या वाईनचा कुणावर वाईट परिणाम होणार नाही' असे म्हणाल्याची त्यांनी आठवण करून दिली.

"मी, तिला अगदी स्पष्टपणे सांगितले की मनुका वाइन एकावेळी तीन मोठे ग्लास भरून पिणे योग्य नाही आणि जर एखादे लहान मुलाने असा अधाशीपणा केला असेल तर त्याला योग्य समज देऊन चांगलेच फटकारले पाहिजे."

अस्वस्थपणे मारिला किचनमध्ये निघून गेली. बिचारी ॲनी, दारातच उभी राहिली.

तिने मनाशी निश्चय केला, संध्याकाळच्या गारठ्यात कोट, टोपी न घालता तशीच झरझर डायनाच्या घराकडे निघाली. भीतभीतच तिने दरवाजा ठोठावला. मिसेस बॅरीनी दार उघडले. दारात थंडीत कुडकुडत मोठ्या आशेने पाहत असलेली ॲनी दिसली.

मिसेस बॅरीनी मख्ख चेहऱ्याने तिच्याकडे पाहिले. त्या एखाद्याच्या बाबतीत पूर्वग्रहदूषीत नापसंती बाळगत असत. मनात राग ठेवून वरवर न दाखवता त्या आतल्या आत कुढत रहात, त्यामुळे तो दूर करणे कठीण होतं असे. ॲनी विषयी त्यांचा ग्रह अगदी पक्का झाला होता: ॲनीने डायनाला निव्वळ द्वेषभावनेतून मद्यधुंद केले होते असा त्यांचा समज झाला होता, त्यामुळे तिला आपल्या मुली पासून दूर ठेवणे, हे त्या आपले कर्तव्य समजत होत्या.

"तुला काय पाहिजे?" त्यांनी कडकपणे विचारले.

ॲनीने त्यांचे पाय पकडले आणि म्हणाली, "मिसेस बॅरी मला माफ करा. डायनाला मुद्दाम मद्य पाजून झिंगायला लावण्याचा माझा उद्देश नव्हता. मी असे कसे करू शकेन? आपण विचार करून पहा, अनाथाश्रमातून दत्तक घेतलेली गरीब लहान मुलगी तिच्या जीवस्यकंठस्य मैत्रीणीला हेतुपुरस्सर मद्य देईल काय? मला ते रास्पबेरीचे सरबत आहे असे वाटले. प्लिज डायनाला माझ्याबरोबर खेळण्यासाठी मनाई करू नका, असे झाले तर माझ्यावर दु:खाचा डोंगर कोसळेल."

अशा प्रकारच्या बोलण्याने मिसेस लिंड यांचे कठोर हृदय क्षणार्धात मृदू झाले होते पण मिसेस बॅरींवर काहीही परिणाम झाला नाही, उलट त्या अधिकच चिडल्या. त्यांना वाटले ॲनी मानभावीपणा करत आहे. तिचे मोठमोठे अवजड शब्द आणि नाट्यमय हावभाव, त्यांना अधिकच संशयास्पद वाटले आणि ती त्यांची चेष्टा करत आहे असा त्यांचा समज झाला म्हणून त्या अतिशय थंडपणे आणि क्रूरपणे म्हणाल्या: "मला नाही वाटत की तू डायनाची मैत्रीण बनण्यासाठी योग्य आहेस. तू तुझ्या घरी गेलेली उत्तम आणि जरा नीट वागत जा." ॲनीचे ओठ थरथर कापत होते.

"तुम्ही मला डायनाला फक्त एकदाच निरोप देण्यासाठी भेटू द्याल काय?" तिने विनंती केली.

"डायना तिच्या वडिलांसोबत कार्मोडीला गेली आहे," मिसेस बॅरी आत जाऊन दरवाजा बंद करत म्हणाल्या.

निराश ॲन शांतपणे ग्रीन गेबल्सकडे परत गेली.

"माझी शेवटची आशा संपली," तिने मारिलाला सांगितले." मी डायनाच्या घरी जाऊन मिसेस बॅरींना भेटले. त्यांनी मला अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली. मारिला, मला वाटत नाही की त्या एक सुसंस्कृत स्त्री आहे म्हणून. आता मला देवाला प्रार्थना करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही आणि त्याचा सुद्धा फारसा

उपयोग होईल असे वाटत नाही कारण देव सुद्धा अशा दुराग्रही लोकांच्या बाबतीत फारसे काही करू शकणार नाही.”

“ॲनी, तू अशा गोष्टी बोलू नकोस,” मारिलाने ॲनीला दटावले. पण मनातून रासस्पेरी सरबत आणि मनुका वाईनचे अदलाबदल झाल्याचे, तिला हसू येत होते आणि यांचे तिला नवलच वाटत होते. रात्री मारियाने मॅथ्यूला घडलेली गोष्ट सांगितली, तेव्हा सुध्दा तिला हसू येत होते.

पण जेव्हा झोपायला जाण्यापूर्वी ॲनीच्या खोलीत डोकावली तेव्हा रडून रडून झोपी गेलेल्या ॲनीचा निरागस चेहरा पाहून तिचा जीव कळवळला. तिच्या चेहऱ्यावरून मायेने हात फिरवून विस्कटलेले केस सारखे करून तिने खाली वाकून लाल झालेल्या गालाचे चुंबन घेतले.

# प्रकरण 17

दुसऱ्या दिवशी दुपारी ॲनी, स्वयंपाकघराच्या खिडकीतून वाकून बाहेर डोकावत होती, अचानक तिला झऱ्याजवळ डायना उभी असलेली दिसली. अधिक निरखून पाहिल्यावर ती ग्रीन गेबल्स कडे पाहत कुणाला तरी हातवारे करून बोलावत असल्याचे ॲनीच्या लक्षात आले. क्षणार्धात ॲनी पळत पळत तिच्याकडे निघाली. तिच्या मनात आश्चर्य आणि भावपूर्ण डोळ्यात आशा भरून राहिली होती पण जवळ जाताच डायनाचा उदास चेहरा पाहून ती आशा मावळली.

“तुझ्या आईने मला माफ केले नाही?” ॲनीने विचारले.

डायनाने नकारार्थी मान हलवली.

“नाही, तिने मला तुझ्याबरोबर खेळायला मनाई केली आहे. मी तिला सांगितले की यात तुझी काहीच चूक नाही पण त्याचा काही उपयोग झाला नाही. फक्त मला दहा मिनिटात तुझा निरोप घेऊन येण्यास सांगितले आहे.”

“कायमचा निरोप घेण्यासाठी दहा मिनिटे अपूरी आहेत.” ॲनी रडत रडत म्हणाली. ”

“डायना, तुला भविष्यात कितीही प्रेमळ मित्र मिळाले तरी तू मला कधीही विसरणार नाही असे प्रामाणिकपणे वचन देशील काय?"

“नक्कीच मी तुला वचन देते पण मला कोणी जिवलग मैत्रिण मिळणार नाही आणि मिळाली तरी मला नको आहे. मी तुझ्यावर जसे प्रेम केले तर इतर कुणावर प्रेम करू शकणार नाही,” डायना रडत रडत म्हणाली.

“ओ, डायना, तू माझ्यावर प्रेम करतेस?” तिचा हात धरत ॲनी मोठ्याने ओरडली.

“होय नक्कीच मी तुझ्यावर प्रेम करते. तुला ते माहीत नव्हते का?”

“नाही, मला वाटले मी फक्त तुला नक्कीच आवडत असेन पण तू माझ्यावर प्रेम करशील अशी मला आशा नव्हती. आज तागायत कुणी माझ्यावर प्रेम केले नाही. माझ्यावर कुणी प्रेम करत आहे ही जाणीवच किती विलक्षण आहे! हा प्रकाशाचा किरण, आपल्या विभक्त झालेल्या मार्गावर कायमचा चमकत राहिल. डायना परत एकदा मला ऐकव.” ॲनीच्या चेहऱ्यावर समाधान विलसत होते.

डायना शांतपणे म्हणाली, “मी तुझ्यावर मनापासून प्रेम करते, ॲनी, आणि ते शास्वत असेल याची मी तुला खात्री देते.”

“मी सुध्दा तुझ्यावर कायम प्रेम करत असेन. इथून पुढच्या आयुष्यात, तुझी आठवण ताऱ्यासारखी चमकत राहिल. आपण एकत्र वाचलेल्या शेवटच्या गोष्टीत ते दोन मित्र असेच म्हणत होते. तुझ्या काळ्याभोर केसांची एक बट मला आठवण म्हणून मला दे.”

बट कापण्यासाठी कात्रीची जरूरी होती. सुदैवाने ॲनीच्या एप्रनमध्ये छोटी कात्री होती. तिने गंभीरपणे एक बट कापून घेतली आणि म्हणाली, “माझ्या प्रिय मैत्रिणी, या पुढे आपण शेजारी असूनही एकमेकींना अनोळखी असू. पण माझे हृदय तुझ्याशी सदैव विश्वासू राहील.”

डायना निरोप घेऊन परत निघाली, तिची पाठमोरी आकृती नजरेत साठवून घेत ॲनी थांबून राहिली.

“आता सर्व संपले आहे,” ॲनी मारिलाला सांगत होती. “आता मला दुसरी कोणी मैत्रीण असणार नाही. माझी अवस्था पूर्वी पेक्षा जास्त वाईट झाली आहे. आता माझ्याकडे पुस्तकाच्या कपाटातील केटी मॉरिस किंवा डोंगरातून प्रतिध्वनी

उमटवणारी व्हायोलेटा नाही. आता मी एकटीच उरले आहे. डायनाने मला केसांची बट दिली आहे. मी ती एका छोट्याशा पिशवीत घालून गळ्यात घालणार आहे. मी मेल्यावर ती पिशवी माझ्याबरोबर कॉफीनमध्ये असेल याची खात्री करून घ्या कारण मी फार काळ जगेन यावर माझा विश्वास नाही. कदाचित त्यावेळी मिसेस बॅरीला पश्र्याताप होईल आणि मग डायनाला माझ्या अंत्यविधीला येऊ देईल."

"जो पर्यंत तू व्यवस्थितपणे बोलू शकतेस तो पर्यंत तुला दु:खाने मरणाची फारशी भीती नाही," मारिला सहानुभूतीपूर्वक म्हणाली.

पुढच्या सोमवारी, ॲनी वह्या पुस्तके घेऊन शाळेला जाण्यासाठी तयार होऊन मारिलाच्या समोर आली. "मी परत शाळेत जाणार आहे. आता माझ्या आयुष्यात एव्हढीच एक गोष्ट उरली आहे. माझी प्रिय मैत्रीण तर माझ्यापासून हिरावून घेतली आता निदान शाळेत तरी ती दृष्टीस पडेल आणि पूर्वीचे दिवस आठवून मनाला थोडी शांती लाभेल," ॲनीने लांबलचक प्रस्तावना केली.

"त्यापेक्षा तू अभ्यासावर जास्त लक्ष दिलेस तर त्याचा फायदा होईल. मला आशा आहे की परत इतरांच्या डोक्यावर पाटी फोडली जाणार नाही आणि चंबु गबाळे आवरून शाळा सोडून परत येता येणार नाही. शाळेत नीट वागत जा आणि शिक्षक काय सांगतात तिकडे लक्ष देत जा."

"मी आता एक आदर्श विद्यार्थीनी बनण्याचा प्रयत्न करणार आहे. अर्थात त्यामध्ये जास्त गंमत नाही पण मला आता उदास वाटत आहे त्यामुळे माझे इतस्ततः विखुरलेले जाणारे लक्ष, फक्त अभ्यासावर केंद्रीत करेन. मात्र शाळेला जाताना, आमच्या रोजच्या स्वप्न रस्त्याने बर्चच्या झाडाच्या सावलीतून एकटीला रडायला येईल."

ॲनीचे शाळेत परत खुल्या मनाने स्वागत करण्यात आले. पण ॲनीची कल्पनाशक्ती, गायनातील आवाज, खेळा मधला सहभाग अगदी मधल्या सुट्टीतील

मोठ्या आवाजात पुस्तके वाचनाचा उपक्रम, या सर्व गोष्टींमधला तिचा उत्साह कमी झाला होता. तिच्या वर्गातील मुला मुलींनी छोट्या छोट्या भेटवस्तू दिल्या.

मधली सुट्टी संपल्यानंतर तिच्या डेस्कवर 'स्ट्रॉबेरी सफरचंद' ठेवलेले दिसले. ॲनीने स्ट्रॉबेरी सफरचंद खायला म्हणून हातात घेतले आणि तिला आठवले की या प्रकारची सफरचंद फक्त लेक ऑफ शायनिंग वॉटरच्या पलीकडे असलेल्या मिस्टर ब्लिथ यांच्या जुन्या बागेतील झाडांना लागतात. ॲनीने जणू काही हातात जळता निखारा असल्यासारखे पटकन स्ट्रॉबेरी सफरचंद खाली ठेवले आणि हात रुमालाला पुसले.

दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत ते सफरचंद तिच्या डेस्कवर पडून होते. सकाळी शाळा झाडणाऱ्या मुलाने ते आनंदाने उचलले.

ॲनीला शाळेत परत येण्याच्या आपल्या निर्णयाचे समाधान जरूर वाटत होते पण ती मनापासून आनंदीत नव्हती. गेर्टी पायसोबत बसलेल्या डायना बॅरीकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नव्हती, यांचे दु:ख मात्र जाणवत होते.

"डायना बहुतेक माझ्याकडे पाहून हसल्याचे मला जाणवले," शाळेतून आल्यावर ॲनी, मारिलाला म्हणताना तिचा आवाजात दु:ख दाटून आले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ॲनीला एक पाकीट मिळाले त्यात एक चिठ्ठी आणि एक लाल टिश्यू पेपर पासून बनवलेला बुक मार्कर होता. चिठ्ठीत लिहिले होते,

"प्रिय ॲनी, माझ्या आईने शाळेत तुझ्याबरोबर बोलायला आणि खेळायला मनाई केली आहे. यात माझा काहीच दोष नाही तरी तू माझ्यावर रागावून नको, मी तुझ्यावर पूर्वीसारखे प्रेम करते. शाळेतील गमतीजमती, सिक्रेट्स सांगण्यासाठी मला तुझी खूप आठवण येते. मी बुक मार्कर बनवायला शिकले आहे. माझी आठवण म्हणून तुला एक बुक मार्कर पाठवत आहे.

तुझी खरी मैत्रीण

डायना "

ॲनीने ती चिठ्ठी वाचली, बुकमार्क कुरवाळला आणि लगेच उत्तर लिहायला सुरुवात केली.

“प्रिय डायना,

मी नक्कीच तुझ्यावर कधीही रागावणार नाही. तुला तुझ्या आईने सांगितलेले ऐकायला हवे. आपण जरी शरिराने दूर असलो तरी आपण मनाने जोडल्या गेलो आहोत. मला आता इतर कोणाशी मैत्री करण्याची इच्छा उरली नाही. एकदा तुला जीवाभावाची मैत्रीण बनवल्यानंतर इतर कुणाला ते स्थान देणे शक्य नाही. तुला चिठ्ठीत स्पेलिंगच्या चुका सापडतील, सध्या मी तिकडे लक्ष द्यायचे ठरवले आहे.

आयुष्याच्या अखेरपर्यंत

असणारी तुझी मैत्रीण

ॲनी अथवा कार्डेलीया शर्ली”

ॲनीने पुन्हा शाळेत जाण्यास सुरुवात केल्यावर मारिलाच्या मनात ॲनी आणखी काही नवीन उपद्व्याप करून ठेवते की काय याची धास्ती होती, पण सुदैवाने तसे काही झाले नाही. एकतर ॲनीने मिनी अँड्र्यूजकडून प्रेरणा घेऊन आदर्श विद्यार्थीनी व्हायचे मनात घेतले असावे किंवा तिने मि. फिलिप्स सरांच्या शिकवण्याची पद्धत चांगली आत्मसात केली असावी. तिने अभ्यासात स्वतःला झोकून दिले होते. कुठल्याही बाबतीत गिल्बर्ट ब्लिथच्या मागे राहायचे नाही हे मात्र तिने पक्के ठरवले होते. या स्पर्धेत गिल्बर्टला हरवण्याची जिद्द तिने बाळगली होती. गिल्बर्टच्या बाजूने ही स्पर्धा निकोप होती पण ॲनीच्या बाबतीत तसे म्हणता येणे अवघड होते. गिल्बर्ट कडून झालेला अपमान ती विसरली नव्हती, राग आणि प्रेम दोन्ही अत्युच्च पातळी गाठण्यासाठी ती कसोशीने प्रयत्नशील होती. अभ्यासात गिल्बर्टला हरवण्याची जिद्द

ती उघडपणे मान्य करत नव्हती कारण असे झाले असते तर ती त्यांची दखल घेत आहे ही गोष्ट उघड झाली असती, तिने पुर्णतः त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचे ठरवले होते. गिल्बर्ट हा स्पेलिंग टेस्टचा मुख्य होता पण ॲनीने त्याला मागे टाकले. गिल्बर्टने सर्वच्या सर्व गणिते अचूक सोडवली त्याचे अभिनंदन फळयावर नांव लिहून केले गेले. ॲनी संपूर्ण संध्याकाळी उशिरापर्यंत अपूर्णांकाच्या गणितांशी झटापट करत राहिली आणि दुसरे दिवशी वर्गात पहिली आली. एके दिवशी तर दोघांनी सारखे गुण मिळवल्याने दोघांची नावे एकत्र लिहिली गेली. ॲनीला मात्र हे वात्रट मुलांनी नावांच्या जोड्या जुळवून भिंतीवर नाव लिहिल्याप्रमाणे वाईट वाटले. प्रत्येक महिन्याच्या शेवटी लेखी परीक्षा घेतली जात असे, तिच्या निकालाच्या दिवशी तर उत्कंठा शिगेला पोहचत असे. पहिल्या महिन्यात गिल्बर्ट तीन गुणांनी पुढे आला. दुसऱ्या महिन्यात ॲनीने त्याला पाच गुणांनी मागे टाकले. परंतु गिल्बर्टने संपूर्ण शाळेसमोर तिचे मनापासून अभिनंदन केल्याने तिला आपला विजय थोडा अगोड वाटला. त्यांच्या खिलाडूपणा ऐवजी तिला त्याला पराजयाची बोच जाणवली असती तर जास्त आनंद झाला असता.

फिलिप्स सर कदाचित तितकेसे चांगले नसतील पण ॲनीप्रमाणे शिकण्याबाबत दृढनिश्चय करणारा विद्यार्थी कोणत्याही प्रकारच्या शिक्षकाच्या हाताखाली प्रगती करण्याशिवाय राहत नाही. टर्मच्या शेवटी दोघांनाही पाचव्या इयत्तेत पदोन्नती दिली गेली. अभ्यासाचे विषय बदलले. लॅटिन, भूमिती, फ्रेंच आणि बीजगणित नव्याने अभ्यासक्रमात समाविष्ट झाले. भूमितीसाठी ॲनीला जादा परिश्रम घ्यावे लागत होते. भूमितीला कंटाळून ॲनी मारिलाला म्हणाली, “हा विषय माझ्या पचनी पडेल असे काही मला वाटतं नाही. या सर्व नियमांवर आधारित गोष्टी आहेत त्या कल्पनेचा काहीच उपयोग होत नाही. फिलिप्स सर मला भूमितीतील धड्डम् भोपळा असे म्हणतात. पण काही गिल... विद्यार्थी भूमिती मध्ये खूप हुशार

a

आहेत. मला मेल्याहून मेल्यासारखे वाटते. डायनाला सुद्धा माझ्यापेक्षा चांगली भूमिती जमते. तिला माझ्यापेक्षा जास्त चांगले गुण मिळाले तरी मला वाईट वाटायचे कारण नाही, कारण जरी आम्ही बोलत नसलो तरी आम्ही एकमेकींवर प्रेम करतो. तिच्याबद्दल विचार करून मला कधीकधी खूप वाईट वाटते. पण खरोखर, मारिला, अशा मनोरंजक जगात कोणी फार काळ दुःखी राहू शकत नाही, नाही का?"

# प्रकरण 18

अनेकदा एखादी मोठी घटना, अनेक छोट्या छोट्या घटनांच्या निर्मितीस कारणीभूत होत असते. आता हेच पाहा ना, कॅनेडियन मेरीटाईम प्रोव्हिन्सच्या चीफ मिनिस्टरांच्या राजकीय दौऱ्यात प्रिन्स एडवर्ड आयलंडचा समावेश करण्याच्या निर्णयाचा, ग्रीन गेबल्स येथील लहान ॲनी शर्लीच्या नशिबाशी संबंध असण्याचे काहीच कारण नव्हते पण त्या निर्णयामुळे ॲनीच्या अंगच्या गुणांना अधिक उजाळा मिळाला.

जानेवारी महिन्यात मेरीटाईम प्रोव्हिन्सच्या चीफ मिनिस्टरांची मोठी सभा शार्लोटटाऊन येथे झाली. ॲव्हनली येथील बहुतेक लोक चीफ मिनिस्टरांच्या पक्षाच्या बाजूने होते त्यामुळे गावातील जवळपास सर्व स्त्री पुरुष ॲव्हनली पासून तीस मैल दूर असलेल्या शार्लोटटाऊन येथे सभेला गेले. मिसेस लिंड, आपल्या पतीसह सभेला गेल्या. त्यांना राजकारणाची आवड होती. मिस्टर लिंड मात्र घोडागाडी चालवण्यासाठी आणि घोड्यांच्या देखभालीसाठी सोबत गेले होते. मारिलाला सुध्दा राजकारणात रस होता शिवाय चीफ मिनिस्टरांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी चालून आली होती म्हणून

मिस्टर आणि मिसेस लिंड सोबत मारिला पण गेली होती. दुसरे दिवशी परत येईपर्यंत घरची जबाबदारी ॲनी आणि मॅथ्यू यांच्याकडे सोपवली होती. त्यामुळे मारिला आणि रेचेल बरोबर सभेच्या ठिकाणी गुंतली असता, ग्रीन गेबल्समध्ये मॅथ्यू आणि ॲनी किचनमध्ये बसले होते, जुन्या पद्धतीच्या वॉटरलू स्टोव्हच्या आगीच्या निळया पिवळया ज्वाळांचे प्रतिबिंब खिडकीच्या काचेवर चमकत होते. मॅथ्यू सोफ्यावर

बसून वकीलांबरोबर चर्चा करत होते. तर जवळच ॲनी अभ्यास करत बसली होती पण वारंवार तिची नजर घड्याळाकडे जात होती, तिथेच जेन अँड्रयूजने त्या दिवशी तिला वाचायला दिलेले एक नवीन पुस्तक तिथे ठेवले होते. जेनने पुस्तकाची इतकी तारिफ केली होती की ॲनीचे हात पुस्तक उचलण्यासाठी शिवशिवत होते. पण अभ्यासाच्या वेळी गोष्टीचे पुस्तक हातात धरल्यास गिल्बर्ट ब्लिथचा नंबर येईल हे सत्य नाकारण्याजोगे नव्हते. ॲनीने मॅथ्यूना त्यांच्या वेळी भूमिती हा विषय अभ्यासक्रमात होता काय आणि प्रश्न केला. मॅथ्यूनी नकारार्थी मान हलवली.

ॲनीने निव्वळ भूमिती या एका विषयामुळे तिला आपले सर्व भवितव्य अंधकारमय होईल अशी भीती बोलून दाखवली. यावर मॅथ्यूनी त्यांच्याजवळ, फिलिप्स सर ॲनीच्या हुशारीचे कौतुक करत होते असे सांगितले.

ॲनी म्हणाली, “भूमितीच्या बाबतीत फिलिप्स सर अगदी गोंधळून सोडतात त्यामुळे नीट समजत नाही. आता आम्हाला शेती हा विषय पण अभ्यासासाठी आहे. त्यामुळे बरीच उपयुक्त माहिती मिळते. तिकडे मारिला आणि मिसेस लिंड सभेमध्ये भाषण ऐकत असतील. मिसेस लिंड महिलांना मतदानाचा हक्क मिळायला हवा असे म्हणत होत्या. मॅथ्यू तुम्ही कोणत्या बाजूला आहात?”

“अर्थात कंझर्व्हेटिव्ह” मॅथ्यूनी उत्तर दिले.

“मी पण कंझर्व्हेटिव्ह आहे. पण आमच्या वर्गात गिल--काही मुले लिबरल पक्षाच्या विचारांची आहेत. तुम्हाला माहिती आहे काय, फिलिप्स सर दररोज संध्याकाळी प्रिसी अँड्रयूजला घरी शिकवण्यासाठी जातात. खरं तर मिरांडा स्लोन देखील प्रिसी सारखीच प्रवेश परिक्षेची तयारी करत आहे. पण तिला फिलिप्स सर जास्त मदत करत नाहीत, असे का या गोष्टीचा मला मला उलगडा होत नाही.”

आपल्याला पण बऱ्याचशा गोष्टी समजत नाहीत असा खुलासा मॅथ्यूनी केला.

"मला वाटते मला माझा अभ्यास अगोदर पूर्ण करायला हवा. त्याशिवाय मला जेन अँड्रूयूजने दिलेले पुस्तक वाचता येणार नाही. परंतु जर ते सतत डोळयासमोर दिसत असेल तर वाचायचा मोह आवरणे कठीण होते. मी सरळ कपाटात ठेवून कपाळाला कुलूप लावते आणि मॅथ्यू तुमच्याकडे चावी देते पण मी अभ्यास पूर्ण करेपर्यंत मला तुम्ही चावी देता कामा नये. जर चावीच मिळाली नाही तरच अभ्यास पूर्ण होण्याआधीच पुस्तक वाचायच्या मोहाला प्रतिकार करणे सोपे होईल. बरं मी तळघरातून बटाटे आणायला जाणार आहे. तुम्हाला बटाटे आवडतील ना?

"ठिक आहे चालेल," खरे पाहिले तर मॅथ्यूना बटाटे फारसे आवडत नसतं पण

ॲनीची आवड त्यांना माहित होती.

ॲनी बटाटे घेऊन तळघरातील जिना चढत किचनमध्ये प्रवेश करत होती तेव्हढ्यात घाबरीघुबरी झालेली डायना घरात शिरली. तिचा चेहरा पांढराफटक पडला होता, कडाक्याच्या थंडीत पळत आल्याने ती धापा टाकत होती, अगदीच घाईघाईत एक शाल पांघरून बाहेर पडलेली दिसत होती. तिला तशा अवस्थेत पाहताच ॲनीला आश्र्चर्याचा धक्का बसला आणि तिच्या हातातील ताट खाली पडले त्यातील सर्व साहित्य पेटत्या मेणबत्ती सकट घरंगळत खाली तळघरात जाऊन पडले. दुसऱ्या दिवशी ताट, वितळलेल्या मेणबत्ती मध्ये रुतलेले मारिलाने पाहिले. दैव बलवत्तर म्हणून कुठे आग वगैरे लागली नव्हती, संकट टळले म्हणून मारिलाने देवाची करुणा भाकली.

"डायना काय झाले?" तुझ्या आईने शेवटी आपल्या मैत्रीला होकार दिला काय?" ॲनीने विचारले.

a

“अ‍ॅनी, लौकर घरी चल. मिनी मे खूपच आजारी आहे. तिचा माकड खोकला बळावला आहे आणि आई बाबा बाहेर गावी सभेला गेले आहेत. आमच्या सोबतीला थांबलेली मेरी जो, पण घाबरून गेली आहे. डॉक्टरांना बोलवायला जायला दुसरे कोणी नाही. मिनी मेची हालत खूप वाईट झाली आहे आणि मेरी जोला अशावेळी काय करावे हे माहित नाही - आणि मला खूप भीती वाटते!”

मॅथ्यू काहीही न बोलता, कोट टोपी घालून बाहेर आले आणि जवळच्या कार्मोडी गावात डॉक्टरांना बोलवायला जाण्यासाठी ते सॉरेल घोडी आणायला घाईघाईने तबेल्याकडे गेले.

“मला नाही वाटत की आज कोणी डा ॅक्टर त्यांना भेटतील, डॉक्टर ब्लेअर सभेला जाणार होते. आणि डॉक्टर स्पेन्सर देखील बहुतेक गेले असावेत. मिसेस लिंड पण गावात नाहीत,” असे म्हणून डायना रडू लागली.

“रडू नकोस डायना, मला माकड खोकला बळावला तर काय करायचे हे माहित आहे. मिसेस हॅमंडच्या मुलांना बऱ्याचवेळा हा आजार झाला होता. मी त्यांची काळजी घेतली होती. थोडी थांब घरात इपेकॅक औषधांची बाटली शोधते, तुमच्या कडे असेलच याची खात्री नाही. ते यावेळी द्यावे लागेल. एकदा कफ पडून गेला की मग काळजी करण्याचे कारण नाही. गडबडीने तिने बाटली शोधली आणि ती घेऊन दोघी डायनाच्या घरी निघाल्या. थंडगार वारे अंगाला झोंबत होते. सर्वत्र नीरव शांतता पसरलेली होती. संपूर्ण रस्ता हिमाच्छादित झाला होता. वाटेवरचे फरचे वृक्ष शुभ्र हिमकणांनी माखलेले होते. आकाशात ताऱ्यांच्या प्रकाशात वातावरण गूढरम्य भासत होते. अशा वेळी प्राणप्रिय मैत्रीण सोबत असण्याचा आनंद आणि मिनी मेच्या तब्बेतीची काळजी या दोन्ही गोष्टींमुळे अ‍ॅनीची द्विधा मनस्थिती झाली होती.

घरी गेल्यावर ॲनी लक्षात एकंदर परिस्थिती लक्षात आली. तीन वर्षांची मिनी मे खरोखरच खूप आजारी होती. सोफ्यावर तापाने तळमळत होती. श्वासाची घुरघुर मोठ्याने ऐकू येत होती. तिची काळजी घेण्यासाठी नेमलेली फ्रेंच मुलगी मेरी जो, पूर्णपणे गांगरून गेली होती, काय करायचे हेच तिला समजत नव्हते.

ॲनी कौशल्याने आणि तत्परतेने कामाला लागली.

"मिनीला माकड खोकला झाला आहे, मी यापेक्षा जास्त त्रास होणारी हॅमंड यांची मुले पाहिली आहेत. आपल्याला सर्वात अगोदर खूप जास्त गरम पाणी लागेल. मग मेरी जोकडे वळून ॲनी म्हणाली किटली मध्ये अगदी थोडे पाणी आहे. स्टोव्हवर पाण्याचे मोठे पातेले तापवत ठेव. तोपर्यंत मी मिनी मेचे कपडे काढून तिला झोपण्याचा प्रयत्न करते. त्याआधी मला तिला इपेकॅक औषधाचा डोस द्यायचा आहे. तू एक मऊ सुती कापड येऊन ये."

मिनी मेने औषध घेताना खळबळ केली पण ॲनी वस्ताद निघाली. डायना आणि मेरी जो ॲनीच्या मदतीला तत्पर होत्या. उत्साहाच्या भरात त्यांनी इतके पाणी गरम केले की एखाद्या दवाखान्यातील सर्व बाळांना पुरेसे होईल.

रात्री तीन वाजता मॅथ्यू, डा ॅक्टरांना घेऊन आले. त्यासाठी त्यांना स्पेंसरव्हिले या गावी जावे लागले. पण ते येईपर्यंत मिनी मेच्या आजाराला उतार पडला होता आणि तिला झोप लागली होती.

ॲनीने डॉक्टरांना सर्व परिस्थिती विशद केली, "मी निराशेने हार मानण्याच्या अगदी जवळ आले होते, तिची तब्येत जास्तच बिघडत चालली होती त्यामुळे मला खूप भीती वाटू लागली. डायना आणि मेरी जोला मी धीर देत होते पण मी मनातून घाबरून गेले होते. इपेकॅक औषधाचा अगदी शेवटच्या थेंबापर्यंत मी औषध पाजत राहिले. शेवटी चार पाच मिनिटांत खोकल्याची उबळ आली आणि बराचसा कप उलटून पडला.

a

त्यानंतर तिला बरे वाटले. डॉक्टर मला इतके हायसे वाटले की मी ते शब्दात सांगू शकत नाही.”

“मला त्याची कल्पना आहे. डॉ म्हणाले खरे पण त्यांना सुद्धा काय बोलावे हे कळेनासे झाले. मात्र दुसऱ्यादिवशी डायनाच्या आई बाबांना सांगताना ते म्हणाले, “कथबर्ट यांची लाल केसांची छोटी मुलगी भलतीच हुशार आहे. तिनेच तुमच्या मुलीचा जीव वाचवला कारण मी येईपर्यंत उशीर झाला असता. तिच्या वयाच्या मानाने तिला खूपच जास्त समजत आहे आणि कठीण परिस्थितीत योग्य निर्णय त्वरित घेऊन शांतपणे त्याची अंमलबजावणी करण्याची तिची क्षमता वाखाणण्याजोगी आहे. जेव्हा ती मला सर्व परिस्थिती समजावून सांगत होती तेव्हा तिच्या डोळयातील समज पाहिल्यावर मला तिचे कौतुक वाटले.”

सकाळी मॅथ्यूंच्या बरोबर पांढऱ्या शुभ्र बर्फाने झाकलेल्या रस्ताने घरी परततांना रात्रीचे जागरण आणि थकावट विसरून ॲनी अखंड बोलत होती. “खरोखरच किती सुंदर सकाळ आहे नाही? मला खूप आनंद झाला आहे. मिसेस हॅमंडच्या तीन तीन जुळया मुलांची उस्तवार करताना मला अगदी नकोसे वाटत असे पण काल रात्री त्या अनुभवातून मिनी मेच्या जीवावरचे संकट टाळता आले या गोष्टीचा मला अवर्णनीय आनंद झाला आहे. मात्र आज शाळेत जायला जमेल असे वाटत नाही. मला खूप झोप येत आहे.”

“ठिक आहे आज शाळेत जाऊ नकोस. घरी गेल्यावर झोपायला जा आणि चांगली झोप पूर्ण कर. घरातील कामे मी करेन,” मॅथ्यूनी दिलासा दिला.

घरी गेल्यावर ॲनी झोपली ती पार दुपारी उठून किचनमध्ये आली. तोवर मारिला घरी आली होती. ॲनीने उत्सुकतेने मारिलाला विचारले, “तुम्ही चीफ मिनिस्टरना पाहिले काय? कसे दिसत होते?”

a

“हो पाहिले. ते कसे दिसतात या पेक्षा भाषण कसे करतात हे महत्त्वाचे आहे. मला कंझर्व्हेटिव्ह असल्याचा अभिमान वाटला. तुझे जेवण करून घे. खूप भूक लागली असेल. काल रात्रीचा सगळा प्रसंग मला मॅथ्यूने सांगितला. खरोखरच तुला माहिती होती म्हणून मिनी मेच्या जीवावरचे संकट टळले. कोणीही अशा वेळी गडबडून गेले असते. आता अगोदर जेवण करून घे मग आपण बोलू. “खरे पाहायला गेले तर मारिला ॲनीला काही तरी महत्त्वाचे सांगणार होती. पण तिचे जेवण होईपर्यंत काही बोलली नाही.

ॲनने तिची निळ्या प्लम्सची बशी संपवल्यानंतर मारिला म्हणाली: “मघाशी मिसेस बॅरी तुला भेटायला आली होती. पण मी तुला उठवायला नकार दिला. मिनी मेचा जीव वाचवण्यासाठी तुझे आभार मानायचे होते. मागच्या वेळेच्या मनुका वाईनच्या प्रकरणात तुझा दोष नव्हता हे तिला आता पटले आहे. तिच्या वागण्याचा तिला खेद वाटत आहे अशी तिने कबुली दिली. तुला आज संध्याकाळी घरी डायनाची मैत्रीण म्हणून बोलावले आहे. काल रात्रीची थंडी डायनाला थोडी बाधली म्हणून ती येऊ शकत नाही असे म्हणत होती. ॲनी आता लगेच आनंदाने हरखून जाऊ नको.”

ॲनीचा चेहरा आनंदाने फुलून आला होता. “मारिला मी आता लगेच जाऊ काय? माझी जेवणाची भांडी मी आल्यावर घासून ठेवेन. या एव्हढ्या भावनाविवश प्रसंगी भांडी घासत बसणे मला रुचत नाही.”

“ठिक आहे, जा पळ. अगं पण बाहेर थंडी आहे, कोट, टोपी घालून जा नाहीतर सर्दीने आजारी पडशील.”

ॲनी झटकन आवरुन पळाली. बऱ्याच उशिरा संधिप्रकाशात नाचत नाचत घरी आली.

“आज मी पूर्णपणे आनंदात आहे. होय माझे केस लाल असले तरीही मी आनंदात आहे. आज मिसेस बॅरीनी माझ्या केसांचे चुंबन घेतले आणि रडत रडत माझी माफी मागितली, माझे त्यांच्यावर डोंगराएव्हढे उपकार आहेत असे म्हणत होत्या. मी नम्रपणे सांगितले की माझ्या मनात त्यांच्याबद्दल कोणतीही कटू भावना नाही आणि डायनाच्या बाबतीत माझ्या मनात कोणताही वाईट हेतू नव्हता हे मी खात्रीपूर्वक सांगता आहे. या पुढे हा विषय मी कायमचा मनातून काढल्याची ग्वाही दिली. मारिला मी त्यांच्या बरोबर अगदी योग्य पद्धतीने बोलले असे तुम्हाला वाटते ना? त्या माझ्या बोलण्यावर भारावून गेल्यासारख्या वाटल्या. डायनाने मला तिच्या मावशीने शिकवलेला नवीन क्रोशेटची वीण शिकवली. इथे कोणालाही ती येत नाही. एक भेटकार्ड दिले त्यावर सुंदर कविता होती.

“माझ्यासाठी मुद्दाम उंची क्रोकरी काढून चहापाणी केले. फ्रुट केक, पाउंड केक, डोनट्स, दोन प्रकारचे मुरांबे असा बेत केला होता. शिवाय डायनाला मला बिस्किटे का दिली नाहीत म्हणून विचारून बिस्किटे द्यायला लावली. मला एकदम मी कोणीतरी मोठी व्यक्ती असल्यासारखे वाटत होते. मी पण मोठी झाल्यावर लहान मुलींशी असेच बोलेन. मी आणि डायनाने मिळून टाॅफी बनवली पण ती फारशी चांगली झाली नाही. त्या साखर घालायची आम्ही विसरलो आणि लोणी जळून गेले. थंड करायला ठेवले तर त्यांच्या मांजरीने उडी मारली आणि सर्व खाली पडले. पण करतांना आम्हाला मजा वाटली. मिसेस बॅरीनी मला पुन्हा पुन्हा त्यांच्याकडे येण्यासाठी बजावून सांगितले. मला निरोप देण्यासाठी मी दिसेनाशी होईपर्यंत डायना खिडकीतून हल्ली नाही. आजच्या प्रसंगासाठी मी एक विशेष प्रार्थना तयार करणार आहे. "

# प्रकरण 19

फेब्रुवारी महिन्यातील एका संध्याकाळी ॲनी, पळत पळत मारिलाकडे आली आणि एका अत्यंत महत्वाच्या कामासाठी डायनाच्या घरी जाऊन येण्यासाठी परवानगी मागू लागली. अर्थात मारिला अंधार पडल्यावर डायनाला भेटायला जायला परवानगी देणे तसेच कठीण होते. तिने विचारले, “तुम्ही दोघी शाळेतून तर एकत्रच आलात, शिवाय नंतर अर्धा तास बाहेर बर्फ पडलेला असताना बडबड करत उभ्या होतात. त्यामुळे परत आता तिला भेटायला जायची काही गरज नाही.”

नेहमीप्रमाणे ॲनी, एव्हढ्या लौकर हार मानणारी नव्हती. तिने पुन्हा एकदा विनंती केली की खरंच डायनाला काही वेगळे महत्वाचे बोलायचे आहे म्हणून तिचे जाणे गरजेचे आहे. यावर मारियाने विचारले की ही गोष्ट तिला कशी काय समजली. ॲनीला मग त्या दोघींमधील सांकेतिक खाणाखुणांचा खुलासा करावा लागला. जर काही विशेष महत्वाची गोष्ट असेल तर आम्ही एक पेटती मेणबत्ती खिडकीतून उजेड अशी ठेवतो आणि कार्ड बोर्डाने तिचा उजेड अडवून अथवा पाडून आम्ही संदेश देतो. हा तुमचा मूर्खपणा एखादेवेळी घरादाराला आग लावेल असे मारिला रागारागाने म्हणाली.

ॲनीने संदेशवहन यंत्रणा कशी राबविण्यात येते याची माहिती दिली, “दोनदा कार्डबोर्ड मेणबत्ती समोर पुढे मागे केला तर 'तुम्ही तिथे आहात काय?' तीनवेळा संकेत दिला तर 'होय' चार वेळा दिला 'नाही' आणि पांच वेळा सिग्नल दिला तर लौकरात लौकर या, अत्यंत महत्वाची गोष्ट सांगायची आहे' नुकताच

डायनाने पाचवेळा संकेत दिला. तिने आता कशासाठी बोलावले आहे म्हणून माझा जीव टांगणीला लागला आहे. मग मी तिच्याकडे पटकन जाऊन येऊ काय?”

“ठिक आहे, पण दहाव्या मिनिटाला तू परत घरी आलेली दिसली पाहिजेस,” मारिला थोड्या घुश्यातच म्हणाली.

पुढच्या दहा मिनिटात ॲनी धावत धावत जाऊन परत आली आणि लगेच पुढच्या मोर्चेबांधणीला लागली, “मारिला तुम्हाला माहिती आहे काय उद्या डायनाचा वाढदिवस आहे. तिच्या आईने शाळा सुटल्यावर त्यांच्याकडे राहायला बोलावले आहे. उद्या संध्याकाळी उशिरापर्यंत गावातील सभागृहात कथा, कविता आणि नाट्य वाचनाचा आणि वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले आहे त्यासाठी डायनाचे चुलत भाऊ न्यूब्रिजहून घोड्याच्या मोठ्या स्लेज मधून येणार आहेत आणि डायनाला घेऊन सर्व त्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. मला पण तिच्यासोबत आग्रहाने यायला सांगितले आहे. तुम्ही मला परवानगी द्याल ना? माझी तिच्याबरोबर जाण्याची खूप इच्छा आहे.”

“शांतपणे ऐक, तू रात्रीची तिच्याकडे राहायला जाणार नाहीस आणि त्या कार्यक्रमाला तर मुळीच नाही. मला लहान मुलींना अशा कार्यक्रमांना पाठवणे म्हणजे मूर्खपणा वाटतो.” मारिलाने विषय संपवला.

“खरच मारिला, हा कार्यक्रम खूप चांगला आहे, मला जाऊदे ना.”

“अजिबात नाही मी कार्यक्रमाला जाण्यासाठी आणि संपूर्ण रात्र बाहेर राहायला परवानगी देणार नाही. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते की डायनाची आई कशी काय यासाठी तयार झाली.”

“हा खूप खास कार्यक्रम आहे. एकतर डायनाचा वाढदिवस आहे आणि कार्यक्रमात खूप चांगले सादरीकरण होणार आहे. प्रिसी, 'कर्फ्यू मस्ट नॉट रिंग टु नाईट' वाचणार आहे, शिवाय गायन वादन, कविता वाचन, नाट्य वाचन पण आहे.

पाद्री महोदय प्रमुख अतिथी आहेत, ते संबोधन करणार आहेत ते नेहमीच्या प्रवचनासारखे असेल असे तिची आई म्हणत होती."

"मी काय सांगते ते ऐक, बूट काढून झोपायला जा. आठ वाजून गेले आहेत."

शेवटचा प्रयत्न म्हणून ॲनी म्हणाली, "मिसेस बॅरीनी मला डायना बरोबर त्यांच्या विशेष अतिथींसाठी असलेल्या बेडरूममध्ये झोपायला देण्याचे ठरवले आहे. हा विशेष अतिथी म्हणून मला हा सन्मान मिळावा असे तुम्हाला पण आवडेल."

"तू तुझ्या खोलीत जाऊन झोपलीस तर त्यापेक्षा मोठा सन्मान असेल. मला याविषयी काहीही ऐकायचे नाही."

रडत रडत ॲनी तिच्या खोलीकडे जाताना मॅथ्यूनी पाहिले. ते हा सर्व संवाद ऐकत होते. ते मारिलाला म्हणाले, "मारिला, मला वाटते तिच्या मनात एव्हढी जायची इच्छा आहे तर तिला जाऊ द्यावे."

"मी याला परवानगी देणार नाही. तिची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे, कृपया तू त्यात हस्तक्षेप करू नकोस."

"ठीक आहे, मी हस्तक्षेप करत नाही. आपले स्वतःचे मत मांडले म्हणजे हस्तक्षेप केला असे होत नाही आणि माझे मत आहे की तू ॲनीला जाऊ दिले पाहिजे."

"उद्या ती चंद्रावर जाते म्हणाली तरी तू तिला जाऊ देत असे मत मांडशील यात कोणतीही शंका नाही. मी तिला रात्री डायना बरोबर राहायला हो म्हणाले असते पण या कार्यक्रमासाठी नाही म्हणायचे कारण रात्री थंडी बाधली तर आजारी पडायची शिवाय आठवडाभर तिच गोष्ट डोक्यात घेऊन निरर्थक बडबड चालू राहील यात शंका नाही. तिच्या या अति उत्साहाला आवर घालायला हवा असे मला वाटते.

a

मला तिचा स्वभाव आणि तिच्यासाठी काय बरेवाईट आहे ते तुझ्यापेक्षा जास्त समजते," मारिलाचा युक्तिवाद तिच्या दृष्टीने योग्य होता.

मॅथ्यूना युक्तिवाद करणे जमत नसे पण आपले मत ठामपणे मांडत म्हणाले, "तरी सुद्धा माझ्यामते तिला जाऊ देणे योग्य असेल."

मारिलाने पुढे वाद वाढवला नाही आणि शांतपणे झोपायला निघून गेली. सकाळी ॲनी ब्रेकफास्टची भांडी धूत असताना मॅथ्यू धान्याच्या कोठाराकडे जाताना क्षणभर थांबून मारिलाला म्हणाले, "मला वाटतं तू ॲनीला जाऊ द्यायला हवं, मारिला."

मारिला काय उत्तर द्यावे या विचारात पडली आणि नंतर निरूपाय होऊन तिखट स्वरात म्हणाली, "ठिक आहे तुझ्या इच्छेप्रमाणे ती जाऊ शकते तसे न झालेले तुला स्वतःला आवडणार नाही."

हातातील ओले फडके तसेच घेऊन ॲनी धावत आली आणि मारिलाला म्हणाली, "मारिला परत एकदा ते गोड शब्द मला ऐकवा."

"तू एकदा ऐकले आहेस तेव्हढे पुरेसे आहे. हा मॅथ्यूचा निर्णय आहे मी त्यापासून दूर आहे. जर तुला रात्रीची थंडी बांधली आणि आजारी बिजारी पडलीस तर मला बोल लावू नका. ॲन शर्ली, तू तुझ्या हातातल्या फडक्याचे पाणी सगळीकडे पडून त्यांचे डाग पडत आहेत याकडे जरा लक्ष ठेव. इतकी निष्काळजी मुलगी मी आजवर कुठे पाहिली नव्हती."

"खरे आहे माझ्यामुळे तुम्हाला रोज नव्या त्रासाला सामोरे जावे लागते. माझ्याकडून रोज काहीतरी नवीन चुका होतात. शाळेला जाण्यापूर्वी मी सर्व व्यवस्थित पुसून कोरडे करेन. मारिला मला खरोखरच त्या कार्यक्रमाला जायला मनापासून आवडेल. मी कधीच गेलेली नाही. जेव्हा इतर मुली अशा

a

कार्यक्रमाविषयी बोलतात ते मला खूप वाईट वाटते हे तुम्हाला माहीत नाही. मॅथ्यूना समजले असेल. कोणी आपल्याला समजून घेतले तर खूप चांगले वाटते.”

सतत या विषयावर डायना बरोबर चर्चा करण्याच्या नादात, गिल्बर्टने स्पेलिंग टेस्ट आणि तोंडी अंकगणितात तिला मागे टाकले. आज वर्गात प्रत्येकाच्या तोंडी एकच गोष्ट होती. कित्येक मुलांची मोठी भावंडे भाग घेणार होती. ग्रंथालयाच्या मदतीसाठी कार्यक्रम होणार असल्याने प्रत्येकी दहा सेंट तिकिट होते. कॅरी स्लोनच्या वडिलांनी मारिलासारखे लहान मुलींना कार्यक्रमारा न पाठवण्याचे धोरण अवलंबल्याने बिचारी नाराज होऊन हिरमुसली होती.

ॲनीचा उत्साह त्यादिवशी शाळा संपल्यावर डायनाच्या घरी गेल्यावर ओसंडून वाहू लागला. दोघी एकमेकींच्या मदतीने खूप छान पद्धतीने तयार झाल्या. डायनाच्या फरचे जॅकेट, टोपी आणि नवीन फॅशनच्या कपड्यांच्या तुलनेत ॲनीला आपल्या जुन्या फॅशनच्या कपड्यांचे थोडे वैषम्य वाटले पण तिने फारसे मनावर घेतले नाही.

डायनाचे मामेभाऊ घोड्यांच्या मोठ्या स्लेज मधून आले. सर्व जण त्यांच्या स्लेज मधून कार्यक्रमाच्या ठिकाणी निघाले. बर्फाच्या गुळगुळीत रस्त्यावरून स्लेज मधून जातांना गंमत वाटत होती. सूर्यास्ताचे लाल सोनेरी रंगांचे आकाश, बर्फाच्छादित टेकड्या, सेंट लॉरेन्स खाडीतील खोल निळे पाणी, स्लेजच्या किणकिणत्या घंटांचा नाद आणि आनंदी हास्याचे फवारे: ॲनीच्या कल्पनाशक्तीला नवनवीन धुमारे फुटत चालले होते. अद्भुतरम्य वातावरण भासत होते. भारावून गेलेल्या ॲनीने, डायनाचा हात पकडला आणि विचारले, “हे सर्व सुंदर स्वप्न असल्यासारखे वाटत आहे, नाही का? मी कशी दिसते आहे?”

“तू खूप छान दिसत आहेस,” डायना म्हणाली.

त्या रात्रीचा कार्यक्रम म्हणजे श्रोत्यांसाठी मनोरंजनाची मेजवानीच होती. प्रिसी अँड्रयूजने गुलाबी रंगाचा रेशमी गाऊन परिधान केला होता. गळयात मोत्यांची माळ, केसात कार्नेशनची फुले माळली होती. तिने 'कर्फ्यु मस्ट नाॅट रिंग टु नाईट' ही शूर युवतीच्या प्रेमाची कविता सादर केली.

मिस्टर फिलिप्सने सीझर मृत झाल्यावर, मार्क अँटोनीचे अफाट जनसमुदायाला उद्देशून केलेले वक्तृत्व अत्यंत हृदयस्पर्शी स्वरात सादर केले.

सॅम स्लोनने एक विनोदी कविता सादर केली.

ॲनीला संपूर्ण कार्यक्रमातील फक्त एक कार्यक्रम रुचला नाही जेव्हा गिल्बर्ट ब्लीथने ‘बिंगेन ऑन द राईन’ ही युद्ध भूमीवर घायाळ जर्मन सैनिक आपला शेवटचा निरोप आपल्या जीवलगांना देताना एक हृदयस्पर्शी कारूण्यमय कविता सादर करताना ॲनी, लायब्ररीचे पुस्तक वाचत बसली. सर्वांनी टाळया वाजवल्या तेव्हा निर्विकारपणे ताठ बसली होती.

त्या घरी गेल्या तेव्हा अकरा वाजून गेले होते. घरातील मंडळी झोपली होती. घरात अंधार आणि शांतता होती. दोघीही कपडे बदलण्यासाठी खोलीत गेल्या. हळू आवाजात अजून त्यांची कार्यक्रमा विषयी गप्पा चालू होत्या. डायनाने व राहवून ॲनीला विचारले की गिल्बर्ट ब्लीथच्या सादरीकरणावर इतके दुर्लक्ष का केले. नेमकी हीच गोष्ट ॲनीला खटकली. तिने शक्य तितक्या सौम्य शब्दात डायनाला या बाबत प्रश्न विचारू नयेत असे सुचवले आणि थोडे विषयांतर म्हणून खेळकरपणे पळत पळत गेस्ट रूम मध्ये दोघींपैकी कोण प्रथम बेडवर पोहोचते अशी शर्यत लावण्याची सूचना केली आणि डायनाने लगेच उचलूनही धरली. एक दोन तीन म्हणताच दोघी दार उघडे असलेल्या गेस्ट रूममध्ये शिरल्या आणि धप्पकन् दोघींनी एकाचवेळी बेडवर उडी मारली.

a

त्याक्षणी कोणाच्या तरी मोठ्याने किंचाळण्याच्या पाठोपाठ वेदनेने कळवळण्याचा आवाज आला. "अरे देवा!" एका वयस्कर स्त्रीचा आवाज ऐकू आला. दोघीही भीती थरथरत कशा-बशा खोलीच्या बाहेर पडल्या आणि त्यांनी थेट माडीवरची बेडरूम गाठली.

"डायना, खोलीत कोण होते?" ॲनीने विचारले, भीतीने तिची गाळण उडाली होती.

"ती जोसेफिन आंटी होती," डायना आता थोडी सावरली होती. "आता ती प्रचंड रागावणार हे नक्की. खूप मोठा गडबड गोंधळ झाला आहे."

"जोसेफिन आंटी तुझ्या कोण लागतात?" ॲनीने विचारले.

"ती माझ्या वडिलांची आत्या आहे आणि ती शार्लोटटाऊनमध्ये राहते. ती भयंकर खाष्ट म्हातारी आहे. लहान मुलांची दंगामस्ती तिला अजिबात आवडत नाही. इथे आली की सर्वांना सतत रागावत असते. ती येणार आहे हे माहिती होते पण आजच येईल आणि गेस्ट रूममध्ये दार उघडे ठेवून झोपेल यांची मला खरंच कल्पना नव्हती. आता उद्या काय पुढ्यात वाढून ठेवले आहे देव जाणे." असे डायनाने म्हटल्यावर नाही म्हणले तरी ॲनी पण घाबरून गेली.

दुसऱ्या दिवशी रात्रीच्या गोंधळाची काहीच कल्पना नसलेल्या मिसेस बॅरी, डायना आणि ॲनी दोघींना उद्देशून म्हणाल्या, "करमणुकीचा कार्यक्रम कसा झाला? तुम्हाला परतायला बराच वेळ लागला मी तोपर्यंत जागी राहण्याचा प्रयत्न केला पण नकळतपणे डोळा लागला. तुम्हाला जोसेफिन आंटी आल्याचे सांगायचे राहून गेले. त्यामुळे तुम्हाला माडीवर तुमच्या खोलीत झोपायला लागले."

डायना शहाणपणाने यावर काहीच व्यक्त झाली नाही. ब्रेकफास्ट झाल्यावर ॲनी लगेच घरी गेली. दुपारी उशीरा मारिलाच्या कामासाठी मिसेस लिंड यांच्या घरी

a

जाईपर्यंत तिला बॅरींच्या घरातील झालेल्या रणधुमाळी विषयी काहीच कल्पना नव्हती.

मिसेस लिंड यांनी गेल्या गेल्या ॲनीला फैलावर घेतले, “तर, काल रात्री तू आणि डायनाने म्हाताऱ्या जोसेफिन बॅरीला म्हणे मरणाचे घाबरवून सोडले आहे मघाशी जोसेफिन म्हणत होती, नेमका काय प्रकार घडला? डायनावर तर फारच संतापली होती.”

“नाही यात डायनाचा काही दोष नव्हता, मीच शर्यत लावली होती.” ॲनीने कबुली दिली.

“तरी मला वाटलेच की हे तुझेच डोके असणार,” मिसेस लिंड आपला अंदाज अचूक ठरल्याच्या समाधानात म्हणाल्या.

“मघाशी डायनाची आई आली होती तेव्हा सांगत होती, अगोदरच मिस जोसेफिन कडक स्वभावाबद्दल प्रसिद्ध आहे, ती त्यात झोपेत असताना अचानक अंगावर झेप घेतलेली तिच्या तब्बेतीला पण त्रासाची ठरली. महिनाभर राहायला म्हणून ती आली होती पण आता उद्या लगेच परत जाणार आहे. डायनाशी तर तिने बोलणेच सोडून दिले आहे. डायनाच्या संगीत शिक्षणाचा खर्च ती करणार होती पण आता अशा धटिंगण मुलीसाठी काहीही करणार नसल्याचे तिने घोषित केले आहे.”

“अरेरे! मी किती दुर्दैवी मुलगी आहे? माझ्याकडून सारख्या काही ना काही चुका होतात आणि आता तर त्यामुळे माझी प्रिय मैत्रीण अडचणीमध्ये आली आहे. असे का होते याबद्दल मिसेस लिंड तुम्ही काही सांगू शकाल काय?"

“तू खूप निष्काळजीपणे आणि धांदरटपणे वागतेस. जो विचार मनात येतो त्याच्या परिणामांची तमा न बाळगता धाडकन करून किंवा बोलून मोकळी होतेस. या कारणांमुळे तू नेहमी अडचणीत येतेस असे मला वाटते शिवाय तू सतत विचारात आणि नवनवीन कल्पना करण्यात बुडून गेलेली असतेस.”

a

"खरे तर एखादी कल्पना किंवा मनात स्फुरते, तेव्हा एकदम भारी वाटते. जर तुम्ही विचार अथवा कल्पना करण्याचाच त्याग केला तर मग नवीन काहीही घडणे अशक्य आहे. मिसेस लिंड, तुम्हाला असे कधीच काही वेगळे सुचत नाही का?"

मिसेस लिंड यांनी समंजसपणे मान हलवली आणि म्हणाल्या, "त्याबरोबरच तुला परिणामांचा पण विचार करायला पाहिजे. निदान उडी मारण्यापुर्वी आपण कुठे उडी मारत आहोत हे तरी पाहायला हवे."

मिसेस लिंड यांच्या सल्ला ॲनीला कितपत मानवतो यात शंकाच होती. त्यांच्या कडून निघतांना ती बॅरींच्या घराकडे तिची पावले आपसूकच वळली. दारात डायना भेटली.

"जोसेफिन ऑंटी खूप रागावलेल्या काय?" ॲनीने कुजबुज त्या स्वरात विचारले.

"होय," बैठकीच्या खोलीच्या बंद दाराकडे घाबरून बघत डायना म्हणाली.

"खरोखरच ती प्रचंड संतापलेली होती. मला खूपच बोलणी खावी लागली. माझ्या इतकी वाईट मुलगी कुठे पाहिली नाही असे म्हणत होती. मला चांगली शिकवण दिली नाही म्हणून आई बाबांची पण चांगलीच खरडपट्टी काढली. आता लगेच निघून जाणार आहे. मला फारसा फरक पडत नाही पण आई बाबा तिच्या बोलण्याने बरेच दुखावले गेलेत आणि माझ्यामुळे ती मुक्काम लगेच हालवणार म्हणून काळजी करत आहेत."

"यात तुझी काहीच चूक नव्हती. या प्रकरणात दोषी मी आहे हे तू सांगायला हवे होतेस." ॲनीने विचारले.

"छे! छे! मी असे कसे म्हणेन? मी, तुझ्यावर सर्व दोष टाकून स्वतः सही सलामत बाहेर पडण्याचा विचार सुद्धा करू शकत नाही आणि दोषच द्यायचा झाला तर तुझ्या इतकीच मी पण दोषी होते."

a

“ठिक आहे , मी स्वतः जाऊन त्यांना सर्व खुलासा करते,” ॲनी म्हणाली.

“ॲन शर्ली, तू काहीच करणार नाहीस! तसे झाल्यास-ती तुला जिवंत खाईल!”

“मी अगोदरच घाबरले आहे, मला जास्त घाबरवून सोडू नकोस. तोफेच्या तोंडी जायची माझी तयारी आहे पण मला हे करायलाच हवे. ही माझी चूक होती आणि मला कबूल करावे लागेल. सुदैवाने मला चूक कबूल करण्याचा सराव आहे.”

“ठीक आहे, ती खोलीत आहे,” डायना म्हणाली. “तुला हवे असल्यास तू आत जाऊ शकतेस. मी धाडस करणार नाही. आणि तू जे करत आहेस त्यांचा काही फायदा होईल असे मला वाटत नाही.”

ॲनीने सिंहाच्या गुहेत शिरण्यासाठी मनाची तयारी केली आणि बैठकीच्या खोलीच्या दाराकडे निर्धाराने गेली आणि हळूच दार ठोठावले. “आत या” एक कठोर स्वर ऐकू आला. ॲनी आत आली.

मिस जोसेफिन बॅरी, एक बारीक चणीच्या, जून्या शिष्टाचारांत मुरलेल्या एक कडक शिस्तीच्या श्रीमंत वृध्द स्त्री होत्या. सध्या फायर प्लेस जवळ विणकाम करत बसल्या होत्या. काल रात्री त्या प्रसंगामुळे आलेला राग अजून शमला असल्याचे दिसत नव्हते. सोनेरी फ्रेमच्या चष्म्यातून दोन रागीट डोळे, डायनाला पाहण्याच्या अपेक्षेने दाराकडे वळले. कुठल्याही प्रसंगाला तोंड देण्यासाठी धैर्य एकवटून एक अनोळखी मुलगी दारात उभी होती.

“तू कोण आहेस?” मिस जोसेफिन बॅरीनी प्रश्न केला.

“मी ग्रीन गेबल्सची ॲनी आहे,” थरथरत्या आवाजात ॲनी म्हणाली. “तुम्ही ऐकणार असाल तर, मी माझ्या चुकीची कबुली देण्यासाठी आले आहे.”

“कोणत्या चुकीची कबुली?”

a

“काल रात्री आपल्या बेडवर उडी मारण्याची चूकीला मी जबाबदार आहे. मी जर तसे सुचवले नसते तर डायना कधीच असे लागली नसती याची मला खात्री आहे. मिस बॅरी, डायना ही खूप सभ्य, सुसंकृत मुलगी आहे. त्यामुळे माझ्या चुकीसाठी तिला दोष देणे अन्यायकारक आहे हे आपण लक्षात घ्यावे अशी मी आपणाकडे प्रार्थना करत आहे.”

“अन्यायकारक? दुसऱ्या कुणी सुचवले असले तरी डायनाने अंथरुणावर उडी तर मारलीच ना? सभ्य सुसंस्कृत मुलगी, असे चुकीचे कसे काय वागू शकते?”

“आम्ही गंमत करत होतो,” ॲनीने आपली बाजू लढवत राहिली. “मिस बॅरी आम्ही क्षमायाचना मागितली आहे आता तुम्ही आम्हाला माफ केले पाहिजे. कसेही करून डायनाला क्षमा करा, तिला संगीत शिकू द्या. तिला मनापासून संगीत शिकण्याची इच्छा आहे. एखादी गोष्ट करण्याची मनापासून इच्छा असेल आणि जर ती इच्छा पूर्ण झाली नाही म्हणजे कसे वाटते, याची मला पूर्ण कल्पना आहे. तुम्हाला कुणावर रागवायचे असेल तर तर माझ्यावर खुशाल रागवा. मला लोकांचा राग सहन करण्याची लहानपणापासून सवय आहे, डायना आपला राग सहन करु शकणार नाही.”

मिस जोसेफिन बॅरीच्या डोळ्यातील राग थोडा निवळल्यासारखा दिसत होता पण तरीही थोड्या कठोरपणे त्या ॲनीला म्हणाल्या, “माझा तुम्ही निव्वळ गंमत करत होतात या गोष्टीवर विश्वास नाही. आम्ही कधी लहानपणी असली गंमत केली नाही. एक तर मी एव्हढ्या मोठ्या खडतर प्रवासानंतर थकून झोपले होते आणि त्यात तुम्ही दोघींनी एकदम अंगावर उडी मारल्याने माझी काय हालत झाली हे तुम्हाला माहीत नाही.”

“मला खरोखरच माहित नाही पण मी कल्पना करू शकते. तुम्हाला खूप त्रास झाला असणार यात शंकाच नाही. पण आमच्या बाजूने विचार केला तर त्रास

a

आम्हाला पण झाला. तुम्ही फक्त कल्पना करावी की आमच्या जागी तुम्ही असता तर तुम्हाला कसे वाटले असते. त्या पलंगावर कोणी झोपले असेल याची आम्हाला काहीच कल्पना नव्हती. उडी मारल्यावर जेव्हा तुमचे किंचाळणे ऐकू आले तेव्हा आम्हाला मरणाची भीती वाटली. अतिशय भयंकर असा अनुभव होता. आम्हाला गेस्ट रूममध्ये झोपायला परवानगी दिली होती पण आम्ही झोपू शकलो नाही. तुम्हाला अशा भव्य बेडरूममध्ये झोपायची सवय आहे, तुम्हाला त्याची अपूर्वाई असण्याचे कारण नाही. पण जर तुम्ही एक अनाथ मुलगी असता आणि तुम्हाला अशा घरात पाहुणे म्हणून राहण्याचा सन्मान मिळाला असता आणि त्याऐवजी अशी फटफजिती झाली असती तर तुमच्या मनाची काय अवस्था झाली असती?"

एव्हाना मिस जोसेफिन बॅरीचा सगळा राग निघून गेला होता. आणि त्या हसू लागल्या. तो आवाज ऐकल्यावर किचनच्या दारात बेचैन होऊन उभ्या असलेल्या डायनाच्या जीवात जीव आला. तिला मोठा दिलासा मिळाला होता.

"माझ्या कल्पनाशक्तीला बहूधा न वापरल्याने गंज चढला असावा. पण तू म्हणतेस ते पण बरोबर वाटते. आपण कोणत्या बाजूने विचार करतो त्यावरून आपले मत बनते. इथं बस आणि मला तुझी संपूर्ण माहिती सांग," मिस जोसेफिन बॅरी प्रेमळपणे म्हणाल्या.

"मला माफ करा, आता मी इथे जास्त वेळ थांबू शकत नाही. मला तुमच्या बरोबर बोलायला आवडले असते पण आता घरी मारिला माझी वाट पाहत असेल. ती एक अतिशय दयाळू स्त्री आहे, माझे पालनपोषण योग्य प्रकारे होण्यासाठी दक्ष आहे पण तसे पाहिले तर हे काम इतके सोपे नाही. आपल्या बेडवर मी मारलेल्या उडी बद्दल तुम्ही मारिलाला जबाबदार धरू नये. पण मी आपला निरोप घेण्यापूर्वी पुन्हा एकदा आपल्याला विनंती करते की आपण डायनाला माफ करावे आणि

a

आपल्याला जितके दिवस ॲव्हनली मध्ये राहायचे असेल तितके दिवस रहावे आमच्यावर रागावून लौकर निघून जाऊ नये.”

“तू जर अधूनमधून मला भेटायला आणि माझ्याबरोबर गप्पा मारायला येणार असशील तर मी माझा बेत बदलेन.” त्यादिवशी संध्याकाळी जोसेफिन ऑटीनी डायनाला एक सुंदर ब्रेसलेट दिले आणि घरच्या मंडळींना सांगितले फक्त त्या मुलीची--ॲनीची चांगली ओळख व्हावी म्हणून थोडे दिवस थांबण्याचा निर्णय घेतला आहे, तिच्या बरोबर छान वेळ गेला आणि मनाची करमणूक पण झाली. माझ्या आयुष्यात गमतीजमती करून हसवणारी आणि मन प्रसन्न करणारी व्यक्ती दुर्मिळ आहे आणि नोकर मंडळींना प्रवासासाठी केलेली बांधाबांध सोडून परत सामान त्यांच्या खोलीमध्ये ठेवायला सांगितले.

त्यानंतर मिस बॅरी महिनाभर राहिल्या. यावेळी त्यांचे वास्तव्य घरातील सर्वांना नेहमी पेक्षा जास्त अनुकूल झाले. ॲनीची त्यांच्या बरोबर चांगलीच मैत्री झाली. त्यांच्या निरस आयुष्यात, अवखळ पण निर्व्याज अशा बालपणातील आनंदाची नव्याने ओळख झाली.

परत आपल्या गावी परततांना मिस जोसेफिन बॅरीनी ॲनीला निक्षून सांगितले, “जेव्हा कधी तू आमच्या गावात येशील तेव्हा तू मला भेटायला आले पाहिजे. मी माझ्या सर्वात मोठ्या गेस्ट बेडरूममध्ये तुझ्या झोपायची व्यवस्था करेन.”

“मिस बॅरी, यांच्या मनात माझ्या विषयी एकप्रकारची आत्मीयता वसत होती,” ॲनीने मारिलाला सांगितले.” परंतु त्यांच्याकडे पाहिल्यावर तसे वाटत नव्हते पण ते खरे नव्हते, तसे की मॅथ्यूंच्या बाबतीत सुरवातीला जाणवले नाही पण नंतर मात्र त्यांची ममता जाणवली. तसे पाहायला गेले तर या जगात कनवाळू प्रेमळ माणसे दुर्मिळ नाहीत. त्यांचा शोध घेतला तर अशा अनेक व्यक्ती नक्कीच सापडतील.”

# प्रकरण 20

ग्रीन गेबल्समध्ये वसंत ऋतू पुन्हा एकदा आला होता—अकल्पितपणे सुंदर पण थोडासा छंदिष्ट वसंत हलक्या पावलांनी अलगदपणे एप्रिल मे महिन्यात कॅनडात अवतीर्ण झाला. गोठलेला हिवाळा हळूहळू संपायला लागला होता पण दिवस अजून थंडीचे होते, सृष्टीच्या जीवनचक्रात हळूहळू बदल जाणवू लागले होते. झाडांच्या अंगोपांगी वाढीच्या खुणा दिसू लागल्या होत्या. संध्याकाळचे आकाश गुलाबी, सोनसळी रंगांनी माखून निघायला लागले होते. डायना आणि ॲनीच्या शाळेला जाण्यायेण्याच्या स्वप्न रस्त्यावरच्या मेपलला लाल रंगच्या कळयाचे अंकुर फुटले. वाटेतील ओढ्याच्या काठी हिरव्या कोवळया फर्नच्या रोपटी एकमेकांना खेटून वाढायला लागली. मि. सिलास स्लोगन यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या ओसाड माळरानावर मेफ्लॉवर बहरले होते. पांढऱ्या आणि गुलाबी रंगाच्या मेफ्ला ॅवरनी सारे माळरान फुलून गेले होते. ॲव्हनलीच्या शाळेतील मुले मुली एका दुपारी या माळरानावर एकत्र जमली होती. मनसोक्तपणे फुले गोळा करून हसत खेळत वेळ कसा गेला कुणाच्याही ध्यानात राहिले नाही. संध्याकाळच्या संधीप्रकाशात मुले हातामध्ये फुलांनी भरलेली बास्केट घेऊन गाणी गुणगुणत घरी परतली.

“मारिला ज्या देशांत मेफ्लावर उगवत नसतील, त्या देशातील लोकांबद्दल मला वाईट वाटते,” असे शाळेतून फुलांनी भरलेली बास्केट घेऊन आल्यावर ॲनी म्हणाली. “पण डायनाच्या मते अशा देशात अन्य काही चांगले असू शकेल. पण

मला तर मे फ्लावर पेक्षा चांगले काही असेल असे वाटत नाही. शिवाय त्या लोकांना जर मेफ्लावर म्हणजे काय, हेच जर माहित नसेल तर त्यांना ते नसण्याचे दु:ख वाटण्याचे कारण नाही. माझी अशी कल्पना आहे की ही फुलणारी फुले म्हणजे मागील वर्षाच्या उन्हाळयात मेलेल्या फुलांचे आत्मे असून तेच परत येत असावेत आणि हा त्यांचा स्वर्ग असावा.

“आज दुपारचा डबा आम्ही एका जून्या विहीरीजवळच्या मोठ्या झाडाखाली बसून खाल्ला. मुलांच्या खूप दंगामस्ती सुरू होती. फिलिप्स सरांनी प्रिसीला आपण गोळा केलेली फुले दिली आणि म्हणाले, 'गोड भेट स्विकारावी', मला पण एकाने फुले देऊ केली पण मी स्विकारली नाहीत. त्या व्यक्तीच्या नांवाचा मी उच्चार सुध्दा करत नाही. आम्ही फुलांचे पुष्पगुच्छ बनवले, माळा बनवल्या. मी टोपीला फुलांनी सजवले आणि एकमेकांच्या हात हात घालून ओळीने गाणी म्हणत तिथून निघालो.

“मि. स्लोनच्या शेतातील माणसे आम्हाला पहायला हातातील कामे सोडून उभी होती.”

“निव्वळ मूर्खपणा!” मारिलाने फटकळ प्रतिक्रिया दिली.

मे फ्लावर नंतर व्हायोलेटची पाळी होती. व्हायलेट व्हॅलीचा नजारा काही आगळाच दिसत होता. या वाटेवरून ॲनी भारावलेल्या सारखी चालत असे. डायनाला उद्देशून ॲनी म्हणाली, “हे सारे निसर्ग सौंदर्य पाहून मंत्रमुग्ध व्हायला होते, इथे मला जगाची पर्वा वाटत नाही. वर्गात कुणाचा नंबर पुढे आहे की मागे हा विचार मनात सुद्धा येत नाही. इथे मी वेगळीच ॲनी असते आणि शाळेत वेगळी असते. घरी अजून वेगळी, तुझ्या बरोबर तर त्याहून वेगळी, खरंतर मला याचा त्रास होतो. वाटते मी सगळीकडे सारखीच असतात हवी होते. पण विचारांती असे लक्षात आले की

एकच ॲनी असणे आरामदायी झाले असते पण त्यामुळे मला काही आनंददायी गोष्टींना मुकावे लागले असते.”

जून महिन्याची संध्याकाळ, ॲनी तिच्या पूर्वेकडील उतरत्या छप्पराच्या खोलीत अभ्यास करत बसली होती. उजेड कमी झाल्याने वाचन थांबवून खिडकीतून बाहेर बघत बसली होती. तिने नामकरण केलेले ‘स्नो क्वीन' आता परत फुलांनी बहरलेली दिसत होती. बाग फुलांनी फुलून गेली होती. हवेत उबदारपणा जाणवत होता आणि एक प्रकारचा मधाळ गंध दरवळत होता.

ॲनीच्या खोलीत फारसे दृश्यमान बदल केले गेले नव्हते पण खोलीचा नूर पालटून गेला होता. आता ती एका शाळकरी मुलीची खोली म्हणून ओळखू येत होती. वह्या पुस्तके टेबलावर पसरलेली होती. एका निळया रंगाच्या फुलदाणी मध्ये सफरचंदाच्या मोहरलेल्या डहाळी पासून पुष्परचना केली होती. तेव्हढ्यात मारिला तिथे ॲनीने इस्त्री केलेले कपडे घेऊन आली आणि थोडीशी तिथे विसावली. दुपारपासून ठणकणारे तिचे डोके थोडे दुखायचे थांबले होते पण त्यामुळे थकवा जाणवत होता.

ॲनी मारिलाला म्हणाली, “तुमची डोकेदुखी मला मागून घेता आली असती तर मी ती सहन केली असती.”

“पण तू आज माझे कितीतरी काम हलके केले आहेस शिवाय आज कामामध्ये नेहमी प्रमाणे जास्त चुका केलेल्या दिसत नाहीत फक्त मॅथ्यूच्या रुमालाला स्टार्च करण्याची गरज नव्हती आणि जेवणासाठी ओव्हनमध्ये फक्त गरम करायला ठेवलेली 'पाई' करपून काळी पडली होती.” मारिला म्हणाली.

“मला क्षमा करावी मी ओव्हन मध्ये 'पाई' गरम करत ठेवलेली पूर्ण विसरून गेले. खरंतर आज सकाळी तुमचे डोके दुखायला लागल्यावर मी कामात असताना, कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विचारांना डोक्यात येऊ द्यायचा नाही असा निश्चय

केला होता. पाई ओव्हनमध्ये ठेवेपर्यंत मी त्या निर्णयाला चिकटून सुध्दा राहिले पण मनात अचानक कल्पना स्फुरली की मी एका एकाकी मनोऱ्यावर बंदीवान असलेली राजकन्या आहे आणि माझी सुटका करण्यासाठी एक देखणा राजकुमार काळ्या घोड्यावर बसून दौडत दौडत येत आहे मग मला ओव्हनमध्ये ठेवलेली पाई बाहेर काढायचा विसर पडला.

"काल जंगलात आतवर गेल्यावर आम्हाला ओढ्यावर एक छोटेसे बेट बनलेले दिसले. तिथे दोन मेपलची झाडे आहेत. खूपच सुंदर जागा आहे. इस्त्री करत असताना मी त्या बेटाला काय नाव द्यावे याचा विचार करत होते. त्याला आम्ही 'व्हिक्टोरिया बेट' हे नाव नक्की केले आहे कारण राणीच्या वाढदिवसाच्या दिवशी आम्ही ते ठिकाण शोधून काढले. मला करपलेल्या पाई बाबत आणि स्टार्च केलेल्या रुमालाबद्दल खूप वाईट वाटत आहे. खरे तर आज मला कोणतीही चूक होऊ द्यायची नव्हती. आज एका घटनेचा वर्धापन दिवस आहे. मारिला, मागच्या वर्षी या दिवशी काय घडले ते तुम्हाला आठवते का?"

"नाही, मी काही विशेष घडल्याचे आठवत नाही."

"आज मी ग्रीन गेबल्समध्ये येऊन बरोबर एक वर्ष पूर्ण झाले. हा दिवस मी कधीच विसरणार नाही. माझ्या आयुष्यातील तो एक महत्वाचा टर्निंग पॉइंट होता. तुम्हाला त्यांचे विशेष महत्त्व वाटत नसेल पण मी इथे एक वर्षापासून आहे आणि खूप आनंदात आहे. माझ्या मुळे बऱ्याच समस्या निर्माण झाल्या पण त्यावर निराकरण करता आले. मारिला मला इथे आसरा दिल्याबद्दल तुम्हाला पश्र्याताप होत आहे काय?"

"नाही" मारिला पटकन म्हणाली. कधी कधी तर तिला ॲनी येण्यापूर्वी आपण ग्रीन गेबल्समध्ये कसे जगतो होतो याचे आश्चर्य वाटत असे.

a

“तुला इथे ठेऊन घेण्यासाठी पश्र्याताप नक्कीच नाही, पण थोडी बडबड, गडबड, वेंधळेपणा यांचा मात्र त्रास होतो. जरा कामाची गोष्ट ऐक: तुझा अभ्यास झाला असेल तर धावत जाऊन मिसेस बॅरीच्या कडून डायनाच्या ऍप्रनचा पॅटर्न मागून आण."

“आत्ता? आता खूप अंधार पडला आहे.” ॲनी कुरकुरली.

“खूप अंधार? तो कुठे, चांगला संधिप्रकाश तर आहे आणि मला माहीत आहे की अंधार पडल्यानंतर तू बरेचदा डायनाकडे गेलेली आहेस.”

“मी सकाळी लवकर जाईन,” ॲनी उत्सुकतेने म्हणाली. "मारिला, मी सूर्योदयाला उठेन आणि बॅरींच्या घरी जाईन.”

“हे आज नवीन कोणते खूळ डोक्यात घेतले आहेस? मला लगेच त्यावरून तुझा ऍप्रन बेतायचा आहे. पटकन उठ आणि चटकन निघ."

“मग मला लांबच्या रस्त्याने जावे लागणार,” आपली टोपी उचलत ॲनी नाखुशीने म्हणाली.

“मग अजून अर्धा तास जास्त वेळ लागेल. मला थोडी घाई होती,” मारिला म्हणाली.

“मारिला, पण मी झपाटलेल्या झाडांजवळून जाऊ शकत नाही."

मारिला तिच्याकडे अचंबित होऊन पाहतच राहिली.

“झपाटलेली झाडे? तू वेडी बिडी झाली आहेस काय? कुठले झाड झपाटलेले आहे?"

“ओढ्याच्या काठावरचे फरचे जे मोठे झाड आहे ते झपाटलेले आहे.” ॲनी हळू आवाजात कुजबुजली.

“हा काय मूर्खपणा आहे? अशी कुठे झपाटलेली झाडे असतात काय? कोणी तुला सांगितले?"

a

"कोणी नाही, मी आणि डायनाने तशी कल्पना केली, गंमत म्हणून काहीतर भयंकर असे गोष्ट रचण्याचे ठरवले. म्हणून वाटेवरच्या फरच्या बनातले सर्वात मोठे झाड निवडले. रात्रीच्या वेळी पांढरे कपडे घातलेली एक बाई तिथे रडत ओरडत असते. घरात कोणाचा मृत्यू येणार असेल तर ती हमखास दिसते, एका लहान मुलांचे भूत पण तिथे आहे ते मागून येऊन आपल्या थंडगार बोटांनी तुमच्या हाताला स्पर्श करत असते, एक डोके नसलेला माणूस झाडे तोडताना दिसतो आणि त्या झाडाच्या फांदीवर एक सांगाडा लटकत असतो. अशी ती गोष्ट आहे. मारिला मला आता तिथून जाण्याची भीती वाटते. अंधार पडल्यानंतर मी आता कशासाठीही झपाटलेल्या झाडाजवळून जाणार नाही. मला खात्री आहे की झाडांच्या मागून हे सर्व बाहेर येतील आणि मला पकडतील."

"इतर कोणी असे बोलतांना तू कधी ऐकले आहे काय? मला एक गोष्ट सांग, ही जी काही तू कल्पना बनवलेली आहेस त्यावर तुझा विश्र्वास आहे?" मारिला तिच्या मूर्खपणावर पार उखडली होती.

"नाही माझा विश्वास नाही. पण ते फक्त दिवसाच्या उजेडात, रात्री सर्व गोष्टी वेगळ्या असू शकतात, तेव्हा भुतांचा दिवस असतो."

"ॲनी एक गोष्ट कायमची लक्षात ठेव, भूत बीत असे काही नसते," मारिला समजावत म्हणाली.

"असतात मला माहित आहे पण चार्ली स्लोन सांगतो की त्याच्या आजींनी मेल्यावर एका रात्री गायी घरी चरवून आणतांना त्यांच्या मृत पतीना गोठ्यात पाहिले. त्या तर खोटे बोलणार नाहीत. त्या खूप धार्मिक वृत्तीच्या आहेत. मिसेस था ॅमसच्या वडिलांना त्यांच्या भावाचा आत्मा भेटला होता, एका कोकराचे रूप घेऊन तो आला होता आणि त्याने सांगितलल्याप्रमाणे त्यांचा मृत्यू ओढवला. रुबी गिलिस म्हणते—"

a

“ॲनी शर्ली,” मारिला ठामपणे म्हणाली, “मला याप्रकारचे बोलणे पुन्हा कधीही तुझ्या तोंडून ऐकायचे नाही. तुझे नेहमीचे कल्पनेच्या मनोराज्यात रमणे मला अगोदर फारसे आवडत नाही आणि जर त्याची परिणीती या प्रकारच्या कल्पनांमध्ये होत असेल आणि त्या तू खऱ्या मानायला लागलीस तर मी हे चालवू देणार नाही. तू आता लगेच बॅरींच्या घरी जाण्यासाठी निघ आणि फरच्या बनातील रस्त्याने जा, तुला एक चांगला धडा मिळायला हवा. एक शेवटची गोष्ट सांगते तुझ्या डोक्यात परत कधी झपाटलेल्या झाडाविषयी एखादा शब्द येतात कामा नये.”

ॲनीने बराच युक्तिवाद केला, विनवणी केली शेवटी रडायला लागली--तिला खरोखरच भीती वाटत होती. तिच्या मनाने पक्की धारणा झाली होती की रात्रीच्या वेळी फरच्या बनातून जाणारा रस्ता भयंकर भीतीदायक असणार आहे. पण मारिला विचलित झाली नाही. भुताच्या अस्तित्वावर विश्र्वास असणाऱ्या, भीतीने गाळण उडालेल्या ॲनीला, मारिलाने फरच्या बनातल्या, डोके नसलेल्या भुताच्या मार्गावरून जाऊन लगेच परतण्याची आज्ञा फर्मावली.

“अरे, मारिला, तुम्ही इतका क्रूर कशा होऊ शकता?” ॲनी रडत म्हणाली. "एखाद्या पांढरे भूत मला हिसकावून घेऊन निघून गेले तर तुम्हाला काय वाटेल?”

"मी धोका पत्करेन,” मारिला निर्विकारपणे म्हणाली. “तुला माहित आहे की मी योग्य तेच बोलते. मला तुझ्या कल्पनेतील भूतांच्या तावडीतून तुझी सुटका करायची आहे. चल पुढे हो.”

खरोखरच जीव मुठीत धरून ॲनी पळत होती. वाटेत पुलावर तिची पावले अडखळली, पलीकडच्या अंधेऱ्या वाटेने थरथरत पुढे गेली. तिच्या कल्पनेतील भूत झाडांच्या प्रत्येक सावलीत तिला दिसत होते. बर्च झाडाची पांढरी फांदी पाहून तिचे हृदय धडधडायला लागले. झाडांच्या दोन जुन्या पुराण्या फांद्या वाऱ्याने एकमेकींना घासून करकर आवाज येत होता. त्या आवाजाने तिचे कपाळ घामेघूम झाले.

झाडांच्या वरच्या बाजूला लटकलेली वटवाघुळांची टोळी, एखाद्या गूढ अस्तित्वाची जाणीव करून देत होती. मागे भुतांची फलटण लागल्या प्रमाणे ती मिस्टर विल्यम बेलच्या शेतातून मिस्टर बॅरींच्या दारात पोहोचली. मिसेस बॅरींना ऍप्रनचा पॅटर्न मागण्यासाठी तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. ऍप्रनचा पॅटर्न घट्ट हातात धरून आता त्याच भयावह मार्गाने ग्रीन गेबल्समध्ये परतायचे दिव्य बाकी होते. पांढऱ्या भूताला पाहण्यापेक्षा, वाटेत धडपडून पडले तरी बेहत्तर म्हणून डोळे मिटून पळण्याचा निश्चय केला होता. शेवटी अडखळून पडली सुध्दा. तो लाकडी ओंडक्याचा पूल ओलांडल्यावर तिने सुटकेचा निःश्वास सोडला.

"बरं, मग तुला कुणी पकडलं नाही?" मारिला कोरडेपणाने म्हणाली.

"ओह, मार— मारिला, या पुढे मी साध्या साध्या गोष्टींमध्ये संतुष्ट राहीन," थकलेली ॲनी एव्हढेच बोलू शकली.

# प्रकरण 21

“या जगात भेट होणे आणि निरोप देणे या दोन्ही गोष्टी कायमच घडत असतात असे मिसेस लिंड म्हणत होत्या,” शाळेतून आल्याआल्या ॲनी मारिलाला सांगू लागली. “तरी बरे, आज मी दोन हातरुमाल घेऊन गेले होते. मला कधीच वाटले नव्हते की फिलिप्स सरांना निरोप देण्यासाठी तुला डोळे कोरडे करायला दोनदोन हातरुमाल लागतील,” मारिला नेहमीच्या रोखठोक आवाजात म्हणाली.

“नक्कीच, ते काही माझे आवडते शिक्षक नव्हते की मला रडू यावे पण इतर सर्व रडत होते म्हणून मला पण रडावे लागले. जेव्हा निरोपाचे भाषण देण्यासाठी मि. फिलिप्स सरांनी सुरुवात केली आणि रुबी गिलीस एकदम रडायला लागली. खरं तर ती नेहमी फिलिप्स सर तिला आवडत नाहीत असे सांगत असते, मग एकामागून एक मुलींनी रडायला सुरुवात केली. मला मात्र रडू आले नाही. मला त्यांनी माझा भर वर्गात मला एकटीला शिक्षा केली, स्पेलिंग मधील चुकांसाठी नेहमी कठोर टीका केली, मी भूमिती मध्ये अगदीच रिम्या डोक्याची आहे म्हणून हेटाळणी केली. असे सर्व असताना मला रडू कसे येईल? पण जेव्हा त्यांनी भाषण करताना 'आता आपला निरोप घेण्याचा क्षण आला आहे' असे म्हटले, तेव्हा त्यांचे डोळे पाणावले होते, त्यांना पुढे बोलणे अवघड झाले आहे, हे पाहून मला रडू आले. मी त्यांची वर्गात गुप्तपणे टिंगल केली होती, पाटीवर त्यांची व्यंगचित्रे काढली होती, प्रिसी आणि त्यांच्याबद्दल इतर मुलींशी कुचाळक्या पण केल्या होत्या, त्याबद्दल मला भयंकर वाईट वाटले आणि पश्चात्तापाचे रडू आले. वर्गातील मुले मात्र रडली नाहीत.

a

“शाळेतून घरी येताना आम्हाला चर्चमध्ये नव्याने रुजू होणारे फादर आणि त्यांची पत्नी दिसली. त्यांची पत्नी खूप सुंदर आणि अगदी तरूण आहे. तिने फुग्याच्या निळा मलमलचा ड्रेसचा ड्रेस घातला होता. तो मला खूपच आवडला. मिसेस लिंड म्हणत होत्या की फादर आणि त्यांच्या कुटुंबीयांनी फॅशनेबल कपडे करणे बरे दिसत नाही. मला केव्हाचा फुग्याच्या बाह्याचा ड्रेस हवा आहे, मला काही मिसेस लिंड यांचे म्हणणे पटले नाही आणि ते तर नवविवाहित जोडपे आहे मग तिला तेव्हढी तरी मुभा असायला हवी नाही का? अजून त्यांच्या राहाण्याच्या जागेची थोडी स्वच्छता व्हायची आहे तोपर्यंत ते मिसेस लिंड यांच्या घरी राहणार आहेत."

त्यादिवशी संध्याकाळी मारिला, मिसेस लिंड यांचे घरी हिवाळयात त्यांच्याकडून उसनी मागून घेतलेली रजई बनवण्याची लाकडी प्रेम परत करण्याच्या हेतूने गेली होती. ॲव्हनली गावातील मंडळी अनेकदा मिसेस लिंड यांचेकडून वेगवेगळया वस्तू मागून घेऊन जात, मात्र त्या परत मिळतील या बद्दल मिसेस लिंड फारशा आशादायी नसायच्या. त्यादिवशी त्यांच्याकडून उसन्या वस्तू घेऊन गेलेल्या बायका मिसेस लिंड यांच्या घरी येऊन गेल्या. नवीन फादरना, खासकरून त्यांच्या पत्नीला पाहाण्याची सर्वांची इच्छा होती. त्या छोट्या गावात तशी प्रथा होती.

जुने फादर मिस्टर बेंटले अठरा वर्षे ॲव्हनली चर्चचे फादर होते. ते जेव्हा ॲव्हनली मध्ये आले तेव्हा विधूर होते आणि आता गाव सोडून जातांना पण विधूर राहिले होते. अनेकदा त्यांचे लग्न ठरत असल्याच्या वावड्या उठल्या पण त्या शेवटी अफवा निघाल्या. बरीच वर्षे ॲव्हनली मध्ये राहिल्याने त्यांच्या विषयी, लोकांमध्ये आदराची भावना होती. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर, चर्चच्या फादर या पदासाठी अनेक इच्छुक उमेदवारांनी, ॲव्हनलीमधील लोकांसमोर आपल्या ज्ञानाची, वक्तृत्वाची परिक्षा दिली पण गावकऱ्यांनी कुणाला पसंत केले नाही. मिसेस लिंड या सुध्दा एक कडक परीक्षक होत्या. त्यांनी मिस्टर ॲलनच्या सासुरवाडीच्या मंडळींची

पण चौकशी केली सुदैवाने ती मंडळी चांगली प्रतिष्ठीत निघाली. शेवटी सर्वानुमते मिस्टर ॲलन यांना मान्यता मिळाली.

नवीन फादर आणि त्यांची पत्नी हे एक तरुण, आनंददायी जोडपे होते. विशेषतः मिसेस ॲलन, ॲनीला फारच आवडल्या. रविवारच्या शाळेत मिसेस ॲलन यांनी शिक्षिका म्हणून काम करायला सुरुवात केली. त्यांनी मुलांना प्रश्न विचारण्यासाठी प्रवृत्त केले. ॲनीला त्यांचे बोलणे फार आवडले आणि हसणे सुद्धा, त्यांच्या गालाला खळया पडत तशा, ॲनीला आपल्या गालावर पण खळया पडायला हव्या होत्या. या पुर्वी तिला रविवारची चर्चमध्ये भरणारी धर्म शिक्षणाची शाळा, रुक्ष आणि उदास वाटत असे पण मिसेस ॲलन शिकवायला आल्यापासून हसत खेळत अभ्यास घेतला जात होता. तिला मिसेस ॲलनसारखे व्हायला आवडेल असे तिने मारिलाकडे कबूल केले.

त्यावर मारिला म्हणाली, "मला वाटते आपण नवीन फादर मि. ॲलन आणि त्यांच्या पत्नीला चहा फराळासाठी आमंत्रण द्यायला हवे. येत्या बुधवारी त्यांना बोलवायला हरकत नाही. पण मॅथ्यूच्या कानावर ही गोष्ट पडता कामा नये नाहीतर तर तो अगोदरच घरातून पळ काढेल. तसे मि. बेंटली बरोबर त्यांचे चांगले संबंध होते पण फादर ॲलन यांची ओळख करून घ्यायला विशेषतः त्यांच्या पत्नी बरोबर तो बोलायला पुढे येणार नाही."

"मी अगदी ही गोष्ट गुप्त ठेवेन, मॅथ्यूंशी या बाबत काहीही बोलणार नाही. पण मारिला मला मिसेस ॲलन साठी काहीतरी पदार्थ बनवायला आवडेल. तसा मी केक चांगला बनवते हे तुम्हाला माहीत आहे."

"ठिक आहे, तू लेयर केक बनवू शकतेस," मारिलाने कबूल केले.

सोमवार, मंगळवार दोन दिवस पाहुण्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू होती. ॲनी, डायनाला त्याची इत्यंभूत माहिती सांगत असे. "सर्व काही जय्यत

a

तयारी झाली आहे, सकाळी मी केक बनवणार, चहाच्या वेळेपुर्वी मारिला बिस्किटे बनवेल. लाल आणि पिवळया रंगाची दोन प्रकारची जेली, व्हीप्ड् क्रीम आणि लिंबू पाई, आणि चेरी पाई, फळांचा-केक, तीन प्रकारच्या कुकीज, आणि मारिलाचा खास पिवळया प्लमचा मुरांबा, जो फक्त खास पाहुण्यांसाठी राखून ठेवला जातो. या शिवाय लेअर केक आणि बिस्किटे. माझा लेअर केक बिघडणार तर नाही? अशी भीती मला लागून राहिली आहे. काल रात्री तर एक स्वप्नात लेअर केकचे तोंड असलेला, एक छोटा राक्षस माझ्यापाठी लागला होता. कसा केक होणार आहे, देव जाणे.''

''नक्कीच चांगला होईल. मागे तू बनवलेला केक किती छान झाला होता.'' डायनाने समजत काढली.

''होय, पण ऐनवेळी केक चांगला फुगला नाही तर? केक कधी कधी फसतो सुध्दा. आता फक्त मला देवावर भरवसा ठेवावा लागेल. डायना ते इंद्रधनुष्य पाहिलेस काय? आपण इथून गेल्यावर या धबधब्याची छोटी परी ते स्कार्फ म्हणून घेईल असे वाटते.'' ॲनी परत कल्पनेच्या राज्यात रमायला लागली.

अलीकडे झालेला फरच्या बनातील झपाटलेल्या झाडाची गोष्ट, डायनाच्या आईच्या कानावर गेल्याशिवाय राहिली नव्हती. तिने तिखटपणे डायनाची कानउघडणी केली की कल्पनांची भूते निर्माण करण्याचे नस्ते उपद्व्याप बंद करा. तेव्हा या 'परीकथेवर पण विश्वास न ठेवणे योग्य', असा सूज्ञ विचार तिने केला आणि ॲनीच्या बोलण्याला दुजोरा देण्याऐवजी शांत राहणे पसंत केले.

बुधवारी सकाळी ॲनीला उठवत नव्हते, आदले दिवशी संध्याकाळी झऱ्याच्या थंड पाण्यात केलेली दंगामस्ती भोवली होती. डोके जड होऊन सर्दी झाली होती. पण आजचा दिवस स्पेशल होता, मामुली सर्दी तिला केक बनवायला रोखणार नव्हती. ब्रेकफास्ट झाल्या झाल्या तिने केक बनवायला घेतला आणि एकदा

a

ओव्हनमध्ये ठेवून ओव्हनचे दार बंद केल्यावर निश्र्वास टाकला. मग वेगळीच काळजी करत राहिली. बेकिंग पावडर चांगली नसली तर, केक चांगला जाळीदार झालाच नाही तर, काही विसरले तर नाही ना, एक ना दोन अनेक गोष्टी चिंता वाढवत होत्या. शेवटी मारिला काहीशा तुटकपणे म्हणाली, “आपण काही प्रथमच केक बनवत नाही आहोत आणि आपला केक नेहमीच उत्तम बनतो.” आणि झाले ही तसेच, केक सुंदर सोनेरी रंगावर भाजला गेला होता आणि छान फुलून आला होता. त्यावर लाल रंगाच्या जेलीचे थर पसरवून झाले, तेव्हा कुठे ॲनीला हायसे वाटले. तिने पाहुण्यांसाठी खास राखून ठेवलेला टि-सेट आणि अन्य क्रोकरी काढून स्वच्छ करून बाजूला ठेवली आता टेबल डेकोरेशन साठी बागेतील गुलाब वापरण्याची ॲनीने मारिलाची परवानगी विचारली. मारिलाला ते फारसे पसंत पडल्याचे दिसत नव्हते पण तरीही तिने ॲनीला होकार दिला मात्र डेकोरेशन करताना चहा फराळ मांडायला आवश्यक जागा राहील याची काळजी घेण्यास सांगितले.

ॲनीने भरपूर गुलाब आणि फर्न यांची एक अतिशय कलात्मक अशी सजावट केली. त्या बद्दल फादर ॲलन आणि त्यांच्या पत्नीने खूपच कौतुक केले. सर्व सजावट ॲनीने केली असल्याची माहिती मारिलाने दिली. मिसेस ॲलन सजावट पाहून खुश झाल्यामुळे ॲनीला आनंद झाला.

मॅथ्यू अत्यंत नाईलाजाने पार्टीसाठी घरी थांबले होते. मारिलाने त्यांच्यावर एव्हढ्या सूचनांचा भडीमार केला होता की ते जास्तीच बुजल्यासारखे झाले, पण ॲनीने त्यांना चतुराईने बोलते केल्याने ते टापटीप पोशाख करून फादर ॲलन बरोबर बोलत होते अर्थात त्यांनी मिसेस ॲलन बरोबर बोलणेच काय पण बघणे सुद्धा टाळले होते.

टेबलावर इतक्या विविध प्रकारच्या पदार्थांची रेलचेल झाली असल्याने, जेव्हा ॲनीने बनवलेला लेअरचा केक पुढे केल्यावर मिसेस ॲलन यांनी आता पुरे

असे सांगितले तेव्हा मारिलाने विशेष आग्रह करून ॲनीने मुद्दाम त्यांच्यासाठी बनवला अशी पुस्ती जोडली. मिसेस ॲलननी आग्रहास्तव केकच्या तुकडा उचलला आणि खायला सुरुवात केली पण काही बोलल्या नाहीत. मारिलाला त्यांच्या चेहऱ्यावर काही वेगळेच भाव दिसले म्हणून तिने स्वतः केक चाखून पाहिला आणि थोड्या चढ्या आवाजात ॲनला म्हणाली, “ॲन शर्ली! केकमध्ये
नेमके काय घातले आहेस?”

“वेगळे काही नाही, जे रेसिपीमध्ये सांगितले आहे तेच मी वापरले, केक ठिक बनला आहे ना?” ॲनीने दु:खी स्वरात प्रश्न केला.

“ठिक आहे? पार विचित्र झाला आहे. सा ॅरी, मिसेस ॲलन तुम्ही केक खाऊ नका. ॲनी, तू स्वतः खाऊन बघ आणि मला सांग कोणता इसेन्स घातला होतास?”

“व्हॅनिला,” ॲनीने उत्तर दिले, पण केक चाखल्यावर तिचा चेहरा कसनुसा झाला होता. मारिला, बेकींग पावडर मध्ये काही चुकले तर नसेल?”

“बेकिंग पावडर? निव्वळ मूर्खपणा! जा जाऊन इसेन्सची बाटली घेऊन ये.”

ॲनी पॅन्ट्रीकडे पळत गेली आणि इसेन्सची छोटी बाटली घेऊन आली. मारिलाने ती उघडून तिचा वास घेतला.

“अरे देवा! हे तर अंगदुखीचे औषध आहे. परवा माझ्याकडून बाटली फुटली होती म्हणून मी उरलेले औषध या व्हॅनिला इसेन्सच्या रिकाम्या बाटलीत भरून ठेवले होते. माझीच चूक झाली मी तुला सांगायला हवे हवे पण तुला वेगळा वास आला नाही?”

या दुहेरी नामुष्कीमुळे ॲनीला रडू फुटले. “नाही मला सर्दीमुळे वास आला नाही.” ॲनी तिच्या खोलीकडे रडत रडत पळाली आणि पलंगावर पडून रडू लागली. जिन्याच्या पायऱ्यांवर पावले वाजली, कोणीतरी आत आले, तशीच मान वर न

a

करता ॲनी हुंदके देत म्हणाली, “ओ, मारिला! आता माझ्या कपाळावर हा कायमचा शिक्का बसला आता कधीच तो पुसला जाणे संभव नाही. उद्या संपूर्ण ॲव्हनलीमध्ये याच गोष्टीची चर्चा होईल. डायनाने मला विचारले की केक कसा झाला होता तर मी कोणत्या तोंडाने ही गोष्ट सांगू? पण मला तिला सत्य तर सांगावेच लागेल. आता मला सर्वजण ‘औषधांचा केक बनवणारी मुलगी’ म्हणून सर्व मला हसतील. मारिला कृपा करून मला आता खाली बोलवू नको. मी नंतर पाहुणे गेले की सर्व आवराआवर करते. मला मिसेस ॲलनच्या नजरेला नजर देणे शक्य होणार नाही. त्यांना वाटेल की मी त्यांच्यासाठी बनवलेल्या केकमध्ये विष घातले की काय? मिसेस लिंड सांगत होत्या की एका अनाथ मुलीने पालनकर्ता व्यक्तीला विष घातले होते. पण हे औषध विषारी नाही म्हणजे पोटात गेले तर अपाय होत नाही. माझ्याकडून ते केकमध्ये नजरचुकीने घातले गेले. मारिला कृपया तुम्ही मिसेस ॲलनला ही गोष्ट सांगाल काय?”

“मग तू उडी मारुन उठून स्वतः तिला सांग,” तो आनंदी आवाज ऐकून ॲनी पटकन उठली. मिसेस ॲलन, हसऱ्या डोळयांनी तिच्याकडे पाहत उभ्या होत्या.

“मुली तू रडू नकोस. ही एक चूक झाली आहे आणि चूक कुणाकडूनही घडू शकते.”

“माझ्याकडून अशी चूक व्हायला नको होती. मला तुमच्यासाठी खूप चांगला केक करायचा होता.”

“हो मला कल्पना आहे, सर्व ठिक आहे आता रडू नकोस. मला तुमची बाग दाखव. मिस कथबर्ट सांगत होत्या की तू सुद्धा एक फुलांचा ताटवा बनवला आहेस. मला पाहायचा आहे, मला कारण मला फुलांची खूप आवड आहे.”

ॲनी खाली आली, बाग पाहिल्यावर मिस्टर आणि मिसेस ॲलन परत गेले. परत केकचा विषय निघाला नाही. एकंदरीत ॲनीची संध्याकाळ चांगली गेली.

a

तरी थोड्या जड अंतःकरणाने ॲनी म्हणाली, ‘‘मारिला उद्या नवीन दिवस येईल उद्या एकही चूक माझ्याकडून घडू नये.’’

‘‘एकच काय, अनेक चूका घडतील. चूका करण्यात तू कुणाला हार जाणाऱ्यातली नाही आहेस.’’

‘‘हो मला माहित आहे, पण मारिला माझ्याकडून एकच चूक दोनदा घडत नाही."

‘‘त्यांचा काही फायदा नाही जेव्हा तू नवीन चूक करत असतेस."

‘‘कधीतरी माझ्या हातून चुका व्हायच्या थांबतील हा विचार माझे सांत्वन करतो.’’

‘‘बरं, तू जा आणि तो केक डुकरांना खायला दे.’’ मारिला म्हणाली. ‘‘कोणत्याही माणसाला तो खाण्यास योग्य नाही, अगदी जेरी बुओटेलाही नाही."

a

# प्रकरण 22

त्या दिवशी ॲनी पोस्ट ऑफिसमधून धावत घरी आली, धावत कसली आनंदाने उडत उडत आली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तिच्या उत्सुक डोळ्यात आनंद मावत नव्हता तिला पाहून मारिलाने विचारले, “एव्हढे पळत यायचे कारण काय?"

“छे!छे! मिसेस ॲलननी माझ्या नावाने हे आमंत्रणाचे पत्र पोस्टात पाठवले आहे, “मिस ॲनी शर्ली, ग्रीन गेबल्स, उद्या संध्याकाळी आमच्या घरी चहासाठी यावे,

मिसेस ॲलन"

मारिला मी खूप आनंदात आहे, आयुष्यात प्रथमच मला 'मिस' म्हणून संबोधले आणि आपल्या घरी चहासाठी बोलावून माझा सन्मान केला. मी हे पत्र कायमचे जपून ठेवेन.”

मारिला तिचे पाय जरा जमिनीवर आणण्याच्या हेतूने म्हणाली, “या बद्दल मिसेस ॲलन मला म्हणाली होती की रविवारच्या शाळेतील सर्व मुलांना एकदा चहासाठी बोलावणार आहे. तेव्हा तुला एकटीलाच आमंत्रण दिलेले नाही. उगाच अत्यानंदाने जास्त हरखून जाऊ नकोस.”

मारिलाची इच्छा ॲनीने आदर्श मुली सारखे माफक हसावे, आदराने बोलावे, अदबीने व्यक्त व्हावे अगदी दु:खाच्या वेळी व्यक्त होताना सुध्दा या सर्व

a

गोष्टीचे भान असायला हवे अशी होती. पण मुळात ॲनीचा स्वभावधर्म या साऱ्या अपेक्षांच्या चौकटीत बसणारा नव्हता. उगाच अग्नी कडून थंडावा आणि बर्फाकडून उबदारपणाची अपेक्षा केल्यासारखे झाले असते. तिच्या एकाकी आयुष्यात दु:खांचा अतिरेक झाला होता त्यामानाने सुखांची चाहूल नुकतीच लागत होती, त्याचा तिला अत्यानंद होणे गैरवाजवी समजणे चुकीचे ठरले असते. मारिलाला सुध्दा तिची अपेक्षित आदर्श मुलगी कितपत भावली असती याची शंकाच होती.

ॲनीने मारिलाचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले पण मनातून थोडी नाराज झाली, तशात मॅथ्यू म्हणाले की, वारा ईशान्येकडे वाहत आहे, बहुतेक उद्या पाऊस पडायची शक्यता आहे. ॲनी त्या रात्री दु:खी मनाने झोपी गेली. तिला वाऱ्याने झाडांच्या पडणाऱ्या पानांचा आवाज, पाऊस पडत असल्यासारखा वाटू लागला होता. जवळच्या खाडीतील लाटांचा आवाज ऐकत रोज ती झोपी जात असे आज, येणाऱ्या वादळाची तर चाहूल नसले ना ? या चिंतेने व्याकुळ झाली. उद्याची सकाळ कशी उजाडेल या धास्तीने उशिरा कधी डोळा लागला हे तिला कळले नाही आणि सकाळ झाली, आणि मॅथ्यूचा हवामानाचा अंदाज चुकीचा निघाला. पावसाचा मागमूस दिसत नव्हता. त्यामुळे ॲनीची कळी खुलली.

ॲनी मारिलाला म्हणाली, ‘‘मारिला, असेच वातावरण संपूर्ण दिवसभर राहिले तर किती चांगले होईल. चहा पार्टीच्या वेळी माझ्याकडून काही चूक तर होणार नाही ना, अशी भीती वाटत आहे. मी या अगोदर कधी चहापानाला गेलेली नाही पण शिष्टाचारांच्या नियमांचा मी चांगला अभ्यास केला आहे, माझ्याकडून कोणतीही चूक घडू नये याकडे मी विशेष लक्ष देईन. मला भीती वाटते की मी काही चुकीचे वागेन किंवा जे करायला हवे ते करायचे विसरुन जाईन की काय, असे घडू नये यासाठी, तुम्हाला मी वेगळे काही करावे असे वाटत असेल तर मला सांगा."

a

“ॲनी, तुझ्या बाबतीत अडचण अशी आहे की स्वतःबद्दल जास्त विचार करत आहेस, त्याऐवजी तुला मिसेस ॲलनसाठी सर्वात काय अनुकूल आणि चांगले असेल याकडे लक्ष दे.” मारिलाने खरोखरच एक अमूल्य सल्ला दिला होता.

“तुमचे बरोबर आहे, मी स्वतःचा विचार न करण्याचा प्रयत्न करेन.” ॲनीने मारिलाला आश्वस्त केले.

शेवटी चहाचा कार्यक्रम काही गंभीर प्रसंग न घडता व्यवस्थितपणे पार पडला. संध्याकाळी ॲनी प्रसन्न मनस्थितीत घरी परतली. मारिला तिची वाट पाहत दारात उभी होती.

ॲनी मारिलाला म्हणाली, “मारिला, मी खूप मजेत वेळ घालवला. पुन्हा कधीही मला अशी संधी मिळाली नाही तरी आजच्या अनुभवातून मला माझ्या जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटत आहे. मिसेस ॲलननी गुलाबी रंगाचा अतिशय सुंदर पोशाख घातला होता, अगदी सुंदर परी सारख्या दिसत होत्या. मला वाटते मोठी झाल्यावर मला पण एखाद्या पाद्री महोदयांबरोबर लग्न करायला हरकत नाही कारण ते माझ्या लाल केसांना फारसे नापसंत करणार नाहीत. पण त्यासाठी एखादी व्यक्ती मूलतः चांगल्या स्वभावाची असावी लागते त्यामुळे माझ्या बाबतीत ही गोष्ट लागू पडणे अशक्य आहे म्हणून तो विचार सोडून द्यायला हरकत नाही. मी कितीही चांगले बनण्याचा प्रयत्न केला तरी ते सर्व व्यर्थ आहे. माझ्या भूमिती सारखी ही गोष्ट आहे. मिसेस ॲलन स्वभावतः चांगल्या आहेत म्हणून मला त्या आवडतात. मॅथ्यू आणि मिसेस ॲलन सारख्या लोकांवर प्रेम करायला वेगळे कारण लागत नाही कारण ते स्वतः प्रेमळ आहेत. मिसेस लिंड सारख्या व्यक्तींवर तसे चटकन प्रेम बसणे कठीण आहे. त्यासाठी मुद्दाम प्रयत्न करावे लागतात. मिसेस लिंड यांचे समाजकार्य कौतुकास्पद आहे. त्यासाठी त्यांना आदर आणि मान दिला पाहिजे पण मिसेस ॲलन सारखे प्रथमदर्शनी प्रेम वाटणे थोडे अवघड आहे. चहासाठी लॉरेटा ब्रॅडली नावाची

छोटी मुलगी पण आली होती ती रविवारच्या शाळेतील विद्यार्थीनी आहे. ती आणि तिची बहीण गाण्याचे कार्यक्रम करतात. आज त्यांचा व्हाईट सॅंड हॉटेलमध्ये शार्लोटटाऊन हॉस्पिटलच्या मदतीसाठी हा कार्यक्रम आहे. तिथे येणारे अमेरिकन टुरिस्ट अशा कार्यक्रमांना मदत करतात.

"मी मिसेस ॲलनना माझी इथे येण्यापूर्वीची सर्व हकीकत सांगितली तसेच ग्रीन गेबल्समध्ये आल्यानंतरच्या पण घटना सांगितल्या तसेच भूमितीच्या

बाबतीत कच्ची असल्याची पण कबुली दिली. लहानपणी त्यांना पण भूमिती अवघड जात होती असे त्यांनी सांगितले.

त्यामुळे मला थोडे हायसे वाटले. आता मी भूमितीवर जास्त मेहनत घ्यायचे ठरवले आहे. मिसेस लिंड पण आल्या होत्या. त्यांनी आमच्या शाळेत मिस म्युरियल स्टेसी यांची शिक्षिका म्हणून नेमणूक झाल्याची बातमी सांगितली. यापुर्वी कधी ॲव्हनलीच्या शाळेत शिक्षिका नव्हत्या त्यामुळे मिसेस लिंड नव्या नेमणूकीवर नाराज आहेत. पण मला कधी एकदा दोन आठवड्याची सुट्टी संपते आणि नवीन बाईंना भेटते असे झाले आहे.”

# प्रकरण 23

नवीन शिक्षिकेला भेटायला दोन आठवड्याची सुट्टी संपण्याची वाट पाहणाऱ्या ॲनीला त्यानंतरही जास्त दिवस वाट पाहावी लागणार होती. इसेन्स ऐवजी औषध घालून बनवलेल्या केकच्या घटनेला एक महिना उलटला तरी अजून ॲनीच्या हातून लहान मोठ्या चूका होतच राहिल्या. एकदा डुकरांच्या बादलीत टाकण्याचे खाणे धांदरटपणे तिथे भलतीकडेच ओतले, ओढ्यावरचा लाकडी ओंडक्याचा पूल, तंद्रीत ओलांडून गेली, अशा अनेक लहानसहान न मोजण्याजोग्या गोष्टी घडतच होत्या.

मिसेस ॲलन यांच्याकडील चहापानानंतर आठवड्याभरात डायना बॅरीने वर्गातील निवडक मुलींना टी-पार्टीसाठी आमंत्रित केले. मारिलाने ॲनीला परत परत काही हूच्चपणा न करण्याची ताकीद देऊन मगच परवानगी दिली.

टी-पार्टी चांगली पार पडली. खाणेपिणे आटोपल्यावर बैठे खेळ खेळून झाले. नंतर सगळयाजणी बाहेर बागेत खेळायला गेल्या. थोड्याच वेळात त्याच त्याच खेळांचा कंटाळा आल्याने नवीन 'डेअरिंग' नावाचा धाडसी खेळ खेळण्याचा विचार झाला. अलीकडे ॲव्हनली गावातील मुलांचा तो लोकप्रिय खेळ बनला होता. यात प्रतिपक्षाला एखादे धाडसी कृत्य करण्याचे आव्हान द्यायचे आणि त्यातील यशस्वी लोकांची नोंद एका वहीत केली जात असे.

याची सुरुवात कॅरी स्लोएनने रुबी गिलिसला दारातील जून्या पुराण्या विलोच्या झाडावर जमिनीलगतच्या फांद्यावर चढण्याचे आव्हान देऊन केली. रुबी झाडावरच्या सुरवंटांची आणि नवीन ड्रेस खराब होण्याची भीती बाजूला सारून, निव्वळ कॅरीला हरवण्यासाठी तयार झाली आणि जिंकली देखील.

मग जोसी पायने, जेन अँड्र्यूजला डाव्या पायाने लंगडी घालत बागेला प्रदक्षिणा घालण्याचे आव्हान दिले. तिने ते स्विकारले पण प्रदक्षिणा पूर्ण करण्याआधीच पाय जमिनीला टेकला गेला आणि तिला हार पत्करावी लागली.

जोसीचा दणदणीत विजय झाल्याचे दिसत असताना ॲनीने जोसीला लाकडी फळयांच्या कुंपणावरून चालून दाखवायचे आव्हान दिले. त्यासाठी तोल सावरत चालण्यासाठी सराव असणे आवश्यक असते आणि जोसीने अंगभूत चपळाई आणि जोडीला सराव, यामुळे ॲनीचे हे आव्हान सहजपणे पूर्ण केले आणि तिने तिच्या देहबोलीतून ॲनीच्या आव्हानातील फोलपणा दाखवून दिला. बाकीच्या मुलींनी तिचे टाळया वाजवून कौतुक केले कारण त्यांना ते अवघड वाटत होते.

कुंपणावरून खाली उतरतांना जोसीने, ॲनीकडे एक कुत्सित हास्य केले.

ॲनीने आपल्या वेण्या उडवल्या आणि सर्वांना उद्देशून म्हणाली, “एव्हढ्या कमी उंचीवरून चालणे ही काही फार मोठी गोष्ट नाही. मला मेरीजविले येथील एक मुलगी माहिती आहे ती तर छप्पराच्या टोकावरून चालत असे.”

“घराच्या छपरावरून कोणी चालत असेल यावर माझा विश्वास बसत नाही आणि तू सांगतेस तशी कोणी मुलगी असलीच तरी तू हे धाडस करू शकणार नाहीस.”

“मी धाडस करू शकणार नाही?”ॲनी चिडून मोठ्या आवाजात म्हणाली.

“तर मग मी तुला आव्हान देते की बॅरींच्या किचनच्या छतावरील सर्वात उंचावरच्या आडव्या खांबावरून चालून दाखव.” जोसी उद्धटपणे म्हणाली.

ॲनीचा चेहरा उतरला होता पण तिने जोसीचे आव्हान स्वीकारले होते आणि ती किचनच्या भिंतीला टेकलेल्या शिडी जवळ निघाली. सर्व मुली आश्र्चर्यचकीत झाल्या.

“ॲनी तू वरती चढणार नाही आहेस. वरून पडशील तर जीवाशी गाठ आहे. तू जोसीचे बोलणे मनावर घेऊ नकोस. इतके धोकादायक आव्हान देणे चुकीचे आहे,” डायना म्हणाली.

“मला ते स्विकारलेच पाहिजे, माझा आत्मसन्मान पणाला लागला आहे. मी छतावरील आडव्या खांबावरून चालणार हे नक्की. दुर्दैवाने खाली पडून जीव गेला तरी बेहत्तर. डायना तू काळजी करू नकोस. माझे काही बरेवाईट झाले तर आठवण म्हणून माझी मोत्यांची अंगठी तू घ्यावीस अशी माझी इच्छा आहे.”

ॲनी शिडीवरून छतावर गेली. सर्व जणी चिडीचूप झाल्या. ॲनी स्वतःचा तोल सावरत त्या धोकादायक ठिकाणी उभी राहिली आणि त्यावरून पुढे चालू लागली. तिला अस्पष्ट जाणीव झाली की ती सर्वात उंचावर उभी आहे आणि इतरवेळी कामी येणाऱ्या तिच्या कल्पनाशक्तीचा काही उपयोग होणार नाही, तरीपण ती पुढे जात राहिली. अचानक तिची पावले अडखळली आणि तिचा तोल जाऊन धडपडून खाली पडली, उतरत्या छप्परावरून घसरत छपराच्या कडेपर्यंत आली आणि काही कळायच्या आतच व्हर्जिनियाच्या वेलीमध्ये अडकून धप्पकन् जमिनीवर कोसळली.

घोळक्यातील मुलींनी एकदम किंकाळी फोडली आणि सर्वजणी तिकडच्या बाजूला धावल्या.

नशीब ती ज्या बाजूला घसरून पडली होती ती पोर्चची बाजू होती त्यामुळे तिकडे छताची उंची कमी झालेली होती.

a

“ॲनी, ॲनी उठ, काही तरी बोल ॲनी, ॲनी तुला आम्ही काय बोलत आहोत ते तुला ऐकू येत आहे काय?” अं अं असा अस्पष्ट असा ॲनीच्या तोंडून आवाज सर्वांना हायसे वाटले, विशेषतः जोसीला बहुतेक ॲनी जिवंत नसावी असे त्यांना वाटले होते. या सर्व गोंधळाचा आवाज ऐकून मिसेस बॅरी तिकडे धावत आल्या. ॲनी थोडी हालचाल करण्याचा प्रयत्न करणार तोच तीक्ष्ण वेदनेने मोठ्याने ओरडली. मिसेस बॅरीनी ॲनीला काय झाले म्हणून विचारले. ॲनीने आपला पाय बहुधा घोटा दुखावल्याचे सांगितले. डायनाने तोपर्यंत तिच्या वडिलांना बोलावून आणले. त्यांनी उचलून तिला बसते केले. वरून पडल्याने अंगभर खरचटले होते पण पाय मात्र जमिनीवर टेकवण्याच्या परिस्थितीत अजिबात नव्हता. शेवटी तिला उचलून घरी नेण्याचे मि. बॅरीनी ठरवले.

दुपारच्या वेळी मारिला बागेतील सफरचंदे काढत होती. तिला दूरवरून मिस्टर बॅरी तिकडे येताना दिसले सोबत मिसेस बॅरी पण होत्या, मागे सर्व मुलींची फलटण होती. मिस्टर बॅरीं ॲनीला हातात उचलून आणतांना पाहून मारिलाची भीतीने गाळण उडाली आणि त्याक्षणी तिला ॲनीचे तिच्या हृदयात काय स्थान आहे याची जाणीव झाली. तिने स्वतःशी कबूल केले की ॲनी तिला फार म्हणजे फार म्हणजे फारच आवडते. ती धावतच पुढे झाली.

“मि. बॅरी, तिला काय झाले आहे?” मारिलाने कापऱ्या आवाजात विचारले. तिचा चेहरा पांढरा पडला होता, अंग थरथरत होते. स्वतःला अत्यंत खंबीर समंजस समजणाऱ्या मारिला आज हवालदील झाली होती.

थोडे डोके वर करत ॲनीने उत्तर दिले, “मारिला घाबरून जाऊ नका, मी छतावरून चालताना तोल जाऊन खाली पडले. बहुतेक माझा घोटा मुरगळला असेल पण मान बिन मोडली नाही याचे समाधान मानूया.”

"मी तुला त्या पार्टीला जाऊ दिल्यावर तू जाऊन काहीतरी करशील हे मला ठाऊक असायला हवे होते," मारिला स्वतः वरच रागावली होती तरी सुद्धा ॲनी बोलण्याच्या परिस्थितीत आहे हे पाहून तिला थोडा दिलासा पण मिळाला होता.

"मि बॅरी, कृपया तिला इथे सोफ्यावर झोपवावे. अरे देवा! ही बेशुद्ध झाली की काय?"

हे मात्र खरे होते, ॲनी खरोखरच बेशुद्ध झाली होती.

मॅथ्यू, निरोप मिळाताच घाईघाईने घरी आले आणि लगेच डाॅक्टरांना बोलवायला निघून गेले. डॉक्टरांनी नीट तपासल्यावर समजले की घोटा नुसता मुरगळला नव्हता तर तिथले हाड मोडले होते. ॲनीला तिच्या खोलीत नेऊन डाॅक्टरांनी योग्य ती औषधयोजना करून निरोप घेतला. जातांना निदान दिड दोन महिने घराबाहेर पडायला बंदी असल्याचे सांगितले.

रात्री मारिला, ॲनीच्या खोलीत तेव्हा ॲनी निपचीत पडली होती. मारिलाला पाहिल्यावर तिने विचारले, "मारिला तुम्हाला माझ्याबद्दल वाईट वाटत असेल ना?"

दिव्याची वात थोडी मोठी करत मारिला म्हणाली, "ही तुझीच सर्व चूक होती."

"म्हणून तुम्हाला माझ्याबद्दल जास्त वाईट वाटायला हवे कारण माझाच दोष होता या भावनेने मला जास्त वाईट वाटते. जर दुसरे कोणी या साठी जबाबदार असते तर त्याचा इतका त्रास वाटला नसता. पण मारिला माझ्या जागी तुम्ही असता तर काय केले असते? तुम्ही छतावर चढून आडव्या खांबावरून चालत गेला असता?" ॲनीने विचारले.

"मी ठामपणे जमिनीवर उभी राहिले असते आणि ज्यांना दिव्य करायचे आहे त्यांना खुशाल करा असे सांगितले असते."

ॲनीने खोल निःश्वास टाकला आणि म्हणाली, "तुमच्यापाशी मनाची ताकद आहे तशी माझ्याकडे नाही. मला जोसीची हेटाळणी सहन झाली नाही. तिने आयुष्यभर मला कमी लेखले असते. आज जरी छतावरून पडून माझे हाड मोडले असले तरी मी आव्हान स्वीकारले आणि जीवावर उदार होऊन अर्ध्याहून जास्त अंतर पूर्ण पण केले, हे लखलखीत सत्य कोणाला नाकारता येणार नाही. यामुळे झाली एव्हढी शिक्षा माझ्यासाठी पुरेशी आहे म्हणून तुम्ही माझ्यावर रागावू नका. बेशुद्ध पडण्याचा अनुभव फारसा चांगला नव्हता आणि डॉक्टरांनी घोट्याला प्लास्टर घालतांना खूप वेदना झाल्या. आता दिड महिना शाळेला जाता येणार नाही. मला तर नवीन बाईंना कधी एकदा भेटते असे झाले आहे. मी शाळेत जायला लागेल पर्यंत त्या शाळेत जून्या होतील. वर्गातील सर्वांचा गिल--अभ्यास पुढे जाईल. मी बिचारी आपल्या चुकीची शिक्षा भोगत इथे पडून राहणार आहे पण तुम्ही जर माझ्यावर राग धरला नाही तर मला या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी धैर्य मिळेल."

"नाही माझा तुझ्यावर राग नाही. तू छतावरून पडलीस हे तुझे दुर्दैवच आहे. त्यांचा त्रास तू सहन करतच आहेस. असो आता जेवण आणले आहे ते करून औषधे घेऊन झोपी जा."

"नक्कीच तुमच्या सांगण्याप्रमाणे मी वागेन. हा रिकामपणीचा वेळ माझ्या कल्पनाशक्तीच्या सहाय्याने अधिक सुसह्य कसा होईल असा प्रयत्न मी नक्कीच करेन."

पुढचा सात आठवड्यांचा कंटाळवाणा काळ ॲनीच्या कल्पनाशक्तीच्या सोबतीला चौकशीसाठी येणाऱ्या लहान मोठ्या मंडळींची उपस्थितीमुळे बघता बघता बघता संपत आला. रोज कोणी ना कोणी शाळेतील मुली संध्याकाळी येत.

येताना एखादे फुल, पेन्सिल, अथवा पुस्तक घेऊन येत शिवाय वर्गातील गमतीजमती ऐकण्यात ॲनीचा वेळ मजेत जात असे.

ज्यादिवशी ॲनीने खोलीच्या बाहेर पाऊल टाकले त्यादिवशी ती मारिलाला म्हणाली, “किती तरी लोक माझ्या चौकशीसाठी येऊन गेले. अगदी सुपरिटेंडंट बेल मला भेटायला आले, आणि ते खरोखरच खूप चांगले आहेत.

“मिसेस ॲलन तर अनेकवेळा भेटून गेल्या त्या कधीही समोरच्या माणसाला त्याच्या चुकांसाठी बोल लावत नाहीत पण या उलट मिसेस लिंड नेहमीच समोरच्या माणसाला चुकांची जाणीव करून देत असतात. जोसी जेव्हा मला भेटायला आली तेव्हा मी तिचे मैत्री पूर्वक स्वागत केले. तिला वाईट वाटत होते की तिने माझ्यासमोर आव्हान उभे केले आणि नको ते धाडस करण्यासाठी प्रवृत्त केले. जर का माझे बरेवाईट झाले असते तर आयुष्यभर तिला त्याचे ओझे वाहावे लागले असते. डायना तर माझी जीवाभावाची मैत्रीण आहे. डायना सांगत होती नवीन शिक्षिका रंगाने गोऱ्यापान आहेत, त्यांचे केस कुरळे आणि डोळे आकर्षक आहेत.बोलायला खूप छान आहेत. त्यांचे ड्रेस अगदी फॅशनेबल असतात. त्यांनी एक छोटे नाटुकले बसवले आहे. त्या सकाळ संध्याकाळ मुलांकडून व्यायाम करवून घेतात. निसर्ग वाचनासाठी जंगलात घेऊन जातात आणि झाडे, पाने, फुले, पक्षी यांची माहिती करून देतात.

“मिसेस लिंड यांच्या मते अशी शिकवण्याची पद्धत त्यांनी कधी ऐकली नव्हती. मला त्यांची पद्धत खूप आवडली. कधी एकदा मला शाळेत जायला लागते असे झाले आहे. मला वाटते मिस स्टेसी स्वभावाने खूप चांगल्या असाव्यात.”

हे सर्व ऐकून मॅरिला म्हणाली, “ॲनी, एक गोष्ट स्पष्ट दिसते आहे आणि ती म्हणजे बॅरीच्या छतावरून पडल्यामुळे तुझ्या जिभेला अजिबात दुखापत झाली नाही.”

a

# प्रकरण 24

शेवटी एकदाचा ऑक्टोबर महिना उजाडला आणि डॉक्टरांनी ॲनीला शाळेला जाण्यासाठी परवानगी दिली. शाळेत जाण्याचा दिवस उजाडला: शरद ऋतूच्या आगमनाप्रित्यर्थ पहाट लाल सोनेरी रंगाची उधळण करत आली होती. दऱ्याखोऱ्यात धुक्याची चादर पसरली होती त्यावर सूर्य प्रकाश ठेवणीतले चंदेरी, सोनेरी, जांभळट गुलाबी, धुरकट निळा असे रंग मुक्तपणे ओतून देत होता. आजूबाजूच्या शेतांवर दवबिंदूचे आच्छादन पसरले गेले होते आणि कोवळ्या उन्हात ते चांदीसारखे चमचमत होते. पायवाटेवर पडलेले वाळलेल्या पानांचे ढिग, पाऊल पडताच चुरून, कुरकुर असा आवाज करत असे. बर्चच्या झाडांचा डोलारा आता पिवळ्या रंगाकडे झुकायला लागला होता तसेच नेचे, फर्न, वाळून तपकिरी रंगाचे झाले होते. हवेत एकप्रकारची झिंग जाणवत होती, ॲनीच्या छोट्याशा हृदयात लौकरात लौकर शाळेत जाण्यासाठी एक उर्मी जागृत झाली होती. रोजची गोगलगायीची चाल आज बदलून पावलांना वेग आला होता.

ॲनी, परत एकदा नेहमीच्या डेस्कवर डायना बरोबर बसली, तिच्या गैरहजेरी मध्ये त्याठिकाणी बसणारी रुबी पलीकडच्या रांगेतील डेस्कवर बसायला गेली. ज्युलिया बेलने पाठीमागून हळूच तिला च्युइंगम दिले. ॲनीने एक दीर्घ श्वास घेतला आणि आपली चित्रकलेचे वही पुस्तक वरती काढत, समाधानाने पेन्सिलीला टोक काढायला सुरुवात केली.

a

आयुष्याच्या कक्षा आता विस्तारू लागल्या होत्या. नवीन शिक्षिका मिस स्टेसी, ॲनीला तिच्या मागे पडलेल्या अभ्यास भरून काढण्यासाठी मदतीला तत्पर होत्या. त्या एक सहृदय आणि सुसंस्कृत शिक्षिका होत्या त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांचे प्रेम जिंकून घेतले होते. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव झटत होत्या. विद्यार्थांमधल्या सुप्त गुणांना हेरून त्यांना चालना देण्याची मिस स्टेसी यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती.

ॲनी व्यक्तीमत्व त्यांच्या मार्गदर्शनाखाली चहूबाजूंनी खुलायला लागले, प्रतिभा बहरायला लागली या गोष्टींचे मॅथ्यूना कौतुक वाटतं होते. हळूहळू सुरवातीला टिका करणाऱ्या मारिलाचे मत बदलून ती त्यांची प्रशंसा करू लागली.

“मारिला, मला मिस स्टेसी फार आवडतात. त्याचे व्यक्तिमत्त्व प्रतिष्ठित आणि खानदानी आहे. त्यांचा आवाज अतिशय गोड आहे. मला हाक मारताना शेवटच्या 'इ' चा उच्चार करतात ते ऐकायला छान वाटते. आमच्या कडून प्रसिद्ध नाटकातील उतारे पाठ करून घेतात. मला, 'मेरी-स्कॉट्सची राणी' चा उतारा म्हणताना तुम्ही ऐकायला हवा होतात, मी त्यामध्ये माझे पूर्ण अंत:करण ओतते असे रुबी मला शाळेतून येताना म्हणत होती. जेव्हा तिने, 'आता माझ्या वडिलांच्या राज्याला वाचवण्यासाठी, मला माझ्या स्त्री हृदयाला निरोप द्यायला हवा' ही ओळ ऐकली तेव्हा 'अक्षरशः भीतीने रक्त गोठून गेले' असे सांगितले.”

“मला सुध्दा धान्याच्या कोठारात बसून तू वाचून दाखव,” मॅथ्यूनी सुचवले.

“नक्कीच, पण शाळेतल्या माझ्या वाचनात इतके सरस होईल याची खात्री देता येणार नाही.”

मिसेस लिंड म्हणत होत्या, “शुक्रवारी त्यांनी मिस्टर बेल यांच्या टेकडीवरील मोठ्या झाडांवर शाळेतील मुले कावळ्यांची घरटी शोधायला चढली होती, ते पाहून तिचे भीतीने रक्त गोठून गेले,” मारिला म्हणाली.

a

“आम्हाला निसर्गाच्या अभ्यासासाठी कावळ्याचे घरटे हवे होते. आम्हाला त्यासाठी दुपारी निसर्गाचे निरीक्षण करायचे होते शिवाय आम्हाला ती निरीक्षणे लिहून ठेवायची असतात. माझे लिखाण सर्वात चांगले असते,” ॲनीने सविस्तर माहिती दिली.

“असे तू म्हणून काय उपयोग? तुझ्या शिक्षकांनी तसे म्हणायला हवे,” मारिलाचा मुद्दा बिनतोड होता.

“मिस स्टेसी पण तसे म्हणाल्या होत्या. पण माझी मला खात्री वाटत नाही. मी भूमितीमध्ये इतकी मठ्ठ आहे पण आता थोडी थोडी मला समजायला लागली आहे. मिस स्टेसी सर्व संकल्पना व्यवस्थित स्पष्ट करून सांगतात. पण मी त्यात विशेष प्राविण्य मिळवेन असे मला वाटत नाही. पण मला लिहायला आवडते. मिस स्टेसी आम्हाला लिखाणासाठी विषय निवडून देतात. आम्हाला पुढच्या आठवड्यात आम्हाला इतिहासात होऊन गेलेल्या महनीय व्यक्तींच्या विषयी निबंध लेखन करायचे आहे. जिवंतपणी हातून झालेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे मृत्यूनंतर पण लोकांच्या स्मरणात राहते किती भारी आहे. मला देखील अशी उल्लेखनीय कामगिरी करायची आहे. मी जर मिशनरी बनले नाही तर मग रेड क्रॉसमध्ये परिचारिका म्हणून युद्ध भूमीवर जाईन. मिशनरी बनणे थोडे कठीण आहे कारण त्यासाठी तुम्हाला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कणखर असणे आवश्यक आहे. म्हणून आम्हाला शाळेत शारीरिक शिक्षण पण देणे सुरू केले आहे.” ॲनी आपली स्वप्ने बोलून दाखवत होती.

“हा निव्वळ मूर्खपणा आहे,” शाळेमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर गोष्टींना महत्त्व देणे तिला चुकीचे वाटत होते.

आणि खरोखरच नोव्हेंबर महिन्यात मिस स्टेसीनी सुरू केलेल्या नवीन उपक्रमामुळे अगोदर सुरू केलेले निसर्ग दर्शन आणि लिखाण आणि शारीरिक

शिक्षण हे उपक्रम काहीसे मागे पडले. शाळेत ध्वजारोहण समारंभासाठी वर्गणी जमवायची कल्पना जोर धरू लागली त्यासाठी ख्रिसमसच्या रात्री एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरवले गेले. सर्वजण उत्साहाने तयारीला लागले. ॲनी तर या कल्पनेने भारावून गेली होती. तिचा ओसंडून वाहणारा उत्साह, मात्र मारिलाच्या नापसंतीचे कारण बनला. मारिलाला हे सर्व मूर्खपणाचे वाटत होते. अभ्यासात लक्ष घालायचे सोडून भलत्याच गोष्टी मध्ये वेळ वाया घालवणे मारिलाला अजिबात मंजूर नव्हते. मुलांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी ॲनीने अभ्यास इतकेच सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाचे आहेत शिवाय त्यामागचा उद्देश ध्वजारोहण समारंभासाठी निधी संकलन करण्याचा असल्याने त्यामुळे शाळकरी मुलांमध्ये देशभक्तीची भावना विकसित होण्यासाठी मदत मिळते असे प्रतिपादन केले. पण मारिलाला ते पटले नाही, यामागे देशभक्तीचा विचार कमी आणि अभ्यास सोडून मनोरंजनाचा विचार जास्त आहे असे तिचे म्हणणे होते.

"देशभक्ती आणि मनोरंजन दोन्हीही एकाच उपक्रमाद्वारे साध्य होत असेल तर ते चांगले नाही काय? आम्हाला तयारी करण्यात खूप आनंद मिळत आहे. कार्यक्रमात डायना स्वतंत्रपणे एकटी एक गाणे सादर करणार आहे आणि सहा गाणी, 'समुह गायन' म्हणून सादर होणार आहेत. मुलांचे आणि मुलींचे वेगवेगळे नाट्य प्रवेश सादर होणार आहेत त्यापैकी दोन नाट्य प्रवेशासाठी माझी निवड झाली आहे शिवाय मला एकपात्री प्रयोग आणि एक दीर्घ कविता सादर करायची आहे. मला खूपच आनंद झाला आहे पण थोडी भीती पण वाटत आहे. शेवटी एक शोभायात्रा काढणार आहोत:

'विश्र्वास,आशा, औदार्य' अशी त्यामागची संकल्पना आहे. मी, डायना आणि रुबी तिची मुख्य भूमिकेत आहोत. आम्हाला पांढऱ्या रंगाचा गाऊन घालून केस मोकळे सोडायचे आहेत. जेन अँड्र्यूज परी राणी होणार आहे आणि मला तिची

दासी बनायचे आहे. मला केसात पांढऱ्या गुलाबाची माळ घालायची आहे. पायात बूट चालणार नाही म्हणून रुबी मला तिची नवीन चप्पल घालायला देणार आहे. जोसी, मनासारखी भूमिका मिळाली नाही म्हणून नाराज झाली आहे. मला आता मोठमोठ्याने सर्व पाठांतर करावे लागणार मी धान्याच्या कोठारात बसून पाठ करेन. आम्ही शाळेचा हॉलची कागदी फुले आणि पताका लावून सजावट करणार आहोत. सर्व प्रेक्षक स्थानापन्न झाल्यावर आम्ही दोन दोनच्या मुलांची रांग करून स्टेजवर जाणार आहोत. मारिला मला माहित आहे तुम्हाला ही कल्पना फारशी आवडली नाही आहे पण मला काहीतरी वेगळे करायला मिळत यांचा तुम्हाला आनंद नक्कीच वाटत असणार.''

''मला एवढेच वाटते ते जरा व्यवस्थित वागायला शिकावेस. तुमचा हा कार्यक्रमाचा गोंधळ कधी एकदा संपतो असे मला झाले आहे तेव्हा तुझे डोके थोडे फार थाऱ्यावर येईल. सध्या त्या डोक्यात, फक्त पाठांतर, आरडाओरड आणि शोभायात्रा एव्हढेच विषय भरलेले आहेत. पण आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे तुझी जीभ बोलून बोलून कशी काय दमत नाही?''

ॲनीने एक उसासा टाकला आणि ती मागच्या अंगणात गेली. तांबूस हिरव्या आकाशात तिला प्रतिपदेचा चंद्र, चिनार वृक्षाच्या फांद्यामधून दिसत होता. जवळच मॅथ्यू लाकडे फोडत होते. ॲनी जवळच्या लाकडाच्या ओंडक्यावर बसून मॅथ्यूच्या बरोबर कार्यक्रमाविषयी बोलू लागली. तिच्या मनात विचार आला की मनोरंजनाच्या कार्यक्रमात तिचे संभाषण शांतपणे ऐकणारी आणि कौतुक करणारी व्यक्ती, मॅथ्यू शिवाय दुसरी कोणी नसेल.

''ठीक आहे, आता माझी खात्री पटली की तुझी तयारी चांगली चालली आहे, तुमचा कार्यक्रम चांगला होईल. तू तुझी भूमिका चांगल्याप्रकारे पार पाडशील,'' मॅथ्यू तिच्या उत्सुक, उत्साही चेहऱ्याकडे पाहात हसत म्हणाले. ॲनी

त्यांच्याकडे परत हसली. ते दोघे सर्वात चांगले मित्र होते मात्र ॲनीच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर नव्हती म्हणून त्यांनी देवाचे आभार मानले, ती मारिलाच्या अखत्यारीतील बाब होती. जर त्यांच्या एकट्याला ही जबाबदारी असती तर मात्र त्यांचे कर्तव्य आणि तिचा नैसर्गिक कल यातील संघर्ष अटळ झाला असता. आता मारिलाच्या शब्दात सांगायचे झाले तर, "मॅथ्यू हवे तेव्हढे लाड करून ॲनीला बिघडवायचे काम करत आहे."

तरीसुद्धा यांचे परीणाम वाईट होतीलच असे समजणे चुकीचे ठरले असते कारण काही वेळा कौतुकाची शाबासकी, डोळ्यात तेल घालून केलेल्या कर्तव्यदक्ष संगोपनाइतकीच महत्वाची ठरू शकते.

# प्रकरण 25

डिसेंबरच्या थंडीत, संधीप्रकाशात मॅथ्यू घरी परत आले. दाराजवळच्या बाकड्यावर बसून बूट काढणार तोच, बैठकीच्या खोलीतून मुलींचा गोंगाट ऐकू आला. शाळेच्या नाटकाची रंगीत तालीम संपली होती आणि ॲनीच्या मैत्रीणी बाहेर पडायच्या तयारीत होत्या, ते चटकन बूट न काढताच उठले आणि झाडांच्या आडोश्याला उभे राहिले. सगळ्या मुली आता जॅकेट आणि टोपी घालण्यासाठी त्याच बाकाजवळ बोलत उभ्या राहिल्या. जवळच अंधारात आडोश्याला उभ्या असलेल्या मॅथ्यूच्या कडे कुणाचेही लक्ष गेले नाही. मुलींच्या घोळक्यात शाळेतील कार्यक्रमाची चर्चा सुरू होती. तेजस्वी डोळ्यांची ॲनी पण सगळ्या मुलीसारखी उत्साहात बोलत होती. अचानक मॅथ्यूना इतर मुलींपेक्षा ॲनीमध्ये काही वेगळे असल्याची जाणीव झाली पण ते नेमके काय असावे हे त्यांच्या ध्यानात येत नव्हते. याबाबत कुणाला विचारणे पण शक्य नव्हते. मारिलाला विचारले असते तर नक्कीच तिने एक ठळक फरक स्पष्ट केला असता तो म्हणजे ॲनीची जीभ इतर मुलींपेक्षा अखंड चुरुचुरु चालत असते. शेवटी त्यांनी पाईप काढून तंबाखू ओढायला सुरुवात केली. मारिलाला ही गोष्ट अजिबात आवडला नसे. तासा दोन तासांनंतर मॅथ्यूना त्यांच्या प्रश्नांचे उत्तर सापडले: ॲनीचे कपडे इतर मुलींपेक्षा वेगळे होते. मारिलाने

अगदी गडद रंगाच्या टिकाऊ कापडापासून एकाच नमुन्याचे कपडे स्वतः शिवले होते. मुलींच्या कपड्यांतील वेगवेगळया डिझाईनची फॅशनची बिचाऱ्या मॅथ्यूना काहीच कल्पना नव्हती. पण ॲनीच्या ड्रेसच्या बाह्या इतर मुलींपेक्षा अगदीच जून्या पद्धतीच्या आहेत हे त्यांना उमगले. त्या संध्याकाळी त्यांनी पाहिलेल्या लहान मुलींनी लाल, निळया, गुलाबी, पांढऱ्या रंगाचे फ्राॅक्स घातले होते. त्यांना आश्चर्य वाटले मारिला कधीच या रंगांच्या वाट्याला जात नाही. कदाचित मारिलाची निवड बरोबरही असेल कारण ॲनीची देखभाल ही मारिलाची जबाबदारी होती आणि ती व्यवस्थित पार पाडत होती पण डायना बॅरी, ज्या प्रकारचे कपडे नेहमी घालते तसा एखादा ड्रेस ॲनीने घातला तर फार काही नुकसान होणार नाही. मॅथ्यूनी ॲनीसाठी एक छानसा ड्रेस ख्रिसमससाठी भेट म्हणून देण्याचे ठरवले आणि समाधानाचा सुस्कारा सोडला. पाईप बाजूला ठेऊन मग ते झोपायला गेले. तोवर रात्र संपत आली होती. मारिलाचा दिवस सुरू देखील झाला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मॅथ्यू कार्मोडी येथे ड्रेस खरेदीसाठी गेले.

कार्मोडी मधील दुकानात एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या वस्तू मिळत. किराणा, शेती अवजारे, ताग्यातील कापड ते रेडीमेड कपड्यापर्यंत. शेतीच्या संबंधित खरेदी व्यतिरिक्त त्यांचा इतर खरेदीची फारसा संबंध येत नसे. मारिलाच अशा गोष्टींमध्ये लक्ष देत असे. मात्र लहान मुलीच्या ड्रेससाठी त्यांना पुर्णपणे दुकानदाराच्या मेहरबानी वर अवलंबून रहावे लागणार होते म्हणून त्यांनी नेहमीच्या विल्यम ब्लेअरच्या दुकानात जायचे टाळले आणि कारण दुकानात बऱ्याचवेळा ब्लेअरच्या दोन मुली ग्राहकांची चौकशी करत. स्वतः मॅथ्यूना नक्की काय खरेदी करायचे माहिती असते तर ते त्यांच्याकडे गेले असते पण त्यांना त्या मुलींशी नीट बोलणे जमणार नाही असे वाटून त्यांनी सॅम्युअल लॉसनच्या दुकानात जाण्याचा निर्णय घेतला. दुकानात पुरुष असला तर त्याच्याबरोबर त्यांना व्यवस्थित बोलून

a

खरेदी करता येईल असे वाटले पण मॅथ्यूना सॅम्युअलने दुकानात आपल्या पत्नीच्या भाचीची हिशोब लिहण्यासाठी नेमणूक केली होती. ती एक हरहुन्नरी मुलगी होती आपले काम सांभाळून ती ग्राहकांना मदत करत असे. नेमकी तिने मॅथ्यूना काय मदत करु अशी विचारपूस केली. त्यामुळे ते अधिकच गोंधळात पडले. त्यांनी ड्रेस ऐवजी बागेत काम करण्याच्या अवजारांची चौकशी केली आणि तिने तत्परतेने दाखवल्याने एक खरेदी पण केले. त्यानंतर त्यांनी भाजीपाल्याच्या बियाणांची चौकशी केली ते मात्र त्यांच्याकडे उपलब्ध नव्हते. शेवटी साखरेची चौकशी केली आणि कोणत्या प्रकारची साखर किती लागते याचा अंदाज नसल्याने ब्राऊन शुगर चांगली दहा किलो खरेदी केली पण मुख्य ॲनीच्या ड्रेसची साधी चौकशी त्या मुलीकडे करणे त्यांच्याकडून झाले नाही. खरेदी केल्यावर पैसे द्यायचे पण विसरून गेले होते. मिसेस लॉसनच्या भाचीने आठवण करून दिल्यावर ते ओशाळले आणि पैसे देऊन लगेच बाहेर पडले. ते बाहेर पडताना, विक्रेती या अजब गिऱ्हाईकाकडे आश्र्चर्याने पाहत होती.

घराकडे परतताना निम्या रस्त्यापर्यंत मॅथ्यू नेहमीचे दुकान सोडून, मिस्टर सॅम्युएल लॉसनच्या दुकानात गेल्याबद्दल आणि गरज नसलेल्या वस्तू खरेदी केल्याबद्दल स्वतःवरच रागावले होते. बागेसाठी घेतलेले अवजार सामानाच्या खोलीत लपवून ठेवले आणि ब्राऊन शुगर मारिलाच्या कडे सुपूर्द केली. ते पाहून ती अचंबित झाली आणि एव्हढी साखर आणण्यामागचे कारण विचारले. अगदी ब्राऊन शुगर क्वचित कधी फ्रुट केक साठी किंवा कामगारांसाठी पोरिड्ज बनवायला लागत असे. एव्हढी दहा किलो काय करायची असा प्रश्न मारियाने विचारला. तेव्हा असू दे कधीतरी उपयोगी पडेल म्हणून तिकडून ते निघून गेले. तसेही नेहमीचा दुकानदार पांढरी साखर विकत असतानाच मॅथ्यूनी ही साखर कोठून आणि का आणली असावी, हे कोडे मारिलाला पडले होते.

a

ॲनीच्या ड्रेस खरेदीच्या वेळी झालेली फजिती पाहिल्यावर मॅथ्यूना कळून चुकले की या बाबत स्त्री सल्लागाराची गरज आहे. मारिलाचा उपयोग होणार नव्हता हे उघड होते. मॅथ्यू, मारिला आणि मिसेस लिंड यांच्या खेरीज अन्य कुठल्याही स्त्रीशी बोलायला धजावत नव्हते. त्यामुळे त्यांनी मिसेस लिंड यांचा सल्ला घेण्याचे ठरवले. नेहमीच्या परोपकारी वृत्तीने मिसेस लिंड नुसत्या सल्ला देण्यावर थांबल्या नाहीत तर त्यांनी पूर्ण ड्रेस शिवून देण्याची जबाबदारी स्वीकारली.

मॅथ्यूनी फक्त एक सूचना केली, ती म्हणजे आजकाल फॅशन असलेल्या फुग्याच्या बाह्या असलेला ड्रेस असावा. मिसेस लिंडना पण ती सूचना मनापासून आवडली. मारीलाने ॲनीसाठी शिवलेले जून्या पद्धतीचे ड्रेस त्यांना फारसे पसंत पडत नसत, पण तसे मारिलाला सांगून फारसा फरक पडला नसता म्हणून त्या बोलल्या नव्हत्या. मिसेस लिंड यांच्या मते मारिला जून्या वळणाची स्त्री होती शिवाय तिला लहान मुलांच्या संगोपनाचा अनुभव नव्हता. स्वभावतः प्रत्येक मुल वेगळे असते. सर्व मुलांना घडवताना एकाच साच्यात बसवता येत नाही आणि तसे कुठला गणितीय सूत्र ही नाही. त्यासाठी असे कोणते सूत्र गृहीत धरले असेल तर ते बाजूला ठेवून मगच मुलांच्या जडणघडणी वर लक्ष केंद्रित करावे लागते. प्रेम आणि माया गणिती सूत्रात बसत नाहीत. मारिलाला स्वतः प्रमाणे ॲनीने साधे सरळमार्गी असावे या विचाराने, तिच्यासाठी कटाक्षाने फॅशनेबल कपडे शिवलेले नव्हते: परिणामी इतर मुलींचे फॅशनेबल कपडे पाहून ॲनीला पण तशी इच्छा होणे स्वाभाविक आहे आणि जर ती पूर्ण झाली नाही तर संवेदनशील ॲनी, असमाधानी होईल असे मिसेस लिंड यांना वाटत होते. आता खुद्द मॅथ्यूनी सूचना केल्याने त्यांना अजून हुरूप चढला.

पुढचे पंधरा दिवस मारिलाला सतत जाणवत राहिले की मॅथ्यूंच्या मनात काहीतरी वेळी योजना घोळत असावी पण ख्रिसमसच्या आदल्या संध्याकाळपर्यंत ती नेमकी काय योजना होती याचा तिला अंदाज आला नाही. मिसेस लिंड त्या

दिवशी ॲनीचा नवा ड्रेस घेऊन आल्यावर मारिलाला सर्व उलगडा झाला. मिसेस लिंड यांच्या मुत्सद्दी बोलण्यावर मारिलाचा पूर्ण विश्वास बसला नाही तरीसुद्धा मारिलाने त्याबद्दल काही त्रागा केला नाही. अत्यंत संयमाने पण तुटकपणे म्हणाली, "मॅथ्यू काहीतरी मूर्खपणा करेल असे मला वाटत होते, सध्या ॲनीला नवीन ड्रेसची गरज होती असे मला अजिबात वाटत नाही. मी तिला चांगले उबदार, थंडीत घालण्यासाठी तीन ड्रेस शिवले आहेत त्यापेक्षा जास्त कपडे म्हणजे पैशाची उधळपट्टी आहे असे मला वाटते. माझ्यामते ह्या बाहीच्या कापडामध्ये कंबरेचा घेर बसू शकेल. मॅथ्यू तुमच्या या लाडाकोडाने ॲनी अजून शेफारून जाणार आहे. बाकी काही नाही, नवीन ड्रेस घालून मोरासारखी पिसारा फुलवून नाचत सुटणार आहे. पण मला आशा आहे की एव्हढ्या वर तरी तिचे समाधान झाले तरी पुरे नाही तर पुढल्या वर्षी हाताच्या बाह्या फुलून, मोठ्या फुगलेल्या फुग्याच्या आकाराच्या होतील की दरवाज्याची रुंदी लहान वाटायला लागेल."

खिसमसची सकाळ उजाडली तिच मुळी, पांढऱ्या शुभ्र हिमकणांचा वर्षाव करत आणि बघता बघता सगळीकडे बर्फाची चादर पसरली आणि 'ग्रीन ख्रिसमस' येण्याऐवजी 'व्हाईट ख्रिसमस' अवतीर्ण झाला. ग्रीन गेबल्समधील खिडक्यांची तावदाने हिमकणांनी धुरकट झाली होती. ॲनी आनंदाने बाहेरचे बदललेले जग पाहत होती. झपाटलेल्या फरचे झाड, हिमकण पडून पांढरे शुभ्र झाले होते. बर्च आणि जंगली चेरीचे वृक्ष, मोत्यांनी बसल्यासारखे दिसत होते. नांगरलेल्या शेतांवर बर्फाचे आच्छादन पसरले होते. थंडगार हवेमध्ये एकप्रकारची धुंदी जाणवत होती. ख्रिसमसची गाणी मोठ्या आवाजात म्हणत ॲनी जिन्यावरून धावत धावत खाली आली.

"मेरी ख्रिसमस, मारिला! मेरी ख्रिसमस, मॅथ्यू! किती सुंदर ख्रिसमस आहे नाही का? 'व्हाईट ख्रिसमस' मुळे मला खूप आनंद झाला आहे. मला 'ग्रीन ख्रिसमस

a

' आवडत नाही. लोक त्याला ग्रीन ख्रिसमस का म्हणतात कुणास ठाऊक. खरे तर तो करडा तपकिरी रंगाचा असतो. मॅथ्यू हे काय आहे? माझी ख्रिसमस भेट? ॲनीने आतुरतेने मॅथ्यूंच्या हातातील सोनेरी कागदात गुंडाळलेला एक मोठा बाॅक्स पाहून विचारले."

मॅथ्यूनी थोड्या कानकोंडेपणाने बाॅक्स उघडला आणि आतील ड्रेस मारिलाला दाखवताना त्यांच्या डोळ्यात क्षमायाचना होती, मारिला तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत कपात चहा ओतत होती पण तिला सुध्दा ड्रेस आवडल्या सारखे वाटत होते.

ॲनीने ड्रेस घेतला आणि त्याच्याकडे अनिमिष दृष्टीने पाहत राहिली. किती सुंदर होता तो-- चमकदार तपकिरी रंगाच्या, तलम रेशमी स्कर्टला, नाजुक फ्रिल कल्पकतेने लावलेली होती. कंबरेला अत्यंत बारीक चुण्या घातल्या होत्या. गळ्याला सुंदर नाजुक लेस लावलेली होती. सर्वात दिमाखदार गोष्ट होती ती म्हणजे ड्रेसच्या बाह्या, फुग्याच्या बाह्या एका खाली एक कोपराच्या खाली पर्यंत येणाऱ्या होत्या. दोन फुग्याच्या मध्ये स्माॅकिंगची पट्टी आणि रेशमी रिबिनी जोडलेल्या होत्या.

“ॲनी ही तुझी ख्रिसमसची भेट आहे,” मॅथ्यू अडखळत म्हणाले. “तुला आवडली की नाही?”

ॲनीचे डोळे अश्रूंनी डबडबले होते.

“खूप आवडली!” ॲनीने ड्रेस खुर्चीवर ठेवला आणि त्याला दोन्ही हातांनी उराशी कवटाळून धरले. “मॅथ्यू हा ड्रेस अप्रतिम आहे. मला तुमचे आभार कसे मानावेत यासाठी शब्द सुचत नाहीत आणि या फुग्याच्या बाह्या पाहून तर मला हे एक आनंदी स्वप्न असावे असे वाटते.”

a

“ठिक आहे, ठिक आहे आता ब्रेकफास्ट करायला या आणि ॲनी मला तुला एक गोष्ट सांगायलाच हवी ती म्हणजे तुला आताच ड्रेसची गरज आहे असे मला वाटत नाही पण आता मॅथ्यूनी आणला आहेच तर त्याची योग्य काळजी घे. आणि मिसेस लिंड यांनी ड्रेसला मॅचिंग रिबन आणली आहे ती त्याच्या बरोबर ठेव. आणि ब्रेकफास्ट करायला ये,” मारिला म्हणाली.

“अशा वेळी मी ब्रेकफास्ट कशी काय करू शकेन? इतकी सुंदर ख्रिसमस भेट पाहूनच माझे पोट भरले.” ॲनीच्या शब्दातून आनंद ओसंडून वाहत होता.

“फुग्याच्या बाह्यांचा ड्रेस मला कधी घालायला मिळेल असे वाटत नव्हते. एव्हढे समाधान मला कधीच मिळाले नाही. मिसेस लिंड यांनी माझ्यासाठी रिबन दिली, हा त्यांचा चांगुलपणा मला आवडला. मला एक आदर्श मुलगी बनायला आवडेल तसे होण्याचा मी संकल्प मनाशी करते पण अनपेक्षितपणे प्रलोभने समोर येतात आणि मी संकल्प विसरून जाते. तरीही यानंतर मी खरोखरच जास्तीत जास्त प्रयत्न करेन.”

ॲनीचा ब्रेकफास्ट झाला आणि लाकडाच्या ओंडक्याच्या पुलावरून ती डायनाला भेटायला निघाली.

“मेरी ख्रिसमस डायना! हा ख्रिसमस अतिशय सुंदर आहे. मला मिळालेली सर्वात सुंदर भेट तुला दाखवायची आहे. मला मॅथ्यूंनी फुग्याच्या बाह्यांचा सुंदर ड्रेस भेट म्हणून दिला आहे. इतक्या चांगल्या भेटीची मी कल्पना पण कधी केली नव्हती.”

“माझ्याकडे तुझ्यासाठी अजून एक आश्चर्यचकीत करणारी गोष्ट आहे, काल जोसेफिन आंटीने ख्रिसमस भेट म्हणून एक बाॅक्स पाठवला आहे आणि तुझ्यासाठी पण भेट पाठवली आहे. काल संध्याकाळी मी तुला देण्यासाठी येणार होते पण अंधार पडला म्हणून आले नाही,” डायना म्हणाली.

ॲनीने तिला दिलेला बा ॅक्स उघडला, तिच्या नावाचे भेट कार्ड होते आणि सोबत छान मणी लावलेले तिच्या मापाचे चप्पल, सॅटिनचा बो आणि चकचकीत बॅंगल्स होत्या.

“डायना ही खूप मोठी भेट आहे, मला स्वप्नात असल्यासारखे वाटत आहे.”

“मला तर ही दैवी देणगी वाटते कारण आपल्याला आता रुबीची चप्पल उधार घ्यायला लागणार नाही. तशी ती आपल्यापेक्षा मोठी आहे. नाटकात परीने पाय ओढत चालणे बरे दिसले नसते.” डायना म्हणाली.

शेवटी एकदाचा कार्यक्रम अगदी यशस्वीपणे पार पडला. हॉल खचाखच भरला होता. सर्व कलाकारांनी उत्कृष्ट कामगिरी केली, परंतु ॲनची एकूण एक कामगिरी उज्ज्वल होती अगदी जोसी पायला देखील नाकबूल करणे शक्य नव्हते.

“डायना, किती सुंदर संध्याकाळ गेली नाही?” ॲनी आणि डायना रात्री घराकडे निघाल्या होत्या. “हो ना! सर्व छान पार पडले. आपण जवळजवळ दहा डॉलरची कमाई केली. मिस्टर ॲलन सर्व वृत्तांत शार्लटटाऊन येथील वर्तमानपत्रांकडे पाठवणार आहेत,” डायनाने व्यवहारीक बाजू मांडली.

“खरंच आपली नावे पेपरमध्ये छापून येतील, या विचाराने मला आनंद झाला आहे. तुझा गाण्याचा सोलो खूपच सुंदर आहे. प्रेक्षकांनी पुन्हा एकदा सादर करण्याचा आग्रह केला तेव्हा मला माझ्या प्रिय मैत्रीणीचा खूप अभिमान वाटला.”

ॲनी भावूक झाली होती.

“पण तुझे अभिवाचन अप्रतिम झाले. त्यातील दु:ख सर्वांपर्यंत पोहोचले.” डायना म्हणाली.

“सुरवातीला मी खूपच घाबरले होते. माझे नाव पुकारल्यावर मी कशी उठले ते माझे मलाच समजले नाही. माझे पाय लटपटत होते. पोटात भीतीने गोळा आला होता. आवाज फुटत नव्हता. माझ्या मनात मॅथ्यूनी भेट दिलेल्या सुंदर ड्रेसचा विचार

केला आणि मी सगळी हिंमत गोळा केली आणि सुरुवात केली. माझा आवाज मलाच दुरून कुठूनतरी येत असल्यासारखे वाटते होते. माझ्यामते जसे पाठांतर केले तितके सरस स्टेजवर सादर करता आले नाही," ॲनी थोडी हळवी झाली होती.

"खरोखरच तुझे सादरीकरण उत्तम झाले. म्हाताऱ्या मिसेस स्लोगनच्या डोळ्यात अश्रू आलेले मी पाहिले." डायना म्हणाली.

"तर मग मी कोणाच्यातरी हृदयाला स्पर्श केला आहे असे समजायला हरकत नाही. हा खरोखरच एक अविस्मरणीय प्रसंग होता." ॲनी म्हणाली.

"मुलांमध्ये फक्त गिल्बर्टचे संवाद उत्तम होते. ॲनी तू गिल बरोबर वाईट वागतेस. तू जेव्हा स्टेजवरून खाली आलीस तेव्हा तुझ्या केसातील गुलाब खाली पडला होता तो गिल्बर्टने उचलून स्वतःच्या खिशात ठेवलेला मी पाहिला." डायना म्हणाली.

"तो काय करतो यांच्याशी मला काही देणेघेणे नाही. मी मुदलात त्याचा विचारही करत नाही." ॲनीने विषय संपवला.

त्या रात्री वीस वर्षांत प्रथमच मैफिलीसाठी बाहेर पडलेले मारिला आणि मॅथ्यू, ॲन झोपल्यानंतर किचनमध्ये आगीजवळ बसले होते.

"ॲनीने सर्वांसमोर उत्तम काम केले," मॅथ्यू अभिमानाने म्हणाले.

"होय तिने उत्तम काम केले. ती बुद्धीमान मुलगी आहे आणि दिसत पण छान होती. खरेतर मला हे सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे आवडले नव्हते. पण प्रत्यक्ष पाहिल्यानंतर माझे मत बदलले. मुलांच्या सुप्त गुण यामुळे जागृत होतात हे खरेच म्हणायचे. आणि तुला म्हणून सांगते मला ॲनीचा अभिमान वाटतो पण मी तिला सांगणार नाही. उगाच भलतीच फुशारुन जायला नको. आपल्या दोघांपैकी एकाचा तरी धाक असू दे," मारिला समाधानाने म्हणाली.

“मला तिचा अभिमान वाटला हे मी तिला ती झोपायला जाण्यापूर्वीच सांगूनही टाकले,” मॅथ्यू साधेपणाने म्हणाले.

आपण तिच्यासाठी अजून जास्त काय करू शकतो याचा विचार पण करून ठेवायला हवा. मला वाटते की तिला ॲव्हनलीची शाळेपेक्षा अधिक काहीतरी हवे असेल.” यावेळी मात्र मॅथ्यू विचार करून बोलले.

“तो विचार करायला अजून बराच अवकाश आहे. आताशी कुठे तेरा वर्षांची झाली आहे. पण आज तिला पाहून मला धक्काच बसला. मिसेस लिंडेने त्या ड्रेसला खूप लांब आणि घोळदार बनवला आहे त्यात केव्हढी उंच वाटत होती. अभ्यासात हुशार आहे. बुद्धी तल्लख आहे आणि आकलनशक्ती चांगली आहे. मला वाटते इथले शालेय शिक्षण झाले की ' क्विन्स अकॅडमीमध्ये प्रवेशासाठी प्रयत्न करायला हवेत.” मारिलाने आपला विचार बोलून दाखवला.

“ठीक आहे, आता सतत विचार करत राहिल्याने काहीही नुकसान होणार नाही,” मॅथ्यू म्हणाला.

“बऱ्याच गोष्टींवर विचार केल्याने अशा गोष्टी अधिक चांगल्या असतात.”

“ठिक आहे आतापासूनच विचार करायला हरकत नाही. सखोलपणे विचार केला तर गोष्टी चांगल्या गोष्टी सहजपणे घडू शकतात,” झोपायला जाण्यापूर्वी मॅथ्यू बोलले.

# प्रकरण 26

सांस्कृतिक कार्यक्रमाची धामधूम एकदाची संपली पण अजून ॲव्हनलीच्या शाळकरी मुलांची उत्तेजीत मने शांत होण्यास वेळ लागला विशेषतः ॲनीच्या बाबतीत थोडा जास्तच. ॲनीच्या डोक्यातून अजून कार्यक्रमाचा विषय जात नव्हता. रात्री झोपेतही मनात तोच विषय घोळत असे आणि झोप लागत नसे. म्हणूनच की काय मारिलाचा कार्यक्रमाला असलेला विरोध तिला एका दृष्टीने योग्य वाटू लागला. तिच्या मते मारिला ही एक समजूतदार स्त्री होती त्यामुळे समजूतदार असणे खूप चांगले असले पाहिजे असा तिचा समज होता. म्हणून स्वतः मारिला सारखे समजूतदार व्हायचा विचार ॲनीने मनाशी केला पण समजूतदार व्यक्तींमध्ये असणारा कठोरपणा आणि मौजमजेप्रती असणारी नावड लक्षात घेता तिचा विचार बारगळला.

अखेर ख्रिसमसची सुट्टी संपली आणि शाळा हळूहळू पूर्वपदावर येऊ लागली. मैफिलीचा विषय मागे पडला. रुबी आणि एम्मा यांच्यामध्ये बसण्याच्या जागेवरून भांडण झाले आणि त्यांची तीन वर्षांची मैत्री तुटली. जोसी पाय आणि ज्युलिया बेल्स यांच्यामधील अबोला सुरू झाला, याला कारण जोसीने बेसीकडे ज्युलीयाला नावे ठेवली आणि बेसी राईटने ज्युलियाकडे चहाडी केली. स्लोएन भावा बहिणींचे, बेल्स् भावा बहिणींच्या बरोबरचे भांडण मैफिलीच्या अगोदर पासून होते, ते पुढे सुरू राहिले परिणामी ते भांडण त्यांच्या त्यांच्या मित्रमैत्रिणींना पर्यंत

पोहोचले. ॲनी शेर्ली कथबर्ट जास्त भाव खाते म्हणून एला मे तिच्याबरोबर बोलायची बंद झाली.

या क्षुल्लक भांडणांचा अपवाद वगळता, मिस स्टेसीच्या छोट्याशा शाळेचे काम नियमितपणे आणि सुरळीत चालू झाले.

थंडी संपत आली होती. हिंवाळा सौम्य असल्याने बर्फ पडलेला नव्हता. ॲनी आणि डायना जवळच्या पायवाटेने रोज शाळेत जात येत होत्या. चालताना अनेक विषय चर्चेला येत. ॲनी तेरा वर्षांची होणार होती. तिला टिन एज मधील आयुष्य कसे असेल याचे औत्सुक्य वाटू लागले होते. बऱ्याचदा हा विषय डायना बरोबर बोलताना येत असे. रुबी गिलीस पंधरा वर्षे होण्याची वाट पाहत असे प्रियकर मिळण्यासाठी तेव्हढी वाट पाहायला हवी हे तिच्या मोठ्या बहिणींच्या अनुभवातून ती जाणून होती. ॲनी या बद्दल डायनाकडे रुबी गिलीसच्या स्वभावाला दोष देत होती. शाळेच्या नोटीस बोर्ड जवळ दर वेळी वेगवेगळया मुलांबरोबर तिचे नाव लिहले जात असे आणि रुबी खूप चिडल्याचा आव आणत असे पण प्रत्यक्षात तिला या गोष्टी आवडतात असा ॲनीचा कयास होता. मग उगाच खोटे का बोलावे असे ॲनी म्हणाली. खोटे कधी बोलू नये अशी मिसेस ॲलनची रविवारच्या शाळेतील शिकवण होती आणि ॲनीने मिसेस ॲलन सारखे प्रामाणिक, सत्यवचनी बनण्याचे ठरवले होते. मिसेस ॲलन परिपूर्ण व्यक्ती आहेत असे मला वाटते आणि यासाठी मिस्टर ॲलन आपल्या पत्नीला खूप मानतात पण मिसेस लिंड मात्र मिस्टर ॲलनना नावे ठेवत होत्या त्यांच्या मते एव्हढ्या मोठ्या अधिकारी पुरुषाने पत्नीला एव्हढे डोक्यावर चढवून ठेऊ नये असे मिसेस लिंड म्हणाल्याचे ॲनीने डायनाला सांगितले. मिस्टर ॲलन पाद्री असले तरी शेवटी माणूसच आहेत त्यांच्या कडून सुध्दा पाप पुण्य घडणारच. ॲनीने पाप पुण्य या संकल्पना विषयी मिसेस ॲलनशी चर्चा केली तेव्हा तिच्या ध्यानात आले की नेहमी कल्पना विश्र्वात रममाण झाल्याने तिला

a

कर्तव्यांचा विसर पडतो आणि ते पाप आहे म्हणून तेरा वर्षांची झाल्यावर ती कर्तव्ये जास्त जागरूक होऊन करेल.

मिस स्टेसीनी घरचा अभ्यास म्हणून स्वतः रचून एक गोष्ट लिहून आणायला सांगितले होते. डायनाला तो अभ्यास महाकर्मकठीण वाटत होता तर ॲनीला गोष्ट चुटकी सरशी तयार होईल याची खात्री होती. ॲनीची गोष्ट तयार होती. डायनाने आग्रह केल्यावर ती गोष्ट थोडक्यात सांगायला तयार झाली. गोष्टींचे नाव होते, 'मत्सरी मैत्रीण' डायना विचारले, "घरी कुणाला दाखवली आहे काय आणि त्यांना कशी वाटली?"

मारिला म्हणाली, हा तद्दन मूर्खपणा आहे पण मॅथ्यूनी ठिक आहे असा अभिप्राय दिला, असे ॲनीने सांगितले.

गोष्टचा सारांश असा होता. दोन मैत्रिणी असतात. दोघीही दिसायला सुंदर, एकीचे नाव कॉर्डेलिया आणि दुसरीचे नाव जेराल्डीन. त्या गावात एक सरदार पुत्र येतो त्याचे नाव बर्ट्रांम. जेराल्डीनचा घोडा उधळतो तेव्हा बर्ट्रांम तिचा जीव वाचवतो. तिला पाहिल्यावर तो तिच्या प्रेमात पडतो आणि लग्नाची मागणी घालतो ती आनंदाने हो म्हणते. तिला प्रेमाची भेट म्हणून हिऱ्याची आंगठी आणि रत्नांची हार देतो. नंतर कार्डेलियाची आणि त्याची ओळख होते. ती त्याच्या प्रेमात पडते. पण जेव्हा तिला जेराल्डीनला त्यांने मागणी घातल्याचे समजते तेव्हा तिला तिचा खूप संताप येतो पण ती तो दाखवून देत नाही. उलट जेराल्डीनला फिरायला म्हणून रानातील नदीच्या काठावर घेऊन जाते आणि ढकलून बाजूला होते. तेवढ्यात तिकडे बर्ट्रांम येतो आहे जेराल्डीनला वाचवायला नदीत उडी मारतो पण त्याला चांगले पोहता येत नव्हते आणि ते दोघे नदीत बुडून मरण पावतात. नंतर त्यांची प्रेते किनाऱ्यावर वाहून येतात. त्यांच्यावर एकत्र अंत्यसंस्कार केले जातात आणि ते पाहून

कार्डेलीया पश्चात्तापाने वेडी होते आणि मरेपर्यंत वेड्यांच्या दवाखान्यात राहते. अशी तिच्या पापाची शिक्षा मिळते.

डायनाने उत्सुकतेने गोष्ट ऐकली आणि ॲनीच्या कल्पनाशक्तीची वाखाणणी केली आणि तिच्याकडे अभाव असल्याने हिरमुसली. ॲनीने आनंदाने तिला लागेल ती मदत करण्याची तयारी दाखवली आणि बघता बघता स्टोरी क्लबची स्थापना झाली. सुरवातीला फक्त ॲनी आणि डायना पुरता मर्यादित असलेल्या स्टोरी क्लब मध्ये जेन, रुबी आणि तीन चार मुली सामील झाल्या.

प्रत्येक आठवड्याला प्रत्येकीने एक गोष्ट तयार करायची नंतर तिचे सामुदायिक वाचन होईल आणि इतर सदस्यांनी काही योग्य सूचना केल्यास त्याची दखल घेतली जाईल, या प्रकारे नियमावली बनवली गेली. सदस्य टोपणनावाने पण लिहू शकत होते.

मारिलाने परत एकदा या उपक्रमावर कडक ताशेरे ओढले आणि त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे याची जाणीव करून द्यायला ती विसरली नाही.

“मारिला आम्ही गोष्टींच्या माध्यमातून नैतिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो. वाईट लोकांना शिक्षा मिळते, चांगल्या लोकांना बक्षिस मिळते. शेवटी सत्याचा विजय होतो. स्वतः त्रास पडला तरी गरजूंना मदत करावी, खोटे बोलू नये, चोरी करून नये अशी शिकवण गोष्टींच्या माध्यमातून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. मिस्टर आणि मिसेस ॲलना पण आम्ही आमच्या गोष्टी वाचून दाखवल्या, त्या दोघांनीही नैतिकता उत्कृष्ट असल्याचे मान्य केले. फक्त ते चुकीच्या ठिकाणी हसले. आमच्या गोष्टींपैकी सर्वोत्तम चार गोष्टी मिस जोसेफिन बॅरींना पाठवून दिल्या. त्यांनी आवडल्याचे कळवले. मिसेस ॲलन म्हणतात की आयुष्यात एखादे ध्येय पक्के केले पाहिजे. मला मोठे झाल्यावर मिसेस ॲलन सारखे बनायचे आहे. मारिला मी तशी बनू शकेन असे तुम्हाला वाटते काय?”

a

मारिला आश्वासक स्वरात म्हणाली, “तसे बनणे काही फार अवघड आहे असे मी म्हणणार नाही पण इथे 'पण' वर जास्त जोर होता, मला खात्री आहे की मिसेस ॲलन तुझ्यासारखी मूर्ख, विसराळू मुलगी नसावी.”

“पण मारिला, त्या आता जितक्या चांगल्या आहेत, तितक्या चांगल्या लहानपणी नव्हत्या असे त्यांनी स्वतः सांगितले आहे. लहान असताना त्या भयंकर खोडकर होत्या, त्यांना फारशी किंमत मिळत नव्हती. म्हणून मला आशा आहे की मोठेपणी मी काही चांगली व्यक्ती बनू शकेन. मिसेस लिंड सांगत होत्या एक पाद्री लहानपणी मावशीच्या घरातून केक चोरून खात, असे सांगत होते. त्या दिवसापासून त्यांचा, त्या पाद्री महोदय यांविषयी होता नव्हता तो आदर पार संपून गेला. पण माझ्या मते मिसेस लिंड चूक करत आहेत. लहान मुले खोडकर तर असायचीच. खाल्ला एखादे वेळी चोरून केक पण तो कबूल करण्याचे धैर्य दाखविल्यावर त्याचा पुढे वाढाचार लावणे बरोबर नाही. लहानपणी खोड्या करणारी मुले मोठेपणी नाव काढू शकतात हे समजल्यावर मला माझ्याबद्दल विश्र्वास वाटू लागला आहे.” ॲनीने आपली बाजू मांडली.

“ॲनी, तुझी तुला ती ताटे घासून पुसून ठेवायची आहेत. जवळजवळ अर्धा तास तू बोलत आहेस. आपण गप्पा मारत बसण्यासाठी अगोदर नेमून दिलेली कामे संपवा."

# प्रकरण 27

एप्रिल महिन्याच्या एका संध्याकाळी, मारिला महिला मंडळाची मिटिंग आटोपून घराकडे जाण्यासाठी निघाली होती. हिंवाळा संपला होता आणि सर्वांचा आवडत्या वसंत ऋतूचे आगमन झाले होते. मारिला आपल्याच विचारात निघाली होती. तिच्या मनात महिला मंडळाच्या मदत फंडातील देणगी, चर्चच्या भांडारखान्यातील बदलायचे कार्पेट, एका ना दोन अनेक गोष्टी घोळत होत्या. दूरवर पसरलेल्या गवताच्या कुरणांवर मावळतीच्या सूर्याची तांबूस, सोनेरी किरणे पसरली होती. ओढ्याच्या काठच्या झाडांच्या सावल्या वाहत्या पाण्यात नाचत होत्या. चमचमत्या पाण्याच्या तलावाकाठच्या मेपलना तांबूस कळया लगडल्या होत्या. हिवाळयात सुस्तावलेल्या सृष्टीचे हळूहळू चलनवलन सुरू झाले होते आणि त्याची लय चराचरात भरून राहिली होती, अशाच लयीत पावले टाकत मध्यमवयीन मारिला घराच्या ओढीने निघाली होती.

घराजवळ आल्यावर तिची प्रेमळ नजर झाडांच्या आड दडलेल्या ग्रीन गेबल्स आणि आसमंतावर फिरली. खिडक्यांच्या तावदानांवर पडलेले मावळतीचे प्रकाशकिरण परावर्तित होऊन अधिकच चमकत होते.

अंगणात शिरताना मारिलाला आपल्या उबदार किचनमध्ये टेबलावर चहाची जय्यत तयारी असल्याची खात्री होती. ॲनीच्या ग्रीन गेबल्समध्ये येण्यापूर्वी नेहमी बाहेरून आल्यावर चूल पेटवण्यापासून तयारी करावी लागत असे. आता ॲनी हळुहळू स्वयंपाकघरात लक्ष घालू लागली होती. छोटी मोठी कामे स्वतःहून करण्याची तिची तयारी सुरू होती. घरात पाऊल पडताच स्वयंपाकघरात सामसूम होती. चूल थंड होती ते पाहून मारिलाचा अपेक्षाभंग झाला आणि ॲनीचा राग आला

a

कारण बाहेर जाताना ॲनीला पाच वाजता चहा तयार ठेवायला सांगितले होते पण तिची कुठेच जाग नव्हती. घाईघाईने तिने कपडे बदलले. मॅथ्यू शेतातून येण्याची वेळ झाली होती. रात्रीच्या जेवणाच्या तयारीला लागला पाहिजे होते.

"ॲनीचे आल्यावर तिचे चांगलेच कान उपटले पाहिजेत," चुलीत लहान लहान लाकड्याच्या ढलप्या घालत मारिला विचार करत होती. तेवढ्यात मॅथ्यू आले आणि शांतपणे चहासाठी वाट पाहत बसले.

"नक्कीच ॲनी डायना बरोबर कुठेतरी भटकत असणार नाहीतर त्या वेडपटासारखी गोष्टी लिहिण्यात किंवा संवाद पाठ करण्यात दंग झाली असणार. तिला काळ वेळेचे जरा सुध्दा भान नसते. नेमून दिलेल्या कामाकडे मुळी लक्षच नसते. अचानक हातातील काम अर्धवट सोडून दुसरेच काही करत असते. आज मिसेस ॲलन, ती एक तल्लख बुद्धीची गोड मुलगी आहे म्हणून तिचे कौतुक करत होती पण मला काही त्यात तथ्य वाटत नाही, असेल तल्लख बुद्धीची गोड मुलगी पण तिच्या डोक्यात चित्रविचित्र कल्पना भरलेल्या आहेत, हा विक्षिप्तपणा कधी थांबणार आहे हे देव जाणे! एक झाले की एक, हिचे आपले वेडे चाळे सुरूच आहेत. आज मिटिंगमध्ये हेच मी मिसेस लिंडना सांगत होते पण तिला ते पटले नाही. ॲनीमध्ये पुष्कळ दोष आहेत आणि मला ते नाकारता येत नाहीत. मी तिला वाढवत आहे रेचेल नाही. स्वतः रेचेल, ॲव्हनलीमध्ये एखादा देवदूत जरी आला तरी त्याचे दोष काढेल. मी तिला जरा चिडून बोलणार होते पण तेवढ्यात मिसेस ॲलनने ॲनीचे कौतुक सुरू केले म्हणून मला गप्प बसावे लागले. आता देखील मी ॲनीला बजावून गेले होते की घर सोडून जाऊ नकोस, घरी थांबून चहाची तयारी कर पण तेव्हढे सुद्धा तिच्याच्याने झाले नाही. आता पर्यंत तिचे अनेक दोष मी सहन केले पण यापुर्वी तिने कधी अवज्ञा केली नव्हती. आता तिच्यावर विश्र्वास कसा ठेवायचा असे वाटायला लागले आहे."

"मला ती कुठे गेली आहे याची कल्पना नाही," मॅथ्यू म्हणाले, शेतातून दमून भागून आल्यावर शांतपणे मारिलाचे

वाक् ताडन ऐकत उभे होते. आजवरच्या अनुभवावरून जे काही बोलायचे ते बोलू देणेच योग्य होते. काही युक्तिवाद केल्यास त्याचा उलटा परिणाम होईल ही गोष्ट ते जाणून होते.

"कदाचित तू निष्कर्ष काढण्यात खूप घाई करत आहेस, मारिला. तिने तुझी आज्ञा मोडली आहे याची खात्री होईपर्यंत तिला अविश्वासू म्हणू नको. काय झाले त्याचा ॲनी योग्य खुलासा करेल."

"मी तिला घरात थांबायला सांगितले होते पण ती थांबली नाही हे खरे आहे आता तिच्या खुलाशाने माझे समाधान होणे अवघड आहे अर्थात तुला तो पटेलच आणि तू तिचीच बाजू घेशील हे मला माहीत आहे पण माझ्यावर तिची जबाबदारी आहे हे तू विसरु नकोस." मारिलाचा स्वयंपाक

झाला तेव्हा अंधार पडला पण अजून ॲनीचा पत्ता नव्हता. लाकडी ओंडक्याच्या पुलावरून गडबडीत येताना दिसेल असे वाटून मारिलाचे लक्ष ॲनीच्या वाटेकडे लागले होते. सर्व आटोपल्यावर मारिला मेणबत्ती लावण्यासाठी कोठीच्या खोलीकडे निघाली. जाता जाता ॲनीच्या खोलीतील मेणबत्ती पेटवावी म्हणून आत गेली आणि पाहते तर काय, ॲनी डोक्यावरून पांघरूण ओढून पलंगावर पालथी पडली होती. "म्हणजे ही दुपारपासून इथेच आहे की काय?" मारीला क्षणभर गोंधळून गेली. "अरे देवा! तू इथे झोपली आहेस की काय?"

"नाही,"गोंधळून ॲनी म्हणाली.

"मग आजारी बिजारी आहेस काय?" मारिलाने काळजीच्या स्वरात विचारले.

ॲनीने डोके उशी मध्ये अजून खोल खुपसले. जणू तिला काही तरी लपवायचे असावे.

"मारिला आपण कृपया इथून निघून जावे. आणि माझ्याकडे पाहू सुध्दा नका. मी खूप निराश झाले आहे. आता वर्गात कोण पहिला येतो, कोण उत्तर गोष्टी लिहितो, कोण चर्चमध्ये चांगली गाणी गातो या कशा कशाचा उपयोग नाही. मी पुन्हा हे सर्व करू शकेन अशी आशा संपली आहे. माझी यापुढील कारकीर्द संपुष्टात आली आहे. कृपया माझ्याकडे न पाहता आपण निघून जावे."

"असे काय झाले? तू नेमके काय केले आहेस ते या क्षणी उठून मला सांग."

"माझ्या केसांकडे पहा," ॲन हळू आवाजात म्हणाली.

त्यानुसार, मारिलाने तिची मेणबत्ती उचलली आणि ॲनीच्या केसांकडे बारकाईने पाहिलं, "ॲन शर्ली, तू तुझ्या केसांचे काय केलेस? ते हिरवे दिसत आहेत?"

ॲनीचे केस काळपट हिरवे दिसत होते शिवाय त्यात काही मूळचे लाल पण होते. एकंदरीत इतका भयानक अवतार मारिलाने उभ्या जन्मात पाहिला नव्हता.

"हो हिरवेच आहेत. मला वाटले लाल रंगाचे केसाइतके जगात दुसरे काही वाईट नाही पण आता माझ्या लक्षात आले आहे की हिरव्या रंगाचे केस त्याच्या दहापट जास्त वाईट आहेत. मी किती दुःखी आहे याची तुम्हाला कल्पना पण येणार नाही."

"पण हे झाले कसे ते समजले पाहिजे. इथे खूप थंड आहे खाली किचनमध्ये चल आणि नीटपणे काय ते सांग. तरी मला वाटतं होते, दोन महिने झाले अजून तुझ्या हातून नवीन काही उपद्व्याप कसे काय झाले नाहीत. केसांचे काय केले?"

"मी ते रंगवले."

"रंगवले! आपले केस रंगवले! ॲन शर्ली, तुला माहित नव्हते का की असे करणे वाईट आहे?"

a

“असे करणे चुकीचे आहे हे मला माहीत होते, पण मला लाल केसांपासून मुक्ती हवी होती म्हणून मी वाईटपणा पत्करायचा ठरवला; त्याची भरपाई मी जास्त चांगले वागून करायचे ठरवले होते.”

“ठिक आहे, मला जर माझे केस रंगवायचे असते तर मी निदान हिरव्या रंगाने नक्कीच रंगवले नसते.” मारिला उपहासाने म्हणाली.

“मारिला, मला पण ते हिरवे बनवायचे नव्हते, मला अगदी कावळ्या सारखे काळेकुट्ट केस होतील सांगितले म्हणून मी हे रंगवायचे ठरवले. मी त्यांच्या शब्दांवर विश्र्वास ठेवला.”

“तुला कोणी सांगितले? कुणाबद्दल तू बोलत आहेस?"

“आज दुपारी फेरीवाला आला होता. मी त्याच्याकडून रंग विकत घेतला.”

“ॲन शर्ली, मी तुला किती वेळा सांगितले आहे की त्या इटालियनपैकी एकाला घरात येऊ देऊ नकोस! माझा त्याच्यावर अजिबात विश्वास नाही.”

“मी त्याला घरात येऊ दिले नाही. तुमच्या सूचना माझ्या लक्षात होत्या. मी दार व्यवस्थित बंद केले आणि पायरीवर जाऊन त्याच्या वस्तू पाहिल्या. शिवाय, तो इटालियन नव्हता-तो जर्मन ज्यू होता. त्याच्या पेटाऱ्यात खूप गोष्टी होत्या. त्याने मला सांगितले की तो आपल्या पत्नी आणि मुलांना जर्मनीतून बाहेर आणण्यासाठी पैसे हवे आहेत म्हणून तो कठोर परिश्रम करत आहे. तो त्यांच्याबद्दल इतक्या आत्मियतेने बोलला की ते माझ्या मनाला भिडले. मला त्याला मदत करण्यासाठी काहीतरी विकत घ्यायचे होते. मग मला केसांच्या रंगाची बाटली दिसली. त्याने मला हमखास केस काळेभोर होतील आणि रंग अजिबात जाणार नाही असे सांगितले आणि मला विकत घेण्याचा मोह झाला. पण बाटलीची किंमत पंच्याहत्तर सेंट्स होती माझ्याकडे फक्त पन्नास सेंट्स होते, मला म्हणून त्याने पन्नास सेंट्स बाटली द्यायची ठरवली. मला तो भला माणूस वाटला आणि म्हणूनच मी बाटली विकत घेतली आणि खोलीत येऊन त्यावर लिहिल्याप्रमाणे जून्या ब्रशने केसांना रंग लावला. संपूर्ण

बाटली संपवली आणि आरशात पाहिल्यावर मला हिरवा रंग पाहिल्यावर धक्काच बसला आणि मी चुकीचे लागल्याचा पश्र्याताप झाला. त्या वेळेपासून अद्यापही मी पश्र्यातापच करत आहे.''

''आता तरी तुझे डोळे उघडले तर चांगले होईल. दिखाऊपणाच्या हौसेखातर तुला ही शिक्षा मिळाली असे म्हणायला हरकत नाही. मला वाटते एकदा केस नीट धुवून बघ, काही उपयोग झाला तर बरे होईल.'' मारिलाने सल्ला दिला.

ॲनीने केस धुतले, चांगला खसखससून साबण लावून ब्रेशने घास घासले पण व्यर्थ. फेरीवाला खरे बोलला होता. रंग पक्का आहे, मुळीच जाणार नाही. आणि तसेच घडले. केसांचा हिरवा रंग अजिबात फिका पडला नाही.''

''ओ हो मारिला! मी काय करू?'' ॲनी रडत रडत मारिलाला म्हणाली. माझी ही चूक कधीही दुरुस्त होण्याची शक्यता नाही. इतक्या चुका माझ्या हातून झाल्या आहेत. मिसेस लिंडना उद्धटपणे बोलणे, डायनाला चुकीचे पेय देणे, केक मध्ये भलतेच औषध इसेन्स म्हणून घालणे लोक हळूहळू थोडे विसरून गेले पण आता हे हिरवे केस कायमचे माझ्यासोबत असणार आणि लोक कधीच विसरणार नाहीत. वर्गातील मुले मुली माझ्या तोंडावर हसतील, पाठीमागे नावे ठेवतील. मी प्रिन्स एडवर्ड आयलंडमधील सर्वात दुःखी मुलगी आहे.''

आठवडाभर ॲनची नाराजी कायम होती. त्या काळात ती कुठेही गेली नाही आणि दररोज केस धुत असे. बाहेरील लोकांपैकी एकट्या डायनाला हे जीवघेणे रहस्य माहित होते, परंतु तिने कधीही न सांगण्याचे वचन दिले होते आणि तिने आपला शब्द पाळला. आठवड्याच्या शेवटी मारिलाची खात्री झाली की काहीतरी वेगळा उपाय करायला हवा आहे.

मारिला म्हणाली, ''दुसरा कोणताही उपाय नाही, ॲनी. रंग पक्का आहे. तुझे केस कापायला हवेत; त्याशिवाय पर्याय नाही. असे केस घेऊन तू बाहेर जाऊ शकत नाहीस आणि शाळा चुकवून घरी पण बसता येणार नाही.''

a

ॲनीचे ओठ थरथर कापले, पण तिला मारिलाच्या बोलण्यातील कटू सत्य समजले. निराशाजनक उसासा टाकत तिने कात्री आणली आणि मारिलाला म्हणाली, “कृपया एकदाचे हे विद्रुप केस लौकर कापून टाका. काही जणींचे केस आजारात गळतात, काही पुस्तकात मी वाचले आहे तर कोणी कोणी काही चांगल्या कामासाठी केस विकून पैसे उभे करतात अशी काही गोष्ट असती तर मला त्यात केस गमावण्याचे दु:ख झाले नसते. स्व:ताच्या हातानी माझ्या केसांची वाट लावली आहे याचे मला जास्त दु:ख होत आहे. तुम्ही केस कापताना या गोष्टीला आपला मुर्खपणा जबाबदार आहे हे आठवून मला अश्रू आवरणार नाहीत.”

आणि ॲनी ओक्साबोक्शी रडली, मारिलाचे केस कापण्याचे काम पुर्ण झाल्यावर आरशात तिने पाहिले तेव्हा निराशेने एकदम स्तब्ध झाली. मारिलाने केस अगदी बारीक कापले होते. ॲनीला आपलाच चेहरा पाहवेना. तिने झटकन तोंड आरश्यापासून तोंड फिरवले.

“मी केस वाढेपर्यंत स्वतःचे तोंड आरश्यात पाहणार नाही,” ती उद्गारली.

मग अचानक ती परत आरश्यात पाहात स्व:ताशी म्हणाली, “हो मी आरश्यात स्वता:ला पाहणार आहे अगदी रोज, जेव्हा जेव्हा माझ्या खोलीत येईन तेव्हा तेव्हा मी किती विद्रुप दिसते हे प्रत्यक्ष पाहणार आहे आणि नेहमी प्रमाणे वेगळी कल्पना करून स्वतःची फसगत करून घेणार नाही. माझे केस अतिशय वाईट आहेत हा विचार मी मनातही आणणार नाही कारण की माझ्या आता लक्षात आले आहे की माझ्या केसांचा रंग जरी लालसर असला तरी ते लांब आणि दाट होते आणि समोरच्या बाजूला केसांच्या कुरळया बटांमुळे अगदीच काही वाईट दिसत नव्हते.”

येणाऱ्या सोमवारी ॲनीच्या कापलेल्या केसांनी शाळेत बरीच खळबळ माजवली पण नशीब कुणालाही त्यामागचे खरे कारण समजले नाही अगदी जोसी पायला सुध्दा नाही, तरी तिने ॲनीच्या तोंडावर शेतातील बुजगावणे म्हणून सांगायला कमी केले नाही.

a

ॲनी शाळेतून आली तेव्हा मारिला डोकेदुखीने हैराण होऊन थोडावेळ स्वस्थ पडलेलेली होती.

तिला ॲनी म्हणाली, “मी जोसीला मला बुजगावणे म्हटल्यावर काहीही उलट उत्तर दिले नाही, मी विचार केला की हा माझ्या शिक्षेचाच एक भाग आहे आणि तो मी धीराने सहन केला पाहिजे. जोसी माझ्या तोंडावर मी बुजगावण्यासारखी दिसते असे म्हणाली तेव्हा मला तिला उत्तर द्यायचे होते पण मी तसे केले नाही. मी फक्त एक तिरस्कारयुक्त नजर तिच्याकडे टाकली आणि तिला माफ केले. चुकलेल्याला क्षमा करणे यात पुण्य मिळते यानंतर मी जास्तीत जास्त चांगले बनण्याचा प्रयत्न करणार आहे तसेच मी पुन्हा कधीही सुंदर बनण्याचा प्रयत्न करणार नाही. मला मिसेस ॲलन, मिस स्टेसी आणि तुमच्या सारखे चांगले व्हायचे आहे आणि जर मी तशी बनले तर त्याचे श्रेय सर्वस्वी तुमचे असेल. डायना म्हणाली की माझे केस थोडे वाढायला लागले की डोक्याभोवती वेल्वेटची काळी रिबन बांधून एका बाजूला त्याचा बो बांध म्हणजे छान दिसेल. मारिला मी मघापासून खूपच बोलत आहे काय? तुमचे डोके खूप जास्त दुखत असेल तर मी बाम लावून चेपून देऊ काय?”

“माझे डोके आता बरे आहे, दुपारी मात्र जास्त दुखत होते. अलीकडे माझी ही डोकेदुखी वाढत चालली आहे त्यासाठी मला डॉक्टरांना भेटावे लागेल असे वाटते आणि तुझ्या बडबडी बद्दल म्हणशील तर मला आता त्याची सवयच झाली आहे, त्यामुळे मला त्यांचे काही वाटत नाही.”

मारिलाला ॲनीची बडबड ऐकून बरे वाटले असे सूचित करायचे होते, फक्त शब्द रचना वेगळी होती मात्र ॲनीने ती अचूक ओळखली.

# प्रकरण 28

आज ॲनी आणि तिच्या मैत्रिणींनी ला ॅर्ड टेनिसन यांच्या 'इड्ल ऑफ द किंग' कवितेमधील लॅन्सला ॅट आणि इलेन यांच्या हृदयस्पर्शी प्रसंगाचा नाट्य रुपांतर करायचे ठरवले होते.

“ॲनी, इलेन तर तुलाच बनायला हवेस, मी होडीत झोपून पाण्यावर तरंगण्याचे धाडस कधीच करू शकत नाही.”

जेन म्हणाली, “खरच खूपच रोमांचक कल्पना आहे. पण मला शांतपणे पडून राहणे जमणार नाही आणि मध्ये मध्ये उठून पाहिले तर त्यातील नाट्य निघून जाईल."

“छे!छे! मला पाण्याची फार भीती वाटते,” रुबी म्हणाली, “आपण दोघी तिघी असतो ते सुद्धा बसलेल्या स्थितीत तेव्हाची गोष्ट वेगळी पण मेल्याचे सोंग करून झोपून तरंगत्या होडीतून जायच्या नुसत्या कल्पनेनेच मी मरून जाईन. ॲनीच हे पात्र करु शकते."

“मला तरंगायची भीती वाटत नाही, इलेनचे पात्र करायला पण आवडेल पण ते विचित्र दिसेल. पण लाल केसांची इलेन कशी होऊ शकेल. तिचे केस तर सोनेरी होते, रंग पांढऱ्या लिलीच्या फुलासारखा गोरापान, रुबीच खरी इलेन म्हणून शोभेल,” ॲनीने स्पष्ट मत मांडले.

a

“ॲनी तसा तुझा रंग पण रुबी सारखाच गोरा आहे शिवाय केस कापण्यापुर्वी होते त्यापेक्षा कमी लालसर दिसतात,” डायनाने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

“डायना, खरचं तुला पण असे वाटते की माझ्या केसांचा लाल रंग कमी होत आहे? मला थोडा संशय आला होता पण कुणाला विचारायचे धाडस झाले नाही. त्याला लाल ऐवजी तपकिरी रंग असे म्हणता येईल?” ॲनीच्या आवाजातील आशा आणि आनंद लपत नव्हता.

“होय नक्कीच,” डायना प्रेमाने ॲनीच्या केसांकडे पाहत म्हणाली.

बॅरींच्या मालकीच्या जागेतील तलावाच्या काठावर सर्वजणी खेळत होत्या. मासेमारी आणि बदकाची शिकार करण्यासाठी तलावाच्या काठावर एक छोटी होडी बांधून ठेवलेली असे. उन्हाळयात शाळेतील पाच सहा जणी मिळून बहुतेक याच ठिकाणी खेळत असत.

मिस्टर बेल यांनी वसंत ऋतूमध्ये त्यांच्या घराच्या मागील कुरणातील बरीच झाडे निर्दयपणे तोडली होती. त्याबरोबर त्यांचे भातुकलीच्या खेळातील ‘इडलवाइल्ड’ हे घर उध्वस्त झाले होते. ॲनी त्या कापलेल्या बुंध्याशी बसून रडली होती. मि. बॅरींची सपाट तळाची छोटी नाव डायना आणि ॲनी खुशाल तलावात वल्हवायला शिकल्या होत्या.

शाळेत टेनिसनची कविता अभ्यासाला होती. त्यांचे नाट्य रुपांतर करण्याची ॲनीची कल्पना होती. फक्त प्रमुख पात्रे म्हणून इलेन, लॅन्सलॉट, गिनीव्हर आणि किंग ऑर्थर एव्हढीच पात्र योजना करण्याचे ठरले होते.

होडी नेहमीच्या बांधलेल्या जागेवरून प्रवाहात लोटल्यानंतर ती प्रवाहाबरोबर पुलाखालून वाहत जाऊन पुढे तलावाच्या वळणावर उथळ पाण्यात जाऊन थांबत असे. ॲनी आणि डायनाने अनेकदा अशा प्रकारे होडीतून दुसऱ्या तीरावर गेल्या होत्या.

इलेनची भुमिका साकारायला ॲनीची मनातून इच्छा होती पण इलेनच्या व्यक्तिरेखेला आपण कलात्मक न्याय देण्यासाठी परिपूर्ण नाही असे तिला वाटत होते. शेवटी इतर मुलींनी असमर्थता व्यक्त केल्यामुळे ॲनी शेवटी इलेनचे पात्र करण्यासाठी तयार झाली तर रुबी-किंग ऑर्थर, जेन-गिनीव्हर, डायना-लॅन्सला ॅट अशी निवड पक्की झाली. शिवाय इलेन व्यतिरिक्त इतर जणींना तिच्या वडिलांची आणि भावांची अशा दुहेरी भूमिका करायला लागणार होत्या. एक गोष्ट मात्र अडचणीची होती ती म्हणजे छोट्या होडीतून इलेनचा मृतदेह वाहत जातांना त्यासोबत मुका सेवक जाऊ शकत नव्हता. एक माणूस आडवा झोपल्यावर दुसऱ्याला बसायला जागा उरतच नव्हती.

वातावरण निर्मितीसाठी होडीला आतून काळा रंग असणे आवश्यक होते म्हणून डायनाच्या आईची जूनी शाल आत अंथरायचे ठरले.

सर्व जय्यत तयारी झाली. ॲनी होडीमध्ये छातीवर हाताची घडी करून आडवी झाली आणि तिने डोळे मिटले.

“खरोखरच ती मेल्यासारखी दिसत आहे,” रुबी घाबरून म्हणाली. बर्चच्या झाडाच्या सावल्या तिच्या शांत, फिकट चेहऱ्यावरून हलत होत्या. “असे मरणाचे सोंग करणे ठिक आहे काय? मिसेस लिंड तर म्हणतात, नाटक, अभिनय सर्व नैतिकदृष्ट्या त्याज्य गोष्टी आहेत,” रुबी खरोखरच घाबरलेली दिसत होती.

“रुबी तू मिसेस लिंड यांच्या गोष्टी सांगू नकोस, त्यांच्या जन्माच्या अगोदर शेकडो वर्षे जूनी ही नाट्यकला आहे. जेन, तू तुझे नेपथ्याचे काम कर, खरे तर मी मेल्याचे सोंग केल्यावर बोलणे पण मूर्खपणाचे आहे,” ॲनी गंभीरपणे बोलली.

जेन उठली, इलेनच्या अंगावर घालायला सुवर्ण वस्त्र हवे होते. पिवळ्या रंगाच्या स्कार्फची पर्यायी व्यवस्था केली गेली. पांढऱ्या लिलीची फुले इलेनवर

a

वाहायला हवी होती ती मिळाली नव्हती म्हणून निळ्या आयरिसची फुले इलेनच्च्या घडी घातलेल्या हातांवर ठेवण्यात आली.

“आता सर्व तयारी झाली आहे,” जेन म्हणाली. “आता आपण तिच्च्या कपाळाचे चुंबन घेऊन तिला शेवटचा निरोप देऊ. डायना तू निरोप देताना 'लाडक्या बहिणी, कायमचा निरोप देतो' असे आणि रूबी तू 'गोड बहिणी, अलविदा' असे दु:खी चेहऱ्याने गंभीरपणे म्हणा आणि ॲनी तुझा चेहरा जरा हसरा असू दे कारण मृत्यूला इलेन स्वतःहून हसत हसत सामोरी गेली होती. सर्व पार व्यवस्थित पडले आता होडी पाण्यात लोटायला हवी,” जेन दिग्दर्शकाची भुमिका चांगली निभावून नेत होती.

होडी पाण्यात घाईघाईने लोटतांना तिची एक बाजू कठड्याला घासली गेली. इलेनचा पुढचा प्रवास सुरळीत सुरू झाला याची खातरजमा झाल्यावर डायना, जेन आणि रुबी पुलाच्च्या पलीकडल्या तीराकडे पळाल्या. तिकडे त्यांना किंग ऑर्थर, लॅन्सलॉट आणि गिनीव्हरच्च्या भूमिकेसाठी तयार रहायचे होते आणि इलेनला अखेरचा निरोप देण्यासाठी होडीतून उतरवून घ्यायचे होते.

काही मिनिटे ॲनीने तरंगत राहण्याचा आनंद लुटला आणि तिला काही काही तरी अघटीत घडत असल्याची जाणीव झाली. होडीत पाणी शिरायला लागले होते. तशी ॲनी, काळी शाल आणि पिवळा स्कार्फ हातात धरून पटकन उठून उभी राहिली. होडीच्च्या तळाला गळती लागली होती. होडी पाण्यात लोटताना कठड्याला घासली गेली होती तेव्हा एखाद्या खिळा सुटून लाकडाची फळी सुटली गेली असावी. परिस्थिती गंभीर होती. पुलाखालून पलिकडच्च्या काठावर जाण्यापूर्वी बुडायला लागली होती. थोडे फार वल्हे मारायचे ठरवले तर गडबडीत दोन्ही वल्ही काठावर राहिली होती. ॲनीने किंकाळी मारली पण कुणाच्च्या कानी पडणे अशक्य होते. ॲनीने धीर गमावला नव्हता, एक शेवटची संधी बाकी होती.

a

दुसरे दिवशी ॲनी, मिसेस ॲलनना हा जवळजवळ जीवावर बेतलेला प्रसंग सांगताना म्हणाली, “होडी प्रवाहाबरोबर पुढे चालली होती पण होळीच्या आतील पाणी वाढत चालले होते. मधला पूल येईपर्यंत पाणी भरून कधी बुडेल हे सांगणे कठीण होते. मी देवाचा धावा सुरू केला. पण प्रार्थना करताना डोळे मिटून घेतले नाहीत कारण मला माहिती होते की देवाला पण मला वाचवायला एकच मार्ग होता तो म्हणजे पूलाच्या आधाराच्या खांबाजवळून होडी जाताना थोडी फार आडली तरच होडीला सोडून देऊन मला त्यावर चढते शक्य होईल. हे खांब म्हणजे जुन्या झाडांची खोडे आहेत आणि त्यावर खूप गाठी आणि जुन्या फांद्या आहेत. प्रार्थना करताना मला स्वतःला लक्ष देऊन हा मार्ग काढायला लागणार होता. परत एकदा मी देवाची प्रार्थना केली, 'देवा होडी एखाद्या झाडाच्या खांबाजवळ थोडीशी थांबू दे.’ पुढचे काम मला करायला हवे होते आणि देवाने माझी प्रार्थना ऐकली, एक मिनिटभर होडी एका खांबाला आदळली मी शाल आणि स्कार्फ माझ्या खांद्यावर फेकला खांबाला घट्ट धरून वरच्या एका छोट्या फांदीवर चढून बसले. मी देवाचे आभार मानले. आता मला पूलाच्या आधाराच्या खांबावरून परत जमिनीवर येण्यासाठी मदतीची गरज होती."

होडी पुढे गेली आणि मध्य प्रवाहात पूर्णपणे बुडाली. पलीकडे डायना, जेन आणि रुबी तिची वाट पाहत उभ्या होत्या त्यांना बोट बुडालेली दिसली आणि ॲनीचे काय झाले असेल याचा अंदाज आला. क्षणभर त्या भीतीने गोठून गेल्या नंतर घाबरून किंचाळायला लागल्या. पूलाच्या रस्त्याकडे न थांबता जंगलाच्या रस्त्याने पळत सुटल्या. खांबाला घट्ट धरून घसरत्या पायाने कसाबसा तोल सांभाळत बसलेल्या ॲनीला त्यांच्या किंकाळया ऐकू आल्या. थोड्याच वेळात कोणीतरी मदतीला आले असते. प्रत्येक क्षण महत्वाचा होता. लिलीच्या फुलासारख्या दुर्दैवी इलेनचा आत धीर सुटला होता. तिच्या मनात हजारो शंका

a

कुशंका फेर धरू लागल्या. अजून कसे कोणी मदतीला येत नाही? सर्वजणी कोठे गेल्या असतील? त्यांच्यापैकी कोणी बेशुद्ध तर पडले नसेल? कोणी मदतीला आलेच नाही तर? एक ना दोन. हातापायातले बळ संपल्यावर खाली घसरून पडणे शक्य आहे. हिरवेगार पाणी पाहून तिच्या पोटात भीतीने ढवळायला लागले. तिची कल्पनाशक्ती तत्परतेने कामाला लागली होती आणि तिला वाटले आता हातातील आणि मनगटातील वेदनांनी सहनशक्तीची कमाल पातळी गाठली आहे आणि त्याच क्षणी, गिल्बर्ट ब्लिथ हार्मन अँड्र्यूजची होडी वल्हवत पुलाखाली आला.

गिल्बर्टने वर पाहिले आणि त्याला आश्चर्य वाटले, त्यांच्याकडे मोठ्या डोळयांची पांढरीफटक पडलेली ॲनी तुच्छतेने पाहत होती आणि तिच्या चेहऱ्यावरचे भाव देखील खचितच मित्रत्वाचे नव्हते.

“ॲन शर्ली! तू इथे? काय झाले?” त्याने विचारले.

आणि उत्तराची वाट न पाहता त्याने आपली होडी, खांबांच्या अगदी जवळ नेऊन थांबवली आणि मदतीला हात पुढे केला. त्याच्या हाताला घट्ट पकडून ॲनी त्याच्या होडीमध्ये आली. ॲनी पुर्ण भिजली होती, शाल आणि स्कार्फ ओलाचिंब झाला होता. गिल्बर्ट समोर एव्हढी शोभा झाल्यामुळे स्वतःवर खूपच चिडली होती.

"काय झालं, ॲनी?” गिल्बर्टने आपली वल्ही उचलत विचारले.

“आम्ही इलेनचे नाटक करत होतो,” आपल्या रक्षणकर्त्याकडे नजर न टाकता ॲनी म्हणाली. “मी होडीतून केमलोट कडे चालले होते आणि होडीच्या फटी मधून पाणी शिरले. मी कशीबशी पुलाच्या खांबावर चढले त्यानंतर लगेच होडी बुडाली. डायना वगैरे मदतीला बोलवायला गेल्या आहेत. कृपा करून तू मला किनाऱ्यावर सोडतोस काय?”

कर्तव्यदक्षपणे गिल्बर्टने होडी किनाऱ्याकडे नेली मात्र उतरतांना त्याने देऊ केलेली मदत नाकारत ॲनीने चपळपणे किनाऱ्यावर उडी मारली. ॲनीने त्याचे

a

आभार मानले पण त्यात मित्रत्वाची भावना दिसत नव्हती लगेच ती जायला वळली. तिच्या पाठोपाठ गिल्बर्ट पण होडीतून उतरला आणि त्याने पुढे होऊन ॲनीचा हात धरून थांबवले आणि म्हणाला, “ॲनी इकडे बघ, आपण चांगले मित्र बनू शकत नाही काय? मी तुझ्या केसांची चेष्टा केली त्याबद्दल मी तुझी मनापासून माफी मागतो. मला तुला त्रास द्यायचा नव्हता, मी फक्त गंमत करत होतो. आणि त्या गोष्टीला आता बरेच दिवस झाले आहेत शिवाय आता तुझे केस खूप सुंदर झाले आहेत, मी खरंच सांगतो. आपण मित्र बनूया.”

क्षणभर ॲनी घुटमळली, गिल्बर्टच्या तपकिरी डोळयात थोडी उत्सुकता आणि थोडा संकोच दिसत होता, ते पाहून एक नवीन अनुभूती जागी झाली आणि पुर्वी झालेल्या मानहानीचा काहीसा विसर पडला. हृदयाचा ठोका चुकल्यासारखे वाटले. पण क्षणार्धात जून्या अपमानाच्या कटू आठवणी जाग्या झाल्या आणि नवी अनुभूती विरून गेली. दोन वर्षांपूर्वीचे दृश्य काल घडल्यासारखे डोळ्यापुढे स्पष्टपणे उमटले आणि गिल्बर्टने तिच्या केसांची 'गाजर' म्हणून केलेली टिंगल, संपूर्ण शाळेसमोर झाला अपमान, इतरांना दखल देण्यायोग्य देखील वाटला नसेल पण इतका कालावधी लोटला तरी तिच्या मनातील जखम अजून ताजी होती. तिच्या मनातला तिरस्कार गिल्बर्टला माफ करायला तयार नव्हता आणि कधीही माफ करण्यास तयार होण्याची शक्यता पण नव्हती.

“नाही,”ती थंडपणे म्हणाली, “मी तुझ्याशी कधीच मैत्री करणार नाही, गिल्बर्ट ब्लिथ; आणि मला तुझी मैत्रीण व्हायचे नाही!”

"ठीक आहे!” गिल्बर्ट रागाने होडी जोरात वल्हवायला सुरवात केली आणि होडी घेऊन दूर जाता जाता म्हणाला “मी तुला पुन्हा कधीही मित्र होण्यास सांगणार नाही, ॲन शर्ली. आणि मलाही तुझी पर्वा नाही!”

a

गिल्बर्टची होडी बरीच दूरवर गेली आणि ॲनी फरच्या झाडांच्या वाटेवरून वर निघाली. नेहमी पेक्षा ताठ मानेने ती चालली होती पण आतून खेद वाटत होता.

तिला वाटले की गिल्बर्टला ती वेगळे उत्तर देऊ शकली असती अर्थात त्याने तिचा भयंकर अपमान केला होता, तरीही--!

ॲनी आता रडवेली झाली, आतापर्यंत तिने स्वतः वरचा ताबा सुटू दिला नव्हता आणि भीती आणि भीतीच्या परिणामांना दूर ठेवत संकटातून सही सलामत बाहेर पडली होती.

अर्धा वाटेवर डायना आणि जेन भेटल्या. तिचे आईवडील घरी नव्हते. रुबीची भीतीने दातखीळ बसली होती. मारिला कार्मोडी येथे गेली होती. एकटे मॅथ्यू तेव्हढे शेतात गवत काढत होते.

डायना ॲनीच्या गळ्यात पडून रडायला लागली रडता रडता म्हणत होती, "ओ ॲनी, आम्हाला वाटले तू बुडालीस, आम्ही तुला इलेन बनायला भाग पाडले, आम्ही तुझा खून केल्यासारखे झाले असते. रुबी घाबरून बेशुद्ध पडली आहे. पण ॲनी तू कशी काय बाहेर आलीस?"

"मी पुलाखालच्या खांबावर कशीबशी चढले. कसा कोण जाणे गिल्बर्ट ब्लिथ मिस्टर अँड्र्यूजच्या होडीमधून आला आणि मला पाण्याच्या बाहेर आणले."

"अय्या! कित्ती छान!" जेन म्हणाली, "आता तुझा अबोला संपेल."

"नाही असे कधीच होणार नाही," पुर्वीची ॲनी परत जागी झाली आणि तिच्या अपमानाची जखम नव्याने ताजी झाली. "मी खूप घाबरले होते पण तुम्हाला माझ्यामुळे त्रास झाला. माझा जन्मच मुळी अशुभ नक्षत्रावर झाला आहे. त्या त्रास माझ्या मित्र मैत्रिणींना पण सोसावा लागत आहे. डायना मला क्षमा कर तुझ्या बाबांची होडी कायमची गेली, त्यामुळे झालेले नुकसान ते वेगळेच शिवाय आता

माझ्या अंदाजाप्रमाणे आपल्याला तलावाच्या काठी फिरकायला देखील बंदी असेल.”

पुढे काय घडेल याविषयी ॲनीच्या अंदाजापेक्षा ॲनीची समयसूचकता अचूक असल्याचे सिद्ध झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर बॅरींच्या आणि कथबर्ट यांच्या घरात मोठी खळबळ उडाली.

“ॲनी, तुला कधीतरी समजेल काय?” मारिला कळवळून म्हणाली.

“नक्कीच, मारिला या बद्दल मी विचार केला आहे,” ॲनी आशावादी पणाने म्हणाली. “मला वाटतं की समजूतदार होण्याची माझी शक्यता आता पूर्वीपेक्षा अधिक आहे.”

“पण मला तर असे वाटत नाही,” मारिला खरे तेच म्हणत होती.

पण ॲनीचे उत्तर तयार होते, “आज मी नवीन आणि मौल्यवान धडा शिकले. ग्रीन गेबल्समध्ये आल्या पासून मी केलेल्या चुकांमधून धडा शिकवत आहे. तुमच्या ब्रोचच्या बाबती: न विचारता कोणाच्या वस्तूंना हात लावू नये.

झपाटलेल्या झाडांच्या बाबतीत: नको त्या भलत्याच कल्पना करणे चुकीचे आहे.

केक मध्ये इसेन्स ऐवजी औषध घातले: स्वयंपाक करताना निष्काळजीपणा करून चालणार नाही.

केस रंगवल्यामुळे: नको त्या डामडौलापाठी न लागता प्राप्त परिस्थितीचा स्वीकार करणे. आता मी माझ्या केसांचा अगर नाकाचा विचार मनात आणत सुध्दा नाही.

आणि आजच्या नाटकाच्या निमित्ताने: प्रेम कहाणीचे आकर्षण मला मृत्यूच्या दारात घेऊन गेले. शेकडो वर्षांपुर्वी असे घडणे शक्य होते असेलही पण मी पुन्हा प्रेम कहाणीच्या नादाला लागणार नाही.”

a

“असे होईल याची मी आशा करते,” मारिला म्हणाली.

मारिला बाहेर गेल्यावर आतापर्यंत काहीच न बोलणारे मॅथ्यू ॲनीच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले, “प्रेम हा विषय संपूर्णपणे त्याज्य असा विषय नाही. सगळी नसली तरी त्यात सुध्दा थोडी चांगली बाजू आहे हे नक्की ध्यानात ठेव. जास्त नाही पण थोडे तरी प्रेम आयुष्यात हवे असते.”

a

# प्रकरण 29

सप्टेंबर महिन्यातील संध्याकाळ, ॲनी 'स्वप्न' रस्त्याने कुरणातून गायी घेऊन घराकडे निघाली होती. सूर्यास्ताची वेळ होती, तांबूस सोनेरी सूर्यप्रकाश सगळीकडे पसरला होता पण मेपल आणि फरची झाडे जिथे दाटीवाटीने उभी होती त्या ठिकाणी मात्र झाडांच्या सावल्या पडल्याने जास्त काळोख झाला होता. विशेषतः फरच्या झाडांवर पसरलेल्या जांभळया फुलांच्या वेलींमुळे अंधार अजून गच्च भरून राहिला होता. वाऱ्याचे झाडांसोबत संगीताच्या साथीसह ताल नृत्य सुरू होते.

गायी शांतपणे रवंथ करीत निघाल्या होत्या आणि ॲनी त्यांच्या मागे अभ्यासाला असलेली 'मार्मिओन' ही दीर्घ कविता म्हणत चालली होती. तेव्हढ्यात डायना घाईघाईने तिकडे येताना दिसली. एकंदरीत तिच्या आविर्भावावरून तिला काही तरी महत्वाची गोष्ट सांगायची आहे असे दिसत होते.

“डायना,आजची संध्याकाळ, किती सुंदर संध्याकाळ आहे नाही काय?”

“खरंच तशीच सुंदर बातमी सांगायला मी आले आहे. काय असेल ओळख बघू.”

"कशा संदर्भात आहे? शाळा, चर्च की वाढदिवसाची पार्टी?” ॲनीने विचारले.

“या पैकी एकही नाही, पण खूपच निराळी आणि मनोरंजक गोष्ट आहे.” डायना म्हणाली. “जोसेफिन आंटीचे पत्र आले आहे. शार्लटटाऊन मध्ये मोठे प्रदर्शन

भरणार आहे आणि त्यासाठी तिने मला, तुला बरोबर घेऊन तिच्याकडे राहायला बोलावले आहे.''

''डायना तू खरे सांगतेस? ॲनी एकदम भांबावून गेली,'' पण मला मारिला परवानगी देणार नाही. तिला महत्वाच्या कामाव्यतिरिक्त इकडे तिकडे मौजमजा करण्यासाठी गेलेले अजिबात आवडत नाही. परवा जेनने व्हाईट सॅण्ड हॉटेलमध्ये अमेरिकन कॉन्सर्ट ऐकण्यासाठी बोलावले होते, त्यांच्या मोठ्या बग्गीतून जाण्याची चांगली संधी होती पण मारिलाने मला सोडले नाही त्याऐवजी 'घरी बसून अभ्यास केला तर त्याचा फायदा होईल' असे सुनावले. माझी इतकी निराशा झाली की झोपताना मी प्रार्थना देखील केली नाही. पण नंतर मला पश्र्याताप झाला आणि मध्यरात्री प्रार्थना करून मग मी झोपले.''

''आपण असे करू, आमच्या आईलाच मारिलाला विचारायला सांगू म्हणजे मग त्या तुला माझ्याबरोबर पाठवण्याची जास्त शक्यता आहे. तसे झाले तर आपण धमाल करू शकू. या अगोदर मी कधीच प्रदर्शन पाहिले नाही. इतर मुली जेव्हा त्याविषयी बोलत असतात तेव्हा मला खूप वाईट वाटते. जेन आणि रुबी तर दोनवेळा जाऊन आल्या आहेत शिवाय यावेळी परत जाणार आहेत,'' डायना, नुसत्या जाण्याच्या कल्पनेने मनोराज्यात रमली होती.

''मी मात्र माझे जायचे नक्की झाल्याशिवाय याबाबत विचार सुध्दा करणार नाही,'' ॲनी दृढपणे म्हणाली.

''कारण जायला मिळालेच नाही तर मग मला निराशा सहन करणे असह्य होईल. पण जायला मिळाले तर चांगलीच गोष्ट आहे, माझा नवीन कोट पण तोपर्यंत शिवून होईल. मारिलाच्या मते सध्या मला नवीन कोटची गरज नाही असे होते, माझा आहे तोच कोट या हिवाळयात घालता आला असता त्यामुळे नवीन शिवलेल्या ड्रेसवर मी समाधानी राहावे मारिलानी स्पष्ट केले. खरंच मारिलानी खूप सुंदर

a

फॅशनेबल ड्रेस शिवला आहे. आता मारिला स्वतः माझे सगळे ड्रेस फॅशनेबल शिवतात, त्यांना मॅथ्यूनी मिसेस लिंड कडून फॅशनेबल ड्रेस शिवून घेतलेला आवडला नव्हता. तसे पाहायला गेले तर जे लोक जात्याच सुंदर आहेत त्यांना काहीही शोभते पण सर्वसामान्य लोक चांगले कपडे घातल्यावर चारचौघात उठून दिसू शकतात. मॅथ्यूनी मला नवीन कोट घ्यायला हवा असे सांगितल्यावर, मारिलानी स्वत: कोटाचे कापड विकत आणले आणि कार्मोडी येथून कोट शिवणाऱ्या दुकानात कोट शिवायला दिला. शनिवारी सायंकाळी कोट शिवून मिळणार आहे. मॅथ्यूनी माझ्यासाठी निळी मखमली टोपी आणली आहे तिला सोनेरी साखळी आणि गोंडे लावले आहेत. खरंच खूप सुंदर आहे. परवा रविवारी येताना तू घातलेली नवीन टोपी खूपच ऐटबाज आहे. मला तुला पाहून तू माझी प्रिय सखी असल्याचा अभिमान वाटला. कपड्यांना जास्त महत्व देणे तुला चुकीचे वाटत नाही ना? मारिलाच्या मते कपड्यांचा जास्त विचार करणे ही चांगली गोष्ट नाही पण मला मात्र चांगले कपडे घालायला, पाहायला आणि त्याविषयी बोलायला फार आवडते. शिवणकाम एक अतिशय सुंदर कला आहे आणि कोणतीही चांगली कलाकृतीला दाद देणे चुकीचे कसे असेल? शिवाय मारिला स्वतः उत्तम शिवणकाम करत असून असे कसे म्हणू शकतात?”

शेवटी मिसेस बॅरींची शिष्टाई फळाला आली आणि मारिलांनी ॲनीला डायना सोबत शार्लटटाऊनला जोसेफिन बॅरींच्या घरी जाण्यासाठी परवानगी दिली. मिस्टर बॅरी दोन्ही मुलींना सोडून लगेच परतणार होते. ॲव्हनली पासून शार्लटटाऊन सुमारे तीस मैल दूर होते त्यामुळे सकाळी लौकर निघायचे ठरले. मंगळवारी सकाळी ॲनी सूर्वोदयापूर्वी उठली. तिने खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले, पूर्वेकडील आकाश स्वच्छ होते, ढगांचा मागमूस देखील नव्हता, दिवस चांगला जाईल याची

a

खात्री झाली. दूरवर बॅरींच्या खिडकीत दिवा लुकलुकताना दिसला, डायना उठली होती.

ॲनीचे आवरून होईस्तोवर मॅथ्यूनी चूल पेटवून ब्रेकफास्ट तयार केला तोवर मारिला पण उठून खाली आली, आज तिला मॅथ्यूनी बनवलेला ब्रेकफास्ट खाण्याचा कपिलाषष्ठीचा योग आला होता. ब्रेकफास्ट झाल्यावर ॲनी नवीन कोट, टोपी घालून तयार झाली आणि जवळच्या वाटेने लाकडाच्या ओंडक्यावरून ओढा ओलांडून बॅरींच्या घरी पोहोचली. मिस्टर बॅरी आणि डायना तिची वाट पाहत होते आणि लगेचच बग्गी शार्लटटाऊनकडे निघाली.

बराच लांबचा पल्ला गाठायचा होता, ॲनी आणि डायनाने प्रवासाचा मनमुराद आनंद लुटला. हिरव्यागार शेतांवर पहाटेची तांबूस सोनेरी किरणे पसरली होती. हवात गारवा होता, दऱ्याखोऱ्यात आणि डोंगरमाथ्यावर निळसर धुके तरंगत होते. काही वेळा रस्ता जंगलातून जात होता, तर काही वेळा सागर किनाऱ्याला समांतर जात होता. जंगलात जागोजागी लाल मेपलची झाडे, हिरव्या पार्श्वभुमीवर उठून दिसत होती. वाटेतील नदीनाल्यांवरील पूल, मच्छीमारांच्या झोपड्या, बंदरावरील सकाळच्या वेळचा गडबड गोंधळ आणि तालावर पडणाऱ्या घोड्यांच्या टापांचा आवाज, सगळे काही एक अद्भुतरम्य गोष्टी सारखे वाटत होते. शार्लटटाऊन ते पोहोचले तेव्हा दुपार झाली होती. मुख्य रस्त्यापासून थोडे दूर समुद्रकिनाऱ्यालगत मिस जोसेफिन बॅरींचा भव्य वाडा होता. आजूबाजूला बीच वृक्षांची राई होती शिवाय तिथे इल्म, बर्च, असे जूने वृक्ष होते. मिस जोसेफिन दारातच भेटल्या.

डायना सोबत ॲनी पण आल्याने त्यांना आनंद झाला होता. आल्या आल्या त्यांनी अगत्याने ॲनीची चौकशी केली. आणि ती पुर्वीपेक्षा जास्त चांगली दिसत आहे असे कौतुक केले.

डायना आणि ॲनी तो भव्य वाडा पाहून आश्चर्यचकित झाल्या. त्याना बैठकीच्या खोलीत सोडून मिस बॅरी जेवणाची तयारी कुठवर आली हे पहायला गेल्या. दोन लहान मुली तेथील वैभवाने अवाक् झाल्या होत्या.

“हा वाडा राजवाड्यासारखा आहे,” ॲनी हळू आवाजात म्हणाली.

“होय मी पण इथे प्रथमच आले आहे. मला पण कल्पना नव्हती की जोसेफिन आंटीचे घर इतके मोठे असेल याची,” डायना म्हणाली.

“मखमली गालिचा, रेशमी पडदे,” एक सुस्कारा टाकत ॲनी म्हणाली, “या अशा वैभवसंपन्न घरात राहायला मिळावे असे स्वप्न मी पाहिले होते. ते आज पूर्ण झाले पण मी इथे कायमची रमू शकेन असे मात्र वाटत नाही. कल्पनेत राहण्यात जो आनंद असतो तो कल्पना सत्यात उतरल्यावर तेव्हढा रहात नाही. इथे इतकी समृध्दी आहे की इथे कल्पनेला काहीच वाव नाही. गरीबाला वैभवाच्या कल्पनेने समाधान मिळू शकते.”

डायना आणि ॲनीने मिळून सगळा वाडा फिरून पाहिला. नंतर बाहेरची बाग, हिंडून पाहिली. त्यानंतर त्यांनी सभोवतालच्या राईत आणि जमलेच तर समुद्र किनाऱ्यावर जायचा बेत केला होता पण मिस्टर बॅरीनी परतीच्या प्रवासाला निघताना त्यांचा निरोप घेण्यासाठी वाड्यात बोलावून घेतले.

बुधवारी सकाळी प्रदर्शनाचे उद्घाटन होणार होते. मिस जोसेफिन बॅरी, डायना आणि ॲनीला सकाळीच आपल्याबरोबर प्रदर्शनाच्या मैदानावर घेऊन गेल्या होत्या. संपूर्ण दिवसभर कार्यक्रमांची भरगच्च रेलचेल होती.

घरी आल्यावर ॲनीने प्रदर्शनाबद्दल इत्यंभूत माहिती दिली, “मारिला, मी कल्पना पण करू शकले नसते इतक्या साऱ्या मनोरंजक गोष्ट तिथे होत्या, त्यापैकी कुठली गोष्ट सर्वात जास्त मनोरंजक होती हे मला ठरवता आले नाही. घोड्यांची रेस पाहाताना माझे भान हरपून गेले. कलाकुसरीच्या वस्तू, फुले आणि पुष्परचना यांचे

a

दालन फार आवडले. जोसी पायच्या विणलेल्या लेसला प्रथम पारितोषिक मिळाले, मला खूप आनंद झाला. मी जुना राग, मान अपमान विसरून गेले म्हणजे एक चांगली समंजस मुलगी बनत आहे असे समजायला हरकत नाही. मिस्टर हार्मन अँड्र्यूजना त्यांच्या बागेतील ग्रेव्हनस्टीन सफरचंदासाठी दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आणि मिस्टर बेल यांना डुक्करासाठी प्रथम पारितोषिक मिळाले. क्लारा मॅकफर्सन हिला चित्रकलेसाठी बक्षिस मिळाले, सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मिसेस लिंड यांना लोणी आणि चीजसाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मला तिथे मिसेस लिंड यांना पाहून खूपच आनंद झाला. परक्या ठिकाणी आपल्या ओळखीचा माणूस भेटल्यावर जसा आनंद होतो तसा आनंद झाला, यावरून मिसेस लिंड मला किती जवळच्या वाटतात याची कल्पना आली. एकंदर काय तर आजुबाजुच्या सर्व गावांमध्ये ॲव्हनलीचे यश सर्वच बाबतीत सरस ठरले. त्यानंतर मिस बॅरी आम्हाला घोड्यांची रेस पाहायला घेऊन गेल्या. मिसेस लिंडच्या मते घोड्यांची शर्यत ही एक तिरस्कारणीय गोष्ट आहे. खरा ख्रिश्चन अशा गोष्टीला मान्यता देणार नाही म्हणून त्या पाहायला आल्या नाहीत. मला पण रेस पाहिल्यावर वारंवार जावे असे त्यात काही आहे, असे वाटले नाही कारण त्याचा तुम्हाला मोह पडू शकतो. डायना इतकी उत्साहित झाली होती की एक तगडा काळा घोडाच जिंकेल म्हणून माझ्याबरोबर दहा सेंटची पैज लावायला तयार झाली. मला तसे वाटत नव्हते पण मी पैज लावायला तयार झाले नाही. मला मिसेस ॲलनना सर्व सांगायचे होते, घोड्यांची पैज जिंकणे किंवा हरणे हा प्रश्न नव्हता पण पाद्री महोदयांच्या पत्नीला मी घोड्यांच्या जिंकण्यावर पैज लावली हे मानहानीकारक दिसले असते आणि तसेही मी पैज लावली नाही हे चांगले झाले कारण की डायना म्हणत होती तो घोडा जिंकला पण मी पैज न लावल्याने माझे दहा सेंट वाचले. ते माझ्या चांगल्या वागण्याचे बक्षिस समजायला हरकत नाही. तिकडे एक माणूस मोठ्या फुग्यातून आकाशात उंच जात

होता. मला पण फुग्यातून जायला खूप आवडले असते. किती धाडसाची आणि थरारक गोष्ट असेल. तिकडे आणि एक गंमत होती. एक ज्योतिषी पिंजऱ्यातील पक्ष्याकडून भविष्याचे कार्ड उचलायला लावून भविष्य सांगत होता. मिस बॅरीने आम्हाला ज्योतिषाला प्रश्न विचारण्यासाठी प्रत्येकी दहा सेंट दिले. त्या ज्योतिषाने, 'माझा नवरा श्रीमंत असेल, रंगाने काळा असेल मात्र लग्नानंतर मी परदेशात कायमची जाईन' असे भविष्य सांगितले आणि डायनाला, 'ती लग्नानंतर ॲव्हनलीमध्ये राहिल, तिचा नवरा पण श्रीमंत असेल आणि रंगाचे गोरा असेल असे सांगितले'. आम्ही दोघी नाराज झालो. डायनाला परदेशी जायची इच्छा आहे आणि मला ॲव्हनलीमध्येच राहायचे आहे. मारिला रात्री आम्ही इतक्या दमलो होतो की झोपच लागली नाही. मिस बॅरींनी सांगितल्याप्रमाणे आम्हा दोघींना खास पाहुण्यांसाठी राखीव प्रशस्त बेडरूम झोपायला दिली होती. पण तिथे झोपल्यावर माझी जशी कल्पना होती तसे काही जाणवले नाही. बहुदा आता मी मोठी झाल्याने माझा लहानपणीच्या ज्या कल्पना होत्या त्या बऱ्यापैकी फोल ठरल्याचे मला जाणवले आणि त्याचे दु:ख वाटले.''

गुरुवारचा मुलींचा बराचसा वेळ बागेत गेला आणि संध्याकाळी मिस बॅरी त्यांना संगीत अकादमीमध्ये एका मैफिलीसाठी घेऊन गेल्या. जिथे प्रख्यात गायिकेच्या गायनाचा कार्यक्रम होता. ॲनीसाठी ती संध्याकाळ एक आनंदाचा खजिनाच होता. ॲनीने तो खजिना मारिलाच्या पुढ्यात रिता केला, ती म्हणाली, ''मॅडम सेलित्स्की दिसायला अतिशय सुंदर होत्या. त्यांनी पांढरा सॅटीनचा पोशाख केला होता. हिऱ्यांचे दागिने त्यावर खुलून दिसत होते. माझे तर सर्व लक्ष त्याच्याकडे खिळून राहिले होते. पण जेव्हा त्यांनी गायनाला सुरुवात केली ते ऐकल्यावर इतर कुठलाच विचार मनात आला नाही. असे वाटले की यापेक्षा चांगले गायन दुसरे काही असूच शकत नाही. जेव्हा मी आकाशातील ताऱ्यांकडे पाहते तेव्हा देखील

मला तसेच वाटते आणि माझे डोळे भरून येतात. मॅडम सेलित्स्की यांचे गाणे ऐकून मी अगदी सद्गदीत झाले. माझ्या डोळ्यात आनंदाश्रू उभे होते. त्यांचे गायन संपल्यावर मला दु:ख झाले. आनंदाच्या एव्हढ्या अत्युच्च शिखरावर गेल्यावर परत सामान्य जीवनात परतणे माझ्यासाठी अत्यंत कठीण गोष्ट होती आणि तशी मी मिस बॅरींना बोलूनही दाखवली. त्या म्हणाल्या की आपण रस्त्याच्या पलीकडे असलेल्या आईस्क्रीमच्या दुकानात जाऊन आईस्क्रीम खाऊ मग बरे वाटेल. मला तो बेत खूप विचित्र वाटला; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मला खरेच बरे वाटले. आईस्क्रीम पण अत्यंत स्वादिष्ट होते. खरं सांगू का मारिला, रात्री अकरा वाजता तिथे बसून आईस्क्रीम खाण्यात एक धमाल मजा वाटली. डायना तर म्हणाली ती कायमचेच अशा शहरात राहायला आवडेल, मला मिस बॅरींनी मला काय आवडेल असे विचारले. मी म्हणाले की मला खरोखर काय वाटले हे सांगण्यापूर्वी मला याचा खूप गांभीर्याने विचार करावा लागेल. झोपायला गेल्यावर मी शांतपणे विचार केला आणि मी असा निष्कर्ष काढला की मी माझा जीव शहरी जीवनात कायमचा रमणारा नाही. एखादेवेळी रात्री अकरा वाजता चकाचक रेस्टॉरंटमध्ये काही वेळाने आईस्क्रीम खाणे छान आहे पण एरव्ही मला माझ्या ग्रीन गेबल्समध्ये रात्री अकरा वाजता शांतपणे झोपायला आवडेल. झोपेतही मला बाहेर वाहणाऱ्या वाऱ्याची, आकाशात चमकणाऱ्या ताऱ्यांची सोबत जाणवत असते. या विचारासरशी मला खोलवर समाधान वाटले. सकाळी मी मिस बॅरींना तसे सांगितले, यावर त्या हसल्या खरेतर मी गंभीरपणे बोलत होते त्यांनी हसण्यावारी नेल्याचे पाहून मला आवडले नाही. मी काही गंमत म्हणून बोलत नव्हते. तरीसुद्धा त्या एक अगत्यशील स्त्री आहेत, त्यांनी आमचे आदरातिथ्य खूपच चांगले केले. त्यांनी आमची अगदी राजेशाही थाटात सरबराई केली.”

a

शुक्रवारी घरी घेऊन जाण्यासाठी मि. बॅरी आले. डायना आणि ॲनीला उद्देशून निरोप देताना मिस बॅरी म्हणाल्या, "मुलींनो तुम्हाला इकडे राहायला आवडेल असेल. पुन्हा कधीही या. ॲनी तुला आनंद मिळाला की नाही?"

"मी तर प्रत्येक क्षणाचा आनंद लुटला," असे म्हणून ती मिस बॅरींच्या गळयात पडली आणि पटकन त्यांच्या गालाचे चुंबन घेतले.

हे पाहून डायनाला धक्काच बसला कारण तिने असे धाडस कधीच केले नसते म्हणून ती थोडी घाबरली. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मिस बॅरीना ॲनीने दाखवलेली जवळीक भावली त्या मनातून आनंदून गेल्या, मि. बॅरीची बग्गी बाहेर पडताना जड अंतःकरणाने त्यांना निरोप देऊन त्या परत त्यांच्या मोठ्या घरात परत गेल्या. एव्हढ्या मोठ्या घरात आज त्यांना एकटे एकटे वाटत होते गेले तीन चार दिवस त्या दोघींचा वावर, दंगामस्ती, बडबड यामुळे घराला घरपण आल्यासारखे वाटत होते एरव्ही नोकर चाकऱ्याच्या गराड्यात त्या मात्र एकट्या पडल्या सारख्या झाल्या होत्या. तसे पाहायला गेले तर मिस बॅरी, एक अतिश्रीमंत पण स्वार्थी वृध्द स्त्री होत्या, त्यांना लोकांकडून सेवा करवून घेण्यात अथवा त्यांचे मनोरंजन करून घेण्यात आनंद वाटत असे. ॲनीने त्यांचे मनोरंजन केले त्यामुळे त्यांना तिचा सहवास आवडला, तिचा उत्साह, बोलण्यातील गोडवा, बोलके डोळे यांनी त्यांना मोहवून टाकले पण तिची जिज्ञासू चौकस बुद्धी, लोकविलक्षण विचारशक्ती यांचे मिस बॅरींच्या लेखी फारसे महत्त्व नव्हते. तरीसुद्धा त्यांच्या मनात विचार आला, "मला असे वाटले होते की मारिला कथबर्टने अनाथाश्रमातून मुलगी सांभाळायला आणून एक गाढवपणा केला आहे पण आता मला समजले की तिचा हा निर्णय योग्यच होता. माझ्या घरात अशी स्वच्छंदी मुलगी असती तर मी सुध्दा कुटुंबवत्सल आनंदी स्त्री होऊ शकले असते."

a

घरी परततांना डायना आणि ॲनी, तेव्हढ्याच आनंदी आणि उत्सुक होत्या. शेवटी घरची ओढ वेगळीच असते. व्हाईट सॅण्डच्या रस्त्याने बग्गी किनाऱ्याच्या रस्त्याला वळली तेव्हा सूर्यास्त झाला होता. आकाश तांबूस सोनेरी झाले होते आणि समुद्रातून पौर्णिमेचा चंद्र वर येत होता. त्यांचा तेजस्वी प्रकाश, खाडीतील लाटांवर पडला होता. चमचमत्या लाटा नाचत नाचत येऊन खडकांवर आपटून फुटत होत्या, हवेत गारवा जाणवत होता.

“मला घरी परततांना किती आनंद होत आहे, कधी एकदा मारिला आणि मॅथ्यूंच्या कानावर सर्व गोष्टी घालते असे झाले आहे,” ॲनी म्हणाली.

जेव्हा ओढ्यावरचा मोठा पूल ओलांडून ॲनी ग्रीन गेबल्समध्ये आली तेव्हा उबदार स्वयंपाकघराने तिचे स्वागत केले. डायनिंग टेबलावर गरमागरम जेवण वाट पाहत होते. हातातील विणकाम बाजूला ठेवून मारिलाने तिचे स्वागत केले. तिच्यासाठी खास बा◌ॅइल्ड चिकनचा बेत केला होता.

मारिला म्हणाली, “मला वाटले की अशा प्रवासामुळे तुला भूक लागली असेल, पटकन कपडे बदलून ये, मॅथ्यू आल्यावर लगेच जेवण करू. तू घरी आल्याबद्दल मला खूप आनंद झाला आहे. तुझ्याशिवाय चार दिवस मला घरात अजिबात करमले नाही.”

जेवणानंतर ॲनी फायर प्लेस जवळ बसून मारिला आणि मॅथ्यूंना शार्लटटाऊन मधील प्रदर्शनाचा, संगीताच्या मैफिलीचा, बाग बगिच्यांचा आणि मिस बॅरींच्या राजेशाही आदरातिथ्याचे सांग्रसंगीत वर्णन ऐकवले.

शेवटी झोपायला जातांना प्रसन्न मनाने 'शुभ रात्री' म्हणत म्हणाली, “शार्लटटाऊनची भेट म्हणजे माझ्या आयुष्यातील एक संस्मरणीय घटना म्हणायला हरकत नाही पण ती अनुभवून परत घरी येणे ही सगळ्यात चांगली गोष्ट आहे.”

# प्रकरण 30

मारिला आरामखुर्चीत बसून विणकाम करत होती, डोळे थकल्यासारखे झाले, किंचित डोके दुखायला लागले आता थोडे थांबावे म्हणून तिने विणकाम मांडीवर ठेवले आणि मागे झुकून डोके मागे टेकले. अलीकडे डोकेदुखी फारच वाढली होती. शहरात जाऊन डोळे तपासून चष्म्याचा नंबर बदलला की काय, हे पाहायला हवे असा विचार करत तिने आजुबाजुला नजर टाकली.

अंधार पडायला लागला होता. अजून थोडा संधिप्रकाश रेंगाळत होता. स्वयंपाकघरातील चूलीचा लालसर उजेड, खिडकीच्या काचेतून दिसत होता.

ॲनी, फायर प्लेस समोरच्या जाड सतरंजीवर आरामात मांडी घालून आगीकडे पाहत बसली होती. ॲनीने वाचायला घेतलेले पुस्तक मांडीवरून खाली घसरले होते आणि ती तिच्या स्वप्नांच्या दुनियेत हरवून गेली होती. बहुधा मनात स्पेनमधील किल्ल्यावर एखादी साहसी कथा आकार घेत असावी. तिच्या ओठांवर हसू होते, डोळे लकाकत होते आणि चेहरा भारावलेला दिसत होता.

मारिलाने प्रेमाने ॲनीकडे पाहिले, तिच्या नजरेतील प्रेम शेगडीतील पेटलेल्या आगीतील प्रकाशात अधिकच गहिरे आणि स्निग्ध भासत होते. मारिलाला वागण्याबोलण्यातून प्रेम व्यक्त करणे कधी जमलेच नाही पण ती त्या बारीक चणीच्या लहान मुलीवर प्रेम करायला शिकली होती आणि ते प्रेम तिच्या अंत:करणात किती

a

खोलवर रुजले होते याची तिला स्वतःला कल्पना नव्हती. प्रत्यक्षात मारिलाने, ॲनीला शिस्त लावण्याची नैतिक जबाबदारी स्विकारल्याने नेहमीच ती कठोर टीकाकारांच्या भूमिकेत वावरत असे त्यामुळेच ॲनी मारिलाच्या तिच्या वरच्या प्रेमाबद्दल अनभिज्ञ होती. ॲनीला मारिलाचे मन जिंकणे ही अशक्यप्राय गोष्ट वाटत होती. मारिला, मॅथ्यूंप्रमाणे तिला समजून घेऊ शकत नाही अशी तिची समजूत झाली होती पण ती वेळोवेळी या विचारांना बाजूला ठेवून मारिलाने तिच्यावर केलेले असंख्य उपकार स्मरून, स्वतःच्या मारिलाच्या प्रती असलेल्या कर्तव्याचे भान राखण्याचा प्रयत्न करत असे.

"ॲनी आज दुपारी तुझ्या शिक्षिका मिस स्टेसी इथे आल्या होत्या," मारिला अचानकपणे म्हणाली.

ॲनी तिच्या दिवास्वप्नातून जागी झाली.

एक उसासा टाकत तिने मारिलाला विचारले, "मग मला हाक का मारली नाहीत? मी जवळच खेळत होते. थंडीची सुरुवात झाली आहे आता वसंत ऋतू येईपर्यंत सारी सृष्टी निद्रिस्त होईल. कोणी परी येऊन तिच्या जादूच्या छडीने अशी जादू करत असेल अशी मी कल्पना करत होते पण मध्यंतरीच्या झपाटलेल्या झाडाच्या गोष्टीमुळे डायनाने कल्पना करण्याचे सोडून दिले आहे. गेल्या बुधवारी मिस स्टेसीनी आम्हाला सर्व मुलींना जंगलात ओढ्यावर फिरायला नेले होते. तेव्हा आम्हाला आता जास्त जबाबदारीने वागायला हवे असे सांगितले. आम्ही चांगल्या सवयी लावून घ्यायला हव्यात तसेच आयुष्यात पुढे काय करायचे आहे त्याची दिशा ठरवून त्याचा पाया घालायची हीच वेळ आहे असे समजावून सांगितले. जर पाया डळमळीत असेल तर त्यावर कोणतीही चांगली इमारत उभी राहणे शक्य नाही असे पण सांगितले. मी आणि डायनाने आयुष्यात काहीतरी चांगले बनण्यासाठी

a

शिक्षणावर भर देण्याचे ठरवले आहे. पण मारिला मिस स्टेसी आपल्याकडे कशासाठी आल्या होत्या?''

''तेच तर सांगायचा मी प्रयत्न करत आहे पण तू बोलायलाच देत नाही आहेस, मिस स्टेसी तुझ्याबद्दल बोलण्यासाठी आल्या होत्या.''

''माझ्या बद्दल?'' ॲनी एकदम धास्तावल्यासारखी झाली पण नंतर चिडून म्हणाली, ''त्यांनी काय सांगितले असेल ते मला माहित आहे. मी तुम्हाला सांगायचे ठरवले होते पण विसरून गेले. काल मी इतिहासाच्या तासाला इतिहासाचे पुस्तक वाचण्याऐवजी, वर्गात 'बेन हर' वाचत होते तेव्हा मिस स्टेसीनी पाहिले आणि गोष्टीचे पुस्तक काढून घेतले पण काही बोलल्या नाहीत. जोसी पाय कुत्सितपणे हसली. मधल्या सुट्टीत मला एकटीला बोलावून सांगितले की मी दोन चूका केल्या आहेत, एकतर अभ्यासाचा वेळ वाया घालवत गोष्टीचे पुस्तक वाचत होते आणि दुसरे म्हणजे मी इतिहासाचे पुस्तक वाचते आहे असे भासवून गोष्टीचे पुस्तक वाचून, शिक्षकांना फसवत होते. खरंतर तो पर्यंत मला हा विचार सुचलाच नाही. मी माफी मागितली आणि पुन्हा अशी चूक करणार नाही असे सांगितले. याशिवाय आठवडाभर 'बेन हर' ला हात सुध्दा लावणार नाही याची खात्री दिली. पण त्यांनी तसे करण्याची गरज नाही, त्यांना पूर्णपणे मला माफ केले आहे, असा शब्द दिला होता मग परत तुम्हाला येऊन सांगण्याची काहीच आवश्यकता नव्हती."

''मिस स्टेसीनी मला याबद्दल काहीच सांगितले नाही. तुझे मन तुला खात आहे. तरी पण तुझ्या सांगण्यावरून मला वाटते की तुझे चुकले आहे, मुळात शाळेत गोष्टीची पुस्तके नेणे चुकीचे आहे आणि तशीही तू बरीच पुस्तके वाचली आहेस. आमच्यावेळी कथा, कादंबऱ्यांना पाहायला पण दिले जात नव्हते.''

''पण तुम्ही 'बेन हर' कादंबरी कशी म्हणू शकता? ते तर धार्मिक पुस्तक आहे. अगदी रविवारच्या चर्चमधील शाळेत वाचायला देण्यास हरकत नाही. आता

यापुढे मी मिसेस ॲलन आणि मिस स्टेसीनी सुचवलेल्या पुस्तकांव्यतिरिक्त इतर कोणती पुस्तके मी वाचणार नाही असे ठरवले आहे. मिस स्टेसीना संतुष्ट करण्यासाठी एव्हढे तरी मी करुच शकते. पण त्या नेमके कशासाठी आल्या होत्या?"

"ठिक आहे, मी आत दिवा लावायला जात आहे नंतर मला इतर कामे करायची आहेत," मारिला काहीशा रागाने म्हणाली.

"खरं तर तुला मिस स्टेसी काय म्हणाल्या हे ऐकण्यात काडीमात्र रस आहे असे वाटत नाही. तुला फक्त तुझी जीभ चुरूचुरू चालवायची आहे."

"नाही असे काही नाही. आता मी एकदम गप्प बसेन पण त्या का आल्या होत्या ते मला सांगा. मी खूप बोलते हे खरे आहे पण तरीही अनेक गोष्टी सांगायच्या असतात त्या राहून जातात हे तुम्हाला पण माहिती आहे. कृपया मिस स्टेसी काय म्हणाल्या ते सांगा." ॲनी गयावया करत म्हणाली.

"तर मग ऐक, त्या शाळेमध्ये क्विन्स अकॅडमीत प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांचा शाळा सुटल्यावर जादा तास घेऊन तयारी करून घेणार आहेत. मिस स्टेसी, मला आणि मॅथ्यूना विचारण्यासाठी आल्या होत्या की आम्हाला तुला, क्विन्स अकॅडमीत पाठवायचे आहे काय? ॲनी तुझी काय इच्छा आहे? तुला क्वीन्स अकॅडमीमध्ये जाऊन शिक्षक बनण्यासाठी प्रवेश परीक्षा पास व्हायला आवडेल का?"

"ओ मारिला! मला खूपच आवडेल. सहा महिन्यांपासून वर्गात चर्चा सुरू आहे पण मी तिकडे विशेष लक्ष दिले नाही कारण मला वाटले की मी त्यासाठी योग्य नसेल. मला शिक्षक बनायला आवडेल. पण ती खूप खर्चिक बाब आहे. मिस्टर ॲन्ड्रयूज म्हणले की प्रिसीला त्यासाठी त्यांना एकशे पन्नास डॉलर्स खर्च आला आणि प्रिसी भूमितीमध्ये हुषार होती."

a

“तुला खर्चाची काळजी करण्याचे कारण नाही. आम्ही दोघांनी जेव्हा तुझी जबाबदारी स्वीकारली तेव्हा तुझ्यासाठी जे चांगले आहे ते करण्याचा देण्याचा आणि उत्तम शिक्षण देण्याचा संकल्प केला होता. माझ्यामते प्रत्येक मुलगी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावी म्हणून त्यासाठी नोकरी व्यवसाय करण्यासाठी योग्य प्रशिक्षण घ्यायला हवे. जो पर्यंत आम्ही दोघे इथे आहोत तोपर्यंत ग्रीन गेबल्स तुझेच घर आहे. पण उद्या आमच्या माघारी काय हा प्रश्न आहे पण त्यासाठी आपण तयार असले पाहिजे, ॲनी, तुला आवडत असल्यास तू क्विन्स अकॅडमीत प्रवेशाच्या तयारीसाठी मिस स्टेसी जादा तास घेणार आहेत त्याकरिता निवडलेल्या मुला़मध्ये तू सामील होऊ शकतेस.”

“हो! मारिला धन्यवाद,” ॲनीने मारिलाच्या कंबरेला लाडाने विळखा घातला. “मी तुमची आणि मॅथ्यूंची आभारी आहे. मी खूप अभ्यास करेन तुमचे कष्टाचे पैसे वाया जाऊ देणार नाही. पण एक गोष्ट सांगून ठेवते, भूमिती मध्ये माझ्याकडून जास्त अपेक्षा ठेऊ नका. मी कठोर परिश्रम घेतले तर भूमिती व्यतिरिक्त इतर विषयात मी चांगली कामगिरी करून दाखवेन.”

यावर मारिला म्हणाली, “तू सर्व यशस्वीरीत्या पूर्ण करशील असे मला वाटते. मिस स्टेसी म्हणत होती की तू मेहनती आणि हुषार आहेस.”

खरे सांगायचे तर मिस स्टेसीनी मारिला जवळ ॲनीचे केलेले गुणगान, मारिलाने कधीही उघड केले नसते, तिने 'ॲनी कौतुकाने चढून जाईल म्हणून नसते लाड नकोत' असा विचार केला.

“आतापासून जीव पणाला लावून अभ्यास करण्याची आवश्यकता नाही. अजून वर्ष, दिड वर्षांचा अवधी आहे. तुम्ही दिड वर्षानी परिक्षा देण्यासाठी पात्र असाल पण अभ्यासाची वेळेत सुरुवात करणे आणि सखोल अभ्यास करणे कधीही चांगले असे स्टेसी मिस म्हणत होती,” मारिला म्हणाली.

“मी आता मन लावून अभ्यास करेन. कारण आता मला जीवनाचा उद्देश मिळाला आहे. तो मी निष्ठेने पूर्ण करेन. मला मिस स्टेसी प्रमाणे एक चांगली शिक्षिका व्हायचे आहे. शिक्षकी पेशा हा एक उदात्त व्यवसाय आहे.” ॲनी गंभीरपणे म्हणाली.

शाळेमध्ये प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठीचे जादा तास घेण्याची सुरवात झाली. गिल्बर्ट ब्लिथ, ॲन शर्ली, रुबी गिलिस, जेन अँड्रयूज, जोसी पाय, चार्ली स्लोएन आणि मूडी स्पर्जन मॅकफर्सन हे विद्यार्थी त्यात सामील झाले. डायना बॅरीने यासाठी नांव नोंदवले नव्हते. तिचे पालक त्यासाठी तयार नव्हते, ॲनीसाठी हा निर्णय आपत्तीजनक ठरला. आजवर डायनाला सोडून तिने कुठल्याही कार्यक्रमात भाग घेतला नव्हता, त्यामुळे दोघींनाही याचे दु:ख जाणवत होते. ॲनीने ते दु:ख मारिला पुढे उघड केले.

“मारिला, परवा रविवारी प्रवचनामध्ये फादर ॲलननी म्हटल्याप्रमाणे मी डायनाला एकटीला शाळा सुटल्यावर बाहेर पडताना मृत्यूचा कडूपणा चाखत आहे असे वाटले. डायना सुध्दा प्रवेश परीक्षेच्या अभ्यासवर्गाला आली असती तर किती छान झाले असते. मिसेस लिंड म्हणतात की हे जग अपूर्ण आहे म्हणून आपल्याला परिपूर्णता लाभणे अशक्य आहे. याबाबत मला मिसेस लिंड यांचे बोलणे पटले. तसा आमचा अभ्यास वर्ग पण चांगला आहे. जेन आणि रुबी यांना फक्त शिक्षक व्हायचे आहे. जोसी पाय पुढे कॉलेजला जाण्याची म्हणून तयारी करत आहे. तिला पैश्यासाठी नोकरी करण्याची गरज नाही असे म्हणत होती. मूडी स्पर्जन चर्चमध्ये फादर होणार आहे. चार्ली स्लोअन पुढे राजकारणात जाण्यासाठी इच्छुक आहे. परंतु श्रीमती लिंडे म्हणतात की तो त्यात कधीही यशस्वी होणे कठीण आहे, कारण स्लोअन कुटुंबातील लोक प्रामाणिक आहेत आणि आजकाल राजकारणात प्रामाणिक लोक नावालाही उरलेले नाहीत.”एव्हढे बोलून ॲनीने वाचायला घेतलेल्या 'ज्युलियस सीझर' पुस्तकात डोके घातले.

a

“गिल्बर्ट ब्लीथने पुढे काय करायचे ठरवले आहे?” मारिलाने विचारले.

“गिल्बर्ट ब्लीथच्या जीवनात काही महत्वाकांक्षा असेलच तर मला त्याबद्दल कल्पना नाही,” ॲनीच्या बोलण्यात तिरस्कार डोकावत होता.

आता गिल्बर्ट आणि ॲनी यांच्यात उघड उघड शत्रुत्व निर्माण झाले होते. पूर्वी ॲनी कडून एकतर्फी होते, परंतु गिल्बर्टने ॲनप्रमाणेच वर्गात प्रथम येण्याचा निर्धार केला होता. तिच्या पोलादी निर्धाराला आव्हान देणारा तो एकमेव प्रतिस्पर्धी होता. संपूर्ण वर्गाने त्या दोघांचे श्रेष्ठत्व स्पष्टपणे मान्य केले होते आणि त्यांच्या बरोबर स्पर्धा करण्यासाठी कोणी तयार नव्हते.

ॲनीची तलावातून सुटका केल्यानंतर जेव्हा तिने गिल्बर्टची माफी स्विकारण्यास नकार दिला त्या वेळेपासून गिल्बर्टने ॲनीची, फक्त आणि फक्त एक कट्टर प्रतिस्पर्धी याखेरीज इतर कोणतीही ओळख नाकारली. वर्गातील इतर मुलींशी तो बोलायचा अभ्यासाची चर्चा करायचा, पुस्तकांची शब्दकोड्यांची देवाणघेवाण, चेष्टा मस्करी सुध्दा सुरू होती, रविवारीच्या प्रार्थना वर्गाला अथवा वादविवाद स्पर्धेच्या वेळी इतर मुलींपैकी कुणाबरोबर सोबत घरी देखील जात असे पण त्याने ॲन शर्लीकडे फक्त दुर्लक्ष केले आणि हेच दु:ख ॲनीच्या मनाला डाचत होते पण ते मान्य करणे पण तिला अवघड वाटत होते. तरीसुद्धा पुन्हा कधी गिल्बर्टने माफी मागण्याचा प्रसंग आला तर तिचे उत्तर मागे दिलेल्या उत्तरापेक्षा निश्चितच निराळे असेल असे तिला वाटत होते. अचानक तिच्या लक्षात आले की तिने गिल्बर्ट विषयी मनात जी त्वेषाची भावना जोपासली होती ती आता दुबळी पडत चालली आहे. खरेतर तिचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यासाठी त्याची तिला अशावेळी सर्वात गरज होती. तिने जूने सर्व भांडणाचे प्रसंग आठवून पाहिले त्यातून तिला तिच्या रागाला खतपाणी घालायचे होते, पण ते सर्व व्यर्थ ठरले. शेवटचा थोडाफार राग येण्याचा

प्रसंग, तळ्याकाठी आला होता. पण आता त्याचा मागमूसही उरला नव्हता. ॲनीने नकळत गिल्बर्टला क्षमा करुन टाकली होती. पण आता खूप उशीर झाला होता.

तरीसुद्धा तिला तिच्या गर्विष्ठपणाची खंत वाटत आहे आणि गिल्बर्ट बद्दलचा राग आता निवळला आहे याचा अंदाज गिल्बर्टलाच काय डायनाला देखील आला नाही. तिने तिच्या भावना विस्मरणाच्या खोल दरीत पुरून टाकण्याचे ठरवले होते. आणि त्यामध्ये ती इतकी यशस्वी झाली की गिल्बर्ट जरी बाहेरून दाखवत असला तरी मनातून ॲनी त्यांच्या मुळे दुखावली गेली आहे ही गोष्ट विसरू शकत नव्हता आणि त्यामुळे स्वतःला माफ करू शकत नव्हता. परंतु ॲनी सुध्दा, चार्ली स्लोएन बरोबर सतत निर्दयीपणे त्रासदायक वागत असते या विचाराने स्वतः सांत्वन करून पाहत होता.

अभ्यासाच्या धामधुमीत हिंवाळा संपला. आणि परत एकदा सुट्टीचे वेध लागले. आता सुट्टी मध्ये अभ्यासाचा विचार सोडून धमाल उडवून द्यायचा ॲनीसह सर्वच मुलांचा विचार होता. गोष्टींची पुस्तके वाचायची होती. चर्चमधील कार्यक्रमासाठी गायनाचा सराव करायचा होता. मिसेस ॲलन कडे शनिवारी दुपारचे नवनवीन गोष्टी शिकायला आणि त्यासोबत गप्पा मारायला जायचे होते. जादू झाल्यासारखे चोरपावलांनी वसंत ऋतू कधी आला ते लक्षात सुध्दा आले नाही. प्रवेश परिक्षेच्या अभ्यास वर्गात व्यतिरिक्त इतर शाळेला सुट्टी पडली आणि मुले हिरव्यागार कुरणात, जवळच्या जंगलात भटकू लागली. अधूनमधून लॅटिनचे व्याकरण आणि फ्रेंच भाषेचा सुट्टीतील अभ्यास अपूर्ण असल्याची बोच जाणवत असे.

अभ्यासवर्गाच्या शेवटच्या तासाला मिस स्टेसी वर्गाला उद्देशून म्हणाल्या, "या वर्षी तुम्ही भरपूर अभ्यास केला आहे, आता तुम्ही आनंदाने सुट्टीचा उपभोग घेऊ शकता. सुट्टीचा वेळ बाहेरच्या वातावरणात घालवा आणि पुढील वर्षासाठी

चांगले आरोग्य, उत्साह आणि महत्वाकांक्षा यांचा मुबलक साठा करून ठेवा. पुढचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे आहे हे कोणीही विसरता कामा नये.''

''पण तुम्ही पुढच्या वर्षी आमच्या शाळेत राहणार आहात ना?'' जोसी पायने विचारले.

जोसी पाय एरव्ही कधीही प्रश्न विचारत नसे पण आज तिने विचारलेल्या प्रश्नांमुळे सर्वांना तिच्याबद्दल कृतज्ञता वाटली. सर्वांनाच हा प्रश्न पडला होता पण मिस स्टेसीला हा प्रश्न विचारण्याचे त्यांना धाडस नव्हते. मिस स्टेसीना त्यांच्या राहत्या गावात मोठ्या नामांकित शाळेत शिकवण्यासाठी संधी चालून आली आहे आणि त्या पुढच्या वर्षी ॲव्हनलीच्या शाळेत राहणार नाहीत अशी बातमी सगळीकडे पसरली होती. म्हणून मुले अस्वस्थ झाली होती. सर्वांनीच त्यांचे उत्तर ऐकण्यासाठी श्‍वास रोखून धरला होता.

''होय मी पुढच्या वर्षी पण ॲव्हनलीच्या शाळेत राहणार आहे,'' मिस स्टेसी म्हणाल्या. ''माझ्या गावामधील शाळेत शिकवण्याचा विचार मी केला होता पण माझे मन इथल्या मुलांमध्ये गुंतल्याने मी ही शाळा सोडून जायचा विचार बदलला, तेव्हा मी पुढच्या वर्षी सुध्दा इथेच असणार आहे.''

''हुर्यो!''सर्व मुलांनी बाक वाजवून मिस स्टेसींच्या निर्णयाचे स्वागत केले.

''मला खूपच आनंद झाला, जर तुम्ही इथून गेला असता तर मला अभ्यास करणे अशक्य झाले असते,''ॲनी कृतज्ञतेने म्हणाली.

त्यारात्री ॲनीने सर्व पुस्तके पेटीत भरून ठेवली आणि सुट्टीमध्ये अभ्यासाच्या पुस्तकांचे तोंड सुध्दा पाहणार नाही असे सांगून टाकले.

''मी आता अभ्यास करून दमले आहे, विशेषतः भूमितीचे सर्व पुस्तक पाठ केले आहे. आता मात्र अभ्यासाचा कंटाळा आला आहे. आता सुट्टीत मौजमजा, दंगामस्ती करण्याचे ठरवले आहे. नाही तरी पुढच्या वर्षी मी लहान मुलगी राहणार

a

नाही मग मला दंगामस्ती करणे शोभणार नाही. मिसेस लिंड म्हणत होत्या की माझी उंची अशीच वाढत राहिली तर पुढच्या वर्षी मला लांब स्कर्ट घालावे लागतील. मग मला मोठ्या माणसांसारखे जबाबदारीने वागावे लागेल, परीकथांवर विश्र्वास ठेवता येणार नाही. लौकरच रुबी वाढदिवसाची पार्टी देणार आहे, रविवारच्या शाळेची सहल जायची आहे शिवाय संगीताची मैफिल पण असणार आहे. मिस्टर बॅरी, डायनाला आणि मला व्हाईट सँड्स हॉटेलमध्ये रात्रीच्या जेवणासाठी घेऊन जाणार आहेत.

"गेल्या सुट्टीमध्ये जेन अँड्र्यूज तिथे रात्रीच्या जेवणासाठी गेली होती ती सांगत होती तिथे इलेक्ट्रीकचे दिवे होते. खूप सारी सुंदर सुंदर फुले होती. तिथे असणाऱ्या महिला, बहुतेक सर्व अमेरिकन होत्या त्यांचा डामडौल, हिऱ्यांचे दागिने, फॅशनेबल कपडे पाहून डोळे दिपून गेले. जेन म्हणाली की झगमगती संध्याकाळ, आयुष्यभर विसरणार नाही."

मारिला गुरुवारी मिटिंगला गेली नव्हती म्हणून विचारपूस करायला मिसेस लिंड ग्रीन गेबल्समध्ये आल्या होत्या.

"गुरुवारी मॅथ्यूला त्रास झाला, छातीत दुखायला लागले होते," मारिलाने सांगितले.

"मला म्हणून मिटिंगला यावेसे वाटले नाही. हल्ली बऱ्याच वेळा त्याला असा त्रास होतो. म्हणून मला काळजी वाटते. डॉक्टरांनी थोडी दगदग कमी करायला सांगितले आहे. पण विश्रांती हा शब्दच मॅथ्यूला आवडत नाही त्यामुळे थोडे अवघड झाले आहे. रेचेल आता चहा घेऊनच मग जा," असे मारिला म्हणाली.

दोघीही बैठकीच्या खोलीत निवांतपणे बसल्या होत्या. ॲनीने चहा केला, नुकतीच तिने बनवलेली बिस्किटे अद्यापही गरम होती. इतकी चविष्ट आणि खुसखुशीत बिस्किटे खाल्यावर मिस लिंडना कौतुक केल्याशिवाय राहवले नाही,

a

त्या म्हणाल्या,"ॲनी खरोखरच एक हुशार मुलगी बनली आहे. पुढेमागे तुम्हाला आधार देईल एव्हढी समंजस पण झाली आहे."

"आताशी कुठे तिची बुध्दी स्थिर झाली आहे त्यामुळे आमची काळजी कमी झाली . मला भीती वाटत होती की तिचा विक्षिप्तपणा असाच चालू राहिला तर मग पुढे अवघड होईल पण आता मी खात्रीने सांगू शकते की की मी तिच्यावर पूर्णपणे विश्र्वास ठेवू शकते." मारिलाच्या बोलण्यात ॲनीबद्दल प्रेम आणि अभिमान स्पष्ट दिसत होता.

मिसेस रेचेल लिंड गंभीरपणे म्हणाल्या, "अजून मला तीन वर्षांपूर्वीचा तो दिवस आठवत आहे. त्यादिवशीचे तिचे वागणे बघून ती इतकी इतकी चांगली असेल असे मला कधीच वाटले नव्हते. तिचा तो संतापलेला चेहरा, उद्धटपणे बोलण्याची पद्धत पाहून मी अक्षरशः घाबरून गेले. घरी जाऊन मी थाॅमसला म्हणाले देखील की माझे शब्द लिहून ठेव, 'मारिला कथबर्टने चुकीचा निर्णय घेतला आहे आणि त्याचा तिला पश्र्याताप करावा लागेल' पण ती माझी चूक होती. आणि त्या मला त्याचा आनंद झाला. त्यासाठी मी देवाचे आभार मानते. जणू ती वेगळ्याच जगातून आलेली होती त्यामुळे इथले नियम तिला लागू पडत नसावेत. पण गेल्या तीन वर्षांत तिच्यामध्ये आश्र्चर्यकारक बदल झाला आहे. तिच्या वागण्याबोलण्यात तर झालाच आहे पण दिसण्यात देखील झाला आहे. बघायला गेले तर ती डायना किंवा रुबी सारखी सुंदर नाही पण जेव्हा त्या तिघी एकत्र असतात तेव्हा त्या दोघींच्या पेक्षा तीच जास्त लक्ष वेधून घेते. जणू काय या दोघी जून महिन्यात फुलणाऱ्या पांढऱ्या लिलीज् असून पिअनीचे लालबुंद मोठे फुल म्हणजे ॲनी समजायला हरकत नाही."

a

# प्रकरण 31

ॲव्हनलीच्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी पडली. गेले सहा महिने ॲनीने अभ्यासाला वाहून घेतले होते. शाळा सुटल्यावर आता डायनाची सोबत नसल्याने वाटेवरचे रेंगाळणे थांबले होते. रविवारी सुट्टीच्या दिवशी अभ्यास वर्ग भरत असल्याने आणि परत घरी अभ्यास पूर्ण करावा लागत असल्याने, ॲनीचे बाहेर पडणे जवळ जवळ बंदच झाले होते असे म्हणणे रास्त ठरले असते. सुट्टी पडल्या पडल्या ॲनीला, एका पेशंटला तपासायला स्पेंसरव्हिले येथील डा ॅक्टरांनी ओझरते पाहिले. प्रथमतः ती त्यांना ओळखू आली नाही. मिनी मेच्या माकड खोकल्याच्या आजाराच्या वेळी रात्री तेच डॉक्टर तपासायला आले होते. तेव्हा त्यांनी ॲनीच्या प्रसंगावधानाचे कौतुक केले होते. आता ॲनी त्यांना पार बदललेली दिसली. अशक्त वाटत होती आणि पांढरी फटक पडली होती, डोळे निस्तेज वाटत होते. उत्साह पण कमी झाल्यासारखा वाटत होता. डॉक्टरांच्या ते लक्षात आले, त्यांनी तीक्ष्ण नजरेने तिला एकदा पाहिले आणि तोंड वाकडे करून मान हलवली, लगेच मारिलाला चिठ्ठी लिहिली, "तुमच्या लाल वेण्या घालणाऱ्या मुलीला, संपूर्ण उन्हाळा मोकळ्या हवेत ठेवा, तिला पायाला भिंगरी लावल्यासारखी बाहेर हिंडू फिरू देत. घरात बसून पुस्तके वाचायला अजिबात देऊ नका."

असा सल्ला तर नेहमी टी. बी. च्या पेशंटला दिला जात असे. चिठ्ठी वाचल्यावर मारिला घाबरली आणि ॲनीला तिच्या आयुष्यातील सोनेरी उन्हाळ्यात स्वातंत्र्य आणि स्वच्छंदपणे भटकंती करण्याचा आनंद मनमुराद

a

उपभोगला. स्वप्न रस्ता, ओढ्यावरचा छोटा धबधबा, त्यांनी शोधून काढलेले व्हिक्टोरिया आयलंड आणि नेहमीची खेळण्याची जागा विल्मोर या आणि इतर ठिकाणी ती आणि डायना यांची जोडगोळीला संपूर्ण सुट्टीभर फिरण्याला यावेळी मारिलाने अजिबात आक्षेप घेतला नाही. अधूनमधून मात्र गोष्टींची काही पुस्तके वाचण्यासाठी ॲनीने डा ॅक्टरांचा सल्ला धुडकावून लावला होता हे मारिलाच्या ध्यानात आले होते पण तिने थोडे दुर्लक्ष केले. ॲनीने आपल्या कल्पनाशक्तीला नव्याने चालना दिली, कविता वाचन केले, जंगलात पिकलेल्या बेरीज् मनसोक्त खाल्या, कच्च्या बेरीज्, फुलांच्या माळा केसात माळल्या आणि उघड्या डोळ्यांनी उज्ज्वल स्वप्ने पाहिली. पुर्वीची ॲनी परत आली असे वाटू लागले. वजन उंची नजरेत भरण्याइतपत वाढली होती. चेहऱ्यावर तजेला आणि डोळ्यात तेज चमकत होते. बोलण्यात उत्साह आणि चालण्यात उर्जा भरली होती. एकंदरीत डा ॅक्टरांची आशंका दूर झाली होती. सप्टेंबर महिना सुरू झाला आणि ॲनीला परत एकदा अभ्यासाचे वेध लागले. तिने भूमितीवर जास्त मेहनत घ्यायचे ठरवले होते.

ॲनीची मारिला बरोबर अवांतर गप्पा मारत बसली होती, ‘‘मारिला, मिसेस लिंड म्हणत होत्या की मिस्टर ॲलन आता बऱ्यापैकी सफाईदारपणे प्रवचन द्यायला शिकले आहेत कदाचित त्यांना मोठ्या शहरातील चर्चमध्ये बोलावले जाईल, तिथे त्यांना इथल्या तुलनेत चांगले उत्पन्न मिळू शकेल आणि ॲव्हनली चर्चला नवशिक्या व्यक्तीला परत तयार करावे लागेल. पण मला वाटते ती चिंता आतापासून करण्यापेक्षा मिस्टर ॲलनच्या प्रवचनाचा लाभ घेणे योग्य ठरेल. मी तर मुलगा असते तर मी निश्चितच फादर बनून चर्चची सेवा केली असती. जर धर्मशास्त्राचे यथार्थ ज्ञान असेल तर उत्कृष्ट प्रवचनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून खिळवून ठेवता येते. मारिला, महिला हे काम का बरे करू शकत नाहीत? मी मिसेस लिंड यांना ते विचारले आणि त्यांना धक्काच बसला त्यांच्या मते ही एक धर्मातील नितीनियमांच्या विरोधात

आहे. त्या पुढे म्हणाल्या अमेरिकेत काही ठिकाणी अशा नेमणूका झाल्या आहेत पण त्यांना असे वाटते ही वेळ अजून तरी कॅनडावर आली नाही आणि येऊही नये. मला खात्री आहे महिला धर्म प्रसारासाठी पाद्री बनायला काहीच चुकीचे नाही. इतर वेळी मदतीसाठी, फंड गोळा करण्यासाठी महिला पुढाकार घेतच असतात. मला तर वाटते मिसेस लिंड अथवा आपल्या सुपरिटेंडंट मॅडम मिसेस बेल उत्तम प्रकारे प्रार्थना करून आल्यावर सरावाने चांगले प्रवचन देऊ शकतात."

"होय मला पण तसे वाटते, तसेही मिसेस लिंड येताजाता सर्वांना उपदेश करतच असते. तिच्या नजरेतून ॲव्हनली मधील कोणाचीही चूक सुटू शकणार नाही," मारिला म्हणाली.

"मारिला मला एक प्रश्न पडला आहे, जेव्हा मी तुमच्या, मिसेस ॲलन अथवा मिस स्टेसी यांच्या बरोबर असते तेव्हा तुम्ही माझे आदर्श असता, माझ्या मनात तुम्हाला काय अपेक्षित आहे हे जाणून घेऊन त्याप्रमाणे वागावे असे वाटते. पण जेव्हा मी मिसेस लिंड यांच्या बरोबर असते तेव्हा नेमके उलटे होते, त्यांना ज्या गोष्टी पटत नाहीत, आवडत नाहीत, नेमक्या त्याच गोष्टी करण्याची मला इच्छा होते. तुमच्या मते यामागे काही विशेष कारण असू शकेल काय? खरोखरच मी दुष्ट आणि पापी व्यक्ती असेन काय?"

मारिला क्षणभर गोंधळून गेली पण मग हसून म्हणाली, "ॲनी, जर तू दुष्ट आणि पापी असशील तर मी देखील आहे कारण तू म्हणतेस तशी, अनेकदा मला देखील इच्छा होते. रेचेल चांगल्या कामासाठी लोकांच्या फारच पाठीमागे लागते आणि सतत त्यांचा पिच्छा पुरवत असते. अशा सततच्या तक्रार करण्याला, टोचून बोलण्याला धर्मशास्त्राने मनाई केली पाहिजे होती. ही एव्हढी गोष्ट सोडली तर रेचेल एक चांगली दयाळू ख्रिश्चन स्त्री आहे. ॲव्हेनलीमध्ये कुणाला गरज पडल्यास, सर्वात पुढे मदतीला रेचेल असते."

a

“तुम्हाला पण माझ्यासारखेच वाटत असेल तर मग मला काळजी करण्याचे कारण नाही. मी मोठेपणी चांगली व्यक्ती कशी बनण्यासाठी काय करायला हवे याचा विचार करत असते. मला तुम्ही, मॅथ्यू, मिसेस ॲलनसारख्या चांगल्या माणसांची साथ आहे मग मला चांगली व्यक्ती बनण्यात यशस्वी व्हायलाच हवे नाहीतर ती माझी चूक ठरेल. माझ्यावर ही एक मोठी जबाबदारी आहे. माझ्याकडे एकच संधी आहे, जर मी चांगली व्यक्ती बनू शकले नाही तर सर्वांचे कष्ट व्यर्थ ठरतील. माझी उंची दोन इंच वाढली आहे. तुम्ही माझा नवीन ड्रेसची उंची लांब ठेवली हे चांगले झाले. तो गर्द हिरव्या रंगाचा झालर लावलेला ड्रेस मला फार आवडला. जोसी पायच्या प्रत्येक ड्रेसला झालर लावली आहे. सध्या त्याची फार फॅशन चालू आहे. माझ्याकडे पण झालर लावलेला ड्रेस आहे याचा खूप आनंद वाटतो आणि मनात खोलवर कृतज्ञता जाणवते त्यामुळे मला मन लावून अभ्यास करण्यासाठी आतून उर्मी जागृत होत आहे.”

“असे काही वाटणे महत्वाचे आहे,” मारिला समाधानाने म्हणाली.

सुट्टी संपून शाळा सुरू झाली. मिस स्टेसी कबूल केल्याप्रमाणे ॲव्हनलीच्या शाळेत हजर झाल्या. अभ्यास वर्गाचे विद्यार्थी, नव्या जोमाने अभ्यासाला लागण्यास उत्सुक होते. या वर्षात अखेरीस प्रवेश परीक्षा असणार होती. प्रत्येकाच्या भविष्यातील वाटचाल या परिक्षेवर अवलंबून होती. ॲनीच्या मनात सतत परिक्षेचे विचार घोळत असत. स्वप्नात देखील त्यांनी पाठ सोडली नव्हती.

गिल्बर्ट पास झाला आहे आणि ॲनीचे नाव यादीत नाही या स्वप्नामुळे ॲनी झोपेतून एक दोनदा घाबरून जागी झाली होती.

हिवाळा मजेशीर आणि आनंदी होता, कामात आणि अभ्यासात मुले व्यस्त असल्याने दिवस भराभर उलटत होते. शाळेतील वातावरण पुर्वीसारखेच उत्साही होते. वर्गातील जुनी तेढ, चढाओढ अजून तशीच होती. पण ॲनीच्या उत्सुक

डोळयांसमोर नवे विचार, नव्या भावना, महत्वाकांक्षाचे नवीन जग, अद्यापही माहित नसलेली ज्ञानाची नवीन क्षेत्रे नव्याने खुणावत होती.

"मात्र कोणत्याही विषयाचे सखोल ज्ञान परिश्रमपूर्वक मिळवावे लागते, अपूरे ज्ञान धोकादायक असते कारण जसजसे आपण ज्ञान प्राप्त करतो तसतसे आपल्याला अजून किती ज्ञान मिळवायचे आहे याची जाणीव होते. 'ज्ञानाची छोटी टेकडी वाढता वाढता डोंगर बनून त्याचा आल्प्स् पर्वत बनते' त्यासाठी सतत ज्ञान प्राप्तीची कास धरली पाहिजे," हेच मिस स्टेसी मुलांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करत होत्या.

मिस स्टेसीच्या काळजीपूर्वक आखलेल्या धोरणांचे आणि व्यापक विचारांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांना विचार करण्यास, माहिती गोळा करण्यास व त्या माहितीच्या आधारे स्वतःला नेमके काय हवे याचा शोध घेण्यास प्रवृत्त करत होते. तिच्या या नवीन शैक्षणिक धोरणांना विश्र्वस्तांचा आणि मिसेस लिंड सारख्या जून्या विचारसरणीच्या सभासदांचा आक्षेप होता.

ॲनी अभ्यासाव्यतिरिक्त समाजात मिसळायला लागली. स्पेन्सरव्हिलेच्या डाॅक्टरांचा सल्ला लक्षात ठेऊन मारिलाने पण तिच्या बाहेर पडण्याला आडकाठी आणली नाही. वादविवाद स्पर्धा आणि गायनाच्या अनेक कार्यक्रम झाले. या सर्व गोष्टींमध्ये अजून दोन गोष्टींची भर पडली ती म्हणजे स्लेज गाडी चालवणे आणि स्केटिंग. या दरम्यान ॲनीची उंची भराभर वाढत चालली होती. एक दिवस ॲनी मारिलाच्या शेजारी उभी होती तेव्हा ॲनीची उंची आपल्यापेक्षा जास्त असल्याचे तिच्या लक्षात आले आणि मारिला आश्चर्यचकित झाली.

"ॲनी, तू इतकी उंच कधी झालीस?" मारिलाच्या आवाजात अविश्र्वास डोकावत होता. ॲनीच्या वाढलेल्या उंची बद्दल मारिला खंतावली होती. ती ज्या लहान मुलीवर प्रेम करत होती ती छोटी बालिका आता गायब झाली होती आणि

a

तिच्या जागी पंधरा वर्षांची गंभीर डोळे विचारशील भुवया, भरपूर उंची असलेली किशोरी ताठ मानेने उभी होती. मारिलाने जेव्हढे त्या बालिकेवर प्रेम केले तेव्हढेच प्रेम ती या किशोरवयीन मुलीवर करत होती पण मनात काहीतरी दु:ख डाचत होते. त्या दिवशी संध्याकाळी ॲनी आणि डायना एकत्र प्रार्थना-सभेला गेल्या होत्या. मारिला एकटीच विचार करत बाहेर बसली होती. बराच वेळ झाला म्हणून मॅथ्यू कंदील घेऊन पाहायला आले, पाहतात तर काय मारिला रडत होती. मॅथ्यूना काळजीने गडबडून गेले. त्यांना बरे वाटावे म्हणून मारिला बळेबळेच असल्यासारखे करून म्हणाली, "ॲनीचा विचार करत होते. आता मोठी झाली आहे. पुढच्या वर्षी शिकण्यासाठी परगावी जाईल. मला खूपच आठवण येईल."

"तिला बऱ्याच वेळा घरी येता येईल," मॅथ्यूनी तिचे सांत्वन केले. मॅथ्यूंच्या लेखी ॲनी अजूनही चार वर्षांपूर्वी जून महिन्याच्या एका संध्याकाळी ब्राइट रिव्हरमधून घरी आणलेली ती लहान, उत्सुक बडबडी मुलगी होती. "आणि तोपर्यंत रेल्वेमार्गाचे कार्मोडीपर्यंतचे काम पूर्ण होईल."

"म्हणून काय ती नेहमी करता इथे असेल असे होणार नाही," मारिलाला हळवी झाली होती तिला आपले दु:ख अधिक कुरवाळत बसायचे होते. "तुम्हा पुरुषांच्या हे दु:ख समजणार नाही, बघता बघता छोटी ॲनी मोठी झाली आणि आता थोड्या वर्षात तिचे स्वतंत्र जीवन सुरू होईल. मला ती आपल्यापासून दूर जाईल या कल्पनेने रडू येत आहे." असे म्हणून मारिला उदासपणे घरात गेली.

ॲनी मधील शारिरीक बदलांपेक्षा तिच्या वागण्याबोलण्यात लक्षणीय बदल जाणवू लागला होता. मुख्य म्हणजे तिची नेहमीची बडबड कमी झाली होती. एक तर ती कमालीची शांत झाली होती किंवा जास्त विचारी झाली असेल. नेहमीसारखी स्वप्नांच्या दुनियेत हरवून जाताना दिसत नव्हती. ती कमी बोलत असते हे मारिलाच्या ध्यानात आले होते आणि न राहवून तिने विचारले देखील, "ॲनी,

हल्ली तू खूप कमी बोलत असतेस आणि बोलताना अवजड शब्द वापरायचे पण कमी झाले आहेत. नेमके काय झाले आहे?"

ॲनीने लाजून किंचित हसत हातातील पुस्तक खाली ठेवले आणि स्वप्नाळू डोळ्यांनी खिडकीतून बाहेर पाहीले, बाहेरच्या वेलीवर वसंत फुलला होता, टपोऱ्या लाल रंगांच्या कळया उमलून फुले फुलली होती.

"कारण मला माहित नाही पण मला आता जास्त बोलावेसे वाटत नाही. त्याऐवजी माझे सतत विचारमंथन सुरू असते आणि ते विचार मी मनाच्या आतल्या कप्प्यात जपून ठेवत असते, दुसऱ्या कुणी त्यावर हसावे किंवा आश्र्चर्य प्रगट करावे असे मला वाटत नाही. आणि अवजड शब्दांच्या वापराबाबत तर आम्हाला मिस स्टेसीने नेमके उलटे सांगितले आहे. त्यांनी साध्या सरळ भाषेत थोडक्यात पण महत्वाच्या मूद्दे मांडायला शिकवले आहे. मला आता अवजड बोजड शब्द वापरावेसे वाटत नाहीत. मिस स्टेसी म्हणत होत्या की अवजड शब्दांच्या अतिरेकी वापरामुळे माझा निबंध शब्दबंबाळ होत असे. मला त्यांनी सांगितल्या प्रमाणे लिहिताना सुरवातीला अवघड वाटले पण आता सवय झाली आणि मला ती पद्धत चांगली वाटते."

"तुमच्या स्टोरी क्लबचे काय झाले आहे? मी खूप दिवसांपासून तुला याबद्दल बोलताना ऐकले नाही." मारियाने विचारले.

"आता स्टोरी क्लब अस्तित्वात नाही. आमच्याकडे त्यासाठी वेळ पण नाही. आता आम्हाला पुर्वीच्या गोष्ट आठवून हसायला येते. प्रेम प्रकरण, पळून जाऊन लग्न करणे, खून किंवा रहस्य या गोष्टींवर आमची कथा बेतलेली असे आणि तो तद्दन मूर्खपणा होता. आम्हाला मिस स्टेसीने कथा कशी लिहावी यांचे प्रात्यक्षिक म्हणून आमच्याकडून कथा लिहून घेतल्या मात्र त्यामध्ये भलतेच काही घुसडून देण्यास सक्त मनाई केली. आपल्या आयुष्यात ॲव्हनलीमध्ये काय घडू शकते याची

कल्पना करून त्यावर लिहायला लावले, स्वतः त्यातील गुणदोष तर टिपलेच पण आम्हाला आमच्या लेखनातील दोष शोधायला सांगितले. मी स्वतः ते दोष शोधायला लागेपर्यंत माझ्या रचनांमध्ये इतके दोष आहेत असे मला कधीच वाटले नव्हते. मला खूप लाज वाटली मला पूर्णपणे सोडून द्यावे असे वाटू लागले. परंतु मिस स्टेसी म्हणाल्या की मी स्वतःला, स्वतःच्या लेखनाची कठोर टीकाकार होण्याचे प्रशिक्षण दिले तरच मी चांगले लिहायला शिकू शकेन. आणि म्हणून मी प्रयत्न करत आहे."

"आपल्या कडे अजून दोन महिने आहेत. तो पर्यंत तू काहीतरी मार्ग नक्कीच काढू शकतील," मारिलाने दिलासा दिला.

"फक्त दोन महिने," ॲनी हादरली होती. "मला माहित नाही, काहीवेळा परिक्षा व्यवस्थित पार अशी आशा वाटते पण मग कधी कधी खूप भीती वाटते. तसा मी मन लावून अभ्यास केला आहे. मिस स्टेसीनी पण आमच्याकडून खूप सराव करून घेतला आहे. पण प्रत्येकाला सर्वच गोष्टी जमतात असे नाही. मला जशी भूमिती अवघड वाटते तसे जेनला लॅटिन, रुबी बीजगणित आणि जोसीला अंक गणित जड जाते. मिस स्टेसी आमची मुख्य परिक्षेपुर्वी स्वतंत्रपणे परिक्षा घेणार आहे जी प्रवेश परीक्षे इतकी कठीण असेल आणि पेपर्स पण काटेकोरपणे तपासणार आहे. त्यामुळे आम्हाला मुख्य परिक्षेचा चांगला सराव होईल आणि अंदाज पण येईल. मला आता कधी एकदा परिक्षा होऊन जाते असे झाले आहे. मारिला मला खूप भीती वाटते. झोप लागत नाही. जाग आल्यावर एकच विचार मनात सारखा सारखा येथे राहतो की मी पास झाले नाही तर काय करू?."

"का, पुढच्या वर्षी शाळेत जा आणि पुन्हा प्रयत्न कर," मारिला बेफिकीरपणे म्हणाली.

"छे! मला ते सहन होणार नाही. नापास होणे ही लाजिरवाणी गोष्ट असेल. विशेषत: जर गिल— जर इतर पास झाले तर मला कुठे तोंड सुद्धा दाखवायची सोय राहणार नाही. मी परीक्षेमध्ये इतकी घाबरून जाते की माझा खरच गोंधळ उडण्याची शक्यता आहे. मला जेन अँड्र्यूज सारखे बनायला हवे, तिला असा काहीही त्रास होत नाही."

ॲनीने एक खोलवर उसासा टाकला, खिडकीतून निळ्याभोर आकाशाचे दर्शन होत होते, हवा आल्हाददायक होती, वसंत ऋतूने बाहेरच्या निसर्गाच्या किमया केली होती, ॲनीने नजर आत पुस्तकांवर वळवली आणि मनातल्या मनात विचार करू लागली, "जर मी प्रवेश परीक्षा पास झाले नाही तर बाहेरच्या सृष्टी सौंदर्याचा पाहिल्याप्रमाणे उपभोग कधीच घेऊ शकणार नाही."

# प्रकरण 32

जून महिन्याच्या अखेरीस शाळेचे शैक्षणिक वर्ष संपले आणि ॲव्हनलीच्या शाळेतील मिस स्टेसीचा कार्यकाल पण संपला. ॲन आणि डायना त्या दिवशी संध्याकाळी घरी आल्या तेव्हा खूपच शांत शांत वाटत होत्या, सुजलेले लाल डोळे आणि भिजलेले रुमाल, मिस स्टेसीच्या हृदयस्पर्शी निरोप समारंभाची साक्ष देत होते. डायनाने मागे वळून शाळेच्या इमारतीकडे एकदा पाहिले आणि दीर्घ उसासा टाकला.

"असे वाटत आहे की सर्व संपून गेले आहे," डायना निराशपणे म्हणाली.

"मला तुझ्यापेक्षा जास्त वाईट वाटायला हवे कारण तू पुढील वर्षी याच शाळेत असणार आहेस पण माझे नशीब जर जोरावर असेल तर मला शाळेचा आताच कायमचा निरोप घ्यायला हवा," ॲनी डोळे पुसत म्हणाली.

"तू म्हणतेस तसेच असणार नाही, मिस स्टेसी नसणार, तू नाहीस, जेन, रुबी कोणी कोणी नसणार . मी एकटी पडेन, मला माझ्या बाकावर तुझ्या खेरीज दुसरे कुणी बसण्याची कल्पना पण सहन होत नाही. किती आनंदात आपण इतके दिवस शाळेत जात असू आता ही सर्व संपल्याची भावना खूपच भीतीदायक आहे," डायनाच्या गालावरून अश्रू ओघळले.

a

“आता तू रडायचे थांबवले नाहीस तर मला पण परत रडायला येईल. मिसेस लिंड म्हणतात त्याप्रमाणे जर आपण संपूर्ण आनंदी बनू शकत नसलो तरी जेव्हढे जमेल तेव्हढे आनंदी बनायला हरकत नाही. शेवटी, मी पुढच्या वर्षी परत येईन असे सांगण्याचे धाडस करत आहे. मी प्रवेश परीक्षा पास होणार नाही असे राहून राहून मला वाटून राहिले आहे.” ॲनी समजूत घालत म्हणाली.

“असे का म्हणतेस? मिस स्टेसीनी घेतलेल्या चाचणी परीक्षेत तर तू चांगलीच कामगिरी केली आहेस,” डायना म्हणाली.

“हो मला चाचणी परीक्षेची भीती वाटली नव्हती पण मला मुख्य परीक्षेचा नुसता विचार जरी मनात आला तरी हृदयात धडकी भरते, शिवाय माझा परीक्षा क्रमांक तेरा नंबर आहे. जोसी पाय म्हणते की तो खूप दुर्दैवी आहे. मी काही अंधश्रद्धाळू नाही आणि मला माहित आहे की यामुळे काही फरक पडू शकत नाही. पण तरीही तेरा नंबर नको होता असे वाटते.”

“मी तुझ्या बरोबर थोडा वेळ घालवायला आले असते. पण आता तुझ्या परीक्षेच्या दृष्टीने तुझा वेळ फार महत्वाचा आहे. तुला अभ्यासाला झोकून द्यावे लागणार.” डायना म्हणाली.

“नाही; उलट मिस स्टेसीनी पुस्तक उघडून सुध्दा पाहू नका असे सांगितले आहे. त्यामुळे कंटाळा तर येईलच पण गोंधळ पण उडेल. सरळ बाहेर फिरायला जा, परीक्षेचा अजिबात विचार न करता लौकर झोपायला जा असे सर्वांना सांगितले आहे. त्यांचा सल्ला चांगला आहे पण पालन करायला अवघड आहे. प्रिसी अँड्र्यूजने मला सांगितले की ती पेपरच्या आदल्या रात्री एक वाजेपर्यंत जागून एकदा सर्व उजळणी करत असे. मी पण तसे करण्याचे ठरवले आहे. डायना, मला परीक्षेच्यासाठी तुझ्या जोसेफिन आंटीनी त्यांच्याकडे बीचवूड येथे राहायला बोलावले यासाठी त्यांचे खूप आभार मानायला हवेत. त्या खूप दयाळू आहेत."

a

“पेपर कसा गेला हे मला लगेच पत्राने कळव,” डायनाने बजावले.

“हो नक्कीच, मंगळवारी रात्री माझा पहिला दिवस कसा गेला ते पत्राने कळवते,” ॲनीने न कबूल केले.

“मी बुधवारी स्वतः पोस्ट ऑफिस मध्ये चौकशी करते,” डायना म्हणाली.

ॲनी पुढच्या सोमवारी शहरात गेली आणि बुधवारी डायना, पोस्ट ऑफिसला जाऊन थडकली आणि तिला पत्र मिळाले.

ॲनीने पत्रात लिहिले होते, “प्रिय डायना, मंगळवारी रात्री जोसेफिन आंटीच्या घरातून पत्र लिहित आहे. मला दिलेल्या खोलीत मी एकटीच आहे. माझी खूप इच्छा होती की आता तू माझ्या बरोबर असायला हवी होतीस. मी उजळणी करू शकले नाही. मी मिस स्टेसीना तसा शब्द दिला होता तसा अवघड होता पण मी पाळला.

“काल मिस स्टेसी आमच्याबरोबर आल्या होत्या. रुबीचे हात थंडगार फडलू होते. जोसी पाय मला म्हणाली की मी रात्रभर जागी होते असे मला पाहून तिला वाटत आहे. तिच्या मते जरी मी प्रवेश परीक्षेत पात्र झाले तरी मला पुढचा शिक्षक बनण्याचा अभ्यासक्रम झेपणार नाही. कधी कधी मला वाटते की जोसीला पूर्णपणे मी अजून ओळखू शकलेली नाही.

“आम्ही क्विन्स अकॅडमीत गेलो तेव्हा लांब लांबून खूपच मुले आली होती. मूडी स्पर्जन एकटाच काही तरी पुटपुटत बसला होता. जेनने त्याची चौकशी केली तर तो म्हणाला की तो पाढे म्हणत बसला आहे, आणि कृपया त्याला मध्ये मध्ये बोलून विचलित करू नये तसे झाले तर त्याला भीती वाटेल आणि परिक्षेचा अभ्यास विसरून जाईल. मी मला व्यस्त ठेवण्यासाठी पाढे म्हणत बसला आहे.

“परीक्षेच्या खोलीपर्यंत मिस स्टेसी आम्हाला सोडायला आल्या. जेनचा नंबर माझ्या जवळच आला होता. ती खूपच शांत होती मला तिचा हेवा वाटला.

माझ्या छातीत धडधडायला लागले. मला वाटले की ती धडधड साऱ्या वर्गाला ऐकू येत असेल. तेव्हढ्यात वर्गात इंग्रजी विषयाच्या प्रश्न पत्रिका वाटायला सुरुवात झाली. माझे हातपाय थंड पडले आणि चक्कर येते की काय असे वाटायला लागले. बरोबर चार वर्षांपूर्वी जेव्हा मी मारिलाला विचारले होते की मी ग्रीन गेबल्समध्ये राहू शकते काय, तेव्हा माझी अशीच परिस्थिती झाली होती. मग मी सावरले, माझ्या मनातील गोंधळ तोवर मिटला होता. मला पेपरमध्ये नेमके काय आणि कसे लिहायचे ते उमगले होते.

“इंग्रजी पेपर नंतर जेवणाची सुट्टी होती त्यानंतर इतिहासाचा पेपर झाला. थोडा अवघड होता. थोडी सनावळी आठवायला लागली पण एकंदरीत मी बऱ्यापैकी सोडवला आहे असे मी खात्रीने म्हणून शकते. माझी खरी परीक्षा उद्याच आहे. भूमिती पेपरची मला काळजी लागून राहिली आहे. एकदाचा भूमितीच्या पेपर पार पडला की डोक्यावरचे ओझे उतरेल.

“मिसेस लिंडच्या म्हणण्यानुसार मी भूमितीत पास झाले किंवा नापास, सूर्य काही उगवायचा अथवा मावळायला थांबणार नाही. अर्थात ते सत्य आहे पण तेवढ्याने काही दिलासा मिळत नाही.

"दुपारचा पेपर संपल्यावर इतर मुले, मुली भेटल्या. मूडी स्पर्जनला इतिहासाचा पेपर अवघड गेल्याने तो अतिशय दु:खी झाला होता. उरलेले पेपर देण्यापेक्षा परत घरी जायला निघणार होता. मी त्याला दिलासा देऊन तसे करण्यापासून परावृत्त केले कारण त्यामुळे मिस स्टेसीने घेतलेली मेहनत पण वाया गेली असती.

“रुबी सुध्दा भयंकर नाराज होती तिच्याकडून इंग्रजीच्या पेपरात झालेली चूक पेपर संपून बाहेर पडल्यावर तिच्या लक्षात आली होती. तिचे सांत्वन करून मग

a

थोडे बरे वाटावे म्हणून आम्ही आईस्क्रीम खायला गेलो. मला तेव्हा तुझी फार आठवण आली, ते आमच्या बरोबर असायला हवी होतीस.

परिक्षा अजून दोन दिवसात संपतील."

"तुझी मैत्रीण,

"ॲनी"

शेवटी एकदाची प्रवेश परीक्षा संपली आणि शुक्रवारी ॲनी घरी पोहोचली. ॲनी थकली होती पण परीक्षा पार पडल्याच्या आनंदात थकवा विसरून गेली. जेव्हा डायना ग्रीन गेबल्समध्ये तिला भेटायला आली तेव्हा दोघी एकमेकींच्या गळयात पडल्या जणू काही बरेच वर्षांनी भेटल्या असाव्यात. डायनाने पेपर्स कसे गेले या बाबत विचारपूस केली. ॲनीने सांगितले की भूमिती व्यतिरिक्त सर्व पेपर्स उत्तम गेले आहेत पण भूमिती मध्ये काय होईल यांचा अंदाज करता येत नाही. ग्रीन गेबल्समध्ये परत आल्याबद्दल ॲनीने कमालीची खूश झाली होती. ग्रीन गेबल्स हे जगातील सर्वात प्रिय, सुंदर ठिकाण आहे असे तिचे म्हणणे होते आणि ते खरेही होते.

“बाकीच्या मुलांना कसे पेपर्स गेले?” डायनान विचारले.

“सर्वजण असे म्हणतात की पास होणार याची खात्री नाही पण मला वाटते त्यांना चांगले पेपर्स गेले असावेत. मूडी स्पर्जनला अजून इतिहासाची खात्री नाही आणि चार्लीला बीजगणिताची. परंत निकाल लागल्याशिवाय खरे काय ते समजणार नाही. त्यासाठी निदान पंधरा दिवसांचा अवधी आहे. माझा तर जीव अगदी टांगणीला लागला आहे. असे वाटते की शांतपणे झोपी जावे आणि पंधरा दिवसांनी एकदम परिक्षेच्या निकालाच्या वेळी जाग यावी.”

गिल्बर्टला पेपर्स कसे गेले हे डायनाला जाणून घ्यायचे होते पण त्याच्या बाबतीत ॲनीला विचारायची सोय नव्हती. डायनाने ॲनीला धीर देण्याचा प्रयत्न केला.

a

"माझ्यासाठी गुणवत्ता यादीत नंबर येणे महत्त्वाचे आहे तसे झाले नाही तर पास होणे अथवा नापास दोन्हीही माझ्यादृष्टीने सारखेच आहे," ॲनीने स्पष्ट केले.

डायना यांचा अर्थ समजून होती: गिल्बर्ट ब्लीथ पेक्षा जास्त मार्क्स मिळवणे हा तिचा यशस्वी असण्याचा निकष होता.

याच गोष्टीवर ॲनीने आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते. रस्त्याने जाताना अनेकदा त्या दोघांची भेट झाली होती पण दोघेही एकमेकांना ओळखत असल्याचे दाखवून देत नसत, प्रत्येकवेळी ॲनी ताठ मानेने त्याच्या पुढ्यातून निघून जाताना मनातून मात्र हळहळत असे की होडी बुडताना गिल्बर्टची मदत जशी स्विकारावी तसाच त्याचा मैत्रीचा प्रस्ताव स्विकारायला हवा होता. मात्र दोघांनी परीक्षेत अव्वल स्थान पटकावायची प्रतिज्ञा केली होती. त्यामुळे दोघांपैकी कोण वरचढ ठरणार याची उत्सुकता संपूर्ण शाळेला लागली होती. जोसी पायने तर गिल्बर्टच सर्वात पुढे असेल अशी पैज देखील लावली होती. जर जोसी पैज जिंकली असती तर ॲनीला तिचा अपमान असह्य झाला असता.

ॲनीला गुणवत्ता यादीमध्ये समावेश व्हावा असे वाटण्याचे आणखी एक कारण होते ते म्हणजे मॅथ्यू आणि मारिला यांच्यासाठी ती एक अभिमानास्पद गोष्ट बनली असती. विशेषतः मॅथ्यूना ॲनी संपूर्ण प्रिन्स एडवर्ड आयलंड मधील मुलांच्या मधून अव्वल स्थान पटकवणार अशी खात्री होती. अर्थात ॲनीला जरी मॅथ्यूंची अपेक्षा अवाजवी वाटत असली तरी निदान गुणवत्ता यादीत पहिल्या दहा नंबरात तरी आपले नाव असेल असे वाटत होते जेणेकरून मॅथ्यू तिचे यश अभिमानाने मिरवू शकतील आणि तेच तिच्या परिश्रमाचे सार्थक असेल.

परीक्षेनंतर पंधरा दिवस उलटले. ॲनी एकदा पोस्ट ऑफिसची चक्कर सुध्दा मारून आली बाकीची मुले पण तेच करत होती. मूडी स्पर्जन असा एकच मुलगा असा होता की ज्याला स्वतः जाऊन निकाल पाहण्याचे धैर्य नव्हते. कोणीतरी

त्याला येऊन पास किंवा नापास झाल्याचे सांगेपर्यंत वाट पाहायची त्याची तयारी होती.

बघता बघता अजून एक आठवडा गेला. आता निकालाची प्रतिक्षा सर्वांनाच असह्य झाली. दररोज दुपारी पोस्ट ऑफिस कडून निराशा घेऊन परतणाऱ्या ॲनीकडे पाहून मॅथ्यू पण गंभीर झाले.

आणि एका संध्याकाळी बातमी आली. ॲनी तिच्या खिडकीतून बाहेर बघत होती आणि तिला डायना ग्रीन गेबल्सच्या दिशेने पळत पळत येताना दिसली. तिच्या हातात बहुतेक वर्तमानपत्र पत्र फडफडत असावे.

ॲनी पटकन उठली, वर्तमानपत्रात निकाल जाहीर झाला असेल या विचाराने तिच्या काळजात धडधड सुरु झाली, एक पाऊलही पुढे टाकते अशक्य झाले. तोवर डायना धावतच ॲनीच्या खोलीत घुसली. डायना आनंदाने बेभान झाली होती.

डायना मोठ्याने ओरडतच आली, "ॲनी, तू प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहेस — तुला आणि गिल्बर्टला दोघानाही—सारखेच मार्क्स् आहेत—पण तुझे नाव पहिले आहे. अरे, मला खूप अभिमान आहे!"

डायनाने वर्तमानपत्र टेबलावर टाकले आणि स्वतः ॲनीच्या बेडवर जाऊन पडली. धावत आल्याने तिला धाप लागली होती, जास्त बोलायला पण जमत नव्हते. ॲनीने काड्यापेटीने दिवा पेटवायला लाघ्गली तीचे हात थरथरत होते. शेवटी सात आठ काड्या बाद झाल्यानंतर एकदाचा दिवा पेटला. अधिरतेने तिने वर्तमानपत्रात निकाल पाहिला दोनशे मुलांमुलींच्या यादीत पहिल्या क्रमांकावर तिचे नाव झळकत होते.

a

हा "ॲनी, तू खूप छान केलेस," डायना कौतुकाने बोलती आता कुठे ती बोलता येण्याइतपत सावरली होती. ॲनीने पेपरकडे एकटक पाहत होती तिला पण काय बोलावे हे कळत नव्हते.

मिस्टर बॅरीनी बरोबर दहा मिनिटांपुर्वी ब्राइट रिव्हरमधून पेपर आणला होता. त्याच दिवशी दुपारी तो शहरातून ट्रेनने आला होता. पोस्टाने निकाल यायला उद्याचा दिवस उजाडला असता. डायनाने पेपरमध्ये निकाल पाहिला आणि तशीच ती ॲनीच्या घराकडे धावत धावत आली होती. दोघीही शांतपणे सर्व निकाल परत एकदा राहीला. ॲव्हेनलीच्या शाळेचे सर्व विद्यार्थी पास झाले होते अगदी मुडी स्पर्जन देखील.

"ॲनी, मिस स्टेसीना खूपच आनंद झाला असेल. त्यांनी स्वतःची गैरसोय सोसून, ॲव्हनलीच्या विद्यार्थ्यांसाठी खूपच मेहनत घेतली त्यांचा चांगला उपयोग झाला. तुझे नांव पाहून मला इतका आनंद झाला की वर्णन करणे अवघड आहे. तू मात्र खूप शांत दिसतेस," डायना म्हणाली.

"मी आश्र्चर्यचकीत झाले आहे, एक नाही दोन, मला शंभर गोष्टी सांगायच्या आहेत पण शब्दच सापडत नाहीत. मी स्वप्नात देखील असे होईल अशी अपेक्षा केली नव्हती. फक्त एकदाच मनात विचार आला होता, मी जर पहिली आले तर, या नुसत्या विचारानेच मला थरथरायला झाले. संपूर्ण प्रिन्स एडवर्ड आयलंड मधून पहिल्या क्रमांक येण्याची शक्यतेवर माझा स्वतःचा विश्र्वास बसला नाही. डायना आपल्याला सर्वात अगोदर मॅथ्यूना ही बातमी सांगायला जायला हवे. आपण शेतात जाऊन त्यांना सांगू आणि मग सर्वांना सांगू या."

दोघी कुरणात गेल्या, मॅथ्यू गवताचा भारा बांधत होते आणि मारिला कुंपणाजवळ मिसेस लिंड यांच्या बरोबर बोलत उभी होती.

a

"ओ मॅथ्यू! मी पहिल्या क्रमांकाने पास झाले, दोघाना सारखे मार्क्स् आहेत. दोघांना पहिला नंबर विभागून मिळाला आहे. माझी मेहनत व्यर्थ गेली नाही, मु देवाची अत्यंत आभारी आहे."

"हे मी नेहमीच म्हणत आलो आहे," वर्तमानपत्र निकालाच्या यादीकडे कौतुक भरल्या डोळयांनी पहात मॅथ्यू म्हणाले, "मला खात्री होती की सहज सर्वांना हरवू शकशील."

"ॲनी, तू अतिशय कौतुकास्पद यश मिळवले आहेस," ॲनीबद्दल वाटणारा अभिमान लपवत मारिला म्हणाली. मिसेस लिंड, गंभीरपणे हे कौतुक न्याहाळत होत्या पण प्रांजळपणे म्हणाल्या, "तिने खूप चांगले काम केले आहेस असे नुसते म्हणणे पुरेसे नाही, ॲनी तू आज तुझ्या कर्तृत्वाने सर्वांचे डोळे दिपवून टाकले आहेस. आम्हाला तुझा अभिमान वाटतो."

त्यानंतर ॲनी मिसेस ॲलन यांना आनंदाची बातमी सांगायला गेली. त्यांच्या बरोबर या पुढील वाटचालीसंदर्भात गंभीर गप्पा पण झाल्या. त्या रात्री ॲनीने तिच्या उघड्या खिडकीजवळ गुडघे टेकले आणि तिने परमेश्वरापाशी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली तसेच भविष्यकाळा करिता अशीच कृपा असावी म्हणून विनम्रपणे विनंतीही केली.

पांढऱ्याशुभ्र उशीवर जेव्हा ती डोके टेकवून झोपी गेली तेव्हा तारूण्याला साजेशी मनोरम स्वप्ने डोळयापुढे साकार होत होती.

a

# प्रकरण 33

ती एक प्रसन्न संध्याकाळ होती, निरभ्र आकाशात सुंदर पिवळसर-हिरवट संधिप्रकाश रेंगाळत होता. खिडकीतून पाहिले असता, झपाटलेल्या झाडाच्या मागे पौर्णिमेच्या चंद्राची प्रभा हळूहळू उजळत निघाली होती, मंद मंद वारा वाहत होता, पानांची सळसळ ऐकू येत होती, पक्ष्यांची किलबिल चालली होती.

ॲनीच्या खोलीत मात्र आज जरा लौकरच दिवा पेटला होता. ॲनीने व्हाइट सॅण्ड्स हॉटेल येथे एका मनोरंजनाच्या कार्यक्रमात भाग घेतला होता. त्याकरिता ती तयार होत होती. केशभूषा, वेशभूषा करायला डायना मदतीला धावून आली होती.

“ॲनी, तुझा पांढरा ऑर्गेंडीचा ड्रेस घाल,” डायनाने सल्ला दिला.

चार वर्षांपूर्वी जेव्हा ग्रीन गेबल्समध्ये ॲनीचा प्रवेश एका विचित्र योगायोगाने झाला होता आणि तिला नाकारले गेले ते दु:ख तो अपमान तिच्या जिव्हारी लागला होता. आता परिस्थिती पार बदललेली होती, विशेषतः मारिलाने तिला स्वतःला नामंजूर असलेल्या बऱ्याचशा गोष्टींकडे जाणूनबुजून कानाडोळा केला आणि बघताबघता 'ग्रीन गेबल्स' त्या तरूण मुलीसाठी मायेची ऊब देणारे प्रेमळ घरकुल कधी बनले, हे त्या घरातील मंडळींच्या लक्षात सुध्दा आले नाही.

गुलाबाची फुले असलेला मखमली गालिचा आणि गुलाबी रंगाचे पडदे ही ॲनीने सुरुवातीला पाहिलेले स्वप्न होते ते काही साकार झाले नव्हते पण तिला त्याचे दु:ख वाटत होते असे मात्र नव्हते. तिच्या वयानुसार तिची स्वप्ने पण बदलली होती. आता फरशीवर चांगल्या प्रकारचा गालिचा अंतरला होता. खिडक्यांना फिकट हिरव्या रंगांचे तलम असे मलमलचे पडदे लावलेले होते. भिंतीवर सोनेरी, चंदेरी धाग्यांनी विणकाम भरतकामाच्या शोभेचे पडदे टांगण्याऐवजी मिसेस ॲलन यांनी

a

ॲनीला दिलेल्या सफरचंदाच्या मोहरलेल्या फांदीचे चित्र, भिंतीवर लावलेले होते. मिस स्टेसी बरोबरचा वर्गातील साऱ्या मुलामुलींचा फोटो अगदी अभ्यासाच्या टेबलाजवळ लावला होता. टेबलावर फुलदाणीत बागेतील ताजी फुलांची कलात्मक पुष्प रचना केली होती. त्यांचा मधूर सुवास वातावरणात दरवळत होता.

तिथे महागडे महोगनीचे फर्निचर नव्हते पण पुस्तकांनी भरलेले कपाट होते. एका वेताच्या आरामखुर्चीवर, सुंदर भरतकाम केलेल्या दोन उश्या पाठीला आणि बसायला सुखकर होईल अश्या प्रकारे ठेवल्या होत्या. जवळच भिंतीवर एक सोनेरी फ्रेमचा बिलोरी आरसा टांगून ठेवला होता. एक छोटा पलंग, बेडशीट, उशीचे अभ्रे घालून नीट तयार ठेवला होता.

ॲनी व्हाईट सॅंड्स हॉटेल मधील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणार होती. हॉटेलमध्ये प्रामुख्याने अमेरिकन टुरिस्ट येत, त्यांच्या करमणुकीसाठी प्रिन्स एडवर्ड आयलंड मधील हौशी कलाकार एकत्र येऊन विविध मनोरंजनाचे कार्यक्रम करत आणि जमा झालेली रक्कम देणगी दाखल शार्लोटटाऊन हॉस्पिटला दिली जात असे. प्रामुख्याने गायन, वादन, नाट्य प्रवेश, कथा, कविता वाचन असे कार्यक्रमाचे स्वरूप असे. ॲनी या कार्यक्रमात कविता वाचन करणार होती. ॲनीच्या आयुष्यातील हा एक विशेष महत्त्वाचा प्रसंग होता, ॲनीने मिळवलेल्या सन्मानाचे मॅथ्यूना अत्यंत अप्रुप वाटत होते अर्थात मारिलाला पण मॅथ्यूच्या इतकेच ॲनीच्या अंगच्या गुणांचे कौतुक होते पण ते तिने कदापि मान्य केले नसते नेहमीच्या सवयीप्रमाणे ती म्हणाली, “तरुण मुला मुलींनी कार्यक्रमाच्या निमित्ताने असे एकत्र येणे हे काही मला आवडले नाही. निदान तिकडे हॉटेलमध्ये तरी कोणी जबाबदार व्यक्ती असणे आवश्यक होते.”

ॲनी आणि डायना, जेन ॲड्र्युज आणि तिचा भाऊ बिली यांच्या बरोबर त्यांच्या बग्गी मधून जाणार होते. बहुतेक ॲव्हनलीची सर्वच तरुण मंडळी या

a

कार्यक्रमाला उपस्थित राहणार होती. कार्यक्रमानंतर कलाकारांना रात्रीचे जेवण असणार होते.

“डायना, अंग हा ऑर्गेंडीचा ड्रेस खरोखरच मला शोभून दिसेल ना? मला तर बाई माझा निळया फुलांचा मला ड्रेस चांगला दिसेल असे वाटते. हा ड्रेस थोडा जास्तच फॅशनेबल आहे.”

“पण तुला ऑर्गेंडीचा ड्रेस खरोखरच शोभून दिसतो,” डायना म्हणाली.

अलीकडे ॲव्हनलीमध्ये फॅशनच्या संदर्भात डायनाचा शब्दाला बरेच वजन प्राप्त झाले होते. गुलाबी रंगाच्या ड्रेसमध्ये डायना खूपच सुंदर दिसत होती. ॲनीने कार्यक्रमात भाग घेतला असल्याने तिला कपड्यांकडे विशेष लक्ष देणे भाग होते.

“तुझ्या ड्रेसची फ्रिल अजून थोडी खांद्यावरून बाहेर दिसू दे. आता मी कमरेचा पट्टा बांधते. पायामध्ये या फॅन्सी स्लिपर्स घाल. मी केसांच्या दोन वेण्या घालून निम्म्यावर पांढरी रिबिन बांधून त्याचा चांगला बो बनवते. कपाळावर एकही बट आणायला नको. तुझे केस तसेच दिसतात, मिसेस ॲलन म्हणतात तशी तू मदर मेरी सारखी दिसशील. आमच्या बागेतील पांढरा गुलाब मी मुद्दाम आणला आहे तो कानामागे तुझ्या केसात घालूया मी मुद्दाम तुझ्यासाठी तो गुलाब राखून ठेवला होता.”

“मी गळयात मोत्यांचा हार घालून काय? मॅथ्यूनी माझ्यासाठी आणला आहे, तो मी घातलेला त्यांना नक्कीच आवडेल."

डायनाने होकारार्थी मान हलवली आणि ॲनीच्या गळयात मोत्यांचा हार घातला.

“ॲनी, तुझ्यामध्ये नैसर्गिक गोडवा आहे. ज्या प्रकारे तू ताठ मानेने चालत असतेस तेव्हा त्यात डौलदारपणा असतो, तुझ्या तुलनेत मी अगदीच फिकी पडते असे मला पुर्वी पासून वाटत होते ते आता अगदी स्पष्ट दिसत आहे त्यामुळे मला

आता तुझ्याबरोबर तुलना करणे सोडून द्यायला हवे,"डायना अगदी मनापासून प्रेमळपणे म्हणाली.

"तुझ्या दोन्ही गालावर इतक्या सुंदर कळया पडतात," डायनाच्या आरशात दिसणाऱ्या प्रतिबिंबाकडे उत्सुक नजरेने पाहत ॲनी म्हणाली. "माझे स्वप्न होते की मला अशी निदान एकतरी गोड खळी पडावी पण ते स्वप्न कधीच पूर्ण होणार नाही हे मला समजले आहे. बरं आता तरी माझी कार्यक्रमाला जाण्यासाठी तयारी पूर्ण झाली की नाही?"

"एकदम तयार," डायना म्हणाली. मारिला खोलीच्या दाराशी उभी होती. मारिलाचे केस आता बरेचशे पांढरे पडत चालले होते, वाढत्या वयाच्या खूणा जाणवत होत्या, चेहऱ्यावर मात्र पुर्वीचा तटस्थपणा जाऊन मायाळूपणा दिसून येत होता.

"मारिला आत येऊन पहा तरी आमची कथाकथनकार कशी दिसत आहे," डायना म्हणाली.

"अगदी नीटनेटकी आणि योग्य दिसत आहे आणि केसांच्या वेण्या अगदी चांगल्या घातल्या आहेत. पण मला वाटतं ऑर्गेंडीचा पांढरा ड्रेस प्रवासात खराब होईल शिवाय हवेत गारठा आहे त्यामुळे थंडीत घालण्यासाठी योग्य नाही. खरं तर ऑर्गेंडीचे कापड वापरण्यायोग्य नसते पण मॅथ्यूला काही सांगून उपयोग नाही. पुर्वी कापड विकत आणल्या पुर्वी मला निदान विचारत तरी असे पण आता कार्मोडीचे दुकानदार फॅशनच्या नावाखाली काहीही माल त्याला खपवतात आणि तो ॲनीसाठी पटकन खरेदी करतो. ॲनी तुझ्या स्कर्ट, बग्गीमध्ये नीट सावरून बस नाहीतर चाकांमध्ये अडकेल आणि अंगात उबदार जाकीट घाल." असे म्हणत मारिला खाली निघाली. ॲन किती गोड दिसते याचा तिला अभिमान वाटत होता. अगदी पौर्णिमेच्या चंद्राची प्रभा ॲनीच्या चेहऱ्यावर फाकली होती. मारिलाला तिचे

सादरीकरण ऐकण्यासाठी उत्सुक होती पण कार्यक्रमास उपस्थित राहता येत नसल्याने मनातून नाराज होती.

“माझा ड्रेस खरच दव पडून खराब होईल काय?” ॲनीने डायनाला विचारले.

“छे!” खिडकीचे दार बंद करत डायना म्हणाली, “रात्र किती सुंदर आहे. दव वगैरे पडणार असे वाटत नाही. बाहेर बघ किती चांदणं पडले आहे.”

“होय खरंच, माझी खोली पूर्व दिशेला आहे याचा मला खूप आनंद वाटतो. रोज सकाळी समोरच्या टेकडीमागून सूर्योदय होताना पाहणे अतिशय आनंददायी अनुभव आहे. रोज एक नवीन सकाळ, असे वाटते रोज माझा अंतरात्मा सूर्य प्रकाशात न्हाऊन निघत आहे. डायना, अगं मला ही छोटी खोली खूप आवडते. पुढच्या महिन्यात मी परगावी गेल्यावर माझ्या या शिवाय माझे कसं जमणार हे मला माहीत नाही.”

“आज रात्री ॲव्हनली सोडून जाण्याबद्दल बोलूया नको,” डायना कळवळून म्हणाली. “मला आज त्यांचा विचार करायचा नाही त्याचा मला फार त्रास होतो. मला आजची संध्याकाळ, आनंदात घालवावयाची आहे. तुझे पाठांतर पूर्ण झाले आहे ना? तुला भीती तर वाटत नाही ना?”

“नाही, मी अनेकदा त्यांचे प्रयोग सार्वजनिक ठिकाणी केले आहेत. मला सर्व तोंडपाठ आहे. ती एक दु:खी कविता आहे, 'द मेड्न्स व्हाउ्'. लॉरा स्पेन्सर एक विनोदी कथावाचन करणार आहे, परंतु मला लोकांना हसण्यापेक्षा रडवायला आवडेल.”

“जर तुला 'वन्स् मोअर' मिळाला तर परत एकदा म्हणून दाखवणार काय?”

“छे! वन्स् मोअर वगैरे काही मिळणार नाही,” ॲनी म्हणाली, पण मनातून मात्र आशा बाळगून होती की दुसरे दिवशी सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी मॅथ्यूना वर्णन करून सांगताना वन्स् मोअर मिळाल्याचे अभिमानाने सांगता येईल.

बिली अँड्र्यूजने आग्रहाने ॲनीला बग्गीमध्ये समोरच्या सीटवर बसण्याची विनंती केली. खरे तर ॲनीला डायना आणि जेनसोबत मागे गप्पा मारत बसायला आवडले असते. पण बिलीला वाईट वाटले म्हणून ती पुढे बसायला तयार झाली. बिली वीस वर्षांचा तरुण मुलगा होता, अंगाने थोडा जाड, बोलायला अबोल होता त्याला ॲनीचे खूप कौतुक होते. तिच्या समवेत हॉटेल व्हाईट सॅंड्स मध्ये जाताना त्याला अभिमान वाटत होता. ॲनी अधूनमधून मागे मान वळवून डायना आणि जेन बरोबर गप्पा मारत होती. मधूनच बिली बरोबर हसत हसत प्रवासाचा आनंद लुटत होती. रस्त्याने बऱ्याच बग्ग्यांची गर्दी झाली होती. बहुतेक सर्वच व्हाईट सॅंड्स हॉटेलमध्ये चालल्या होत्या. प्रत्येक वाहनातून हास्य विनोदाचे आवाज ऐकू येत होते. ते हॉटेलवर पोहोचले तेव्हा सगळीकडे प्रकाशाचा झगमगाट होता.

तिकडे ॲनीला आयोजन समितीच्या स्त्रिया भेटल्या, त्यांनी कलाकारांच्या ड्रेसिंग-रूममध्ये नेले. मेकअप रूम शार्लोटटाऊन सिम्फनी क्लबच्या सदस्यांनी भरलेली होती. तिकडे गेल्यावर ॲनीला एकदम लाजल्या सारखे झाले, तेथील उच्चभ्रू लोकांच्या मध्ये आपण अगदीच खेडवळ दिसत आहोत या जाणीवेने तिला दडपण आले. तिच्या आजूबाजूला श्रीमंतीचे जणू प्रदर्शनच भरलेले दिसत होते. उंची रेशमी झुळझुळीत कपड्यांची सळसळ जाणवत होती. नवनवीन फॅशनेबल कपड्यांची शोभा सुंदर नक्षीकाम केलेली कलाबुतची झालर शोभा अजूनच वाढवताना दिसत होती; या सगळ्या पुढे ॲनीला, ग्रीन गेबल्समध्ये अतिशय सुंदर भासणारा आपला ड्रेस अगदीच साधा आणि मामूली वाटू लागला. ॲनीच्या शेजारी उभ्या असलेल्या श्रीमंत देखण्या स्त्रीने परिधान केलेल्या हिऱ्यांच्या दागिन्यांच्या

तुलनेत, ॲनीने घातलेली मोत्यांची माळ अगदी फिकी भासत होती. इतरांनी घातलेल्या परदेशी महागड्या फुलांच्या पुढे डायनाने दिला पांढरा गुलाब अगदीच बापुडवाणा दिसत होता. ॲनीने आपला कोट आणि टोपी काढून एका बाजूला ठेवून दिली आणि शक्य तितक्या लौकर आपल्या ग्रीन गेबल्समधील खोलीत परतणे शक्य व्हावे अशी मनोमन इच्छा केली.

हॉटेलच्या मोठ्या रंगमंचावरील परिस्थिती ॲनीच्या दृष्टीने आणखी वाईट होती असे म्हणायला हरकत नसावी. तेथील विजेच्या दिव्यांच्या उजेडाने डोळे दिपून गेले आणि गोंगाटाने कान बधीर झाले. परफ्यूमच्या वासाने डोके चक्रावून गेले. तिला वाटायला लागले उगाच या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला, आरामात डायना आणि जेन बरोबर प्रेक्षकात बसले असते तर भारी गंमत आली असती. ॲनीच्या जवळचे एक दणकट बांध्याची गुलाबी रेशमी ड्रेस घातलेली एक स्त्री आणि एक पांढऱ्या रंगाचा फॅशनेबल पोशाख केलेली एक तरुण मुलगी उभी होती. गुलाबी रेशमी ड्रेस घातलेली स्त्री अधूनमधून चष्म्यातून ॲनीला न्याहाळत होती त्यामुळे ॲनी वैतागून गेली होती. पांढरा ड्रेस घातलेली तरुण मुलगी, स्थानिक कलाकार अगदीच अडाणी आणि खेडवळ आहेत असे शेजारच्या मुलीला सांगत होती, त्यांच्या कलेच्या सादरीकरणात चुका किंवा विसंगती निर्माण होऊन विनोद निर्मिती होईल त्यातून झाले तर मनोरंजन होऊ शकेल, असा तिचा समज होता. ॲनीला त्या मुलीचा प्रचंड राग आला.

ॲनीच्या दुर्दैवाने, कथा कविता सादर करणाऱ्या व्यावसायिक कलाकार, श्रीमती इव्हान्स, त्यावेळी हॉटेलमध्ये उतरल्या होत्या आणि त्यानी त्या कार्यक्रमात भाग घेण्यास होकार दिला होता आणि त्या कथा कथन करण्यासाठी उभ्या राहिल्या, काळेभोर डोळे, लांबसडक केस पाठीवर सोडलेले, अंगात करड्या रंगाचा झगमगणारा गाऊन, गळयात चमचमणाऱ्या हिऱ्यांचा नेकलेस अशी ती तयार होऊन

a

आली होती. तिचा आवाज कमालीचा लवचिक होता आणि अभिव्यक्तीची अद्भुत शक्ती होती; तिच्या सादरीकरणावर प्रेक्षक अगदी भारावून गेले. ॲनी सगळा त्रास विसरून आनंदाने ऐकत होती. कथा कथन पूर्ण झाले आणि ॲनी एकदम भानावर आली, तिचा आत्मविश्वास पार ढेपाळला होता. याउप्पर ती कधीच अशा प्रकारच्या कार्यक्रमात भाग घेऊ शकणार नाही अशी तिची खात्री झाली. तिला त्वरित तिच्या ग्रीन गेबल्समध्ये परत जायचे होते.

नेमक्या त्याच वेळी ॲनीचे नाव पुकारले गेले. ॲनीला रंगमंचावर बोलावण्यात आलेले पाहून, पांढऱ्या ड्रेस परिधान केलेली मुलगी, एकदम चमकली, तिच्या नजरेत कौतुकाची छटा दिसत होती. पण ते समजून घ्यायला ॲनी भानावर नव्हती. ती कशीबशी उठून उभी राहिली पण तिला आपल्या भोवतालचे जग फिरत आहे असे वाटू लागले होते.

तिचा चेहरा एव्हढा उतरला होता की प्रेक्षकांमध्ये बसलेल्या डायना आणि जेन चिंतेत पडल्या आणि दोघींनी एकमेकींचे हात घट्ट पकडून ठेवले आणि पुढे काय होते ते पाहण्यासाठी तयार झाल्या. ॲनीला स्टेजवर जाऊन सादरीकरण करण्याची एकदम जबरदस्त भीती वाटू लागली. तसे तिने अनेकदा सार्वजनिक ठिकाणी सादरीकरण केले होते पण या प्रकारच्या प्रेक्षकांशी तिला यापूर्वी कधीच सामना करावा लागला नव्हता. समोरचा प्रेक्षकवर्ग पाहिल्यावर तिच्या अंगातले त्राण निघून गेले. अशा प्रकारचा प्रेक्षकवर्ग, तिला सर्वस्वी अपरिचित होता तशातच सभागृहातील विजेच्या दिव्यांचा लखलखाट पाहून तिची मती गुंग झाली होती. तिच्या समोर आलिशान खुर्च्यांवर उच्चभ्रू समाजातील स्त्री पुरुष, गंभीरपणे बसलेले होते, त्यांची अभिरुची आणि शिष्टाचार याबाबत ॲनी अनभिज्ञ होती. नेहमीच्या वाद विवाद स्पर्धेच्या वेळी, बसण्यासाठी साधे बाक, प्रेक्षक म्हणून शिक्षक,

शाळेतील मुले, शेजारी पाजारी आणि कौतुक भरल्या डोळ्यांनी पाहणारे कुटुंबीय, असे वातावरण असे.

ॲनीचा असा समज झाला की इथे असलेले प्रेक्षक एकतर कठोर टीका करणारे असतील किंवा त्या पांढऱ्या ड्रेस घातलेल्या मुलीने म्हटल्याप्रमाणे खेडवळ कलाकारांच्या सादरीकरणाची गंमत पहायला आला असावेत. ॲनी निराश झाली, तिला आपल्या असहाय्यपणाची तिला लाज वाटली आणि दु:खही झाले. तिचे पाय थरथरायला लागले. हृदयाची धडधड वाढली आणि डोळ्यापुढे अंधारी आल्यासारखे वाटू लागले. तोंडातून शब्द देखील फुटेना. तिथे थांबून होऊ घातलेल्या नामुष्की पेक्षा तेथून तत्क्षणी पलायन करण्याचा मार्ग उचित वाटला, तेव्हा तिच्या भीतीने विस्फारलेल्या डोळयांना सर्वात शेवटच्या रांगेत उभा असलेला गिल्बर्ट ब्लीथ दिसला. हसत हसत तो पुढे वाकून जोसी पायकडे पाहत होता. ते पाहून ॲनीला, गिल्बर्ट तिच्या फजितीवर कुत्सितपणे हसत आहे असे वाटले. प्रत्यक्षात तसे काहीच नव्हते. गिल्बर्ट सहज हसत होता, एकंदरीत मनोरंजनाचा कार्यक्रमाला खूपच रंगत आली होती शिवाय आज ॲनीच्या बदलल्या रूपाचे त्याला मनापासून कौतुक वाटत होते. जोसी पाय त्याच्या शेजारी बसली होती, त्यादिवशी ती गिल्बर्टच्या बरोबर त्यांच्याच गाडीतून आली होती. तिच्या चेहऱ्यावर मात्र खरोखरीच उपरोधिक हास्य होते. पण ते ॲनीला दिसले नाही आणि तिने ते पाहिले असते तरी त्याची फारशी पर्वा केली नसती. ॲनीने एक दीर्घ श्वास घेतला, झटकन मान वर उचलली, धैर्य आणि दृढनिश्चय वीजेच्या वेगाने तिच्यामध्ये प्रवेश करते झाले: गिल्बर्ट ब्लिथसमोर ती अयशस्वी होणार नव्हती - ती कधीही त्याला तिची टिंगलटवाळी करण्याची संधी देणार नव्हती, कधीच नव्हती! तिची भीती आणि अस्वस्थता नाहीशी झाली; आणि तिने कविता सादर करायला सुरुवात केली. तिचा गोड आवाज, जरासुद्धा कंप न पावता, सभागृहाच्या शेवटच्या प्रेक्षकांपर्यंत

a

स्पष्टपणे थेट पोहोचला, तिने पूर्णपणे स्वतःवर आणि सादरीकरणावर नियंत्रण मिळवले होते. नुकत्याच अनुभवलेल्या भीतीवर मात करून ॲनीने पूर्वी कधीही केली नव्हती इतक्या अप्रतिमपणे कविता सादर केली. जेव्हा तिचे कविता पठण संपले तेव्हा सभागृहात टाळयांचा कडकडाट झाला. भारावून गेलेली ॲनी, थोडी लाजत, आनंदाने हरखून तिच्या जागेवर परत गेली. तिच्या शेजारच्या गुलाबी रंगाचा रेशमी पोशाख केलेल्या महिला, तिचा हात धरून तो हालवून म्हणाली, “मुली, तू खूपच सुंदर कविता म्हणालीस, मला तर ऐकताना रडायला येत होते, ते बघ तुला परत व्यासपीठावर वन्स मोअर साठी  बोलावत आहेत.”

“छे! मी परत एकदा म्हणून शकणार नाही,” ॲनी गोंधळून गेली होती. “पण तरीही मला म्हणायला हवे आहे, नाहीतर मॅथ्यूना वाईट वाटेल, मला वन्स् मोअर मिळणार याची त्यांना खात्री होती.”

“तर मग पळ, मॅथ्यूना निराश करू नकोस,” ती महिला हसून म्हणाली.

हसतमुख चेहऱ्याने ॲनी परत रंगमंचावर गेली आणि परत एकदा प्रेक्षकांच्या विनंतीस मान देऊन कवितेचा थोडा भाग म्हणून दाखवला. प्रेक्षकांनी परत एकदा टाळयांच्या गजरात तिचे कौतुक केले. उरलेली संध्याकाळ तिच्यासाठी विजयी संध्याकाळ होती.

जेव्हा मनोरंजनाचा कार्यक्रम संपला तेव्हा ॲनीच्या शेजारच्या गुलाबी पोशाखातील महिलेने तिला अगत्याने स्वतः बरोबरच बसवून घेतले आणि तेथील प्रतिष्ठीत मंडळींशी तिची ओळख करून दिली. ती महिला स्वतः एका लक्षाधीश अमेरिकन उद्योगपतीची पत्नी होती. व्यावसायिक कलाकार, श्रीमती इव्हान्स आल्या आणि ॲनी बरोबर गप्पा मारल्या, त्यांनी तिच्या आवाजाचे कौतुक केले आणि कवितेच्या निवडीसाठी प्रशंसा केली. अगदी त्या पांढऱ्या ड्रेस मधील मुलीने सुध्दा ॲनीचे कौतुक केले. हॉटेल व्हाईट सॅंड्स तर्फे रात्रीची मेजवानी आयोजित केली

होती. त्यामध्ये डायना आणि जेनला पण ॲनीचे सोबती म्हणून बोलावले गेले. बिली अँड्रयूज मात्र मेजवानी पासून दूरच इतर मुलांबरोबर त्या तिघींनी वाट बघत थांबला होता. मेजवानी आटोपल्यावर तिघी जणी बिली बरोबर परत जात असताना त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या.

"किती छान वेळ गेला नाही?" जेन उसासा टाकत म्हणाली. "मी जर श्रीमंत अमेरिकन असते तर मी संपूर्ण उन्हाळयात व्हाईट सॅड्स हॉटेलमध्ये राहिले असते. हिऱ्यांच्या दागिने, नवनवीन फॅशनचे कपडे घालता आले असते. रोज रोज आईस्क्रीम, चिकन सॅलड खायला मजा आली असती. शिक्षिकेची नोकरी करण्यापेक्षा ते किती आरामदायी जीवन असेल याच्या नुसत्या कल्पनेनेच किती आनंद वाटतो. ॲनी, तू कविता खूप छान सादर केलीस. सुरवातीला तर आम्हाला भीती वाटली की तू सादर करण्यापूर्वी निघून जाशील की काय म्हणून पण तू मिसेस इव्हान्सपेक्षा चांगले सादरीकरण केलेस."

"छे! असे काही नाही. मिसेस इव्हान्सपेक्षा मी कशी चांगले करू शकेन? त्या अनुभवी कलाकार आहेत आणि मी फक्त थोडे वाचनाचे आणि संभाषणाचे कौशल्य असलेली एक शाळकरी मुलगी, दोघींची तुलनाच करता येणार नाही. लोकांना माझे सादरीकरण खूप चांगले वाटले यातच मी समाधानी आहे."

डायना तुझ्यासाठी माझ्याकडे एक चांगली बातमी आहे. आणखी एका कलाकाराला तुझे कौतुक करताना मी ऐकले आहे. तिथे एक अमेरिकन चित्रकार होता, जोसी पायचा नातेवाईक, तो तिच्याकडे तुझ्याबद्दल चौकशी करत होता ती टिशन केसांची मुलगी कोण आहे? मला तिचे चित्र काढायला आवडेल असे त्यांनी सांगितले. पण टिशन केस म्हणजे काय ते समजले नाही."

"'टिशन केस' म्हणजे लाल रंगाचे केस असा अर्थ होतो. जगप्रसिद्ध इटालियन चित्रकार टिशन, हे प्रामुख्याने लाल रंगाचे केस असणाऱ्या स्त्रीयांचे चित्र काढत असत."

“तेथील महिलांचे हिऱ्यांचे दागिने तुम्ही पाहिलेत काय? किती लकाकत होते. तुम्हाला तसे श्रीमंत व्हायचे आहे काय?” जेनने विचारले.

“आम्ही श्रीमंत आहोतच. आपण सोळा वर्षांच्या एखाद्या आनंदी राजकुमारी सारख्या आहोत. आपल्याकडे तल्लख बुद्धी आहे, कल्पनाशक्ती आहे. या समुद्राचे आता पाहिल्यास, चांदी सारखा चमचमणारा पृष्ठभाग न दिसता फक्त अंधाराच्या सावल्याच्या दिसत आहेत तरीही त्याच्या आत असंख्य रत्नांचा खजिना आहे. आपल्याकडे लाखो डॉलर्स आणि अथवा हिरे माणके असली तरी आता त्यांच्या सुंदरतेचा आस्वाद घेता येणार नाही. मला वाटते आपण, स्वतःला शक्य असले तरी तुम्ही त्या श्रीमंत महिलांच्या जागा घेण्यासाठी तयार होणार नाही. जेन तुला ती पांढऱ्या लेसचा ड्रेस घातलेली दुर्मुखलेली मुलगी व्हायला आवडेल काय? की तू, गुलाबी ड्रेस घातलेली स्त्री, जी प्रेमळ आणि दयाळू आहे पण जाडजूड आणि बुटकी स्त्री बनू इच्छितेस? अगदी मिसेस इव्हान्सकडे थोडे बारकाईने पाहिले तर, त्या प्रसिद्ध अनुभवी कलाकार असल्या तरी दु:खी आणि उदास दिसत होत्या. मला माहित आहे जेन, तुला असे जीवन जगायला नक्कीच आवडणार नाही.”

“तसे मी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही,” जेन ॲनीचे बोलणे न पटल्यासारखी म्हणाली, “पण मला वाटते की संपत्ती आणि समृद्धी एखाद्या व्यक्तीला चांगले समाधान देतात.”

“जरी मला हिऱ्यांची आसक्ती वाटत असली तरी मला, मी जशी आहे तसेच कायम रहायला आवडेल. मी ग्रीन गेबल्सची ॲनी बनून राहाण्यास समाधानी आहे, मॅथ्यूनी मला प्रेमाने दिलेल्या मोत्याच्या माळेवर माझे तितकेच प्रेम आहे जितके की त्या गुलाबी ड्रेसमधील मॅडमचे त्यांच्या हिऱ्यांच्या दागिन्यांवर असेल.”

# प्रकरण 34

पुढचे तीन आठवडे, ग्रीन गेबल्समध्ये खूपच गडबडीचे होते कारण ॲनीला आता पुढील शिक्षणासाठी शार्लटटाऊन येथे जायचे होते, त्यासाठी खूप सारी तयारी सुरू होती. नवीन कपडे शिकवायचे होते, बऱ्याच बारीकसारीक गोष्टींची खरेदी करायची होती, बऱ्याच गोष्टी लक्षात ठेवून त्याची योग्य संगती लावायची होती. ॲनीच्या आवडीप्रमाणे तिच्या कपड्यांच्या खरेदीसाठी मॅथ्यूनी सर्व लक्ष देण्याचे काम उचललेले होते आणि मारिलाला त्यासाठी अजिबात आक्षेप घेतला नव्हता एव्हढेच नाही तर मारिला एका संध्याकाळी ॲनीच्या पूर्वेकडील गॅबलमधील खोलीत गेली, तिच्या हातामध्ये एक फिक्कट हिरव्या रंगाचे कापड होते.

"ॲनी, तुझ्यासाठी सुंदर नाजुक कलाकुसर असलेले कापड खरेदी केले आहे. मला वाटत नाही की आणखी एका ड्रेसची आवश्यकता असेल कारण तसे तुझ्याकडे बरेच चांगले ड्रेस आहेत; पण मला वाटलं की तुला शहरात संध्याकाळी कुठे कार्यक्रमाला अथवा पार्टीला जावे लागले तर खराखुरा 'इव्हनिंग गाऊन', असावा. मला माहीत आहे, जेन, रुबी आणि जोसी यांनी इव्हनिंग गाऊन शिवून घेतले आहेत आणि तेंव्हा तुझ्याकडे पण असायला हवा असे मला वाटले. त्यासाठी मी आणि मिसेस ॲलन शहरात जाऊन हे कापड घेऊन आलो. एमिली गिलीस ही खूपच छान फिटींगचे कपडे शिवून देते म्हणून तिच्याकडून शिवून घेण्याचे ठरवले आहे. त्यापुर्वी मुद्दाम तुला कापड दाखवायला आणले आहे," घाईघाईने जिना चढून

a

आल्याने, मारिला धापा टाकत म्हणाली, तिच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता पण स्वर दु:खी होता. उन पावसाचा खेळ चालला होता असे म्हटले तर वावगे ठरले नसते.

“अय्या, कित्ती सुंदर! खूप खूप धन्यवाद. माझ्यासाठी तुम्ही इतका त्रास घेण्याची, पैसे खर्च करण्याची खरच काही आवश्यकता नव्हती --तुमच्या अशा प्रेमामुळेच माझा इथून पाय निघणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे.”

एमिलीने सुंदर इव्हनिंग गाऊन शिवला, भरपूर चुण्या असलेला,सुंदर झालर लावलेला अंगात अगदी व्यवस्थितपणे बसणारा गाऊन पाहून ॲनी हरखून गेली. संध्याकाळी ॲनीने तो मॅथ्यू आणि मारिलाला घालून दाखवून खास त्यांच्यासाठी म्हणून 'द मेड्न्स व्हाउ' ही कविता सादर केली. ॲनीचा भावपूर्ण तेजस्वी चेहरा, सादरीकरण करताना आवाजातील आवश्यक चढ उतार हे सर्व पाहताना आणि ऐकताना मारिलाच्या डोळ्यापुढे पहिल्यांदा ॲनीने ग्रीन गेबल्समध्ये प्रवेश केलेला दिवस आठवला, अकरा वर्षांची पोरकी पोर, त्या पिवळ्या तपकिरी रंगाच्या विचित्र आखूड ड्रेस मध्ये घाबरून अश्रू भरल्या डोळ्यांनी विचारत होती 'म्हणजे मी मुलगी आहे म्हणून तुम्हाला नको आहे', त्या आठवणीने मारिलाच्या डोळ्यात अश्रू आले.

“मारिला, माझी कविता ऐकून तुम्हाला रडू आले आहे,” असे म्हणत ॲनी खाली वाकली आणि मारिलाच्या गालावर आपले ओठ टेकवले, “याला मी माझ्या सादरीकरणाला मिळालेली पोच पावती समजते.” ॲनी म्हणाली.

“छे! छे! मी काही तुझी कविता ऐकून काही रडणाऱ्यातली बाई नाही,” मारिला पटकन म्हणाली. तिने स्वतःला कणखर स्त्री म्हणून सिद्ध केले होते. “तू अजून लहानगी ॲनी असतीस तर किती बरे झाले असते निदान आमच्या बरोबर राहिली असतीस, पण आता तू मोठी झाली आहेस, पुढील शिक्षणासाठी तू परगावी जात आहेस; किती उंच झाली आहेस, आधुनिक मुलगी म्हणून शोभून दिसते आहेस

आणि या इव्हनिंग गाऊन मध्ये तर निराळीच कोणी मुलगी वाटत आहेस. आमच्या ॲव्हनलीची ॲनी म्हणून अजिबात ओळखू येत नाहीस---या विचाराने मला अगदीच एकटं एकटं पडल्यासारखे वाटत आहे, आणि म्हणून माझ्या डोळ्यात पाणी आले."

"मारिला!" ॲनी पटकन जाऊन मारिलाच्या मांडीवर बसली, तिचा चेहरा हातात घेतला आणि तिच्या डोळ्यात गंभीरपणे पाहत प्रेमाने म्हणाली,"

"मी खरोखरच जराही बदललेली नाही, खरंच नाही. आणि जरी मी काही कालावधीसाठी इथून बाहेर गेले तरी माझे मूळ इथेच रूजलेले आहे. मी बाह्यतः किती बदलले किंवा इथून बाहेर पडले तरी मी कायम मनाने तुमची छोटी ॲनी असणार आहे जी तुम्ही, मॅथ्यू आणि या प्रिय ग्रीन गेबल्सवर आयुष्यभर प्रेम आणि प्रेमच करत असेन."

ॲनीने आपले गाल मारिलाच्या गालावर घासले आणि मॅथ्यूंच्या खांद्याला थोपटण्यासाठी हात पुढे केला. मारिलाला जर ॲनीप्रमाणे शब्दात भावना व्यक्त करता आल्या असत्या तर ती बरेच काही बोलली असती. पण स्वभावतः आणि सवयीप्रमाणे ती काही बोलली नाही फक्त तिने हलकेच ॲनीला मिठीत घेतले आणि मनोमनी ती कधीही तिला सोडून दूर जाऊ नये, अशी इच्छा करत छातीशी कवटाळून धरले."

मॅथ्यूंचे डोळे ओलांडले आणि ते पटकन बाहेर बागेत निघून गेले. ते मनात विचार करत होते, "माझ्या माहितीप्रमाणे ती फारशी बिघडलेली नाही. अधूनमधून मधून मी केलेले कोडकौतुक तिला बिघडवण्यास कारणीभूत झाले नाही. ती हुशार आणि सुंदर आणि प्रेमळ आहे, जी इतर सर्वांपेक्षा चांगली आहे. ती एक आमच्यासाठी देवाची देणगीच आहे, खरोखरच मिसेस स्पेन्सरला चुकीचा निरोप मिळाल्याने, त्या मुला ऐवजी मुलगी घेऊन आल्या, ती चूक आमच्यासाठी वरदान

ठरली. असे काही घडत असेल यावर माझा विश्वास नाही पण आम्हाला तिची गरज आहे हे जाणवून परमेश्वराने तिला धाडले असावे, असे जाणवण्याइतपत तो योगायोग होता, त्यासाठी मी देवाचा आभारी आहे."

शेवटी ॲनीचा शार्लटटाऊन येथे जाण्याचा दिवस आला. ॲनी मॅथ्यूंबरोबर घोडागाडी तून निघाली, जाण्यापूर्वी ॲनी आणि डायना एकमेकींच्या गळयात पडून रडल्या, मारिलाने ॲनीला निरोप देताना डोळ्यात पाणी न आणण्याचा निर्धार केला होता आणि तो पूर्ण केला. जेव्हा ॲनीची गाडी बाहेर पडली तेव्हा डायनाने डोळे कोरडे केले, तिचे चुलत भाऊ कार्मोडी येथून आले होते त्यांच्या बरोबर डायना व्हाईट सँड्स येथे समुद्रकिनारी पिकनिकला गेली, आणि आपले मन रमवण्याचा प्रयत्न केला. मारिला मात्र घरातील होती नव्हती तेव्हढी सर्व कामे काढून ती दिवसभर उपसत राहिली. ॲनी दूर गेल्याचे दु:ख हृदयाला जाळत होते. रात्री मारिला झोपायला गेली तेव्हा कोपऱ्यातील खोली, आज मोकळी असणार याची जाणीव तिला दु:ख देत होती. एक तरुण मुलगी आजपासून तिथे राहणार नव्हती. ती खोली आज तिच्या वाचून पोरकी झाल्याचे दु:ख मारिलाला अनावर झाले आणि ती उशी मध्ये तोंड खुपसून ओक्साबोक्शी रडू लागली थोड्यावेळाने ती भानावर आली आणि आपण आजवर बाह्यतः ॲनी बद्दल विशेष प्रेम माया दाखवत नसलो तरी ॲनीने आपले अंत:करण आपल्या प्रेमाने जिंकून घेतले आहे याची तिला नव्याने ओळख झाली.

क्विन्स अकॅडमीची परिक्षा उत्तीर्ण झालेले ॲव्हेनलीचे सर्व विद्यार्थी एकदाचे अकॅडमीत पोहोचले. पहिला दिवस उत्साहात पार पडला. नवीन विद्यार्थ्यांची आणि प्रोफसरांची ओळख करून घेण्याचा कार्यक्रम झाला विद्यार्थी वेगवेगळया वर्गात विभागले गेले. मिस स्टेसीनी ॲनीला एका वर्षात दोन इयत्ता पूर्ण करण्याचा सल्ला दिला होता, त्याप्रमाणे ती दोन्ही इयत्तांचा अभ्यास एकाच वर्षात

पूर्ण करणार होती. गिल्बर्ट ब्लिथ पण तसेच करणार होता. याचा अर्थ शिक्षक म्हणून काम करण्याचा परवाना मिळवण्यासाठी घ्यावे लागणारे प्रशिक्षण, दोन ऐवजी एका वर्षात पूर्ण करणार होते अर्थात यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागणार होती. ॲनी आणि गिल्बर्ट वगळता इतर सर्वांनी दोन वर्षांत प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी ॲडमिशन घेतली होती.

पन्नास मुलांचा एक वर्ग होता. गिल्बर्ट वगळता वर्गातील सर्व मुले मुली ॲनीला अनोळखी होत्या. त्यामुळे ॲनीला एकटेपणाचे दु:ख जाणवू लागले. तसे पाहायला गेले तर वर्गाच्या दुसऱ्या टोकाला उंच, तपकिरी केसांचा गिल्बर्ट ब्लिथ होता पण ती त्याच्याबरोबर यापुर्वी ज्याप्रकारे वागली बोलली आहे ते आठवून त्या ओळखीचा फारसा उपयोग होणार नव्हता याची तिची तिलाच खात्री पटली होती, तर सुध्दा ते दोघे एकाच वर्गात आहेत याचा तिला आनंद झाला आहे, हे सत्य ती नाकारू शकत नव्हती. पुर्वीपासून चालत आलेली दोघांमधील स्पर्धा, चढाओढ सुरूच राहणार होती आणि ती जर नसती तर काय करावे असा ॲनीला प्रश्न पडला असता.

“त्याच्या बरोबर स्पर्धा केल्याशिवाय मला चैन पडणार नाही,” ॲनीने विचार केला. “गिल्बर्ट कमालीचा दृढनिश्चयी दिसत आहे. मला वाटते तो नक्कीच इथे सर्वप्रथम येण्याचा संकल्प करून आला असावा. पण जेन आणि रुबी म्हणतात तसा गिल्बर्ट किती देखणा आहे, खरंच या अगोदर मला हे कधी जाणवले नव्हते. बरे झाले त्या दोघी पहिल्या वर्षाच्या वर्गात आहेत नाहीतर त्यांना मी माझे गिल्बर्ट विषयी मन बदलले आहे असे वाटले असते. आता इतरांची ओळख झाली की मला तेव्हढे अवघड वाटणार नाही. इथे पण कोणी नवीन मैत्रीणी मिळतीलच. पण मी डायनाला वचन दिले आहे की काही झाले तरी मैत्रीण म्हणून तिचे स्थान अव्वलच राहिल, इतर कोणीही ते स्थान घेऊ शकणार नाहीत. ती तपकिरी डोळ्यांची,

a

लालभडक ड्रेस घातलेली मुलगी, दिसायला खूप सुंदर आहे आणि ती दुसरी गोरीपान मुलगी खिडकीतून बाहेर बघत आहे ती चांगली दिसते. तिचे केस किती छान आहेत. ती खिडकीतून बघत नसून विचारात रंगून गेलेली दिसते, बहुदा माझ्यासारखी स्वप्न पाहत असावी.

मला त्या दोघींची मैत्री करायला आवडेल.

पण मी त्यांना ओळखत नाही आणि त्या माझ्याबरोबर बोलायला उत्सुक असतीलच असे नाही. खरच खूप एकटं पडल्यासारखे वाटत आहे."

त्या संध्याकाळी ॲनीला हॉलमधील बेडरूममध्ये अजून एकटेपणाची जाणीव तीव्र झाली आणि खरोखरच ती तिथे एकटीच होती. इतर बऱ्याच मुलींची सोय त्यांच्या नातेवाईक किंवा ओळखीच्या लोकांच्या घरी झाली होती. ॲनीला सुध्दा मिस जोसेफिन बॅरींच्या इथे राहायला आवडले असते परंतु बीचवुड क्विन्स अकॅडमीपासून इतके दूर होते की तिथे राहणे सोईस्कर नव्हते; त्यामुळे मिस बॅरीनी, ॲनीसाठी बोर्डिंग हाऊस शोधले त्यामुळे मॅथ्यू आणि मारिला आश्वस्त झाले, त्याच ठिकाणी ॲनीची राहण्या जेवण्याची सर्व सोय केली होती.

एका उच्च कुलीन महिलेने ते बोर्डिंग सुरू केले होते, तिचे पती ब्रिटीश अधिकारी होते, त्यांच्या पश्र्चात त्यांनी हे बोर्डिंग सुरू केले होते. तिथे प्रवेश देण्यापुर्वी विद्यार्थ्यांची बारकाईने चौकशी करत असत, त्यांच्या बोर्डिंगमध्ये ॲनी घराइतकी सुरक्षित असेल याची खात्री मिस बॅरीनी मॅथ्यू आणि मारिलाला अगोदरच दिली होती. तिकडे राहण्या जेवण्याची सोय चांगली होती, शेजारपाजार चांगला होता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अकॅडमी पासून अगदी जवळ होते.

हे सर्व जरी खरे असले आणि तसे ते नंतरच्या काळात सिध्दही झाले पण सुरवातीच्या ॲनीच्या घरापासून दूरावल्याचे दु:ख कमी होण्यास त्याची काही मदत झाली नाही. अत्यंत निराशेने ॲनी आपली छोटी खोली पाहत होती, एक लोखंडी

लहान पलंग, रिकामी पुस्तकांचे कपाट, खोलीला दिलेला रंग पण मळकट होता. तिथे कुठेही ग्रीन गेबल्समधला प्रसन्नपणा दिसत नव्हता. ॲनीला गुदमरल्यासारखे वाटायला लागले. ग्रीन गेबल्समधील तिच्या शुभ्र पांढऱ्या रंगाच्या खोलीची, खिडकीतून बाहेर डोकावून पाहिल्यावर दिसणाऱ्या निसर्ग सौंदर्याची, मळयातील भाजीपाल्याची, चांदण्या रात्रीतल्या बागेची तिला आठवत येऊ लागली. घरा जवळून वाहणारा ओढा, रात्री वाऱ्याने हलणाऱ्या झाडांच्या फांद्या, दूरवरून डायनाच्या खिडकीतून दिसणारा प्रकाश यापैकी काही काही इथे नव्हते. इथल्या खोलीतील खिडकीबाहेर एक मोठा गजबजलेला रस्ता असणार होता, विजेच्या दिव्यांचे, टेलीफोनच्या तारांचे जाळे, रस्त्यावरील खांबावर असणार होते आणि त्या विजेच्या प्रकाशात अनेक अनोळखी चेहरे जात येत असताना दिसणार होते, हे सर्व ॲनी जाणून होती आणि त्यामुळेच ती अगदी रडकुंडीच्या घाईला आली होती आणि तिच्या डोळयातून टपटप आसवे ओघळू लागली.

तिने मनाशी विचार केला, असे रडत बसणे हा वेडेपणा आहे, हे तर कमकुवत मनाचे लक्षण आहे, मला हे थांबवलेच पाहिजे पण काय करावे, ॲनीला परत परत ॲव्हनलीचे विचार मनात येत होते आणि दु:खाला परत परत उकळी फुटत होती.

“येत्या शुक्रवारीच तर परत ॲव्हनलीला जाणार आहे, फक्त चारच तर दिवस मध्ये आहेत पण कितीतरी वर्षे असल्यासारखे वाटते. मॅथ्यू आता घराकडे निघाले असतील, मारिला त्यांची वाट पाहत गेटजवळ रेंगाळत असेल, अरे पण हे अश्रू थांबतच नाहीत, मला कशातच आनंद वाट नाही, त्यापेक्षा दु:खी असणे बरे वाटत आहे.”

परत एकदा अश्रूंचा पूर येणार होता पण जोसी पाय दिसल्यावर थांबला, यात शंकाच नाही. ओळखीचा चेहरा पाहून आनंदात ॲनी विसरली की त्या

a

दोघींमध्ये फारसे सख्य नाही तरीही ॲव्हनलीचा एक भाग म्हणून ॲनीने तिचे स्वागत केले.

"तू वर आलीस यांचा मला फार आनंद झाला," ॲनी मनापासून म्हणाली.

"तू तर रडत आहेस" जोसी तिची कीव करत म्हणाली." तुला बहुतेक घरची ओढ लागली असणार, काही काही लोक याबाबत खूपच हळवे असतात. मला मात्र घर सोडून आल्याचे विशेष दु:ख वाटत नाही. मला तर त्या जून्या पुराण्या ॲव्हनली गावाच्या संथ जीवनाचा कंटाळा आला होता, एव्हढेच नव्हे तर आता मला वाटते मी इतकी वर्षे तिथे कशी काय राहू शकले. शार्लटटाऊन खूप सुंदर आणि जिवंत शहर आहे. ॲनी तू रडू मात्र नकोस, तू रडलीस की तुझे नाक, डोळे लाल होतात आणि मग संपूर्ण चेहरा लालबुंद होतो. मी आजच्या अकॅडमीमध्ये खूप छान वेळ घालवला. आमचे फ्रेंच शिकवणारे प्राध्यापक बदकासारखे दिसतात. ॲनी तुझ्याकडे काही खाऊ आहे काय? मला खूप भूक लागली आहे. माझी खात्री आहे मारिलाने तुझ्यासोबत भरपूर केक वगैरे खाऊ दिला असणार म्हणूनच मी इकडे आले. नाहीतर मी फ्रँक स्टॉकलीसोबत पार्कमध्ये जाणार होते. तो मला विचारत होता की ती लाल केस असलेली मुलगी कोण आहे म्हणून. मी सांगितले, तू अनाथ असून कथबर्टनी तुला दत्तक घेतले आहे. तुझ्या पूर्वायुष्याबद्दल कोणालाही फारसे माहिती नाही."

असंवेदनशील आणि भावनाशून्य स्वभावाच्या, जोसी बरोबर बोलण्यापेक्षा एकटेपणात रडून का होईना मनावरचा भार थोडा कमी झाला असता असा ॲनीच्या मनात विचार आला. तितक्यात जेन आणि रुबी पण तिथे आल्या. लाल आणि जांभळया रंगाची क्विन्स कॉलेजची फित त्यांच्या कोटाला लावली होती. जोसी, जेन बरोबर बोलत नसल्याने, तिने जास्त बोलायचे टाळले आणि पर्यायाने ॲनीचा त्रास थोडा कमी झाला.

a

“आज सकाळपासून आतापर्यंत मला तास नाही तर कित्येक दिवस गेले आहेत असे वाटायला लागले आहे आणि लगेच मला व्हर्जिलच्या अभ्यासाला बसायचे आहे. आम्हाला उद्यासाठी अभ्यासाची बरीच तयारी करायची आहे अगदी रात्री सुध्दा जागरण करायला लागेल. ॲनी, तू पण रडत होतीस की काय? पण ते खरे असेल तर मला थोडे सांत्वन मिळेल. मी सुध्दा रुबी माझ्याकडे येण्यापूर्वी रडत बसले होते. म्हणून आम्ही तुझ्याकडे आलो. काही खायला मिळेल काय? तुझ्याकडे मारिलाने दिलेला केक नक्कीच असणार, त्यामध्ये खरी ॲव्हनलीची चव असणार,” जेन उसासा टाकत म्हणाली.

टेबलावर क्विन्स अकॅडमीचे माहिती पत्रक पडलेले होते, ते रुबी चाळायला लागली. तिने ॲनीला विचारले, “ॲनी तू सुवर्ण पदकासाठी प्रयत्न करणार आहेस की काय?"

ॲनीने शक्य तितका प्रयत्न करून पाहायला हरकत नाही, असा विचार करत असल्याचे सांगितले.

ते ऐकून जोसी म्हणाली, “त्याशिवाय क्वीन्स मध्ये एव्हरी शिष्यवृत्ती सुरू होणार आहे. आजच तसा प्रस्ताव मंजूर झाला. फ्रँक स्टॉकलीने मला सांगितले - त्याचे काका गव्हर्निंग मंडळातील एक आहेत. उद्या अकादमीमध्ये त्याची घोषणा केली जाईल.”

एव्हरी शिष्यवृत्ती! ॲनचे हृदय, अधिक वेगाने धडधडू लागले आणि तिच्या महत्त्वाकांक्षेची क्षितिजे जादू झाल्यासारखी अजून विस्तृत झाली. जोसीने बातमी सांगण्यापूर्वी ॲनला महत्वाकांक्षेचे सर्वोच्च शिखर म्हणजे शिक्षकाचा प्रांतीय परवाना, वर्षाच्या शेवटी प्रथम श्रेणी, आणि कदाचित पदक! एव्हढे गाठायचे होते. पण आता एका क्षणात ॲनीने स्वतःला एव्हरी शिष्यवृत्ती जिंकताना, रेडमंड कॉलेजमध्ये कला अभ्यासक्रम घेतांना आणि काळा गाउन आणि काळी टोपी घालून

a

पदवी मिळवताना पाहिले, हे सर्व ॲनीच्या डोळयापुढे साकार झाले अगदी जोसीचे बोलणे संपता क्षणीच. कारण एव्हरी शिष्यवृत्ती इंग्रजी विषयासाठी होती आणि ॲनीला वाटले की इथे तिची पावले योग्य मार्गावर आहेत.

न्यू ब्रन्सविकच्या एका श्रीमंत उद्योगपतीने आपल्या संपत्तीचा बराच मोठा हिस्सा, मेरीटाइम प्रांतातील वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांना, मोठ्या संख्येने शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी दान केला होता, त्यातील काही भाग क्विन्स अकॅडमीला मिळणार की नाही याविषयी थोडा संदेह निर्माण झाला होता.

परंतु शेवटी प्रकरण मिटले आणि वर्षाच्या शेवटी इंग्रजी विषय आणि इंग्रजी साहित्यात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांला, रेडमंड कॉलेजमध्ये पदवी घेण्यासाठी दरवर्षी अडीचशे डॉलर्स, शिष्यवृत्ती मिळणार होती. ॲनीच्या मनाला गुदगुल्या झाल्या, शिष्यवृत्ती मिळवल्याचे स्वप्न पाहात ॲनी झोपायला गेली यात काहीच आश्चर्य नव्हते.

“कठोर परिश्रम केल्यास ही शिष्यवृत्ती मिळवणे शक्य आहे,” ॲनीने संकल्प केला. “मी बीए झाले तर मॅथ्यूना खूप अभिमान वाटेल. अशी महत्वाकांक्षा एक आनंददायी भावना आहे आणि ती पार पाडण्यात मी सफल होईन यात शंकाच नाही. यानंतर ही अजून नवनवीन ध्येय मार्ग खुणावू लागतील आणि ते पार करण्यासाठी कठोर परिश्रमांस पर्याय नाही,” ॲनीचा विचार पक्का झाला होता.

a

# प्रकरण 35

ॲनीला घरापासून दुरावल्याचे दु:ख जाणवत होते पण दर शनिवार रविवार घरी जाण्याने ते बरेच कमी कमी होत गेले. जोपर्यंत हवामान स्वच्छ कोरडे होते तो पर्यंत ॲव्हनलीमधील सर्वच विद्यार्थी, शुक्रवारी रात्री नव्याने सुरू झालेल्या रेल्वेतून कार्मोडीला येत, तिथून ॲव्हनली फार दूर नव्हती. त्यांना भेटायला त्यांचे ॲव्हनलीमधील शाळा सोबती जमत असत. आठवड्यातून तेव्हढाच काय तो विसावा मिळत असे. बाकी इतर वेळी एका वर्षात दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करताना ॲनीची दमछाक उडत असे शिवाय शिष्यवृत्ती आणि मेडल मिळवण्याची जिद्द थोडा वेळ देखील अभ्यासाकडे दुर्लक्ष करु देत नसे.

गिल्बर्ट ब्लीथ आणि रुबी गिलिस नेहमीच एकत्र दिसत. तशी रुबी देखणी तर होतीच, गोरा रंग, निळे डोळे, आकर्षक बांधा शिवाय तिकडे गेल्यावर फॅशनेबल स्कर्ट घालायला लागली होती. ती खूप हसरी आणि आनंदी तरूण मुलगी होती जीवनातील आनंद मनमोकळेपणाने आनंद लुटत होती.

“हल्ली गिल्बर्ट बऱ्याच वेळा रुबी बरोबर दिसतो पण मला ती गिल्बर्टला खरोखरच आवडत असेल असे वाटत नाही,” जेन, ॲनीच्या कानात कुजबुजली. ॲनीने पण तसा विचार केला नव्हता.

a

एव्हरी शिष्यवृत्तीसाठी गिल्बर्टसारख्या मित्रांबरोबर मिळून अभ्यासाची चर्चा करावी, पुस्तकांची, विचारांची देवाणघेवाण, शंका समाधान करणे खेळीमेळीच्या वातावरणात झाले असते, असा विचार तिच्या मनात आल्यावाचून राहिला नाही. गिल्बर्टला एव्हरी शिष्यवृत्ती मिळवण्याची महत्त्वाकांक्षा होती हे ॲनी जाणून होती पण रुबीच्या गिलीस एकत्र अभ्यास करण्यायोग्य व्यक्ती नक्कीच नव्हती.

गिल्बर्ट बद्दल ॲनीच्या मनात काही अवाजवी भावना नव्हत्या. तिच्या मनात मुलांविषयी फक्त मित्रत्वाची भावना होती. जरी तिची आणि गिल्बर्टची मैत्री असती तरी त्याला इतर किती मित्र मैत्रिणी आहेत, तो कुणा बरोबर फिरतो याची तिला फिकीर केली नसती. तशा तिच्या भरपूर मैत्रीणी होत्या, जरी तिची गिल्बर्टची मैत्री असतीच तरी तिने त्याच्या इतर मित्र मैत्रिणींची फारशी दखल घेतली नसती. मुलांच्या बरोबर मैत्रीच्या संदर्भात ॲनीचा विचार असा होता की विचारांचे आदानप्रदान झाले की तुलनात्मक दृष्टीने योग्य निर्णय घेण्यात मदत होऊ शकते पण अगदी ठामपणे ती काही म्हणाली नाही. पण तिला मनातून असे वाटत होते की एखाद्या शुक्रवारी ट्रेन मधून घरी परततांना जर ती आणि गिल्बर्ट एकत्रपणे घरी निघाले तर पुढील शिक्षण, नोकरी संदर्भातील उपलब्ध संधी आणि येऊ शकणाऱ्या अडचणींचा आढावा घेता आला असता. खेळीमेळीच्या चर्चेतून बरीच माहिती मिळाली असती आणि वेळही आनंदात गेला असता. अभ्यास बद्दल, पुस्तकांबद्दल, आयुष्यात पुढे काय साध्य करायचे आहे त्याविषयी एकमेकांचे विचार जाणून घेता आले असते. गिल्बर्ट एक हुषार विद्यार्थी होता. त्यांचे स्वतःचे विचार स्पष्ट होते. ॲनीला पूर्ण कल्पना होती रुबी गिलिसला अशाप्रकारच्या विषयात काडीमात्र रस नव्हता. रुबीने स्पष्टपणे जेनला सांगितले की गिल्बर्टने सांगितलेल्या अर्ध्याहून अधिक गोष्टी तिला समजल्या नाहीत. त्यांचे बोलणे ॲनीच्या बोलण्यासारखे असते,

a

ती जशी विचारपूर्वक गंभीरपणे पुस्तकांच्या संदर्भात बोलत असते तसेच तो बोलतो मग समोरच्या व्यक्तीला त्यामध्ये इंटरेस्ट असो वा नसो. त्याच्यापेक्षा फ्रँक स्टॉकली खूप चपळ आणि उत्साही आहे पण दिसायला गिल्बर्ट एव्हढा आकर्षक नाही, त्या दोघांपैकी कोण सरस आहे हे ठरवणे कठीण आहे.

ॲनीने अकॅडमीमध्ये तिच्याप्रमाणे. विचारशील, कल्पक आणि महत्वाकांक्षी मुलींचा एक गट तयार केला. तपकिरी डोळयांची, लाल रंगाचे कपडे आवडणारी खूप सुंदर मुलगी स्टेला मेनार्ड आणि स्वप्नाळू मुलगी प्रिस्किला ग्रँट या तिच्या घनिष्ट मैत्रीणी बनल्या. स्वप्नाळू दिसणारी अबोल मुलगी प्रिस्किला नंतर खूप मिश्किल आणि खोडकर असल्याचे दिसले या उलट तपकिरी डोळयांची स्टेला, ॲनीप्रमाणे इंद्रधनुष्यांसारख्या सुंदर, हळव्या स्वप्नात आणि आपल्याच कल्पनाविश्वात रममाण होत असे.

ख्रिसमसच्या सुट्टीनंतर मात्र अकॅडमीमधील ॲव्हनलीच्या मुलांनी दर शुक्रवार घरी जाण्याचे थांबवले आणि सर्वजण गंभीरपणे अभ्यासाला लागले. सर्वप्रथम येण्याच्या मानाचे पदक मिळवण्यासाठी फक्त तीन संभाव्य उमेदवार उरले होते ते उमेदवार म्हणजे: गिल्बर्ट ब्लीथ, ॲन शर्ली आणि लुईस विल्सन. सर्वांनीच हे जवळजवळ मान्य केले होते. एव्हरी शिष्यवृत्तीसाठी सहा जण प्रबळ दावेदार मानले जात होते. गणिताचे पदक निर्विवादपणे एका गावाकडच्या एका मुलानेच पटकावले असते.

रुबी गिलिस आणि स्टेला मेनार्ड पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या सौंदर्यवती ठरल्या. साध्या सरळ जेन ॲड्रूयुजने गृहविज्ञान विषयात सन्मान प्राप्त केला. जोसी पाय सर्वात तिखट बोलणारी मुलगी ठरली. मिस स्टेसीच्या सर्व विद्यार्थ्यांनी कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला असे म्हणायला हरकत नव्हती.

a

अॅनी अगदी झपाटून अभ्यासाला लागली होती. गिल्बर्ट बरोबरची स्पर्धा पूर्वीसारखी तीव्र होती पण वर्गातील इतर विद्यार्थ्यांना त्याची फारशी माहित नव्हती. अॅनीला पण त्याला शत्रू समजण्याऐवजी एक तुल्यबळ प्रतिस्पर्धी समजत होती त्यामुळे कटुता काहीशी कमी झाली होती. तिच्या दृष्टीने जिंकणे महत्त्वाचे होतेच पण पूर्वी प्रमाणे तसे झाले नाही तर जगणेच असह्य होईल असे मात्र आता वाटत नव्हते.

अभ्यासातून जेव्हा वेळ मिळेल तेव्हा अॅनी बीचवुड येथे मिस बॅरींच्या घरी जात असे. साधारणपणे दर रविवारी त्यांच्या बरोबर चर्चा जात असे आणि जेवण वगैरे पण तिकडेच करत असे. मिस बॅरी आता वयोमानाप्रमाणे वृध्द होत चालल्या होता पण त्यांची नजर तीक्ष्ण आणि जीभ तिखट होती पण त्यांचा अॅनीवरचा लोभ कायमच राहिला. त्यांची आवडती व्यक्ती म्हणून तिचे स्थान अबाधित राहिले.

“अॅनी सतत जास्तीत जास्त चांगले बनण्याचा प्रयत्न करत असते, अॅनीमध्ये इंद्रधनुष्यासारख्या अनेक छटा आहेत आणि प्रत्येक छटेत ती सुंदर असते. लहानपणापासून ती अशीच आहे की नाही, हे मला माहीत नाही पण तिने मला तिच्यावर प्रेम करायला लावले आहे, मला अशीच माणसे आवडतात, जी मला त्यांच्यावर प्रेम करायला शिकवतात,” मिस बॅरीनी आपले मन स्वतःशी उघड केले होते.

वसंत ऋतूचे आगमन झाले, अॅव्हनलीमध्ये ओसाड माळरानावर जिथे अजून थोडे थोडे बर्फ साचलेले होते त्यामधून गुलाबी मे फ्लाॅवर डोकावून पाहायला लागली होती. जंगल दऱ्यांचा पांढरा रंग पालटून आता हिरवट पिवळा रंग दिसायला लागला होता. परंतु शार्लोटटाऊनमधील क्वीन्स अकॅडमीचे विद्यार्थी अभ्यासाच्या ओझ्याने अगदी दबून गेले होते. उठता, बसता, झोपता, जागता त्यांच्या डोक्यात फक्त परिक्षेचे विचार असे आणि बोलण्यात परिक्षेच्या विषयांशिवाय अन्य कुठल्याही विषय नसे.

a

"शैक्षणिक सत्र संपून परिक्षा अगदी तोंडावर आली आहे," ॲनी म्हणाली."मागच्या वर्षी याचवेळी वर्षं किती मोठे आहे असे वाटले होते पण संपूर्ण हिंवाळा अभ्यासात गेला आणि पुढच्या आठवड्यात परिक्षा आली सुद्धा. काही वेळा परिक्षा म्हणजेच सर्व काही असे वाटते पण चेस्टनटच्या झाडावरच्या टपोऱ्या कळया आणि स्वच्छ निळे आकाश पाहताना परिक्षेचा विचार बाजूला पडतो."

यावर जेन, रुबी किंवा जोसी यांनी काहीच मत व्यक्त केले नाही. त्यांच्यासाठी येणाऱ्या परीक्षा या खरोखरच खूप महत्त्वाच्या होत्या - चेस्टनट कळया किंवा निळया आकाशापेक्षा कितीतरी जास्त महत्त्वाच्या होत्या. ॲनीला उत्तीर्ण होण्याची खात्री होती त्यामुळे तिला परिक्षेचे तेव्हढे दडपण नव्हते जेव्हढे इतर मुलींना वाटतं होते त्यांचे संपूर्ण भवितव्य पणाला लागले होते त्यांना ॲनीसारखा परिक्षेचा विचार बाजूला ठेवून निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेणे शक्य नव्हते.

"गेल्या आठवड्यात माझे वजन सात पौंड कमी झाले," जेन उसासा टाकत म्हणाली. "काळजी करायची नाही असे म्हटल्यावर काळजी मिटत नाही उलट काळजी मुळे थोडा जास्त अभ्यास तरी हातून होतो. मला तर संपूर्ण कडाक्याच्या थंडीत क्विन्स अकॅडमीमध्ये राहून आणि शिक्षणावर आणि इतर एव्हढा खर्च करून जर शिक्षक बनण्यासाठीचा परवाना मिळाला नाही तर अतिशय दु:ख होईल."

"मला काही फरक पडणार नाही," जोसी पाय म्हणाली. "या वर्षी मी पास झाले नाही तर मी पुढच्या वर्षी परत येईन. माझे वडील मला पाठवू शकतात. ॲन, फ्रँक स्टॉकली म्हणत होता की प्रोफेसर ट्रेमेन म्हणाले की गिल्बर्ट ब्लीथला पदक मिळेल आणि एमिली क्ले कदाचित एव्हरी शिष्यवृत्ती जिंकेल."

"तसे झाले तर मला त्याबद्दल उद्या वाईट वाटेल ही पण आता याक्षणी मला प्रामाणिकपणे वाटते की, जोपर्यंत ग्रीन गेबल्सच्या खालच्या उतारावरील व्हायोलेटस् फुलत आहेत, स्वप्न रस्त्यावरचे फर्न वाऱ्यावर डोलत आहेत, तो पर्यंत

मला एव्हरी शिष्यवृत्ती मिळाली की नाही याने फारसा फरक पडत नाही. मी माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न केला आहे. मला आता संघर्षाचा करण्यातील आनंद मला समजला आहे. प्रयत्न करून विजय मिळाला तर चांगलेच आहे पण प्रयत्न करून अपयश पदरी पडले तरी प्रयत्न केल्याचे महत्व कमी समजण्याचे काहीच कारण नाही. तेव्हा आता परिक्षेबद्दल बोलण्यापेक्षा समोरच्या घरावरील दिसणार निळसर आकाश पहा आणि ॲव्हनलीच्या किनाऱ्यावरील जंगलात दिसणाऱ्या आकाशाची तुलनेत कोणते जास्त सुंदर आहे याचा विचार करा.”

“तू परिक्षेच्या दिवशी कोणता ड्रेस घालणार आहेस?” रुबीने व्यावहारिकपणे विचारले.

त्यानंतर जोसी,जेन आणि रुबी यांची त्या बद्दल चर्चा सुरू झाली. पण ॲनी मात्र खिडकीच्या चौकटीवर हाताचे कोपर टेकवून, स्वप्नाळू डोळयांनी बाहेरच्या आकाशाकडे पाहत भविष्यातील सोनेरी स्वप्ने आशेच्या धाग्यांनी विणत होती. येणाऱ्या आगामी वर्षांत येऊ घातलेल्या कल्पनेच्या कक्षेच्या पलिकडे जाऊन, येणाऱ्या आगामी वर्षातील शक्यतांचा आढावा घेताना प्रत्येक वर्षी एक नवी संधी तिला खुणावत होती.

# प्रकरण 36

त्या दिवशी सकाळी ॲनी आणि जेन क्विन्स अकॅडमीच्या प्रांगणातून नोटीस बोर्ड कडे निघाल्या होत्या, आज शिक्षक प्राप्तता परिक्षेच्या निकाल जाहीर होणार होता. जेन हसतमुख आणि आनंदी दिसत होती. पेपर्स झाल्यावर तिला नक्की पास होणार याची खात्री झाली होती. तिच्या काही जास्तीच्या अपेक्षा नव्हत्या त्यामुळे जास्त विचार करण्याचे कारणच नव्हते. या जगात कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही त्यासाठी योग्य किंमत मोजावी लागते, मोठी महत्वाकांक्षा बाळगणे ही एक चांगली गोष्ट आहे पण ती पूर्ण करण्यासाठी मेहनत तर करावी लागतेच शिवाय स्वार्थत्याग, अस्वस्थता आणि नाउमेद यांच्याशी सामना करावा लागतो. ॲनी थोडीशी धास्तावलेली वाटत होती पण तशी ती शांत होती. कुणी पदक जिंकले आणि कुणी एव्हरी शिष्यवृत्ती, याचा निकाल घोषित होण्यासाठी दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागेल असे वाटत नव्हते.

“ॲनी या दोन्ही पैकी तू एक तरी गोष्ट नक्कीच जिंकशील,” जेन म्हणाली. जोसीच्या म्हणण्यानुसार प्राध्यापकांचे मत अगदीच वेगळे होते याचे जेनला सखेद आश्चर्य वाटत होते.

"

a

"मला एव्हरी मिळण्याची कोणतीही आशा नाही," ॲनी म्हणाली. "प्रत्येकाला मिस एमिली क्ले जिंकेल असे वाटत आहे. जेन, मी नोटीस बोर्डच्या जवळपास देखील जाणार नाही सर्वांसमोर निकाल पाहण्याचे धैर्य माझ्याकडे नाही. मी आपली सरळ लेडीज रूममध्ये जाते, तू निकाल बघ आणि मला येऊन सांग. आपल्या मैत्रीखातर शक्य तेव्हढ्यात लौकर बघून सांग. जर मी पात्र झाले नसेल तर स्पष्टपणे सांगेन आणि सहानुभूती आणि माझी समजूत काढण्याचा प्रयत्न करणार नाही असे मला वचन दे."

जेनीने वचन दिले पण घडले त्यावरून तसे वचन देण्याची गरज नव्हती हे सिद्ध झाले. जेव्हा त्या अकॅडमीच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांपाशी गेल्या तेव्हा हॉल खचाखच भरलेला होता आणि मुले गिल्बर्ट ब्लिथला खांद्यावर उचलून धरून त्यांने मेडल जिंकले म्हणून जयजयकार करत होते.

क्षणभर ॲनला पराभवाची आणि निराशेची एक भयानक वेदना जाणवली. एकूण काय तर ती हरली होती आणि गिल्बर्ट जिंकला होता! मॅथ्यूना वाईट वाटेल - ती जिंकेल याची त्यांना खात्री होती. आणि तेवढ्यात कोणीतरी ओरडले, "एव्हरी विजेत्या, मिस शर्लीसाठी थ्री चिअर्स!"

"ओह, ॲनी,"जेनने श्वास सोडला,"ओ! ॲनी, मला खूप अभिमान आहे! खूप छान झाले आहे नाही का?" आणि त्या पळत पळत लेडीज रुम कडे गेल्या. सगळ्या मुली त्यांच्या भोवती जमा झाल्या होत्या. सर्वजणी तिचे अभिनंदन करत होत्या. हसतमुखाने अभिनंदन स्विकारत होती. कुणी खांद्यावर हात ठेवला तर कुणी जोरजोराने हलवले, कुणी हस्तोलंदन केले तर कुणी मिठी मारली. या सर्वांमध्ये ॲनी जेनीच्या कानात कुजबुजत म्हणाली, "मॅथ्यू आणि मारिला खूपच खूश होतील, मला लगेच घरी बातमी कळवायला हवी."

a

अकॅडमीच्या मोठ्या सभागृहात शैक्षणिक प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित केला गेला. मोठमोठ्या नामवंत व्यक्तींची भाषणे झाली. सन्माननीय पाहुण्याच्या हस्ते बक्षिसे आणि पदके दिली गेली. विजेत्या विद्यार्थ्यांनी आपापले मनोगत व्यक्त केले.

व्यासपीठावर उपस्थित असलेल्या ॲनीचे सर्व लक्ष प्रेक्षकांत बसलेल्या मॅथ्यू आणि मारिला यांच्याकडे लागून राहिले होते. फिकट हिरव्या गाऊन मधील, लकाकणाऱ्या डोळ्यांची, गोऱ्यापान उंच ॲनी, एव्हरी शिष्यवृत्ती विजेती म्हणून घोषित झाली. तिने अतिशय उत्कृष्ट प्रकारे आपले मनोगत व्यक्त केले ते ऐकून मॅथ्यूनी मारिलाला विचारले, “आपण तिला आपल्याकडे ठेवून घेतल्याबद्दल तुला आता आनंद वाटत असेल.”

“मला आनंद होण्याची ही पहिलीच वेळ नाही,” मारिलाने उत्तर दिले. “मॅथ्यू कथबर्ट, या गोष्टीची तुला चांगलीच कल्पना आहे.”

मिस बॅरी, त्यांच्या मागे बसली होती, ती पुढे झुकली आणि छत्रीने मारिलाच्या पाठीला ढोसून म्हणाली, “तुला ॲनीचा अभिमान वाटत असेल नाही का? मला सुध्दा तिचा अभिमान वाटतो आणि तुम्ही बहिण भावांनी तिचे उत्तमप्रकारे संगोपन केले याची दाद द्यावीशी वाटते.”

ॲन त्या संध्याकाळी मॅथ्यू आणि मारिला सोबत ॲव्हनलीला गेली. गेल्या चार पाच महिन्यांत ती घरी गेली नव्हती, अजून एकही दिवस शार्लटटाऊन मध्ये राहण्याची तिची तयारी नव्हती. सफरचंदाची झाडे मोहरली होती, सर्व ॲव्हनली गाव ताजेतवाने आणि रसरशीत दिसत होते. तिला भेटायला डायना ग्रीन गेबल्समध्ये आली होती. तिच्या खोलीतील खिडकीजवळ मारियाने बागेतील गुलाबाच्या फुलांचा गुच्छ ठेवला होता. ॲनीने त्याकडे पाहून समाधानाने एक दीर्घ श्वास घेतला.

a

"ओह! डायना! घरी परत आल्यावर इतके भारी वाटत आहे की शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. फरचे कोन नुकतेच धरायला लागले आहेत. स्नो क्वीनला बघून खूप सुंदर वाटते. पुदिन्याचा वासाने प्रसन्न वाटते आणि पिवळट लालसर छटा असणारे सुवासिक गुलाब किती सुंदर दिसत आहेत. हे सारे एखाद्या सुंदर गाण्यासारखे वाटते ज्यात हा सारा परिसर कायम असाच राहावा अशी आशा आहे आणि कृतज्ञता भाव दर्शवणारी प्रार्थना पण आहे. डायना, तुला भेटून खूप म्हणजे खूपच आनंद झाला."

"मला वाटते आता तुला माझ्यापेक्षा स्टेला मेनार्ड जास्त आवडत असावी, जोसी पायने मला सांगितले तुझी आणि तिची घट्ट मैत्री झाली आहे," डायना थोड्या कडवटपणे म्हणाली.

ॲनी हसली आणि हातातील जून लिलीच्या गुच्छ तिच्यावर फेकत म्हणाली, "स्टेला मेनार्ड ही सर्वात चांगली मुलगी तर आहेच, पण तुझा नंबर तिच्या अगोदर आहे. मी तुझ्यावर पूर्वीपेक्षा जास्त प्रेम करते, मला तुला खूप गोष्टी सांगायच्या आहेत पण आता तुझ्याशी बोलण्यापेक्षा फक्त तुला बघत बसावे असे वाटत आहे. मी खूप दमले आहे. मला अभ्यासू आणि महत्वाकांक्षी असण्याचा देखील कंटाळा आला आहे. उद्या मी बागेतील गवतावर दोन तास काहीही विचार न करता नुसती पडून राहणार आहे."

"ॲनी, तू छान केलेस, तुला एव्हरी शिष्यवृत्ती मिळाली आहे आता तुला शाळेत शिकवणार नाहीस?"

"नाही, मी सप्टेंबरमध्ये रेडमंडला जात आहे. किती छान वाटत आहे, नाही का? आता तीन महिने सुट्टी आणि नंतर आणखी एक नवीन संधी आणि त्या संधीचे सोने करण्याची महत्त्वाकांक्षा, मला अगदी भारावून गेल्यासारखे वाटत आहे. रुबी

a

आणि जेन शिकवण्यास सुरवात करणार आहेत. आम्ही ॲव्हनलीच्या शाळेतील सर्व विद्यार्थी चांगल्याप्रकारे उत्तीर्ण झालो ही अभिमानाची गोष्ट आहे.''

''न्यूब्रिज ट्रस्टींनी जेनला त्यांची शाळा आधीच देऊ केली आहे,''डायना म्हणाली. ''गिल्बर्ट ब्लीथ पण शाळेत शिकवणार आहे. त्याच्या वडिलांना पुढच्या वर्षी त्याला कॉलेजमध्ये पाठवण परवडत नाही, म्हणून त्याला स्वतःच्या कमवायचं आहे. मिस एम्सने सोडण्याचा निर्णय घेतल्यास त्याला ॲव्हनलीची शाळा मिळेल अशी मला अपेक्षा आहे.''

हे मात्र ऐकल्यावर ॲनीला एकदम आश्चर्य वाटले. गिल्बर्ट रेडमंड कॉलेजमध्ये जाईल अशी तिला अपेक्षा होती त्याऐवजी तो सध्या शिक्षकी पेशा स्विकारणार आहे हे समजल्यावर ती निराश झाली. त्यांच्यासारख्या प्रेरणादायी प्रतिस्पर्ध्याशिवाय तिला कॉलेजमध्ये एकाकी वाटले असते. तिला वाटले की कॉलेजमधून पदवी मिळवली तरी तिचे ज्याच्याशी बाह्यतः शत्रुत्व असूनही मनातून मित्रत्वाचे नाते असलेला गिल्बर्ट ब्लिथ तिथे नसेल तर तिला विशेष प्राविण्यासह पदवी मिळाली तरी त्याचे महत्त्व वाटले नसते.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्त्याच्या वेळी अचानक ॲनीला असे वाटले की मॅथ्यूची तब्बेत बरी नसावी. मागच्या वर्षी पेक्षा ते नक्कीच थकल्यासारखे दिसत होते.

''मारिला,'' ते बाहेर गेल्यावर ॲनीने चाचरत विचारले, ''मॅथ्यूंची तब्बेत बरी आहे ना?''

''नाही, त्याला बरे वाटत नाही,'' मारिला काळजीच्या स्वरात म्हणाली. ''गेल्या काही महिन्यांपासून त्याच्या छातीत दुखत आहे. पण तरी तो स्वस्थ बसून विश्रांती घेण्याचे मनावर घेत नाही. मला त्याच्या तब्बेतीची काळजी वाटून राहिली आहे. पण गेले काही दिवस थोडे बरे आहे, आम्हाला एक चांगला कामगार मिळाला

आहे त्यामुळे त्याच्यावरचा कामाचा भार थोडा हलका झाला आहे म्हणून मला आशा वाटते की त्याला थोडी विश्रांती मिळेल. आणि आता तुला पण सुट्टी आहे तू सांगितलेले तो नक्कीच ऐकेल."

ॲनी टेबलावर पुढे झुकली आणि मारिलाचा चेहरा हातात घेऊन म्हणाली, "तुम्ही पण मला थकल्यासारख्या वाटत आहात. तुमच्यावर कामाचा बोजा वाढलेला दिसतो आहे. आता मी घरी आले आहे तेव्हा तुम्ही विश्रांती घ्यावी. फक्त उद्याचा एक दिवस मी जून्या सगळया आमच्या फिरण्याच्या ठिकाणांना एकदा भेट देऊन येणार आणि मग मी कामाला लागेन मग तुम्ही फक्त विश्रांती घेण्याचे काम तुम्ही करा."

मारिला तिच्या मुलीकडे प्रेमाने हसली.

"मला काही कामामुळे थकवा आलेला नाही त्याला कारणीभूत माझी डोकेदुखी आहे. अलीकडे मला डोकेदुखी असह्य झाली आहे. डॉक्टर स्पेन्सरनी चष्मा बदलून पाहिला पण फारसा उपयोग झाला नाही. जूनच्या शेवटच्या आठवड्यात एक प्रतिष्ठित नेत्रतज्ज्ञ इकडे येणार आहेत आणि डॉक्टर म्हणतात की मला त्याला भेटायलाच हवे. आता मला वाचताना शिवणकाम करताना पूर्वीप्रमाणे जमत नाही. ॲनी तू मात्र कौतुकास्पद कामगिरी करून दाखवली आहेस. दोन वर्षांचे शिक्षण एका वर्षात पूर्ण करून आणखी एव्हरी स्कॉलरशिप मिळवली आहेस. रेचेल म्हणत होती की मुलींना कॉलेजच्या शिक्षणाची गरज नाही. मला काही ते पटले नाही. पण एक गोष्ट तुला विचारायची होती ती म्हणजे अलीकडे आपल्या बॅंकेविषयी तुझ्या कानावर काही आले होते काय?"

"बॅंकेची परिस्थिती काहीशी डळमळीत असल्याचे कानावर पडले होते."

"रेचेल पण तसेच काहीसे बोलत होती. मॅथ्यूला त्याचीच खरी काळजी लागली आहे. आमची जी काही बचत आहे ती या बॅंकेत ठेवली आहे. मिस्टर ॲबे

a

आणि आमच्या वडिलांचे घनिष्ठ संबंध होते ते नेहमीच त्यांच्या बॅंकेशी व्यवहार करत त्यामुळे मॅथ्यूने त्यांच्यावरच्या विश्र्वासाने वडिल गेल्यावर देखील व्यवहार सुरू ठेवला.

“आता असे वाटते की गेली काही वर्षे ते बॅंकेचे फक्त नामधारी प्रमुख राहिले असावेत, बाकी सर्व कारभार त्यांच्या पुतण्यांच्या हाती आहे. मिसेस रेचेलने सांगितल्यावर मी मॅथ्यूला बॅंकेतील पैसे ताबडतोब काढायला सांगितले त्यावर मॅथ्यूने विचार करतो असे सांगितले. काल मिस्टर रसेल यांनी बॅंकेचे सर्व ठिकठाक असल्याचे सांगितले आहे.”

दुसरे दिवशी ॲनीनी ठरविल्याप्रमाणे दिवसभर बाहेर होती. तो दिवस कायम स्मरणात राहील इतके वातावरण स्वच्छ आणि कोरडे होते. तेजस्वी सूर्य प्रकाश पडला होता. ॲनीने बराच वेळ बागेत रमली होती. नंतर ओढ्यावरचा धबधब्यावर, जंगलातील त्यांच्या पुर्वीच्या खेळण्याच्या जागी आणि व्हायलेट व्हॅली येथे गेली. नंतर मिसेस ॲलनच्या बोलावण्यावरून त्यांच्या घरी गेली, त्यांच्याबरोबर बऱ्याच गोष्टींवर चर्चा केली. आणि शेवटी संध्याकाळी ती स्वप्न रस्त्याच्या मागच्या बाजूच्या कुरणात, ती मॅथ्यूसोबत गायींसाठी गेली. सूर्य अस्ताला गेला, तरी जंगलात आणि पश्चिमेकडील टेकडीच्या दरीमध्ये त्याचा लालसर सोनेरी प्रकाश पसरला होता. मॅथ्यू खाली मान करून वाकून चालले होते तर ॲनी, मान आणखी ताठ ठेवून जवळजवळ उड्या मारत हुंदाडत होती.

“मॅथ्यू, आज तुम्ही खूप काम करत होतात, तुम्ही एवढी श्रमाची कामे करत जाऊ नका,” ॲनीने बजावले.

“ठिक आहे, पण मला तसे वाटत नाही,” मॅथ्यू गायींसाठी दरवाजा उघडत म्हणाले. “मी दिवसेंदिवस म्हातारा होत चाललो आहे, हेच मला विसरायला होते. मी नेहमीच भरपूर काम केले आहे आणि आता मला त्याची सवय झाली आहे.”

a

“मी मुलगा असायला हवी होते. मी तुमच्या खूप मदतीला आली असते. मी कितीतरी बाबतीत तुमचे ओझे कमी करू शकले असते त्यासाठी मला मनापासून पासून वाटते की मी मुलगा असायला पाहिजे होते,” ॲनी मनापासून बोलत होती.

“एकटी तू डझनभर मुलांपेक्षा जास्त भारी आहेस. तू फक्त स्वतःची काळजी घे. एव्हरी शिष्यवृत्ती मुलाने नाही तर मुलीने मिळवली आहे. माझी मुलगी, मला माझ्या मुलीचा अभिमान आहे.”

अंगणात जाताना मॅथ्यू तिच्याकडे पाहत प्रेमाने हसले. ती आठवण मनात घोळवत ॲनी रात्री बराच वेळ जागी होती. उघड्या खिडकीतून बाहेर बघत भूतकाळ आठवत, भविष्याची स्वप्ने पाहत होती. तेजस्वी चंद्रप्रकाशात स्नो क्वीन न्हाऊन निघाली होती. बागेच्या उतारावरील दलदलीत बेडूकांचे गाणे रंगले होते. ॲनीला त्या रात्रीचे चंदेरी, शांत सौंदर्य आणि सुगंधी शांतता नेहमी आठवत असे. दु:खाने तिच्या आयुष्याला स्पर्श करण्यापूर्वीची ती शेवटची रात्र होती; एकदा का त्याचा स्पर्श झाला की पुन्हा जीवन कधीच पहिल्यासारखे रहात नाही.

# प्रकरण 37

"मॅथ्यू - मॅथ्यू - काय काय झाले? तू ठिक आहेस ना? मॅथ्यू, तुला काही त्रास होत आहे काय ?"मारिला एकदम घाबरून ओरडली. ते ऐकून अॅनी हॉलमधून धावत आली, तिच्या हातात पांढऱ्या नार्सिससची फुले होती,—अॅनीला पांढऱ्या नार्सिससची फुलांचा सुगंध फार आवडत असे. अॅनीला, मॅथ्यू पोर्चमध्ये उभे असलेले दिसले, त्यांच्या हातात वर्तमानपत्राची घडी होती, चेहरा विवर्ण दिसत होता. अॅनीच्या हातातील फुले खाली पडली आणि ती मॅथ्यूना सावरायला पुढे धावली. त्याच वेळी मारिला पण स्वयंपाकघरातून घाईघाईने तिकडे आली पण त्या दोघींना मॅथ्यूंच्या जवळ पोहोचेपर्यंत वेळ झाला होता. त्या त्यांच्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच ते खाली कोसळले होते.

"अॅनी तो बेशुद्ध झाला आहे, जा लौकर गोडाऊन मध्ये मार्टिन आहे त्याला बोलावून आण."

मार्टिन, सध्या कामासाठी नेमलेला माणूस, नुकताच पोस्ट ऑफिस मधून आला होता. तो लगेच डा◌ॅक्टरांना बोलवायला निघाला आणि जाता जाता मि. बॅरींच्या घरी निरोप देऊन पुढे गेला. तिथे मिसेस लिंड पण काही कामानिमित्त आल्या होत्या, ते सर्वजण ग्रीन गेबल्स कडे घाईघाईने आले. अॅनी आणि मारिलाचे, मॅथ्यूना शुद्धीवर आणण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू होते.

a

मिसेस लिंडने त्यांना हळूवारपणे बाजूला केले आणि मॅथ्यूंची नाडी तपासली, नंतर हृदयावर कान लावून पाहिले. तिच्या डोळ्यात पाणी आले होते, मारिला आणि ॲनीच्या चिंताग्रस्त चेहऱ्याकडे पाहत मिसेस लिंड गंभीरपणे म्हणाल्या, “मारिला, मला वाटत नाही की आपण त्याच्यासाठी काही करू शकतो.”

“मिसेस लिंड, असे म्हणू नका, तुम्ही असा विचार करु शकत नाही की मॅथ्यू--मॅथ्यू”, पुढचे शब्द ॲनीला बोलवले नाही, एकदम ती आजारी आणि निस्तेज दिसू लागली.

“बाळा, हो, मला त्याची भीती वाटते. त्याचा चेहरा बघ. तुझ्या लक्षात येईल.”

ॲनीने मॅथ्यूंच्या निष्प्राण चेहऱ्याकडे नजर टाकली, तिथे यमराजाची पडलेली सावली तिला स्पष्टपणे दिसून आली.

जेव्हा डॉक्टर आले तेव्हा त्यांनी ‘मृत्यू तात्काळ मृत्यू’, असे निदान केले. अचानक बसलेला धक्का हे त्यांचे कारण असावे. मॅथ्यूंच्या हातातून गळून पडलेल्या पेपरातील बातमी वरून त्यांना बसलेल्या धक्क्याची सर्वांना कल्पना आली. त्या दिवशी सकाळी मार्टिनने आणलेल्या पेपरमध्ये ‘ॲबे’ बँकेच्या अपयशाचा लेखाजोखा होता.

मॅथ्यूंच्या मृत्यूची बातमी ॲव्हनलीमध्ये लगेच पसरली. दिवसभर परिचितांची आणि शेजाऱ्या पाजाऱ्यांची ये जा सुरु होती. मारिला आणि ॲनीच्या सांत्वनासाठी आणि मॅथ्यूंच्या पुढील विधींसाठी सर्वजण मदतीला धावून आले होते. आयुष्यात प्रथमच मॅथ्यू, ॲव्हनलीच्या गावकऱ्यांच्या मध्ये महत्वाची व्यक्ती बनले होते पण मृत्यूने त्यांना सर्वांपासून वेगळे पाडले होते.

रात्र झाली, ग्रीन गेबल्समध्ये अगदी शांतता होती. बैठकीच्या खोलीत मध्ये मॅथ्यू कथबर्ट यांना शवपेटीमध्ये ठेवले होते, त्यांच्या शांत चेहऱ्यावर प्रेमळपणा

a

दिसून येत होता. जणू शेतातील कामे करायची सोडून विश्रांती घेत असावेत असे वाटत होते. त्यांच्या जवळ ॲनीने फुले ठेवली होती. त्यांच्या आईने ते झाड तिच्या लग्नाच्या दिवशी त्यांच्या घराच्या बागेत लावले होते, मॅथ्यूचे त्यावर जीवापाड प्रेम होते, त्या झाडाची फुले, ॲनीने गोळा करून आणली होती, तेव्हढी एकच शेवटची गोष्ट ती त्यांच्यासाठी करू शकत होती. ॲनीच्या डोळयातील अश्रू सुकले होते. ती फक्त दु:खी चेहऱ्याने त्यांच्याकडे पाहत होती.

त्या रात्री मिसेस बॅरी आणि मिसेस लिंड ग्रीन गेबल्समध्ये थांबल्या होत्या. डायना ॲनीच्या सोबतीला झोपायला तयार होती. ॲनी तिला त्याबद्दल धन्यवाद दिले आणि तिला म्हणाली, ‘‘डायना, गैरसमज करून घेऊ नकोस पण मला एकटीला राहू दे. मला भीती वाटत नाही. ही घटना घडल्या पासून मी क्षणभरही एकटी नाही. मला शांतपणे, अगदी शांतपणे जे काही घडले आहे ते समजून घ्यायचे आहे. मला अजून समजत नाही. असे वाटते की मॅथ्यूना काहीही झाले नाही, ते आहेत, इथेच आमच्या बरोबर आहेत. पण लगेचच असे वाटते की जाऊन खूप वेळ झाला आहे आणि याच गोष्टीची भयंकर टोचणी माझ्या मनाला लागून राहिली आहे.’’

डायनाला ॲनीच्या बोलण्याचा फारसा बोध झाला नाही. मारिला आपल्या प्रिय भावाच्या अनपेक्षित मृत्यूच्या दु:खाने कोलमडून गेली होती, आयुष्याभराची सोबत सुटल्याने दु:खात बुडून गेली होती, हे दु:ख डायना समजू शकली पण ॲनीचे मूकरुदन तिला समजले नाही तरीपण ॲनीच्या इच्छेप्रमाणे तिला एकटीला सोडून निघून गेली.

एकटी असताना तरी डोळयात अश्रू येतील असे ॲनीला वाटत होते. ती मॅथ्यूसाठी अश्रू ढाळू शकत नाही, ही गोष्टच तिला भयंकर वाटत होती. मॅथ्यू, जे कायम तिच्याबरोबर दयाळूपणे वागत आले होते, अगदी कालच, शेवटच्या संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी तिच्याबरोबर एकत्र फिरले होते आज या शवपेटीत

a

बंद होते या विचाराने पण डोळयात अश्रू आले नाहीत. अंधारात खिडकीजवळ गुडघे टेकून टेकडीच्या पलीकडच्या ताऱ्यांकडे बघत प्रार्थना करत असतानाही अश्रू आले नाहीत -नाही आले अश्रू, फक्त तीच भयानक मंद वेदना झोपेपर्यंत सतत जाणवत राहिली, जरासा डोळा लागला तेव्हा कुठे नाहीशी झाली असावी.

मध्यरात्री ॲनीला जाग आली, अजूनही ती स्तब्ध आणि विमनस्क अशीच होती. संपलेल्या दिवसांची आठवण, दु:खाच्या लाटे सारखी तिच्यावर येऊन आदळली. काल संध्याकाळचा मॅथ्यूंच्या चेहरा डोळयासमोर आला, हसत हसत ते दोघे एकमेकांपासून वेगळे झाले होते. तिला त्यांचा आवाज ऐकू आला, "माझी मुलगी, मला माझ्या मुलीचा अभिमान आहे," अचानक डोळे भरून आले आणि ती हमसाहमशी रडू लागली.

मारिलाच्या कानावर तिचे रडणे पडले आणि तिला सांत्वन करण्यासाठी ती ॲनीच्या खोलीत आली.

"अगं ॲनी, बाळ रडू नकोस, आपण त्याला परत आणू शकत नाही, असे रडणे बरे नाही, मघाशी मलासुद्धा राहवले नाही. तो माझ्यासाठी नेहमीच चांगला, दयाळू भाऊ होता- देव सगळे जाणतो."

"मारिला मला रडू दे, दु:खाच्या टोचणी पेक्षा अश्रू बरे, त्यांच्या मला त्रास होत नाही. पण फक्त तुम्ही थोडावेळ इथे थांबा आणि मला तुमच्या जवळ घ्या. मी डायना सोबत थांबू शकले नाही. ती खूप चांगली आहे, दयाळू आहे पण हे दु:ख ती समजू शकणार नाही. हे दु:ख आपले आहे. आपल्या दोघींचे आहे, ती माझ्या हृदयाच्या वेदना समजू शकणार नाही. ओ मारिला! आपण मॅथ्यूंच्या शिवाय कसे जगणार? काय करणार?"

"ॲनी आता आपण दोघींच एकमेकीसाठी आहोत. तू आज इथे नसतीस तर मी एकटीने काय केले असते याचा विचार देखील मला करवत नाही. तू आमच्या

a

जीवनात आलीच नसतीस तर? ॲनी, मला माहीत आहे की मी तुझ्याशी शिस्त लावण्यासाठी काहीशी कडक वागले आहे. पण मी तुझ्यावर मॅथ्यूच्या केले तसे प्रेम केले नाही, असे असे समजू नकोस. आता मी तुला सांगू शकते, मला माझ्या मनातील गोष्टी उघड करणे मला जमत नाही पण आताची गोष्ट वेगळी आहे. आता मी तुला सांगू शकते की माझे तुझ्यावर माझ्या स्वतःच्या मुली प्रमाणे प्रेम आहे आणि तू ग्रीन गेबल्सला आल्यापासून मला आनंद, दिलासा, समाधान आणि सुख दिले आहेस."

दोन दिवसानंतर मॅथ्यू कथबर्टना त्यांच्या घरादारापासून, शेतीवाडीपासून, त्यांच्या आवडत्या बागेपासून, त्यांनी लावलेल्या झाडांपासून, दूर ॲव्हनलीच्या स्मशानभूमीत विधीवत दफन केले गेले आणि ॲव्हनली परत एकदा तिच्या शांत जीवनाकडे वळली. हळूहळू ग्रीन गेबल्समधील रोजचे व्यवहार नेहमीप्रमाणे सुरू झाले. रोजची ठरलेलीच कामे होतच होती पण प्रत्येक गोष्ट करताना आपले जवळचे काही गमावले आहे याचे दुःख जाणवत असे. ॲनीला एका नवीन दु:खाची जाणीव झाली ती म्हणजे मॅथू गेले तरी आपण आपले पुर्वीसारखे जीवन जगायला सुरुवात केली आहे. सकाळी बागेतून फेरफटका मारताना दिसणारा सूर्योदय असो वा नुकत्याच उमलू पाहणाऱ्या टपोऱ्या लाल गुलाबी कळया पाहिल्यावर ॲनी आनंदून जाते असे तसेच डायनाची ग्रीन गेबल्सची भेट म्हणजे ॲनीसाठी नेहमीच आनंददायी ठरते असे. हलका फुलका विनोद, गप्पा, चेष्टा मस्करी यामध्ये दोघींनाही वेळेचे भान राहत नसे थोडक्यात काय तर सभोवतालचे निसर्ग सौंदर्य, निखळ मैत्री यांच्या सहवासात तिच्या चित्तवृत्ती पुर्वी सारख्या फुलून येत पण नंतर तिला स्वतःचीच लाज वाटे आणि पश्च्यातापाने मन पोळून निघत असे.

a

"मॅथ्यू गेल्यावर आता या गोष्टींमध्ये आनंद मिळवणे म्हणजे मॅथ्यूंचा विश्वासघात केल्यासारखे वाटते," एका संध्याकाळी तिने मिसेस ॲलनला खेदाने सांगितले.

"मला त्याची खूप आठवण येते — आणि तरीही, मिसेस ॲलन, जग आणि जीवन मला खूप सुंदर आणि मन लुभावणारे वाटते. आज डायना काहीतरी मजेशीर बोलली आणि मला हसायला आले. जेव्हा मॅथ्यू हे जग सोडून गेले तेव्हा मला वाटले की या जन्मात पुन्हा कधीच मी हसणार नाही. पण जेव्हा असे हसू येते, आनंद होतो तेव्हा आपल्याकडून चूक झाली अशी खंत वाटू लागते."

"मॅथ्यूंना तूझा हसरा, स्वप्नाळू, कल्पना सृष्टी मध्ये रमणारा स्वभाव आवडत असे. तुला सभोवतालच्या सृष्टी वैभवाचा मनमुरादपणे आस्वाद घेत स्वच्छंदपणे ॲव्हनलीच्या जंगलात भटकंती करताना, ओढ्यावरच्या पाण्यात दंगामस्ती करतांना, डायना बॅरी बरोबर, गप्पा टप्पा, हास्य विनोद करताना पाहून मॅथ्यूना खूप आनंद होत असे. कदाचित असेही असेल की ज्या गोष्टी त्यांना स्वतःला करायला आवडल्या असत्या पण त्यांच्या बुजऱ्या स्वभावाच्या मर्यादेमुळे ते करू शकत नव्हते त्या गोष्टी, त्यांची लाडकी मुलगी सहजपणे लिलया करते आहे यांचा सुप्त आनंद त्यांना होत असावा, आता देखील तू थोडी थोडी सावरत आहेस आणि पूर्वपदावर येत आहेस हे पाहून त्यांच्या आत्म्याला निश्चितच शांती आणि समाधान होत असेल," मिसेस ॲलन हळूवारपणे ॲनीला समजावत होत्या.

"दु:खाला सामोरे जाताना हळूहळू त्यातून बाहेर पडण्याची ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. निसर्ग आपल्याला देत असलेल्या उपचारांकडे आपण पाठ फिरवू नये, त्याला त्याचे काम करू द्यावे. मला तुझ्या भावना समजतात पण हा सार्वत्रिक अनुभव आहे. आपण आपल्या प्रिय व्यक्तीच्या कायमच्या निघून गेलेले दु:ख ताजे असताना इतर गोष्टी आपल्याला आनंद देत आहेत विचाराने आपल्याला राग येतो

a

आणि जेव्हा आपल्याला जीवनातील आपले स्वारस्य आपल्याकडे परत येत असल्याचे दिसून येते तेव्हा आपण आपल्या दु:खाशी अविश्वासू आहोत असे आपल्याला वाटते.”

“मी आज दुपारी मॅथ्यूच्या थडग्यावर गुलाबाची फांदी लावण्यासाठी स्मशानात गेले होते,” ॲनी भारावलेल्या मनाने म्हणाली. “त्यांच्या आईने खूप पूर्वी स्कॉटलंडहून आणलेल्या छोट्या पांढऱ्या स्कॉच गुलाबाची ती फांदी होती; तो गुलाब मॅथ्यूंना आवडता गुलाब होता -त्याची छोटी, पांढरीशुभ्र सुवासिक फुले त्यांना त्यांनी त्यांच्या आईची आठवण म्हणून मनाशी जपली असावी. त्यांच्या थडग्याजवळ मी ते लावू शकले याचा मला आनंद वाटला-जणू काही मी त्यांची आवडती गोष्ट त्यांच्याजवळ नेऊन देत आहे असू मला वाटले. मला आशा आहे की स्वर्गात त्यासारखे स्का ॅच गुलाब असतील. कदाचित इतकी वर्षे दर उन्हाळ्यात आमच्या बागेत फुललेले पांढरे स्का ॅच गुलाब, जे त्यांना अतिशय प्रिय होते, त्या गुलाबांचे आत्मे स्वर्गात मॅथ्यूना भेटले असतील. बरं आता बराच उशीर झाला, मला घरी जायला हवे. कातरवेळी मारिलांना अगदी एकटे एकटे वाटते.”

“तू कॉलेजला गेल्यावर त्या अजून एकट्या पडतील,” मिसेस ॲलन म्हणाल्या.

ॲनीने काहीच उत्तर दिले नाही. मिसेस ॲलनना 'गुड नाईट' म्हणून, ती ग्रीन गेबल्स कडे गेली. मारिला समोरच्या दाराच्या पायऱ्यांवर बसली होती, ॲनी तिच्या बाजूला बसली. त्यांच्या मागचा दरवाजा उघडा होता, मावळतीच्या सूर्याचे सोनेरी रंग त्यावर पडून परावर्तीत होत होते. ॲनीने पिवळ्या हनीसकलच्या कळया गोळा केल्या होत्या आणि त्यांचा सुगंध तिला फार आवडत असे.

a

“तू बाहेर होतीस तेव्हा डॉक्टर स्पेन्सर येऊन गेले. ते म्हणाले उद्या शहरात डोळ्यांचे स्पेशॅलीस्ट येणार आहेत, मी एकदा त्यांच्याकडून डोळे तपासून घ्यावेत हे उत्तम. मला वाटते की मी त्यांच्या सल्ल्यानुसार शहरात जाऊन डोळे तपासून घ्यावेत. जर ते डा◌ॅक्टर मला माझ्या डोळ्यांना अनुरूप असा चष्मा देऊ शकले तर मी त्याचे आभार मानेन. मी बाहेर गेल्यावर तूझी इथे एकटे राहायला काही हरकत नाही, ना? मला मार्टिन बरोबर मला जावे लागेल. तू कपड्यांना इस्त्री करून ठेव आणि वाटल्यास बेकिंग कर."

“ठिक आहे, डायना माझ्यासोबत घरी असेल, मी कपड्यांना इस्त्री करून ठेवते आणि बेकींग पण करते. आता मी नक्कीच रुमालाला स्टार्च करणार नाही की केक मध्ये इसेन्स ऐवजी भलतेच औषध घालणार नाही,” ॲनी मजेत म्हणाली. ते ऐकून मारिला हसली आणि म्हणाली, “काय पण तू मुलगी होतीस, तू सतत चूका करत असायचीच आणि मला सतत तुला रागवावे लागत असे. अगदी झपाटल्यासारखे तुझे वागणे होते. तू तुझे केस रंगवून काय अवस्था करून घेतली होतीस, आठवत आहे काय?”

“होय ती गोष्ट मी कधीच विसरणार नाही,”आपल्या जाडजूड वेणीला स्पर्श करत ॲनी म्हणाली. “मी माझ्या केसांच्या रंगाबद्दल इतकी हळवी होते की ते आठवून आता हसायला येते. अजून माझ्या मनाच्या हळव्या कोपऱ्यात ते दु:ख लपून राहिलेले आहे पण त्यावेळी मला त्याचा आणि चेहऱ्यावरच्या बारीक डागांचा भयंकर त्रास होत असे. एक जोसी पाय सोडून बरेचशे लोक माझे केस लाल ऐवजी तपकिरी रंगाचे आहेत असे म्हणतात. जोसी कालच मला म्हणाली की माझे केस जास्तच लाल वाटत आहेत, खरोखरच तसे झाले आहे की मी घातलेल्या काळ्या कपड्यांमुळे तसे वाटत आहे कुणास ठाऊक. मी आता तिच्याकडे दुर्लक्ष करण्याचे

ठरवले आहे. एकदा तिच्या बोलण्यामुळे मी इरेला पेटून पाय मोडून घेतला होता, आता मी तिला महत्व देणार नाही.”

“जोसी, पाय कुटुंबातील व्यक्ती आहे, तेव्हा ती कठोर टीकाकार असणारच हे उघड आहे. योग्य टीका कधी कधी उपयुक्त ठरते पण निवडुंगाच्या फणी सारखी सतत ओरखडे काढणारी टीका मनावर न घेण्यातच शहाणपण आहे. बरं जोसी पुढे शिकवणार आहे काय?”

“नाही पुढचे वर्ष ती अकॅडमीमध्ये पूर्ण करणार आहे. मुडी आणि चार्ली पण अकॅडमीमध्ये राहून वर्ष पूर्ण करणार आहेत. फक्त जेन आणि रुबी शाळेत शिकवत शिकवत स्वतःचा अभ्यासक्रम पूर्ण करणार आहेत.”

“गिल्बर्ट ब्लिथ पण शाळेत शिकवणार, नाही काय?”

“होय,”ॲनीने एका शब्दात उत्तर दिले.

“आता गिल्बर्ट किती छान दिसतोय,” अनावधानाने मारिला म्हणाली.

“गेल्या रविवारी मी त्याला चर्चमध्ये पाहिले आणि तो खूप उंच आणि थोराड दिसत होता. अगदी त्याच्या वडिलांसारखा दिसत होता, तरुणपणी जाॅन ब्लीथ पण तसेच दिसत असत. जॉन ब्लीथ एक चांगला तरूण होता. खरे तर आम्ही चांगले मित्र होतो. सर्वांना आमचे लग्न होईल असे वाटत होते.”

ॲनीने एकदम चमकून वर पाहिले आणि अगत्याने विचारले, “ओ मारिला, मग पुढे काय झाले? का नाही तुमचे---"

“आमचे भांडण झाले, तो त्याविषयी बोलायला आला तरी मी त्याला माफ केले नाही. त्यावेळी मी चिडले होते, रागावले होते, मला सर्वात अगोदर त्याला धडा शिकवायचा होता नंतर मी माफ केलेही असते पण मग तो कधीच परत आला नाही. एकंदरीत सर्वच ब्लिथ कमालीचे स्वाभिमानी आहेत. मला राहून राहून या गोष्टीचे

a

वाईट वाटते की जेव्हा मला संधी मिळाली होती तेव्हाच मी त्याला माफ करायला हवे होते."

"म्हणजे मारिला तुम्ही आयुष्यात प्रेम केले आहे," ॲनी हळूच म्हणाली.

"होय, मला वाटतं तू म्हणतेस ते खरे आहे. तुला माझ्याकडे बघून असं वाटत नाही, खरे आहे ना? बाह्यरंगारून आपण लोकांना ओळखू शकत नाही आणि आता तर प्रत्येकजण, आमच्या मैत्रीला म्हण किंवा प्रेमाला आता विसरून गेले आहेत. फार काय तर मला स्वतःला देखील पार विसर पडला होता. पण मागच्या रविवारी मी गिल्बर्टला पाहिले आणि मला सगळं आठवले."

a

# प्रकरण 38

मारिला दुसऱ्या दिवशी शहरामध्ये डा ॅक्टरांना डोळे दाखवायला गेली आणि संध्याकाळी परतली. ॲन डायनाबरोबर तिच्या घरी गेली होती परत आल्यावर मारिलाला शोधण्यासाठी स्वयंपाकघरात डोकावली, मारिला टेबलाजवळ हातावर डोके टेकवून बसली होती. तिचा उदास चेहरा पाहून ॲनीच्या कसेतरीच वाटले. तिने मारिलाला कधीच विमनस्क बसलेले पाहिले नव्हते.

“मारिला, तुम्हाला खूप थकायला झाले आहे काय?”

“हो-नाही-मला माहित नाही,” मारिला खिन्नपणे आवाजाने वर बघत म्हणाली. “मला वाटते की मी थकले आहे पण मी त्याबद्दल विचार केला नाही. ते कारण नाही.”

“तुम्ही डोळयांच्या तज्ज्ञ डॉक्टरांना भेटलात काय? त्यांनी तपासणी केली काय? ते काय म्हणाले?” ॲनीने उत्सुकतेने विचारले.

“हो, मी त्यांना भेटले. त्यांनी माझे डोळे तपासले. ते म्हणाले, जर मी सर्व वाचन आणि शिवणकाम पूर्णपणे बंद केले आणि डोळ्यांना त्रास होणारे कोणतेही काम केले तर डोळ्यांना विश्रांती मिळेल. या शिवाय मला अजिबात रडून चालणार नाही तसेच त्यांनी दिलेला चष्मा सतत वापरला पाहिजे, तर कुठे माझे डोळे आणखी खराब होणार नाहीत आणि डोकेदुखी बंद होईल. पण जर या प्रकारची काळजी घेतली नाही तर मात्र सहा महिन्यांत मी नक्कीच ठार आंधळी होईन, पूर्णपणे दिसायचे बंद होईल. ॲनी, या विचाराने मला काहीच सुचेनासे झाले आहे.”

ॲनी एकदम शांत झाली, काय बोलावे आणि कसे बोलावे हे तिला समजेना. पण धीर एकवटून ठामपणे म्हणाली, “मारिला तुम्ही असा विचारही मनात

आणू नका. डॉक्टर आशावादी आहेत तुमची दृष्टी शाबूत राहू शकते आणि डोकेदुखी पण बरी होईल. त्यांनी दिलेल्या चष्म्याने तुमची डोकेदुखी बरी झाली तर ती खूप चांगली गोष्ट होईल.''

''मला यामध्ये कोणतीही आशा दिसत नाही.'' मारिला उद्वेगाने म्हणाली,''जर मला वाचन करणे, शिवणकाम करणे किंवा डोळयाला त्रास होईल असे इतर काही करणे अशक्य असेल तर मी आंधळी झाल्यासारखे होईल, असे जगणे म्हणजे जिवंतपणी मरण होय. आणि रडण्याच्या बाबतीत म्हणायचे झाले तर मी एकटी असते तेव्हा मला रडायला येते, माझा नाईलाज आहे. पण या बाबत बोलून काही उपयोग नाही. जरा मला कपभर चहा करून देतेस काय? त्यामुळे मला थोडे बरे वाटेल. मला आता सर्व नकोसे झाले आहे. पण ही गोष्ट इतर कुणाला सांगू नकोस. मला अजून लोकांची चौकशी आणि सहानुभूती नको आहे.''

जेवण झाल्यावर ॲनीने मारिलाला झोपायला भाग पाडले आणि मग ती आपल्या खोलीत गेली आणि तिच्या खोलीत एकटीच अश्रू ढाळत, जड अंतःकरणाने बसली. जेव्हा ती क्विन्स अकॅडमी मधून घरी आली होती त्यादिवशी किती आनंदात होती. तेव्हा डोळयापुढे भविष्यातील उज्ज्वल आशा फेर धरून नाचत होत्या आणि आज तिला वाटत होते की त्यानंतर कित्येक वर्षे उलटून गेली असावेत. परिस्थिती पूर्णतः बदलली होती. परंतु झोपी जाण्यापूर्वी तिच्या ओठावर हसू होते आणि मन शांत होते. तिने आपल्या कर्तव्याच्या चेहऱ्याकडे धैर्याने पाहिले आणि तिला तिथे मित्रत्वाचा भास झाला. कर्तव्याला स्वेच्छेने सामोरे गेल्यास परिस्थितीवर विजय मिळवता येतो.

मारिला डोळयांच्या डॉक्टरांना भेटून आल्यानंतर काही दिवसांनी दुपारी अंगणात एका व्यक्तीबरोबर बोलत होती. ॲनीने त्या व्यक्तीला ओळखले, ते कार्मोडी येथील जॉन सॅडलर होते. मारिलाच्या चेहऱ्यावरचे हावभाव पाहून त्यांचे

a

नेमके मारिलाबरोबर काय काम असावे याचा ॲनीला अंदाज आला नाही. ते गेल्यावर ॲनीने मारिलाला विचारले, “मारिला, मिस्टर सॅडलरला काय हवे होते?”

मारिला खिडकीजवळ बसली, डॉक्टरांच्या सल्ला धुडकावून अश्रू धारा डोळ्यातून वाहत होत्या, बोलताना आवाज रडवेला झाला होता, “त्यांनी ऐकले की मी ग्रीन गेबल्स विकणार आहे आणि त्यांना ते खरेदी करायचे आहे.”

“खरेदी करायचे! ग्रीन गेबल्स खरेदी करायचे आहे? ओ मारिला म्हणजे तुम्ही ग्रीन गेबल्स विकणार आहात असे तर म्हणत नाही!”

“ॲनी, याशिवाय दुसरा कोणता पर्याय मला दिसत नाही. मी सर्व बाजूंनी विचार केला, माझे डोळे जर नीट असते तर मी इथे एकटी राहून, माणसे नेमून काम करून घेऊ शकले असते. पण आता मी तसे करू शकत नाही. कदाचित मी माझी संपूर्ण दृष्टी गमावून बसेन आणि मला येथिल देखभाल, देखरेख जमणार नाही. ॲनी, मला कधीच वाटलं नाही की, मला माझे घर विकावे लागेल तो दिवस पाहण्यासाठी मी जिवंत असेन. जोपर्यंत कोणी ते खरेदी करत नाही तोपर्यंत आता असलेली वाईट परिस्थिती, अधिकाधिक वाईट होत जाईल. आमचे साठवलेले सर्व पैसे बॅंकेच्या दिवाळखोरी मुळे बुडाले. या वर्षीच्या शेतीच्या हंगामासाठी मॅथ्यूने उधारीवर पैसे काढले होते ते फेडणे भाग आहे. घर आणि शेती विकून, देणी भागवावीत आणि छोट्या जागेत राहायला जावे, असा सल्ला मला मिसेस रेचेलने दिला आहे आणि मीही तोच विचार करत आहे. तिच्याजवळ असणारी जागा लहान आहे आणि खूप जूनी आहे पण माझ्या मते एकटीला जगण्यासाठी ते पुरेसे असेल. तू शिष्यवृत्ती मिळवून एक चांगली गोष्ट केली आहेस. पण मला माफ कर सुट्टीमध्ये तुला ग्रीन गेबल्समध्ये राहायला मिळणार नाही, परंतु मला वाटते की सर्व व्यवस्थित पार पाडू शकशील.”

मारिला उन्मळून पडली आणि रडायला लागली. "तुम्ही ग्रीन गेबल्स विकू नका," ॲन दृढपणे म्हणाली.

"अगं ॲनी, तुला माहिती आहे की माझी सुद्धा तशी इच्छा नाही. पण मी इथे एकटी राहू शकत नाही. जर मी इथे एकटी राहिले तर दु:खाने आणि एकटेपणाने मी वेडी होईन आणि माझी दृष्टी जाईल. मला माहित आहे हे असेच होईल."

"मारिला तुम्हाला इथे एकटीला राहायला लागणार नाही. मी तुमच्या सोबत असेन. मी रेडमंडला जाणार नाही."

"रेडमंडला जाणार नाही?" आपला थकलेला चेहरा वर उचलून मारिलाने ॲनीकडे पाहिले आणि विचारले, "तुला नक्की काय म्हणायचे आहे?"

"मी जे म्हणाले तेच मी शिष्यवृत्ती स्विकारणार नाही. त्या दिवशी तुम्ही डोळ्यांच्या डॉक्टरांना भेटून आलात त्यादिवशी रात्रीच मी तसे ठरवले. तुम्ही असा अजिबात विचार करू नका की अशा प्रसंगी मी तुम्हाला एकटीला सोडून जाईन, तुम्ही माझ्यासाठी सर्वकाही केले आहे. मी सर्व गोष्टींचा विचार आणि नियोजन केले आहे. मी तुम्हाला माझ्या पुढील योजना सांगते. मिस्टर बॅरीना पुढील वर्षासाठी शेत भाड्याने द्यायचे आहे. त्यामुळे तुम्हाला शेताचा कोणताही त्रास होणार नाही. मी शाळेत शिकवणार आहे. येथील शाळेत मी अर्ज केला आहे पण ती जागा मला मिळणे अशक्य आहे. गिल्बर्टने अगोदरच त्यासाठी अर्ज केला आहे आणि विश्वस्तांनी गिल्बर्ट ब्लीथला तसे वचन दिले आहे हे मला समजले आहे. पण मला कार्मोडी शाळेत काम मिळू शकेल-मि. ब्लेअरने मला काल रात्री दुकानात तसे सांगितले. अर्थात ते ॲव्हनलीच्या शाळेएव्हढे सोईचे असणार नाही पण मला घरी राहता येईल, उन्हाळ्यात तरी मला रोज येऊन जाऊन नोकरी करणे शक्य आहे आणि हिवाळ्यात आठवड्यातून एकदा शुक्रवारी घरी येता येईल. त्यासाठी घोड्याची व्यवस्था करता येईल. मारिला मी सर्व योजना पक्की केली आहे. मी तुम्हाला रोज

काहीतरी नवीन वाचून दाखवेन आणि तुम्हाला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करेन. तुम्ही अशा थकलेल्या किंवा एकाकी नसाल. आपण दोघी ग्रीन गेबल्समध्ये आरामात आणि आनंदात राहू शकतो.''

मारिला स्वप्नात असल्यासारखे ऐकत होती. ''अग, ॲनी, तू इथे असशील तर मला बरं वाटेल. पण मी माझ्यासाठी तुला असा त्याग करू देऊ शकत नाही. ते खूप चुकीचे होईल.''

''वेड्यासारखे काही बोलू नका,'' ॲनी हसत म्हणाली. ''यामध्ये कोणताही त्याग नाही. ग्रीन गेबल्सचा त्याग करावा लागण्याइतके वाईट काहीही असू शकत नाही - नुकतेच आपण मॅथ्यूंना गमावले असताना, ग्रीन गेबल्स गमावण्याचे दुःख माझ्या सहनशक्तीच्या पलीकडले असेल. आपले प्रिय 'ग्रीन गेबल्स' आपल्यापाशीच राहिले पाहिजे. मारिला मी रेडमंडला जाणार नाही हे पक्के ठरवले आहे. मी इथेच राहून शिकवणार आहे. तुम्ही माझी थोडी सुध्दा काळजी करू नका.

''मी नेहमीप्रमाणेच महत्त्वाकांक्षी आहे. फक्त, मी माझ्या महत्वाकांक्षेचा उद्देश बदलला आहे. मी एक चांगला शिक्षक होणार आहे - आणि मी तुमची दृष्टी वाचवणार आहे. शिवाय, मला इथे घरीच अभ्यास करायचा आहे आणि मला एक छोटा कॉलेजचा कोर्स करायचा आहे. मारिला माझ्याकडे डझनभर योजना आहेत. मी एका आठवड्यापासून त्यांचा विचार करत आहे. त्यासाठी मी माझे सर्वस्व पणाला लावेन आणि माझा विश्वास आहे की त्याचे चांगले फळ मला निश्चित मिळेलच. जेव्हा मी क्विन्स अकॅडमी मधून बाहेर पडले तेव्हा मला वाटले, माझे यापुढील आयुष्य, एखाद्या सरळ रस्त्यासारखे असणार आहे त्यात मला मैलाचे दगड पार करणे एवढे एकच ध्येय असेल. पण आता मला समजले की हा रस्ता सरळ नाही त्याला बरीच वेडीवाकडी वळणे आहेत. ती वळणे कुठे कशी वळतील हे मला माहीत नाही पण हाच रस्ता माझ्यासाठी सर्वोत्कृष्ट आहे असे मी मानते. आता मला

त्या वळणाचे आकर्षण वाटत आहे. त्या वळणानंतरचा रस्ता कसा असेल? मऊ हिरवळ, स्वच्छ प्रकाश, झाडांच्या सावल्या, अप्रतिम निसर्गसौंदर्य नक्कीच पहायला मिळेल. दऱ्या डोंगर, घाटरस्ता, नद्या, ओढे नक्कीच दिसतील आणि कदाचित विशाल समुद्र देखील."

"तरीसुद्धा मला तू शिष्यवृत्ती सोडून द्यावी असे वाटत नाही," मारिला म्हणाली.

"पण तुम्ही मला आता थांबवू शकत नाही. मी आता साडे सोळा वर्षांची तरूणी आहे. मिसेस लिंडनी पुर्वी म्हटल्याप्रमाणे खेचरासारखी जिद्दी," ॲनी गोड हसली.

"मारिला, तुम्ही माझ्यावर दया दाखवू नका. तुमच्या प्रमाणेच मलाही माझ्यावर दया दाखवलेली आवडत नाही आणि त्याची आवश्यकता पण नाही. मला माझ्या प्रिय ग्रीन गेबल्स येथे राहण्याच्या विचाराने मला खूप आनंद झाला आहे. आपल्या घरावर तुमच्या आणि माझ्यासारखे इतर कोणी प्रेम करु शकणार नाहीत. म्हणून तर हे आपले घर, कायम आपल्याकडेच असायला हवे."

"ॲनी तुझ्यावर परमेश्वराची कृपा आहे," मारिला सौम्यपणे म्हणाली. तुझ्या मुळे मला नवीन जीवन प्राप्त झाले आहे असे वाटते. मला वाटते की तू कॉलेजला गेले पाहिजेस पण मला समजले आहे की ग्रीन गेबल्स सोडून दुसरीकडे कोठे राहणे माझ्यासाठी अशक्यप्राय गोष्ट आहे म्हणून मी आता तो विचार सोडून देत आहे. आता मी सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून आहे."

ॲनी शर्लीने कॉलेजला जाण्याचा विचार सोडून देऊन घरीच राहून जवळपासच्या शाळेत शिकवण्याचे काम करण्याचे ठरवले आहे ही बातमी ॲव्हनलीमध्ये सगळीकडे पसरली आणि त्यावर बरीच चर्चा सुरू झाली. बऱ्याचशा लोकांना मारिलाच्या डोळयांच्या आजाराची माहिती नव्हती त्यांना ॲनीच्या निर्णय,

मूर्खपणाचा वाटला पण मिसेस ॲलन सारख्या समंजस स्त्रीने तिच्या निर्णयाचे कौतुक केले, ते ऐकून ॲनीच्या डोळयात आनंदाश्रू तरळले. परोपकारी वृत्तीच्या, मिसेस लिंड पण मिसेस ॲलनच्या मताशी सहमत होत्या, एका संध्याकाळी त्या ग्रीन गेबल्समध्ये आल्या. उन्हाळयातील, त्या प्रसन्न उबदार संध्याकाळी, ॲनी आणि मारिला समोरच्या दारात बसल्या होत्या. संधीप्रकाशात बागेतील फुललेल्या फुलांचा सुगंध, मंद वाऱ्याच्या झुळूकेसोबत सर्वत्र पसरत होता, फुलांवर फुलपाखरे उडत होती, अशावेळी त्या दोघींना शांतपणे दाराच्या पायऱ्यांवर बसायला आवडत असे. जवळच्या दगडी बाकावर मिसेस लिंड बसल्या, त्यांच्या मागे उंच गुलाबी पिवळया रंगाची होलीहॉक्सची फुले फुलली होती, ग्रीन गेबल्सचा चढ चढून आल्याने त्यांना थोडा दम लागला होता, विश्रांती घेतल्यावर त्यांना थोडे बरे वाटू लागले. हसऱ्या चेहऱ्याने त्या म्हणाल्या, "इथे बसल्यावर मला खूपच चांगले वाटले. दिवसभर मी धावाधाव करत असते पण माझ्या भारी भक्कम वजनामुळे तर मला जास्तच दमायला होते, मारिला, तुझ्यासारख्या बारीक चणीच्या पण काटक बायकांचे बरे असते, त्यांना हा त्रास होत नाही. ॲनी, मी असे ऐकले की तू कॉलेजला जाण्याचा विचार सोडून दिलास, हे खरे आहे ना? ते ऐकून मला आनंद झाला. मुलींच्या जातीला आवश्यक तेव्हढे तुझे शिक्षण झाले आहे. आता पुढे मुलींनी पुरुषांसोबत कॉलेजला जाणे आणि लॅटिन आणि ग्रीक अशा शिक्षणावर उगाच डोकेफोड करणे, हे मला पटत नाही."

"मिसेस लिंड, पण मी लॅटिन आणि ग्रीक, दोन्हींचा अभ्यास तर करणारच आहे," ॲनी हसत म्हणाली. "मी ग्रीन गेबल्समध्ये राहून कला विषयांचा अभ्यासक्रम पूर्ण करणार आहे, जे मी कॉलेजमध्ये जाऊन शिकणार होते त्याचा मी स्वतः अभ्यास करणार आहे."

a

ते ऐकून मिसेस लिंड धास्तावलेल्या आणि म्हणाल्या, “तब्बेतीला सांभाळून रहा, इतका अभ्यास केल्याने तुला त्रास होईल, आजारी बिजारी पडशील.”

“छे! छे! मी बिल्कुल आजारी बिजारी पडणार नाही उलट सर्व योग्य प्रकारे निभावून नेऊ शकेन. मी स्वतः उगाच जादा परिश्रम करून स्वत:ला जास्त शिणवून घेणार नाही. माझा आपला मध्यम मार्ग सगळ्यात जास्त चांगला असेल. हिवाळ्यात संध्याकाळी माझ्याकडे भरपूर रिकामा वेळ असणार आहे त्यावेळी करण्यासारखे काही चांगले काम असेल, तर मला हवेच आहे. अनायसे माझा कॉलेजचा अभ्यास बाहेरून पूर्ण करणे शक्य होईल. तुम्हाला माहित आहे काय, मी कार्मोडी येथील शाळेत शिकवणार आहे.”

“ते मला माहित नाही. माझ्या अंदाजाप्रमाणे तू इथेच ॲव्हनलीच्या शाळेत शिकवणार आहेस. विश्वस्तांनी तुला नोकरी देण्याचा निर्णय घेतला आहे.”

“ओ! मिसेस लिंड!” ॲनी झटकन उठून उभी राहिली आणि म्हणाली, “हे कसे शक्य आहे? मला वाटले गिल्बर्ट ब्लिथला त्यांनी तसे वचन दिले होते.”

“हो त्यांनी तसे केले होते. पण गिल्बर्टने तू अर्ज केल्याचे ऐकल्यावर आपला अर्ज मागे घेतला. कालच मिटिंगमध्ये त्याने हे सांगितले आणि तुझा अर्ज स्विकारण्याची सूचना केली. तो व्हाइट सॅण्ड्स येथे शिकवणार आहे. नक्कीच त्याने तुला उपयोग होईल म्हणून हा निर्णय घेतला असावा, त्याला कल्पना आहे की तुला मारिलासोबत राहणे आवश्यक आहे म्हणून त्याने पूर्ण विचारांती निर्णय घेतला. खरोखरच तो दयाळू मुलगा आहे. हा निर्णय घेण्यात त्यांचा स्वार्थत्याग दिसून येतो. कारण आता त्याला व्हाइट सॅण्ड्स येथे राहण्याजेवण्यासाठी वेगळा खर्च करावा लागणार आहे. त्याला स्वतःच्या पैशाने पुढेचे शिक्षण घ्यायचे आहे तरी पण त्याने

a

हा निर्णय घेतला म्हणून विश्र्वस्तांनी तुला नोकरी देण्याचे ठरवले. थाॅमसने घरी आल्यावर मला हे सांगितले ते ऐकल्यावर मला खूप आनंद झाला.''

''पण मला नाही वाटत की मी ही नोकरी स्विकारावी. म्हणजे माझ्यासाठी गिल्बर्टने त्याग करावा ही गोष्ट मला पटत नाही,'' ॲनी तक्रारीच्या सुरात म्हणाली.

''पण आता तू त्याला थांबवू शकत नाहीस, त्याने व्हाइट सॅण्ड्स येथील शाळेत संमतीपत्र दिले आणि त्यावर सह्या सुध्दा झाल्या. आता तू ॲव्हनलीच्या शाळेत नकार दिलास तरी त्याला व्हाइट सॅण्ड्स येथील शाळा सोडता येते शक्य नाही. तेव्हा तुला ही नोकरी स्विकारावी लागेल आणि तसेही सध्या 'पाय' कुटुंबातील कोणी शाळेत जाणारी मुले नाहीत, एक जोसी काय ती शेवटची होती, तेव्हा तुला त्यांचा त्रास होणार नाही. माझे तुला मनापासून आशीर्वाद आहेत. पण हे काय? बॅरींच्या घराच्या खिडकीतून प्रकाशाची उघड झाप का बरे दिसत आहे, त्याचा अर्थ काय?''

''याचा अर्थ डायना मला तिकडे येण्यासाठी संकेत देत आहे. पूर्वी पासून आमची ही पध्दत सुरु आहे. मला माफ करा मी तिकडे पळत पळत जाणार आहे,'' असे हसून बोलत ॲनी तिकडे निघाली देखील.

ग्रीन गेबल्सच्या उतारावरून ॲनी हरणाच्या चपळाईने जी पळत सुटली ती झपाटलेल्या झाडाच्या बनात दिसेनाशी झाली. मिसेस लिंड काळजीच्या स्वरात म्हणाल्या, ''अजून ॲनीमध्ये भरपूर पोरकटपणा शिल्लक आहे.''

''तिच्यामध्ये भरपूर शहाण्या सुरत्या स्त्रीचा पोक्तपणा भरलेला आहे, पण तो दिसण्यासाठी पारखी नजर हवी,'' मारिला फटकळपणे म्हणाली. अलीकडे मारिलाचा फटकळपणा थोडा कमी झाला होता, तो अचानक जागा झाला.

त्या रात्री मिसेस लिंडनी मि. थॉमसला सांगितले, ''मारिला कथबर्टला, ॲनीमुळे आता धीर आला आहे.''

a

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ॲनी मॅथ्यूच्या थडग्यावर ताजी फुले ठेवण्यासाठी आणि स्कॉच गुलाबाच्या रोपाला पाणी देण्यासाठी ॲव्हनलीच्या स्मशानभूमीत गेली. ती बराच वेळ तिथेच थांबली, त्या छोट्याशा जागेत नीरव शांतता होती, तिथल्या झाडांची सळसळ कोणी हळूवारपणे मित्रत्वाच्या गप्पा मारत असावे अशी भासत होती, आजुबाजुला वाढलेल्या गवताची पाती वाऱ्याच्या झुळूकेसोबत मंद मंद डोलत होती. शेवटी जेव्हा एकदाची ॲनी तिथून घरी जाण्यासाठी निघाली तेव्हा, चमचमत्या पाण्याच्या तलावाच्या जवळील टेकडीच्या मागे सूर्य अस्ताला गेला होता, तिथून संधी प्रकाशात दिसणारी ॲव्हनली, जणू स्वप्नात एखादी अतिप्राचीन स्थळ पाहत आहोत अशी भासत होती. क्लोव्हरच्या शेतावरून वाहणारा ताजा वारा, एकप्रकारचा मधाळ गंध वाहून नेत होता. दिवेलागणीची वेळ असल्याने गावातील दिवे एव्हाना लुकलुक करायला लागले होते. पलीकडे समुद्रावर निळसर हिरवट रंगाचे धुके तरंगत होते, किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटांची अखंड खळखळ कानावर ऐकू येत होती. पश्चिमेला मावळतीच्या आकाशाचे सौंदर्य चमचमत्या तलावाच्या पाण्यात उतरले होते. असे अद्भुतरम्य सौंदर्यपान केल्यावर ॲनीचे हृदय उचंबळून आले आणि मनाच्या गाभ्यातून शब्द स्फुरले, “माझ्या ॲव्हनलीतील हे जग खूप सुंदर आणि बाहेरच्या दुनिया पेक्षा खूप वेगळे आहे. मला ते अतिशय प्रिय आहे आणि या जगाचा एक भाग बनून जगण्याचा अनुभव, खूप आनंददायक आहे."

टेकडीच्या निम्म्या वाटेवर, ब्लिथ यांच्या शेतातील छोट्या घराचे दार उघडून एक उंच मुलगा शीळ घालत बाहेर पडला, तो गिल्बर्ट ब्लिथ होता. ॲनीला पाहताच त्याने शीळ घालायची थांबवली आपली टोपी विनम्रपणे उचलून तिला हलकेच अभिवादन करून तो तसाच शांतपणे तिथून निघाला. तोच ॲनीने आपला हात त्याच्या पुढे केला आणि थोडीशी लाजत, थोड्या संकोचाने

म्हणाली, "गिल्बर्ट, माझ्याकरिता तू ॲव्हनलीच्या शाळेतून अर्ज मागे घेतलास याबद्दल मला तुझे आभार मानायचे आहेत. हा तुझा चांगुलपणा मला खूप आवडला आणि म्हणून मला तुला मनापासून धन्यवाद द्यायचे आहेत."

ॲनीने पुढे केलेला मैत्रीचा हात, गिल्बर्टने उत्सुकतेने हातात घेतला.

"मी काही फार मोठी गोष्ट केली आहे असे मला वाटत नाही. पण तुला छोटीशी मदत मला करता आली याचा मला आनंद वाटला. यानंतर आपण मैत्री करणार आहोत का? माझी जुनी चूक तू खरच माफ केली आहेस का?"

ॲनी हसली आणि तिचा हात मागे घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

"मी तुला तलावातून मला सुरक्षितपणे बाहेर काढलेस, त्याचवेळी माफ केले होते. पण माझी मलाच त्याची उमज पडली नव्हती. एखाद्या हट्टी बदकाप्रमाणे आपला हेका मला सोडवता आला नाही. आता मी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करते आणि कबूल करते त्यावेळी न बोलण्याने माझी चूक झाली."

"आपण चांगले मित्र बनणार आहोत," गिल्बर्ट हर्षभरीत होऊन म्हणाला."आपण चांगले मित्र बनण्यासाठीच जन्मलो आहोत. ॲनी नियतीने तुझ्या मार्गात जेव्हढे म्हणून अडथळे आणले होते ते तू पार उधळून लावले आहेस. मला कल्पना आहे की आपण एकमेकांना अनेक प्रकारे मदत करू शकतो. तू तुझे शिक्षण यापुढेही सुरू ठेवणार आहेस ना? मी पण तसेच करणार आहे. चल आपण फिरत फिरत तुझ्या घरापर्यंत जाऊया म्हणजे तुला सोबत होईल आणि आपल्याला बोलता पण येईल."

बऱ्याच वेळाने ॲनी जेव्हा स्वयंपाकघरात प्रवेशली तेव्हा मारिला तिच्याकडे कुतुहलाने पाहत होती.

"ॲनी, तुझ्यासोबत रस्त्यात कोण आला होता?"

"गिल्बर्ट ब्लिथ," ॲनीने उत्तर दिले. नंतर थोडी अवघडून म्हणाली. "मला तो बॅरीच्या टेकडीवर भेटला."

"असा विचारही माझ्या मनात आला नाही की तू आणि गिल्बर्ट ब्लिथ इतके चांगले मित्र असाल की तू त्याच्याशी अर्धा तास गप्पा मारत गेटवर उभी राहशील," मारिला गमतीने हसली.

"आम्ही आतापर्यंत मित्र नव्हतो, पण एकमेकांचे चांगले शत्रू होतो. पण आम्ही ठरवले आहे की भविष्यात चांगले मित्र बनण्यात अधिक समजूतदारपणा असेल. खरंच मी तिथे अर्धा तास उभी होते? मला वाटले फक्त काही मिनिटे झाली असावीत आणि तसेही मारिला आम्हाला पांच वर्षातील हरवलेल्या संवादाची सांगड घालायची आहे."

त्या रात्री ॲनी बराच वेळ तिच्या खिडकीजवळ बसली होती सोबत आनंदी विचार होते. चेरीच्या झाडाच्या फांद्या वाऱ्यावर मंदपणे डुलत होत्या. बागेतील पुदीन्याचा वास खिडकीतून आतपर्यंत येत होता. आकाश तारे लखलखत होते.

क्विन्स अकॅडमीमधून आल्यानंतर ॲनीचे विस्तारलेले क्षितीज काहीसे संकोचले होते. तरी पण ती जाणून होती पायाखालची वाट जरी अरुंद असली तरी त्या वाटेवर आनंदाच्या फुलांचा बहर येऊ शकतो. प्रामाणिकपणे काम करण्याची तिची तयारी होती, तिच्या आशा आकांक्षा वाजवी होत्या आणि गिल्बर्टच्या अनुकूल मैत्रीचा आनंद तिला भरभरून मिळणार होता. जरी रस्ता सदैव वळणावळणाचा असला तरी तिची कल्पनाशक्ती सदैव तिच्या सोबत असणार होती आणि तिचे स्वप्नांचे आदर्श जग कोणी हिरावून घेऊ शकत नव्हते.

"देव  स्वर्गात आहे म्हणून जगामध्ये सर्व काही ठीक आहे," ॲन हळूवारपणे कुजबुजली.

----The End------